



मि. इल्यिन
ये. सेगाल

माणूस महाबलाढ्य कसा बनला

तृतीय कालखंड

आलीगॉसीन — मीओसीन

३७००००० वर्षांपूर्वी — २६०००००० वर्षांपूर्वी



प्लीओपिथेक — प्राचीन सुभेदार — द्रिओपिथेक — ओरीओपिथेक


शास्त्रज्ञांनी पृथ्वीच्या इतिहासाची पाच युगांमध्ये विभागणी केली आहे. आपण राहतो त्या युगाला कैनोझोइक–आधुनिक जीवनाचे युग–म्हणतात. ह्या युगाची मर्यादा आत्तापर्यंत ६५-६७ दशलक्ष वर्षे भरली आहे आणि त्यापूर्वी मेझोझोइक–मध्यजीवनाचे युग–आणि पालेंओझोइक–प्राचीन जीवनाचे युग–ही युगे घडली. सर्वांत जुनी युगे प्रोतेरोझोइक–प्रथम जीवनाचे–आणि आर्केइक–आदिजीवन. ह्या आदिजीवनाच्या युगाच्या अंतापासून, म्हणजे अत्यंत साध्या प्राणीजीवनाच्या उदयापासून, आपण ३ महापद्म वर्षे दूर

चतुर्थ कालखंड

प्लीआतसेन

प्लेस्तोएन

१२०००००० वर्षांपूर्वी | ३०००००० वर्षांपूर्वी



रामापिथेक   ऑस्ट्रेलोपिथेक आफ्रिकी   ऑस्ट्रेलोपिथेक सार्वत्रिक   ऑस्ट्रेलोपिथेक विकसित

आहोत. प्रत्येक युगाची अनेक कालखंडांमध्ये विभागणी केली आहे. आधुनिक युगाचे कालखंड: चतुर्थ कालखंड अथवा मानुष्यक, जेव्हा माणूस अस्तित्वात आला; ह्या काळात युरोपात आणि सैबेरियात प्राचीन हत्ती वावरत होते; तृतीय कालखंड, सस्तन प्राण्यांच्या "काळाचा" आरंभ; नूतन कालखंड; पुनरुत्थानाचा कालखंड.

ह्या पुस्तकाच्या लेखकांविषयी

मिखायल इल्यिन (१८९५-१९५३) सोविएत वैज्ञानिक-सृजनशील साहित्याच्या संस्थापकांपैकी एक होते. १९४० साली त्यांनी त्यांची पत्नी एलेना सेगाल ह्यांच्या सहकार्याने 'माणूस महाबलाढ्य कसा बनला' हे पुस्तक लिहिले. ह्या पुस्तकाला सर्वत्र प्रचंड यश लाभले. अत्यंत अवघड विषयाला साध्या आणि सुबोध शैलीत सांगण्याची किमया लेखकांना साध्य झाली होती, ह्याचे हे प्रतीक. गेल्या काही दशकांच्या काळात शास्त्रज्ञांनी — मानववंशशास्त्रज्ञांनी अनेक नवे शोध लावले आहेत. लेखकांनी मांडलेले काही सिद्धांत जरी कालबाह्य बनले असले, तरीही पुस्तक खात्रीशीर, सत्यनिष्ठ आणि ज्ञानरंजक राहिले आहे. मानवी इतिहासाच्या व संस्कृतीच्या उदयाचे वास्तव चित्र ते सादर करते.

मि. इल्यिन
ये. सेगाल

माणूस महाबलाढ्य कसा बनला

राढुगा प्रकाशन
मॉस्को

अनुवाद : अनिल हवालदार
चित्रकार: यू. कोपिलोव

М. Ильин, Е. Сегал
КАК ЧЕЛОВЕК СТАЛ ВЕЛИКАНОМ
на языке маратхи

Ilyin M., Segal Ye.
HOW MAN BECAME A GIANT
in Marathi

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-000836-0

अनुक्रमणिका

प्रकरण चौथे

प्रकरण पाचवे

प्रकरण सहावे

प्रकरण सातवे

प्रकरण आठवे

प्रकरण नववे

प्रकरण दहावे

प्रकरण अकरावे

प्रकरण बारावे

ह्या पुस्तकाचा विषय अलेक्सेय माक्सिमोविच गोर्की यांनी सुचवला. ते म्हणाले:

"मी ह्या पुस्तकाचा आरंभ कसा केला असता ठाऊक आहे? असीम अंतरिक्षात तुम्ही आहात अशी कल्पना करा. तारे, धूसरता... त्या धूसरतेत खोलवर कुठेतरी सूर्य तळपतोय. सूर्यापासून ग्रह अलग होतात. एका छोटया ग्रहावर वस्तुमात्र सजीव बनते, त्याला स्वतःची जाणीव होऊ लागते. माणूस उदयाला येतो..."

माणूस कसा निर्माण झाला, काम आणि विचार करायला तो कसा शिकला, अग्नीवर व लोखंडावर त्याने वर्चस्व कसे मिळविले, निसर्गावर सत्ता गाजविण्यासाठी तो कसा झटला, जगाचे ज्ञान करून त्याची फेररचना त्याने कशी केली, ह्याची कहाणी लिहिण्याचे काम लेखकांनी १९३६ साली हाती घेतले.

माणूस – महाबलाढ्य

पृथ्वीवर एक महाबलाढ्य आहे.

त्याचे हात असे आहेत, जे सहजपणे आगगाडीचे वाफेचे इंजिन उचलतात.

त्याचे पाय असे आहेत, की एका दिवसात तो हजारो किलोमीटर धावू शकतो.

त्याचे पंख असे आहेत, की सर्व पक्ष्यांपेक्षा अधिक उंचावर, ढगांवरून तो उडू शकतो.

त्याचे कल्ले असे आहेत, की सर्व माशांपेक्षा अधिक चांगल्या रीतीने तो पाण्याखालून पोहू शकतो.

त्याचे डोळे असे आहेत, जे अदृश्य गोष्टी पाहू शकतात आणि असे कान आहेत, जे जगाच्या दुसऱ्या टोकाचे बोलणे ऐकू शकतात.

तो एवढा ताकदवान आहे, की डोंगरांना बोगदे पाडू शकतो आणि धबधब्यांना हवेतच अडवू शकतो

स्वतःच्या इच्छेनुसार तो जगाची फेररचना करतोय, जंगलांची लागवड करतोय, समुद्रांना जोडतोय, वाळवंटांमध्ये पाणी आणतोय.

कोण आहे हा महाबलाढ्य?

हा महाबलाढ्य – माणूस!

माणूस महाबलाढ्य कसा ठरला, पृथ्वीचा मालक कसा बनला?

आमच्या पुस्तकात आम्ही ह्याबद्दलची हकीकत सांगणार आहोत.

प्रकरण पहिले

अदृश्य पिंजऱ्यात

एक असा काळ होता जेव्हा माणूस महापराक्रमी नव्हता, सामान्य खुजा होता, निसर्गाचा मालक नव्हता, तर त्याचा नम्र सेवक होता.

जंगलातील कोणत्याही श्वापदाची, हवेतील कोणत्याही पक्ष्याची, निसर्गावर जेवढी कमी सत्ता होती, त्यांचे जेवढे कमी स्वातंत्र्य होते, तेवढीच माणसाची कमी सत्ता होती, कमी स्वातंत्र्य होते.

एक म्हण आहे: पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र.

पण पक्ष्याला स्वतंत्र म्हणता येईल काय?

खरे आहे, त्याला पंख असतात. पंखांच्या मदतीने कुठे हवे तिथे जाता येते—जंगलांपलिकडे, समुद्रांपलिकडे, पर्वतांपलिकडे. शरदाच्या मोसमात अधिक उबदार प्रदेशांकडे उडत जाणाऱ्या सारस पक्ष्यांचा आपल्यापैकी कुणी हेवा केलेला नाही? निरभ्र आकाशात खूप उंचावरून सारसांचा थवा उडत जात असतो. माणसे खाली उभी असतात, मान उंच करून पहात असतात आणि विचार करतात: "वा, इच्छा असेल तिकडं पक्षी उडताहेत!"

पण खरेच असे आहे काय? पक्ष्यांना प्रवासाची आवड असते म्हणून ते दूर दूर उडत जातात काय? नाही, मजेसाठी ते उडत जात नाहीत, तर गरजेपोटी जातात. स्थलांतराची ही सवय पक्ष्यांना हजारो वर्षांच्या काळात जीवनसंघर्षापायी पिढ्यान्‌पिढ्यांमधून प्राप्त झाली.

पक्षी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी एवढ्या सहज उडत जातो, की जगाच्या प्रत्येक भागात प्रत्येक प्रकारचा पक्षी असणार, असे वाटणे साहजिक आहे.

पण असे असते तर आमच्या पाईन झाडांच्या रायांमध्ये आणि भोजवृक्षांच्या प्रदेशांमध्ये हिरव्या-तांबड्या पिसांचे पोपट आम्हाला भेटले असते. जंगलातून भटकताना डोक्यावर चंडोलांच्या परिचित लकेरी ऐकल्या असत्या. पण असे घडत नाही आणि असे घडणे शक्य नाही, कारण पक्षी जेवढे वाटतात तेवढे पूर्ण स्वतंत्र नाहीत. प्रत्येक पक्ष्याची जगात स्वतःची ठरलेली जागा आहे. एक तैगा प्रदेशात राहतो, दुसरा स्तेपमध्ये, तर तिसरा—समुद्रकिनाऱ्यावर.

गरुडाचे पंख खूप बळकट असतात. पण स्वतःला राहण्यासाठी जागा निवडताना तो कुठेतरी नकाशावरील सीमारेषेच्या पलिकडे दूरवर उडत जात नाही. सोनेरी गरुड स्वतःचे प्रचंड घरटे

सपाट, वृक्षविहीन स्तेप प्रदेशात बांधणार नाही. तसेच, स्तेपमधील गरुड जंगलाच्या मध्यभागी घरटे करणार नाही.

जंगल आणि स्तेप यांना एका अदृश्य भिंतीने अलग केलेले असते. त्या भिंतीला ओलांडणे प्रत्येक श्वापदाला अथवा पक्ष्याला जमतेच असे नाही.

पिंगट ग्राऊज पक्षी, किंगलेट, खारी असे अस्सल जंगलवासी तुम्हाला स्तेपमध्ये भेटणार नाहीत. आणि बस्टार्ड पक्षी अथवा उड्या मारणारे जेर्बोआ उंदरांसारखे स्तेपवासी जंगलात भेटणार नाहीत.

शिवाय, प्रत्येक जंगलाच्या, प्रत्येक स्तेपच्या, आतमध्ये अदृश्य भिंतींचे अडथळे असतात. त्या भिंतींआड छोट्या छोट्या जगांना अलग केलेले असते.

जंगलातील फेरफटका

जेव्हा तुम्ही जंगलातून भटकत असता, तेव्हा अदृश्य भिंतींना थेट भेदून चालत जाता. आणि जेव्हा झाडांवर चढता, तेव्हा तुमचे डोके अनेक अदृश्य छतांना भेदून जात असते. सबंध जंगलाची एखाद्या प्रचंड घराप्रमाणे मजल्यांमध्ये आणि गाळ्यांमध्ये विभागणी केलेली असते. मात्र हे मजले व गाळे तुम्हाला दिसत नाहीत.

एवढे मात्र खरे, जंगलातून भटकत असताना तुमच्या ध्यानात येते, की जंगल बदलत असते. फर वृक्षांच्या जंगलापुढे पाईनचे जंगल येते. पाईनची काही झाडे खूप उंच, तर काही बुटकी. एके ठिकाणी पायांखाली हिरवे शेवाळे चुरचुरते, तर दुसऱ्या ठिकाणी उंच गवत असते, तिसऱ्या जागी पांढऱ्या दगडफुलांनी जमीन झाकून गेलेली असते.

गावाबाहेरील दाचा*मध्ये आठवड्याची सुटी घालविणाऱ्या शहरवासी माणसाच्या दृष्टीने हे एकच जंगल असते. पण अरण्यरक्षकाला विचारलेत, तर तो तुम्हाला सांगील – इथे एक नव्हे, पूर्ण चार जंगले आहेत. ओलसर खळग्यात मऊ दाट शेवाळाच्या गालीच्यावर फर वृक्षांची राई उभी आहे. पुढे, वाळूच्या उतारावर, हिरव्या शेवाळाने माखलेल्या पाईनची राई व भोवताली ब्लूबेरी-बिलबेरीच्या झुडूपांची गर्दी. आणखी वरती, वाळूच्या टेकड्यांवर – पांढऱ्या शेवाळमाखल्या पाईनची राई. त्यापुढील परत ओलसर भागात – गवताळ पाईन-राई.

नकळत तुम्ही तीन भिंती छेदून गेलात. ह्या तीन भिंती जंगलाची चार छोट्या जगांमध्ये विभागणी करतात.

घराप्रमाणे जंगलात जर बिऱ्हाडकरूंच्या नावांच्या पाट्या टांगलेल्या असत्या, तर फर वृक्षांच्या जंगलात तुम्हाला झाडा-झाडांवर अशा पाट्या आढळल्या असत्या: "श्री. क्रॉसबिल,"

* दाचा – शहराबाहेरील रशियन धर्तीचे लाकडी घर. – अनु.

जंगलातील रहिवासी – सुतारपक्षी आणि क्रॉसबिल

"श्री. मिस्किन," "श्री. किंगलेट," "श्री. तीन बोटांचे सुतार"... पानांच्या राईत तुम्ही अगदी वेगळी नावे वाचली असती: "श्री. हिरवे-सुतार", "श्रीमती गोल्डफिंच", "कु. नील-टिटमाऊस", "श्री. माशीभक्षक", "श्रीमती चिफ-चाफ", "श्री. काळटोपे" आणि इतर अनेक.

प्रत्येक जंगलाची अनेक मजल्यांमध्ये विभागणी झालेली असते.

पाईनच्या जंगलात दोन आणि काहीवेळा तीन मजले असतात. खालच्या मजल्यावर शेवाळे किंवा गवत. मधल्या मजल्यावर झुडूपे. वरच्या मजल्यावर – पाईन.

ओक वृक्षांच्या जंगलात चक्क सात मजले असतात. सर्वात वरच्या मजल्यावर ओक, ॲश, लिंडेन आणि मेपलच्या झाडांचे शेंडे आकाशात घुसलेले असतात. त्यांचे कुरळे शेंडे जंगलावर छप्पर धरतात: उन्हाळयात हिरवे, शरदात सोनेरी-लाल, रंगीबेरंगी. खालती, ओकच्या शेंड्यांच्या अर्ध्या वाटेवर, डोंगरी ॲशच्या, जंगली सफरचंदांच्या आणि नासपातींच्या झाडांचे शेंडे डोलत असतात.

त्यांच्याखाली वेली-पानांची दाट झुडूपे: बदाम, हॅथॉर्न, लंबूटांगी झाडे. त्यांच्याखाली गवत

आणि फुले वाढत असतात. पण त्यांचे वेगवेगळे थर असतात. सर्वांत उंच असतात घंटासुराची फुले. त्यांच्याखाली नेचरींमध्ये लिली आणि काऊ-व्हीट वाढतात. त्याहून खाली नीलपुष्पी आणि जंगली स्ट्रॉबेरी वास करतात. सर्वांत खाली जमिनीवर पानशेवाळांची पखरण असते.

जमिनीखाली तळघर आहे. तिथे जंगलातील गवतांची आणि झाडांची मुळे घुसलेली असतात.

जंगलातील प्रत्येक मजल्यावर वेगवेगळे रहिवासी असतात. झाडाच्या उंच शेंड्यावरील घरट्यात पावशा राहतो. त्याच्याखाली ढोलीत सुतारपक्षी राहतो. झुडूपांमध्ये ब्लॅक-कॅप पक्ष्याची वस्ती असते. जमिनीवर खालच्या मजल्याचा रहिवासी भटकतो-रानकोंबडा. जमिनीखाली, तळघरात, जंगली उंदीर त्यांच्या वाटा व बिळे खोदतात.

ह्या प्रचंड इमारतीमधील बिऱ्हाडे वेगवेगळ्या प्रकारची असतात. वरच्या मजल्यांवर भरपूर उजेड आणि कोरडी हवा. खालच्या मजल्यांवर अंधार आणि ओल. ह्या घरात काही शीत-गाळे असतात, ज्यांच्यात फक्त उन्हाळ्यात राहणे शक्य होते. काही उबदार गाळे असतात, ज्यांच्यात वर्षाचे बाराही महिने राहता येते.

जमिनीतील बीळ म्हणजे उबदार गाळा. दीड मीटर खोलवर असलेल्या बीळातील तपमान हिवाळ्यात मोजून पाहिले. असे आढळले की, बाहेर शून्याखाली १८° सें. तपमान होते, तेव्हा बीळातील तपमान शून्यावर ८° सें. होते .

ढोलीत खूप थंड असते. हिवाळ्यात ढोलीमध्ये गोठून जाल. पण उन्हाळ्यात मात्र तेथे आराम वाटतो. विशेषतः "रात्रपाळी"साठी घरातून बाहेर पडणाऱ्या आणि दिवसा अंधाऱ्या कोपऱ्यात डुलक्या काढणाऱ्या वटवाघुळांना व घुबडांना ढोली सोयीस्कर असते.

माणसे वारंवार बिऱ्हाडे बदलतात, ह्या घरातून त्या घरात जातात, मजले बदलतात. पण जंगलात मात्र एका मजल्यावरील रहिवाशाला दुसऱ्या मजल्यावरच्या बिऱ्हाडकरूशी जागेची बदली करणे खूप अवघड जाते.

रानकोंबडा स्वतःचे दमट आणि अंधारे घर सोडून कोरड्या आणि उजेडाच्या पोटमाळ्यावर रहायला जाणार नाही. आणि पोटमाळ्यावर राहणारा पावशा स्वतःचे घरटे जमिनीवर, झाडांच्या पायांपाशी, कधीही बांधणार नाही.

जंगलातील कैदी

कल्पना करा, खारीने स्वतःचे घर जेर्बोआशी बदलायचे ठरविले. खार जंगलात राहते, तर जेर्बोआ स्तेपमध्ये अथवा वाळवंटात राहतो.

खारीचे घर उंच झाडावर ढोलीत असते, किंवा फांद्यांमध्ये असते. पण जेर्बोआ तळघरात राहतो, बीळामध्ये.

आता जेर्बोआने नव्या घरात जायचे ठरविले, तर त्याला झाडावर चढणे प्राप्त आहे. पण हे तो करू शकत नाही, कारण झाडावर चढण्यास त्याचे पंजे मुळीच लायक नाहीत.

खार जमिनीखाली राहू शकणार नाही. तिच्या सर्व हालचाली व सवयी झाडावरील जीवनाला अनुसरून आहेत.

तिच्या शेपटीवर आणि पंजांवर एकदा नजर टाकली, म्हणजे ती कुठे राहते हे सहज सांगता येते.

खारीचे पंजे अशा तऱ्हेने बनलेले आहेत, की फांद्या पकडणे, दाणे तोडणे अथवा कठीण कवचीची फळे फोडणे तिला सोपे जाते. तिची शेपूट म्हणजे साक्षात हवाई छत्री. एका फांदी-वरून दुसऱ्या फांदीवर उडी मारताना हवेत शरीराचा तोल सांभाळायला तिला शेपटीची मदत होते. वेड्यावाकड्या उड्या मारताना शेपूट तिला मदत करते व पाठलाग करणाऱ्या मार्टिन-पासून तिचा जीव वाचविते.

स्तेपमध्ये राहणाऱ्या जेर्बोआचे पंजे व त्याची शेपूट अगदी वेगळ्या प्रकारची असतात. उघड्या स्तेपमध्ये लपण्यासाठी कुठे झुडूप आढळत नाही, किंवा वर चढून बसायला झाड सापडत नाही. शत्रूपासून जीव वाचविण्यासाठी धावले पाहिजे, गायब झाले पाहिजे, जमिनीखाली दडले पाहिजे. जेर्बोआ तसेच करतो. घुबडाला किंवा गरुड-घुबडाला डोक्यावर घिरट्या घालताना पाहताच तो त्यांच्यापासून उड्या मारीत दूर पळतो आणि जमिनीखाली बीळात नाहीसा होतो. उड्या मारताना जमिनीवर रेटा द्यायला तो मागील पायांचा वापर करतो व पुढील पायांनी जमिनीत बीळ खणतो. शत्रूपासून लपून रहायला तो जमिनीखालील बीळाचा वापर करतो. उन्हाळ्यात उष्णतेपासून आणि हिवाळ्यात थंडीपासून स्वतःचे रक्षण करायला त्याला बीळ उपयोगी पडते.

आणि शेपटी? जेर्बोआची शेपटी त्याच्या पंजांची विश्वसनीय मदतनीस. जेव्हा जेर्बोआ मागील पायांवर बसून चौफेर न्याहाळत असतो, तेव्हा शेपटीचा त्याला आधारासाठी उपयोग होतो, तिसऱ्या पायाप्रमाणे उपयोग होतो. जेव्हा तो उड्या मारतो तेव्हा शेपटी सुकाणूप्रमाणे त्याच्या उड्यांना दिशा द्यायला मदत करते. जर शेपटी नसती, तर जेर्बोआ हवेत कोलांटी उडी मारून जमिनीवर दाणदिशी आपटला असता.

म्हणून जर जेर्बोआला व खारीला घरांची अदलाबदल करायची असेल (जंगलाऐवजी स्तेप आणि ढोलीऐवजी बीळ), तर त्यांना शेपट्यांची व पंजांचीसुद्धा अदलाबदल करावी लागेल.

जर आपण जंगलातील आणि स्तेपमधील दुसऱ्या रहिवाशांची ओळख करून घेतली, तर असे दिसून येईल की, त्यांच्यापैकी प्रत्येकजण स्वतःच्या जागेशी एका अदृश्य साखळीने बांधला गेलेला आहे आणि ती साखळी तोडणे तेवढे सोपे नाही.

उदाहरणार्थ, रानकोंबडा जंगलाच्या खालच्या मजल्यावर राहतो, कारण त्याचे आवडते खाद्य तळघरात असते. त्याची लांब चोच जमिनीखालील किडे-अळ्या पकडण्यास समर्थ असते.

रानकोंबडा झाडावर बसून काही करू शकणार नाही. म्हणून झाडाच्या शेंड्यावर रानकोंबडा तुम्हाला कधी दिसणार नाही.

पण तीन बोटांचा अथवा मोठा रंगीबेरंगी सुतार पक्षी जमिनीवर क्वचित दिसेल. एखाद्या फरच्या अथवा भोजाच्या बुंध्याभोवती आख्खा दिवस सुतार पक्ष्याची टोक-टोक चालू असते.

कशासाठी तेथे तो ठोकत असतो? बुंध्यावर अथवा बुंध्याच्या आत तो काय शोधत असतो?

जर आपण फरच्या झाडाच्या बुंध्याची साल थोडीशी सोलून काढली, तर तिच्या आत अनेक वेड्यावाकड्या रेषा सर्व दिशांना गेलेल्या दिसतात. ह्या वाटा फरच्या आत कायम राहणाऱ्या आश्रित किड्याने लाकूड कुरतडल्यामुळे बनलेल्या असतात. प्रत्येक वाकड्या रेषेच्या अखेरीस एक छोटा खळगा असतो. त्या प्रत्येक खळग्यात किड्याच्या कोषाचे अळीत रूपांतर होते व अळीमधून परत नवा किडा निर्माण होतो. किड्याने फरच्या झाडाशी स्वतःचे जीवन जुळवून घेतलेले आहे. आणि सुतार पक्ष्याने किड्याशी जुळवून घेतलेय. सुतार पक्ष्याची बळकट चोच सहजपणे झाडाची साल सोलून काढते. आणि त्याची जीभ खूप लांब व लवचिक असल्यामुळे वेड्यावाकड्या रेषांमधून वळवळत ती किड्याच्या कोषाचा अचूक वेध घेते.

तर अशी साखळी बनते: फर वृक्ष — साल खाणारा किडा — सुतार पक्षी.

ही अनेक साखळ्यांपैकी एक साखळी आहे, जी सुतार पक्ष्याला झाडाशी व जंगलाशी जखडून ठेवते.

सुतार पक्षी झाडावर स्वतःचे खाद्य मिळवतो. तो केवळ साल-किडे खात नाही, तर इतर कीटक आणि त्यांचे कोषही फस्त करतो. हिवाळ्यात तो पाईनच्या शंकू-फळांमधील बिया मोठ्या कौशल्याने खातो. बुंध्याच्या आणि फांदीच्या बेचक्यात तो फळ अडकवतो व फोडतो. बुंध्यावर चोच मारून तो ढोली बनवतो आणि ढोलीत घरटे करतो. त्याची ताठ शेपूट आणि बळकट नख्या बुंध्यावरून चढ-उतार करायला त्याला मदत करतात. मग अशा स्थितीत सुतार पक्षी झाडाला सोडून कसा जाईल?

म्हणजे असे आढळते की, सुतार पक्षी आणि खार जंगलनिवासी नव्हेत, तर जंगलचे कैदी आहेत.

मासा किनाऱ्यावर कसा आला

जंगलचे छोटे जग — जगाला बनविणाऱ्या अनेक छोट्या जगांपैकी एक.

पृथ्वीगोलावर केवळ जंगले आणि स्तेप नाहीत; पर्वत आहेत, तुंद्रा प्रदेश, सागर आणि सरोवरेसुद्धा आहेत.

प्रत्येक पर्वतात एक अदृश्य भिंत असते व ती एका छोट्या जगापासून दुसऱ्या छोट्या जगाला विभक्त करते.

प्रत्येक सागरात अदृश्य छतांनी पाण्याखालचे मजले अलग केलेले असतात.

ऐन किनाऱ्यापाशी, लाटांच्या प्रदेशात, असंख्य शिंपल्यांनी खडकांना झाकून टाकलेले असते. हे शिंपले खडकांना घट्ट चिकटून बसलेले असतात आणि महाभयंकर सागरी तुफानांमध्ये-सुद्धा ते खडक सोडत नाहीत.

अधिक खोलवर, ऊन्हात चमचमणाऱ्या पाण्यात, हिरव्या-तपकिरी समुद्रलव्हाळयांमध्ये रंगीबेरंगी मासे सुळकांडचा मारीत असतात, पारदर्शी पाणफुले तरंगत असतात व तारामासे पाण्याच्या तळाशी संथपणे सरपटत असतात पाण्यातील खडकांवर विलक्षण प्राणी वाढत असतात. वनस्पतींप्रमाणे ते एका जागी स्थिर राहतात. खाद्य मिळविण्यासाठी भटकण्याची त्यांना गरज भासत नाही. त्यांच्या तोंडात खाद्य आपोआप येऊन पडते. दुहेरी मानेच्या बरणीची आठवण करून देणारे लाल ॲसिडिया पाण्याबरोबर स्वतःचे खाद्य चोखून घेतात. चकचकीत सागरी ॲनीमोन स्वतःच्या पाकळयांसारख्या नांग्यांनी जवळून जाणाऱ्या माशांना पकडून गट्ट करतात.

सागराच्या अगदी खालच्या, अंधाऱ्या मजल्यावर अगदी वेगळे जग आहे. तेथे रात्रीचे दिवसात कधीच रूपांतर घडत नाही. तेथे नेहमीच अंधार असतो. महासागरांच्या तळांशी प्रकाश नाही, म्हणजे तेथे पाण-वनस्पती नाहीत, कारण पाण-वनस्पती वाढायला प्रकाशाची गरज असते.

महासागराचा तळ म्हणजे अंधारी स्मशानभूमी. प्राण्यांचे आणि वनस्पतींचे अवशेष तेथे येऊन पडतात.

ओल्या गाळातून दहा नांग्यांचे खेकडे भटकत असतात. रुंद जबडयांचे मासे अंधारात पोहत असतात. काहींना तर मुळी डोळेच नसतात. काहींना दोन दूरदर्शक यंत्राप्रमाणे डोळे लोंबत असतात. काहींच्या अंगावर आगीचे चमकते ठिपके दिसतात. विजेच्या प्रकाशाने गवाक्षे चमकणाऱ्या छोटया बोटींप्रमाणे ते भासतात. काही माशांच्या डोक्यांवरील उंच टेंगळामधून दीपस्तंभासारखा प्रकाश उजळत असतो.

आपण ज्या जगात राहतो, त्याच्यापेक्षा महासागरतळाचे विलक्षण जग अगदी वेगळे आहे.

आणि सागरकिनारीचे, उथळ पाण्यातील जगसुद्धा जमिनीवरील जगापेक्षा वेगळे आहे. वस्तुतः फक्त एका रेषेने, किनाऱ्याच्या रेषेने, ह्या दोन जगांना अलग केलेले आहे.

एका जगाचा रहिवासी दुसऱ्या जगात जाऊन राहू शकतो काय? मासा समुद्रातून बाहेर पडून जमिनीवरील रहिवासी बनू शकेल काय?

हे अशक्य आहे. कारण मासा पाण्यातच जगू शकतो. जर त्याला किनाऱ्यावर रहायचे असेल, तर कल्ल्यांऐवजी त्याला फुफ्फुसे असणे आवश्यक आहे व पंखाऐवजी पाय. समुद्राऐवजी जमिनीवर घर करणे माशाला तेव्हाच शक्य होईल, जेव्हा तो मासा असणार नाही!

पण मासा हा मासा नसणे शक्य आहे?

हा प्रश्न जर तुम्ही शास्त्रज्ञांना विचारला, तर ते तुम्हाला सांगतील की, अब्जावधी वर्षांपूर्वी काही प्रकारचे मासे खरोखरीच किनाऱ्यावर रहायला आले होते व मासा म्हणून त्यांचे अस्तित्व संपले होते. पाण्यातून जमिनीवर जाण्याचे हे स्थित्यंतर एक-दोन वर्षात घडले नव्हते, तर त्यासाठी दशलक्षावधी वर्षांचा अवधी लागला होता.

हळूहळू कोरडया होत चाललेल्या ऑस्ट्रेलियातील नद्यांमध्ये शिंगा-मासा आढळतो. त्याची पोहण्याची फुग्याची पिशवी फुफ्फुसासारखी असते. जेव्हा नद्या आटतात आणि केवळ चिखलाच्या डबक्यांच्या स्वरूपात राहतात, तेव्हा बाकी सर्व जातींचे मासे मरतात व त्यांच्या कुजणाऱ्या शरीरांमुळे पाणी प्रदूषित होते. त्या कोरडया मोसमात फक्त शिंगा-मासा जगतो, कारण त्याला कल्ल्यांबरोबरच फुफ्फुसही असते आणि हवेची गरज भासते तेव्हा तो केवळ त्याचे डोके पाण्याबाहेर काढतो.

आफ्रिकेत आणि दक्षिण अमेरिकेत काही जातींच्या माशांना पाण्याशिवाय जगता येते. दुष्काळी परिस्थितीत ते स्वतःला गाळात गाडून घेतात आणि पावसाळी मोसम परत सुरू होईपर्यंत फुफ्फुसांनी श्वसन करीत स्तब्ध पडून राहतात.

म्हणजे माशांच्या फुफ्फुसांचा विकास होऊ शकला.

पण पायांचे काय करायचे? पण त्याचेसुद्धा जिवंत उदाहरण आहे. उष्ण कटिबंधातील देशांमध्ये उडया मारणारे मासे आहेत. हे मासे फक्त किनाऱ्यावरच उडया मारीत नाहीत, तर झाडांवरही चढतात. त्यांचे दुहेरी पंखे त्यांना पायांप्रमाणे उपयोगी पडतात.

हे सर्व विचित्र प्राणी सिद्ध करतात की, मासे पाण्यामधून बाहेर पडून किनाऱ्यावर रहायला येऊ शकले. पण ते खरेच आले का, हे आपल्याला कुठून समजणार?

नष्ट झालेल्या प्राण्यांची हाडे आपल्याला हकीकत सांगतात. प्राचीन साठ्यांच्या उत्खननात पुराणवस्तुशास्त्रज्ञांना एका प्राण्याची हाडे सापडली. तो प्राणी माशासारखा होता, पण मासा नव्हता. बेडूक किंवा सरडयासारखा तो भू-जलचर प्राणी होता. ह्या प्राण्याचे नाव स्तेगोत्सेफाल. त्याला पंखांऐवजी सरळ पाच बोटांचे पाय होते. जेव्हा तो किनाऱ्यावर यायचा तेव्हा ह्या पायांवर चालायचा, मात्र त्याची चालण्याची गती खूप मंद असायची.

सामान्य बेडूक जरा लक्षपूर्वक निरखून पाहू. अंडयातून तो बाहेर पडतो तेव्हा बेडकुली असतो व बेडकुलीत आणि माशात फारसा फरक आढळत नाही.

म्हणून असा निष्कर्ष निघतो की, प्राचीन काळी काही प्रकारचे मासे सागर व जमीन यांच्यातील सीमा ओलांडून आले होते. पण तसे करताना त्यांच्यात बदल घडला. माशांमधून जलस्थलवासी निर्माण झाले. आणि जलस्थलवासी सरपटणाऱ्या प्राण्यांचे पूर्वज बनले. सरपटणारे प्राणी पशूंचे आणि पक्ष्यांचे पूर्वज ठरले. ह्या पशु-पक्ष्यांपैकी अनेकजण समुद्राची वाट विसरले.

मूक साक्षीदार

मूक साक्षीदार – प्राचीन प्राण्यांची हाडे – आपल्याला सांगतात की, दशलक्षावधी वर्षांच्या काळात सजीव प्राण्यांमध्ये बदल होत गेले.

कशामुळे त्यांच्यात बदल घडले?

चार्ल्स डार्विन यांनी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडेपर्यंत हे कोडे उलगडले नव्हते. त्यांचे कार्य रशियन शास्त्रज्ञ वि. ओ. कोवालेवस्की आणि कॉ. आ. तिमिऱ्याझेव यांनी पुढे चालू ठेवले. त्यांनी पार पाडलेल्या महान कार्यांनंतर, आपल्या पणजोबांना जी उत्तरे देता येत नव्हती ती तुम्हा-आम्हाला आता सहज समजतात.

प्रत्येक सजीव प्राणी जगातील त्याच्या स्थळाशी, वातावरणाशी, सभोवतालच्या परिसराशी जुळवून घेण्यास समर्थ असतो. पण पृथ्वीवर सर्व गोष्टी बदलत असतात: उष्ण हवा थंड बनते, जेथे सपाट मैदाने होती तेथे पर्वत निर्माण होतात, समुद्र मागे हटून भूमीला जागा देतो, पाईन वृक्षांच्या जंगलाऐवजी पानांची झाडे असलेली जंगले उभी राहतात.

जेव्हा भोवतालच्या सर्व गोष्टी बदलतात, तेव्हा सजीव प्राण्यांबाबत काय घडते?

त्यांच्यातसुद्धा बदल होतात.

पण कोणत्या बाजूने त्यांच्यात बदल होईल हे मात्र त्यांच्यावर अवलंबून नसते. हत्तीला गवत, पालापाचोळ्याचा आहार सोडून एकदम मांसाहारी बनता येणार नाही. अस्वल म्हणू शकत नाही: "मला उकडतंय" आणि स्वतःची केसाळ कातडी उतरवून ठेवू शकत नाही.

सजीव प्राण्यांमध्ये स्वेच्छेने बदल घडत नाहीत. त्यांना जेव्हा नवा आहार स्वीकारणे आणि नव्या पद्धतीने राहणे भाग पडते, तेव्हा त्यांच्यात बदल घडतो. आणि हे घडणारे बदल त्यांच्या दृष्टीने नेहमीच उपयुक्त व फायदेशीर असतात असे नाही.

नव्या वातावरणात प्राणी अगर वनस्पती अनेकदा झुरू लागतात, कारण त्यांना आवश्यक त्या गोष्टी मिळेनाशा होतात, त्यांच्या पूर्वजांना जे लाभत होते ते त्यांना लाभत नाही.

त्यांची उपासमार होते व ते गोठतात. किंवा त्याउलट सवय नसलेल्या उष्णतेपायी, पाण्याच्या दुर्भिक्ष्यापायी त्यांचे हाल होतात. ते सहजपणे शत्रूंचे भक्ष्य बनतात. त्यांची मुले अधिक दुबळी निपजतात, जगण्यास नालायक ठरतात. परिस्थितीमधील बदल सहन न झाल्यामुळे हे प्राणी अथवा ह्या वनस्पती अखेरीस नाश पावतात.

पण दुसरेही घडते: सजीव प्राण्यात अशा रीतीने बदल घडतात जे त्याला उपयुक्त ठरतात, हानीकारक होत नाहीत. असे उपयुक्त बदल पुढील पिढ्यांना वारशाने दिले जातात, त्यांचा संचय करण्यात येतो, त्यांना दृढ व बळकट बनविले जाते.

कालांतराने आढळते की, वंशजांचे पूर्वजांशी साम्य उरत नाही. त्यांचा निसर्ग वेगळा बनलाय. त्यांच्या पूर्वजांना जे चालत नव्हते, ते त्यांना चालतेय. नव्या जीवनपद्धतीशी जुळवून

घेणे त्यांना जमलेय, ते जगण्यास समर्थ बनलेत. स्वाभाविक निवड घडली: नव्या परिस्थितीशी जुळते घेऊ न शकणारे नष्ट झाले आणि जुळवून घेणारे जगले.

तिमिऱ्याझेव यांनी एक उदाहरण दिले. जेरूसलेम आर्टिचोकचे झाड डोंगरात लावण्यात आले. मैदानात त्याचा देठ उंच होता व पाने जाड होती. पण डोंगरात ते खुजे बनले आणि त्याची पाने जमिनीवर पसरली.

जेरूसलेम आर्टिचोक वेगळ्या परिसरात गेल्यामुळे हा बदल घडला. डोंगरातील हवामान आणि माती मैदानापेक्षा वेगळी असतात. हा बदल झाडाला उपयुक्त ठरला. आता स्वतःच्या फांद्या बर्फाखाली दडवून थंडी व वाऱ्यांपासून बचाव करणे झाडाला अधिक सोपे बनले.

जीवनपरिस्थितीतील बदलांमुळे सजीव प्राण्यांचे रूप कसे बदलून गेले ह्याची पृथ्वीच्या इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात.

माशांचे जलस्थलचरांमध्ये घडलेले स्थित्यंतर पहा.

उथळ पाण्यांमध्ये, सुकून जाणाऱ्या समुद्रांमध्ये आणि सरोवरांमध्ये ही गोष्ट घडली. सुकून जाणाऱ्या जलाशयांमध्ये जगण्यास असमर्थ ठरलेले मासे नाश पावले. त्यांची संख्या कमी कमी होत गेली. आणि पाण्याविना खूप काळपर्यंत टिकू शकणारे मासे तेवढे जिवंत राहिले. दुष्काळाच्या काळात त्यांनी स्वतःला गाळात गाडून घेतले किंवा पंखांचा पायांप्रमाणे वापर करून ते सरपटत नजीकच्या डबक्यांकडे गेले.

जमिनीवर राहण्यास उपयुक्त ठरेल असा शरीरातील प्रत्येक छोटा बदल जीवनाने स्वीकारला. पोहण्याच्या फुगीर पिशव्यांचे हळूहळू फुप्फुसांमध्ये रूपांतर झाले. दुहेरी पंखांचा पायांमध्ये विकास घडला.

अशा रीतीने वंशपरंपरा, स्थित्यंतर व निवड यांच्यामार्फत जलचर प्राणी भूचर बनले.

नव्या जीवनपरिस्थितीपायी माशांच्या पोहण्याच्या फुगीर पिशव्या, त्यांचे पंख व शरीररचना यांच्यात बदल घडले.

निवडीने फक्त उपयुक्त बदल जतन केले व हानीकारक नाकारले.

वंशपरंपरेने हे उपयुक्त बदल पुढच्या पिढ्यांना दिले—त्यांचा संचय करून त्यांना दृढ बनविले.

वि. ओ. कोवालेवस्की यांनी अभ्यासलेल्या घोड्यांच्या इतिहासावरून आणखी शिकता येईल.

दाट जंगलांमधून, पडलेल्या झाडांच्या खोडांना चपळपणे ओलांडत जाणाऱ्या एका छोट्या प्राण्यापासून घोडा निर्माण झाला, ह्यावर आता विश्वास ठेवणे कठीण जाते. त्या प्राण्याला घोड्याप्रमाणे खूर नव्हते, पाच बोटांचे पंजे होते. जंगलातील उंचसखल भूमीवर ठाम तोल राखण्यास पंजांचा त्याला उपयोग व्हायचा.

कालांतराने अरण्ये विरळ होत गेली, आणि मैदाने निर्माण झाली. घोड्याचे जंगलनिवासी

पूर्वज वारंवार उघड्या मैदानांमध्ये येऊ लागले. पण धोक्याच्या क्षणी जंगलाप्रमाणे मैदानात आडोसा घेता येत नव्हता. पळून जाणे एवढाच सुटकेचा एकमेव उपाय होता. जंगलातील लपंडावाच्या खेळाचे आता मैदानातील पाठलागाच्या खेळात रूपांतर झाले. अशा पाठलागात अनेक जंगलनिवासी प्राणी नाश पावले. फक्त लांब आणि चपळ पायांचे प्राणी हिंस्र पशूंच्या तावडीतून सुटू शकले व वाचले.

जीवनाने इथेही निवड केली: वेगवान धावण्यास उपयुक्त गोष्टी शोधून त्यांना राखले व अनुपयुक्त गोष्टींचा त्याग केला.

घोड्याच्या पूर्वजांच्या जीवनातील बदलाचे संशोधन केल्यानंतर असे आढळले की, वेगवान धावण्यासाठी पायांना अनेक बोटे असण्याची गरज नव्हती. एकच बोट पुरेसे होते, पण ते घट्ट आणि बळकट असणे आवश्यक होते. तेव्हा प्रथम तीन बोटांचे घोडे निर्माण झाले व नंतर एका बोटाचे. आपल्या आताच्या घोड्याला पायावर फक्त एकच बोट आहे, घट्ट खुरासह.

मैदानांमध्ये घोड्याचे केवळ पायच बदलले नाहीत, तर त्याचे एकूण शरीरच बदलले. उदाहरणार्थ, त्याची मान. जर पाय लांब झाले आणि मान तशीच आखूड राहिली असती, तर घोड्याला पायांखालचे गवत तोंडात उचलून घेणे अशक्य बनले असते. तसे घडले नाही, कारण जीवनाने आखूड पायांप्रमाणे आखूड मानवाल्यांचाही त्याग केला.

आणि दात? तेसुद्धा बदलले. स्तेप-मैदानांमध्ये घोड्यांना खरबरीत, कठीण वनस्पती खाव्या लागल्या. त्या वनस्पतींना प्रथम दाढांखाली रगडावे लागे. तेव्हा दातांची रचना बदलली. आताच्या घोड्यांचे दात म्हणजे साक्षात दळणाची जाती आणि रगडयंत्रे. त्यामुळे गवतच नव्हे, तर कडब्याचाही लगदा करता येतो.

पाय, मान, दात ह्यांची योग्य निवड करून अनुकूल बदल घडविण्याच्या ह्या महाप्रचंड कामाला पूर्ण पाच कोटी वर्षे लागली.

म्हणजे समुद्रापासून जमिनीला विभक्त करणाऱ्या, जंगलापासून मैदानाला अलग करणाऱ्या, भिंती ह्या कायमच्या भिंती नव्हेत. समुद्र आटतात किंवा जमिनीला पाण्याखाली भिजवतात. मैदानांचे वाळवंटात रूपांतर होते. सागरनिवासी किनाऱ्यावर सरपटत रहायला येतात. जंगलनिवासी स्तेप मैदानांमध्ये राहू लागतात. पण स्वतःच्या छोट्या जगातून बाहेर पडणे, भोवतालच्या निसर्गाशी जुळलेल्या बंधनांना तोडणे, सजीव प्राण्यांना फार अवघड जाते! आणि ती बंधने तोडल्यानंतरसुद्धा ते स्वतंत्र नसतातच!

एका अदृश्य पिंजऱ्यातून प्राणी दुसऱ्या अदृश्य पिंजऱ्यात अडकतो. जंगलातून मैदानात आल्यावर घोडा इतःपर जंगलनिवासी राहिला नाही, पण मैदाननिवासी बनला. जमिनीची वाट धरणाऱ्या काही माशांना परत समुद्राकडे जायचा रस्ता बंद झाला. पुन्हा सागरात रहायला जायचे असेल, तर त्यांना परत स्वतःचे रूप पालटणे आवश्यक ठरले. जमिनीवर राहणारे काही प्राणी जेव्हा समुद्राकडे परतले, तेव्हा त्यांच्या बाबतीत तसेच घडले. त्यांच्या पायांचे पंखांमध्ये

रूपांतर झाले. उदाहरणार्थ, देवमाशाला एवढे "मासामय" बनावे लागले, की त्याचे कूळ माहीत नसलेली माणसे त्याला "देव-मासा" म्हणतात. वस्तुतः त्याचे बाह्य रूप माशाप्रमाणे असले, तरी तो सस्तन प्राणी आहे.

माणूस स्वातंत्र्याकडे निघाला

पृथ्वीवर जवळजवळ दहा लाख प्रकारचे सजीव प्राणी आहेत. प्रत्येक प्राणी त्याला अनुकूल अशा छोटचा जगात राहतो.

काही ठिकाणी काहींना पाटी दिसते: "प्रवेश बंद." दुसऱ्या काहींना दिसते: "सुस्वागतम्!"

पांढऱ्या अस्वलाला उष्ण कटिबंधातील जंगलात रहायला पाठवून बघा. वाफाळणाऱ्या हमामखान्यात बसल्याप्रमाणे तेथे ते घुसमटून जाईल. कारण त्याच्या अंगावरील उबदार केसाळ कातडी काढून टाकणे शक्य नाही. उष्ण कटिबंधातील रहिवासी हत्ती आर्क्टिकच्या बर्फात काकडून जाईल. कारण हमामखान्यात वावरल्याप्रमाणे तो नागवा हिंडत असतो.

पृथ्वीवर अशी एकच जागा आहे जेथे पांढऱ्या अस्वलाची हत्तीशी गाठ पडते, जेथे जगातील सर्व भागांमधील प्राणी पाहता येतात, जेथे जंगलातील हिंस्र पशूंपासून दोन पावले अंतरावर मैदानातील प्राणी राहतात व मैदानातील प्राण्यांशेजारी पर्वतांमधील प्राणी राहतात.

ही जागा — प्राणिसंग्रहालय! प्राणिसंग्रहालयात दक्षिण आफ्रिकेपाशी ऑस्ट्रेलिया असतो, ऑस्ट्रेलिया उत्तर अमेरिकेचा शेजारी असतो. सर्व जगातील प्राणी प्राणिसंग्रहालयात आढळतात. पण तेथे ते स्वतःच्या इच्छेने आलेले नाहीत. माणसांनी त्यांना एकत्र आणले.

ह्या जिवंत संग्रहापायी माणसाला खटाटोप किती! कारण प्रत्येक प्राण्याला स्वतःच्या विशिष्ट जगाची सवय असते. त्याच्या त्या छोटचा जगाशी साम्य दाखवील असे वातावरण त्याच्याभोवती निर्माण करावे लागते.

एकासाठी हौदात महासागर निर्माण करावा लागतो, तर दुसऱ्यासाठी वीस चौरस मीटरच्या चौकात वाळवंट तयार करावे लागते.

शिवाय प्राणी उपाशीपोटी राहणार नाहीत आणि त्याचवेळी ते एकमेकांना फाडून खाणार नाहीत, ह्याचीही खबरदारी घ्यावी लागते. पांढऱ्या अस्वलाच्या आंघोळीसाठी गार पाणी असले पाहिजे. माकडांना ऊब हवी. सिंहाला वेळच्या वेळी कच्च्या मांसाचा आहार मिळाला पाहिजे. गरुडाला पंख ताणून फडफडायला पुरेशी जागा पाहिजे.


मैदानांमधील, जंगलांमधील, डोंगरांमधील, वाळवंटांमधील, सागरांमधील प्राणी कृत्रिमरीत्या एका जागी गोळा केल्यानंतर, त्यांचा नाश होऊ नये म्हणून कृत्रिमरीत्या त्यांना आवश्यक असे वातावरण निर्माण करणे माणसाला भाग पडले.

पण स्वतः माणूस कुठला प्राणी आहे: मैदानातील, जंगलातील, डोंगरातील?

जंगलात राहणाऱ्या माणसाला "जंगली माणूस" आणि दलदलीत राहणाऱ्याला "दलदली माणूस" म्हणता येईल का?

अर्थातच, नाही.

जंगलात राहणारा माणूस मैदानातही राहू शकतो. दलदली प्रदेशात राहणाऱ्या माणसाला कोरड्या जागी जाऊन रहायला केवळ आनंदच होईल.



पांढऱ्या अस्वलाची हत्तीशी भेट फक्त प्राणिसंग्रहालयात होते

माणूस सगळीकडे राहतो. पृथ्वीवर त्याने पाय ठेवला नाही अशी जवळ जवळ एकही जागा उरलेली नाही. "माणसांना प्रवेश करण्यास मनाई" अशी अदृश्य पाटी जेथे असू शकेल, तेथेही तो जाऊन आलाय. ध्रुवीय संशोधक तरत्या हिमखंडांवर राहतात. पण त्यांना जर अत्यंत कडक उष्ण तपमानाच्या वाळवंटात प्रवास करणे आवश्यक ठरले असते, तर तो प्रवासही त्यांनी ध्रुवीय प्रदेशातील प्रवासाइतकाच यशस्वी केला असता.

मैदानातून जंगलात अथवा जंगलातून मैदानात मुक्काम हलविताना माणसाला स्वतःच्या हाता-पायांमध्ये, दातांमध्ये फेररचना करण्याची आवश्यकता नाही. दक्षिणेतून उत्तरेत गेल्यास, त्याचे शरीर केसाळ कातडीने मढलेले नाही म्हणून काही तो ताबडतोब मरत नाही.

जनावरांना त्यांच्या कातडीपायी थंडीपासून स्वतःचा जसा बचाव करता येतो, त्याचप्रमाणे केसाळ कोट, टोपी आणि बुटांच्या साह्याने माणूस स्वतःचा गोठवणाऱ्या थंडीपासून बचाव करू शकतो.

घोड्यापेक्षा अधिक वेगाने जमिनीवरून भ्रमण करण्यास माणूस शिकलाय. पण त्यासाठी त्याला एकाही बोटाचा बळी द्यावा लागला नाही.

पाण्याखालून माशापेक्षा जास्त जलद पोहायला माणूस शिकलाय. पण त्यासाठी त्याला हात-पाय बदलून पंख लावायची गरज भासली नाही.

सरपटणाऱ्या प्राण्यांचे पक्ष्यांमध्ये रूपांतर घडण्यास कित्येक दशलक्ष वर्षे लागली. त्यासाठी त्यांना फार मोठी किंमत मोजावी लागली: त्यांचे पुढचे पंजे नाहीसे झाले; त्याऐवजी त्यांना पंख लाभले. पण माणसाने हवेत उडण्याची कला अवघ्या काही शतकांच्या आत आत्मसात केली व त्यासाठी त्याला हात गमवावे लागले नाहीत.

प्राण्यांना कैदी म्हणून धरून ठेवणाऱ्या अदृश्य भिंतींना सहीसलामत ओलांडून जाण्याची कला माणसाने अवगत केली आहे.

जेथे श्वसनाला हवा पुरत नाही अशा उंचीवर तो चढतो आणि तेथून जिवंत अवस्थेत ठणठणीत परत येतो.

जेव्हा स्ट्राटोनॉटनी पूर्वीचे उंचावर जाण्याचे सर्व विक्रम मोडले, तेव्हा जीवनाचे छतही त्यांनी उंचावले आणि सजीव प्राण्यांच्या जगाच्या सीमा ओलांडल्या.

जनावरे आणि पक्षी पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहेत. जेव्हा तुम्ही गणितातील समस्या सोडवता, तेव्हा समस्येतील अटींवर उत्तर अवलंबून असते. इथे तसेच आहे. प्रत्येक प्राणी म्हणजे जीवनाने सोडवलेली समस्या. त्या समस्येच्या अटी – म्हणजे प्राण्याच्या अस्तित्वासाठी अनुकूल परिस्थिती. आणि उत्तर म्हणजे वेगवेगळे पंजे, पंख, कल्ले, चोची, नख्या, सवयी, प्रवृत्ती... प्राण्याला कुठे आणि कसे रहायचे आहे त्यावर उत्तर अवलंबून असते: पाण्यात अथवा जमिनीवर, खाऱ्या अगर गोड्या पाण्यात, किनाऱ्यावर अथवा ऐन सागरावर, खोलवर अथवा पृष्ठभागावर, उत्तरेत किंवा दक्षिणेत, डोंगरात अथवा सपाट प्रदेशात, जमिनीवर किंवा जमिनीखाली, स्तेपमध्ये किंवा जंगलात आणि कोणत्या शेजाऱ्यांच्या सहवासात.

प्राणी त्याच्या परिसरावर पूर्ण अवलंबून राहतो.

पण माणूस स्वतःला अनुकूल परिस्थिती स्वतःच निर्माण करतो. तो वारंवार निसर्गाच्या हातून समस्या-पुस्तिका खेचून घेतो आणि नको असलेल्या अटी खोडून टाकतो.

निसर्गाच्या समस्या-पुस्तिकेत म्हटले आहे: "वाळवंटात पाणी कमी." पण वाळवंटात पाण्याचे कालवे खोदून आपण ही अट खोडून टाकतो.

पुस्तिकेत म्हटले आहे: "उत्तरेतील माती सुपिक नाही." पण मातीत खतांना मिसळून आपण ही अट खोडून टाकतो. त्याचप्रमाणे शेतात बारमाही खाद गवतांची व कडधान्यांची पेरणी करून आपण जमिनीला सुपिक बनवितो.

निसर्गाची समस्या-पुस्तिका म्हणते: "हिवाळ्यात गारठा, रात्री अंधार."

पण आपण तिकडे लक्ष न देता आपल्या घरांमध्ये हिवाळ्याचा उन्हाळा व रात्रीचा दिवस बनवितो.

आपल्या भोवतालचा निसर्ग आपण जास्त जास्त प्रमाणात बदलत चाललो आहोत.

आपल्या भोवतालच्या जंगलांचे रूप लागवडींमुळे आणि लाकूडतोडीमुळे केव्हाच पालटून गेले आहे.

आपले स्तेप-प्रदेश आता पूर्वीसारखे राहिले नाहीत. माणसाने त्यांच्यात लागवडी केल्या आहेत.

आपल्या वनस्पती – राय, गहू, सफरचंदे, नासपाती – आता पूर्वीसारख्या जंगली रानगवतांच्या व झाडांच्या स्वरूपात राहिल्या नाहीत, ज्या काळात माणसाने जमिनीला स्पर्श केला नव्हता.

निसर्गात तुम्हाला "नासपात-सफरचंद" कुठे मिळणार? सोविएत शास्त्रज्ञ इवान व्लादीमिरोविच मिचूरीन यांनी बनविलेली संकरित मजेदार फळे कुठून मिळणार?

घोडे, गायी, मेंढ्या हे माणसाळलेले प्राणी आता जंगलात आढळत नाहीत. त्यांची जोपासना व त्यांचे संगोपन माणूस करतो.

एवढेच नव्हे तर जंगली पशूंनीसुद्धा माणसापायी स्वतःच्या सवयी बदलल्यात. काही पशू मानवी वस्तीच्या आणि शेतांच्या अगदी जवळ भक्ष्यासाठी निवास करतात. याउलट काही माणसाला घाबरून एवढ्या दूर पळाले आहेत, जेथे यापूर्वी तेथे ते कधीही राहिले नव्हते.

कालांतराने असेही घडेल की, माणसाने न बदललेला जंगली स्वरूपातील निसर्ग फक्त अभयारण्यांमध्येच पहायला मिळेल.

माणूस निसर्गावर अधिकाधिक सत्ता गाजवू लागलाय.

पण असे नेहमीच नव्हते.

इतर जनावरे जशी निसर्गाचे गुलाम होती, तसेच आपले प्राचीन पूर्वज निसर्गाच्या गुलामीत होते.

पूर्वजांशी भेट


दशलक्षावधी वर्षांपूर्वी आपल्या सध्याच्या जंगलांच्या आणि रायांच्या जागी अगदी दुसऱ्या प्रकारची जंगले होती – अगदी वेगळी झाडे, वेगळे प्राणी व वेगळी तृणे असलेली.

त्या जंगलांमध्ये भोज, लिंबोणी आणि मेपलच्या झाडांशेजारीच पांढऱ्या फुलांची झुडुपे, मऊ सदाहरित पानांची झुडुपे आणि मॅग्नोलिया वाढत होती. कठीण कवचीच्या फळांशेजारी द्राक्षवेली वाढत होत्या व रडणाऱ्या वाळुंजीशेजारी कापूर आणि डिंकाची झाडे उभी होती.

ओकची प्रचंड झाडे दुसऱ्या महाप्रचंड वृक्षांसमोर खुजी भासत.

जर आपल्या जंगलाची घराशी तुलना केली, तर ते प्राचीन जंगल केवळ साधे घर नव्हते: अस्सल गगनचुंबी इमारत होते.

गगनचुंबी इमारतीच्या वरच्या मजल्यांवर खूप उजेड आणि गोंगाट होता. प्रचंड रंगीत



वाघाचे सुळे कटचारीसारखे लांब होते

फुलांमध्ये रंगीबेरंगी पक्षी कलकलाट करीत बागडत असत. फांद्यांवरून झोके घेत माकडे ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत होती.

पहा, माकडांचा एक कळप फांद्यांवरून उड्या मारीत चाललाय – जणू पूल ओलांडावा त्याप्रमाणे. माकडिणी आपल्या पिलांना छातीशी गच्च धरून आहेत, चघळलेली फळे व दाणे पिलांच्या तोंडात भरवत आहेत. मोठ्या वयाची थोडी पोरे आईच्या पायांना बिलगत आहेत. कळपाचा म्हातारा केसाळ म्होरक्या चपळपणे बुंध्यावरून धावतो आणि बाकीचा कळप त्याच्या पाठोपाठ उड्या मारतो.

ही कुठल्या प्रकारची माकडे? असे माकड आता एकाही प्राणिसंग्रहालयात पहायला मिळणार नाही.

हीच ती माकडे, ज्यांच्यापासून माणूस, चिम्पान्झी आणि गोरील्लाचे सामायिक पूर्वज निर्माण झाले. आपण आपल्या जंगलच्या अतिप्राचीन पूर्वजांना नुकतेच भेटलो.

आपले पूर्वज सर्वांत वरच्या मजल्यावर रहात होते. पूल, सज्जे, आगाशा ओलांडाव्यात त्याप्रमाणे भावी माणसे जमिनीपासून खूप उंचावरून झाडांवरून उड्या मारीत जात.

जंगल त्यांचे घर होते. झाडांच्या बुंध्यांच्या बेचक्यांमध्ये फांद्यांची घरटी बांधून ते रात्रीचा मुक्काम त्या घरट्यांमध्ये करीत.

जंगल त्यांचा किल्ला होते. जंगलाच्या वरच्या मजल्यांवर ते लपून बसत, त्यांचा कट्टर शत्रू असलेल्या वाघाच्या अणकुचीदार सुळ्यांपासून स्वतःचे रक्षण करीत.

जंगल त्यांचे कोठार होते. तेथे वरच्या मजल्यांवर, फांद्यांमध्ये खाद्याचे – फळे व दाणे – साठे असत.

पण जंगलाच्या ऐन छपरापाशी रहायचे म्हणजे फांद्यांवरून झोके घेणे, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी घेणे, फळे तोडणे, दाण्यांना फोडणे, ह्या गोष्टी आवश्यक होत्या. चपळ बोटे, तीक्ष्ण नजर आणि बळकट दात आवश्यक होते.


आपल्या पूर्वजांना जंगलाशी अनेक साखळयांनी बांधून ठेवलेले होते. आणि केवळ जंगलाशीच नव्हे, तर जंगलातील सर्वांत वरच्या मजल्यांशी. माणसाने त्या साखळया कशा तोडल्या? जंगलवासींनी स्वतःचा पिंजरा सोडून घराच्या सीमांपलिकडे जाण्याचे धैर्य कसे प्राप्त केले?

प्रकरण दुसरे

आपल्या नायकाची आजी आणि त्याचे चुलतभाऊ

पूर्वीचा लेखक जेव्हा माणसाच्या जीवनाबद्दल व साहसांबद्दल सावकाशपणे कहाणी सांगू लागायचा, तेव्हा सर्वसाधारणपणे पहिल्याच प्रकरणांमध्ये तो वाचकाला कथा-नायकाच्या नातेवाईकांबद्दल तपशीलवार माहिती द्यायचा.

काही पाने वाचताच वाचकाला समजत असे की, नायकाची आजी तिच्या तरुणपणी कोणते सुंदर झगे परिधान करायची आणि विवाहाच्या आदल्या रात्री नायकाच्या आईला कोणते स्वप्न पडले होते. त्यानंतर नायकाच्या दुधाच्या दातांचे, पहिल्या बोबडचा बोलांचे, पहिल्या पावलांचे व पहिल्या खोडचांचे प्रदीर्घ वर्णन यायचे. साधारणपणे पहिल्या दहा प्रकरणांनंतर नायक शाळेत जाऊ लागायचा, दुसऱ्या खंडाच्या अखेरी प्रेमात पडायचा, तिसऱ्या खंडात सर्व साहसे पार पाडून विवाह करायचा आणि कादंबरीच्या उपसंहारात एव्हाना केस पांढरे झालेला नायक व



माणसाचे माकडाशी साम्य असल्याचे फार पूर्वीच लोकांच्या ध्यानात आले होते. ह्या प्राचीन चित्रात ते जास्तच ठळकपणे जाणवते

त्याची पत्नी आपल्या गुलाबी गालांच्या नातवाची पहिली चाल-चाल कौतुकभरल्या नजरेने पहात असताना कादंबरी संपायची.

ह्या पुस्तकात आम्हीसुद्धा माणसाच्या जीवनाबद्दल व साहसांबद्दल कथा सांगू इच्छितोय. प्राचीन काळातील नामवंत कादंबरीकारांच्या उदाहरणाला अनुसरून, आमच्या नायकाच्या काही पूर्वजांबद्दल, त्याच्या जवळच्या नातेवाईकांबद्दल, त्याच्या जन्मस्थळाबद्दल, तो चालायला-बोलायला-विचार करायला कसा शिकला त्याबद्दल, त्याच्या जीवन-संघर्षाबद्दल, त्याच्या सुख-दुःखांबद्दल, त्याच्या जय-पराजयांबद्दल, आम्ही हकीकत सांगणार आहोत. आम्हाला कबूल करावे लागतेय की, अगदी आरंभीच आम्हाला फार अवघड जातेय.

नायकाच्या आजीबद्दल, त्याच माकडीण-आजीबद्दल, जिच्यामधून आपण पुढे निर्माण झालो आहोत, ती ह्या जगामधून केव्हाच नाहीशी झालेली असताना तिचे वर्णन कसे करायचे? वस्तुसंग्रहालयातसुद्धा आमच्या आजीला पूर्ण रूपात पाहणे शक्य झाले नाही, कारण आफ्रिका, आशिया व युरोप खंडात वेगवेगळया ठिकाणांहून तिची फक्त काही हाडे व दात सापडले आहेत.

आमच्या नायकाच्या इतर नातेवाईकांबद्दल, त्याच्या "चुलत भावा-बहिणीं"बद्दल अधिक माहिती उपलब्ध आहे.

फार फार पूर्वी जेव्हा माणूस उष्ण कटिबंधातील अरण्यांमधून बाहेर पडला होता आणि सर्वार्थाने स्वतःच्या पायांवर उभा होता, तेव्हा त्याचे जवळचे नातेवाईक – गोरील्ला, चिम्पान्झी, गिब्बोन आणि ओरांग-उटांग – तसेच पूर्वीप्रमाणे रानटी अवस्थेत जंगलात रहात होते. माणसाला नेहमीच स्वतःच्या दरिद्री नातेवाईकांची आठवण काढायला आवडत नाही. एवढेच नव्हे, कधी कधी तो त्यांच्याशी नाते सांगायलाही नाकारतो. काही माणसांचे तर असे मत आहे की, माणसाची व चिम्पान्झीची आजी एकच होती असे सांगणे अत्यंत निंदाजनक आहे.

पण सत्य बाहेर पडेलच. माणूस आणि माकड एकाच वंशाचे आहेत हे सिद्ध करायला आम्ही हे संपूर्ण पुस्तक खर्ची घातले असते. पण प्रदीर्घ, चिकित्सक चर्चा न करताही, फक्त एक तासभर चिम्पान्झी आणि ओरांगउटांगच्या सहवासात काढल्यास, माणूस व माकड ह्यांच्यातील कौटुंबिक साधर्म्य ठळकपणे नजरेत भरते.

आपले नातेवाईक – रोझा व राफाएल

लेनिनग्रादजवळच्या कोल्तूशी (आताचे पावलोवो) खेडयात, थोर शास्त्रज्ञ इवान पेत्रोविच पावलोव यांच्या प्रयोगशाळेत, एकदा दोन चिम्पान्झींना – रोझा व राफाएल – आणण्यात आले.

सर्वसाधारणपणे माणसे स्वतःच्या जंगलनिवासी दरिद्री नातेवाईकांचा फार चांगला पाहुणचार करीत नाहीत: त्यांना ताबडतोब पिंजऱ्यात कोंडतात. पण ह्यावेळी अफ्रिकेतून आलेल्या पाहुण्यांचे

अत्यंत प्रेमपूर्वक स्वागत झाले. त्यांच्या निवासासाठी संपूर्ण फ्लॅट देण्यात आला: शयन-खोली, भोजनखोली, न्हाणीघर, खेळण्यासाठी व अभ्यासासाठी खोली. शयनखोलीत आरामशीर पलंग ठेवण्यात आले आणि पलंगांशेजारी रात्रीची टेबले. भोजनखोलीत टेबलावर पांढरीशुभ्र चादर पसरण्यात आली व फडताळांमध्ये खाद्यपदार्थ भरून ठेवले.

ह्या सुखसोयींनी युक्त अशा फ्लॅटचे निवासी माणसे नसून माकडे आहेत, अशी आठवण करून देणारी एकही वस्तू तेथे नव्हती. दुपारच्या जेवणापूर्वी टेबलावर बशा व चमचे मांडून ठेवत. रात्री शयनखोलीत पलंगावर स्वच्छ बिछाने सज्ज करीत आणि काटेकोरपणे उशा चोपून ठाकठीक केलेल्या असत. एवढे खरे, काही वेळा पाहुणे शिष्टाचार विसरून वागत: टेबलाशी बसल्यानंतर चमचे एका बाजूला ठेवून सरळ बशांमधील शिजवलेली फळे चाटून खाऊ लागत व झोपण्यापूर्वी उशीवर डोके न टेकविता उशी डोक्यावर ठेवून झोपत.

पण रोझा आणि राफाएल संपूर्णपणे माणसांसारखी वागली नाहीत, तरीही खूपशी माणसांसारखी वागली.

उदाहरणार्थ, कुठल्याही गृहिणीप्रमाणे, रोझा खाद्यपदार्थांच्या फडताळाची किल्ली सहजपणे हाताळत होती. ही किल्ली नेहमी राखणदाराच्या खिशात असे. राखणदाराच्या पाठीशी गुपचूप जाऊन रोझा हळूच त्याच्या खिशात हात घालायची व किल्ली काढून घ्यायची. त्यानंतर निमिषार्धात ती भोजनघरातील खाद्यपदार्थांच्या फडताळाशी धावायची. खुर्चीवर चढून सावधपणे कुलुपात किल्ली घालायची. फडताळाच्या काचेच्या दारांमागे भांड्यात भरलेले जर्दाळू व त्यांच्यावर ठेवलेले द्राक्षांचे घड तिला दिसत. किल्ली फिरवायचा अवकाश — आणि द्राक्षांचा घड रोझाच्या हातात!

आणि राफाएल! शिकण्याच्या वेळांना तुम्ही त्याला पहायला हवे होते! जर्दाळूंनी भरलेली एक छोटी बादली आणि वेगवेगळ्या आकारांचे ठोकळे त्याच्या प्रशिक्षणाच्या वस्तू होत्या. मुले खेळतात त्या ठोकळ्यांपेक्षा हे ठोकळे अनेकपटींनी मोठ्या आकाराचे होते. सर्वांत मोठा ठोकळा स्टूलाएवढ्या उंचीचा होता व सर्वांत लहान — पाय ठेवण्याच्या छोट्या स्टूलाएवढा. जर्दाळूंनी भरलेली बादली फरशीपासून उंचावर टांगून ठेवलेली असे व त्या बादलीतील जर्दाळू काढून खाणे, ही राफाएलवर सोपवलेली कामगिरी होती.


आरंभी राफाएलला ही अवघड कामगिरी पार पाडणे जमेना.

त्याच्या घरी, जंगलात, फळे तोडण्यासाठी त्याला वारंवार झाडांवर चढावे लागत होते. पण इथे फळे फांद्यांवर लगडलेली नव्हती, हवेत टांगलेली होती. ठोकळ्यांविना इथे चढण्यासाठी दुसरे काहीही नव्हते. पण सर्वांत मोठ्या ठोकळ्यावर चढूनसुद्धा जर्दाळूंपर्यंत हात पोहोचत नव्हते.


ठोकळ्यांची हलवाहलव करता करता अचानक राफाएलला शोध लागला: जर एका ठोकळ्यावर दुसरा ठोकळा ठेवला, तर जर्दाळू तेवढे दूर राहणार नाहीत. राफाएलने हळूहळू



राफाएल जेवतोय



राफाएल काम करतोय



राफाएल चित्र काढतोय

तीन, चार, पाच ठोकळ्यांचे पिरॅमिड रचले. त्याला हे काम अवघड गेले. कारण ठोकळे नुसते एकमेकांवर रचून चालणार नव्हते: त्यांच्या विशिष्ट अनुक्रमानुसार त्यांना एकमेकांवर मांडणे आवश्यक होते—प्रथम मोठे, मग त्यांच्याहून थोडे लहान, मग सर्वांत लहान.

अनेकवेळा असे घडले की, राफाएलने चुकीने छोटचा ठोकळ्यांवर मोठे ठोकळे रचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सगळा ढिगारा कोलमडण्याच्या बेतात यायचा.

भासायचे, आणखी एक निमिषमात्र—आणि राफाएलसह पिरॅमिड खाली कोसळणार. पण तसे कधी घडले नाही: सर्व माकडांप्रमाणे राफाएल चपळ होता.

अखेरीस समस्या सुटली. सातही ठोकळे त्यांच्या अनुक्रमांनुसार राफाएलने रचले. जणू त्याने त्यांच्यावरील क्रमांक वाचल्याप्रमाणे.

बादलीपाशी हात पोहोचताच, त्या हिंदकळणाऱ्या पिरॅमिडच्या वरच्या टोकाशी बसून, प्रामाणिक कष्ट करून प्राप्त केलेले जर्दाळू तो मोठचा चवीने खाऊ लागला.

माणसाप्रमाणे दुसरा कोणता प्राणी असा वागू शकला असता? ठोकळ्यांचा पिरॅमिड रचण्याची कल्पना कुत्र्याला सुचली असती का? वस्तुतः कुत्रा समजूतदार प्राणी आहे.

राफाएलची काम करण्याची माणसासारखी पद्धत बघून निरीक्षक थक्क झाले. ठोकळा उचलून तो स्वतःच्या खांद्यावरून पिरॅमिडपर्यंत वाहून न्यायचा. पण ठोकळ्याचा आकार योग्य नसायचा. राफाएल ठोकळा जमिनीवर ठेवायचा आणि जणू विचारात गढून गेल्याप्रमाणे त्याच्यावर बसायचा. थोडी विश्रांती घेऊन झाल्यानंतर परत तो कामाला लागायचा—झालेली चूक सुधारण्याचा खटाटोप सुरू करायचा.

चिम्पान्झीला माणूस बनविता येईल काय?

असे जर आहे, तर चिम्पान्झीला माणसाप्रमाणे चालायला, बोलायला, विचार करायला, काम करायला शिकविणे शक्य नाही का?

प्रख्यात पशुशिक्षक व्लादीमिर दूरोव यांचे अनेक वर्षांपूर्वी हे स्वप्न होते. त्यांचा आवडता चिम्पान्झी मीमूस याच्या शिक्षणावर त्यांनी खूप मेहनत घेतली. मीमूस हुशार विद्यार्थी निघाला. चमच्याचा वापर करण्यास, नॅपकिन गळ्याशी अडकविण्यास, खुर्चीवर बसून टेबलावरील आच्छादनावर न सांडता सूप पिण्यास आणि घसरगाडीवर बसून टेकडीवरून खाली घसरत येण्याससुद्धा तो शिकला होता.

पण तरीही त्याला संपूर्ण माणूस बनविणे शक्य झाले नाही.

हे समजण्यासारखे आहे. माणूस आणि चिम्पान्झी यांच्या वाटा फार फार पूर्वीच वेगळ्या बनल्या. माणसाचे पूर्वज झाडांवरून खाली जमिनीवर रहायला आले, दोन पायांवर चालू

लागले, हातांनी काम करू लागले. पण चिम्पान्झीचे पूर्वज झाडांवरच राहिले, त्या जीवनाशी ते अधिक समरस बनले.


म्हणून चिम्पान्झी माणसासारखा नाही. त्याचे हात तसे नाहीत, पाय तसे नाहीत, मेंदू तसा नाही आणि जीभ तशी नाही.

चिम्पान्झीचा हात पहा. त्याच्या हाताची रचना माणसाच्या हातासारखी मुळीच नाही. चिम्पान्झीचा अंगठा त्याच्या करंगळीपेक्षा लहान आहे आणि आपल्या बोटांप्रमाणे त्याची ठेवण एकाच दिशेला नाही. वस्तुतः अंगठा सर्व बोटांमध्ये सर्वांत आवश्यक असतो, हात म्हटल्या जाणाऱ्या पाच कामगारांच्या पथकाचा तो प्रमुख असतो. बाकीच्या चारांपैकी प्रत्येकाशी तो जोडीने काम करू शकतो आणि सर्वांशी एकत्रितपणेही काम करू शकतो. म्हणूनच आपला हात वेगवेगळ्या उपकरणांना चपळपणे हाताळू शकतो.

चिम्पान्झीला जेव्हा फांदीवरचे फळ तोडायचे असते, तेव्हा तो कधी कधी हातांनी फांदी पकडतो व पायाने फळ तोडतो. जमिनीवर चालताना हाताच्या वाकवलेल्या बोटांवर टेकून तो चालतो. म्हणजे तो वारंवार पायांचा हातांसारखा व हातांचा पायांसारखा वापर करतो.

पण हात व पाय यांच्याशिवाय आणखी एक फार महत्त्वाचा फरक आहे, जो चिम्पान्झीला माणूस बनविण्याचा प्रयत्न करणारे पशुशिक्षक विसरतात. त्यांच्या ध्यानात रहात नाही की, चिम्पान्झीचा मेंदू माणसाच्या मेंदूपेक्षा आकाराने खूपच लहान असतो व कमी विकसित असतो.

मानवी मेंदूच्या कार्याचा अनेक वर्षे अभ्यास करणाऱ्या इवान पेत्रोविच पावलोव यांनी रोझा व राफाएलच्या वर्तनाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. आम्हाला सांगण्यात आले की, "माकड-घरात" ते कधी कधी खूप वेळपर्यंत चिम्पान्झींच्या हालचालींचे निरीक्षण करीत बसत.



माणसाच्या मेंदूचा आकार चिम्पान्झीच्या मेंदूच्या आकारापेक्षा खूप मोठा आहे

चिम्पान्झींचे वागणे अत्यंत मूर्खपणाचे, बेशिस्त असे. हाती घेतलेले काम अर्धवट टाकून ती माकडे नवा उद्योग सुरू करीत.

उदाहरणार्थ, राफाएल अत्यंत मनःपूर्वक स्वतःचा पिरॅमिड रचतोय. पण अचानक त्याचे लक्ष चेंडूकडे जाते आणि ठोकळे बाजूला टाकून स्वतःच्या लांब केसाळ हाताने तो चेंडूशी खेळू लागतो. त्यानंतर काही क्षणातच त्याला चेंडूचा विसर पडतो. आता फरशीवर सरपटणाऱ्या माशीवर राफाएलचे लक्ष केंद्रित झालेय!

चिम्पान्झीच्या ह्या बेशिस्त वागण्याला पाहून पावलोव एकदा उद्गारले होते:

"केवढा गोंधळ! काय हा ढिसाळपणा!"

माकडाच्या गोंधळलेल्या हालचाली त्याच्या मेंदूच्या गोंधळलेल्या कार्याचे हुबेहूब प्रतिबिंब दाखवितात. माणसाच्या मेंदूच्या सुव्यवस्थित आणि केंद्रित कार्याशी त्याचे मुळीच साम्य नाही. तरीसुद्धा, माकड पुरेसे बुद्धिमान आहे आणि जंगलच्या जीवनाशी राहण्यास पुरेसे लायक आहे. त्या छोटया जगाशी अनेक अदृश्य साखळयांनी ते बांधले गेलेले आहे.

रोझा आणि राफाएलच्या फ्लॅटमध्ये त्यांचे चित्रीकरण करण्यासाठी एकदा एक चित्रपट दिग्दर्शक गेले. पटकथेनुसार, माकडांना थोडा वेळ बाहेर मोकळे सोडायचे होते. पण ज्या क्षणी माकडे मोकळी झाली, त्याच क्षणी त्यांनी सर्वांत जवळच्या झाडाकडे धाव घेतली व त्याच्या फांद्या हातांनी पकडून ती आनंदाने झोके घेऊ लागली. स्वतःच्या सुखसोयींनी युक्त अशा फ्लॅट-पेक्षा त्यांना झाडावर जास्त घरच्यासारखे वाटले.

चिम्पान्झी आफ्रिकेत जंगलातील सर्वांत वरच्या मजल्यावर राहतो. झाडाच्या फांद्यांमध्ये तो स्वतःचे घरटे बांधतो. शत्रूपासून बचाव करण्यासाठी तो झाडावर चढतो. झाडावर त्याला फळे व कठीण कवचीची फळे खायला मिळतात.

झाडावर राहण्याची त्याला एवढी सवय झालीय, की सपाट जमिनीवरून चालण्यापेक्षा झाडा-च्या बुंध्यावरून वर-खाली जाणे त्याला जास्त सोपे जाते. जेथे जंगल नाही, तेथे तुम्हाला चिम्पान्झी आढळणार नाही.

चिम्पान्झी स्वतःच्या मायभूमीत कसे राहतात त्याचे निरीक्षण करण्यासाठी एक शास्त्रज्ञ आफ्रिकेत कॅमेरूनला गेला.

काही चिम्पान्झींना पकडून त्या शास्त्रज्ञाने स्वतःच्या फार्मजवळच्या जंगलात सोडले. चिम्पान्झींना घरच्यासारखे वाटावे असा त्याचा हेतू होता. पण ते पळून जाऊ नयेत म्हणून त्याने अदृश्य पिंजरा बसविला. कुऱ्हाड आणि करवत अशा फक्त दोन उपकरणांच्या मदतीने त्याने हा पिंजरा बनविला होता.

शास्त्रज्ञाच्या सूचनेनुसार लाकूडतोडयांनी त्या जंगलाभोवतालची झाडे तोडून टाकली व मोकळ्या मैदानाच्या मध्यभागी तेवढे छोटेसे झाडांचे जंगल शिल्लक ठेवले. आणि ह्याच जंगल-बेटावर शास्त्रज्ञाने त्याचे चिम्पान्झी ठेवले.

शास्त्रज्ञाची योजना खात्रीपूर्वक होती : माकड जंगलात राहणारा प्राणी. म्हणजे स्वेच्छेने माकड जंगलातून बाहेर पडणार नाही. पांढऱ्या अस्वलाला जसे वाळवंटात नेऊन ठेवणे शक्य नाही, त्याचप्रमाणे उघडच्या मैदानात माकडाला रहायला लावणे शक्य नाही.

पण जर चिम्पान्झी जंगलाबाहेर पडू शकत नाही, तर त्याचा नातेवाईक — माणूस — तेथून बाहेर कसा पडला?

आपला नायक चालायला शिकतो

आपला जंगलचा पूर्वज त्याच्या पिंजऱ्यातून एका दिवसात अथवा एका वर्षात बाहेर पडला नाही. जंगलातून बाहेर पडून उघडच्या मैदानात जायला, झाडे नसलेल्या सपाट प्रदेशात स्वतंत्रपणे जायला, त्याला लाखो वर्षांचा अवधी लागला.

जंगलाला बांधून ठेवणारी साखळी तोडण्यासाठी झाडावर निवास करणाऱ्या प्राण्याला सर्व-प्रथम झाडावरून खाली उतरून जमिनीवर चालायला शिकणे आवश्यक होते.

आपल्या काळातसुद्धा माणसाला चालायला शिकविणे सोपे नाही. पाळणाघरात जाणाऱ्या प्रत्येकाला माहीत आहे की, तेथे मुलांचा एक खास गट असतो: "रांगणाऱ्या." ही मुले एका जागी स्वस्थ बसू इच्छित नाहीत, पण अजून त्यांना चालता येत नसते. काही महिन्यांचा अवधी उलटल्यानंतरच "रांगणारे" मूल अखेर "चालणारे" बनते. जमिनीला हात न टेकविता, भोवतालच्या वस्तूंचा आधार न घेता, जमिनीवरून चालणे म्हणजे थट्टा नव्हे! सायकल चालवत जाण्यापेक्षा चालायला शिकणे अनेक पटींनी अवघड आहे.

पण लहान मुलाला चालायला शिकायला काही महिने लागत असले, तर आपल्या पूर्वजाला मात्र काही महिने नव्हे, हजारो वर्षे लागली.

एवढे खरे, त्या प्राचीन काळात, आपला पूर्वज झाडांवर रहात होता त्या काळात, थोडचा अवधीसाठी तो जमिनीवर उतरायचा. शक्यता आहे की, अशा प्रसंगी त्याने नेहमीच जमिनीवर हात टेकले नसतील, तर मागच्या पंजांवर दोन-तीन पावले तो धावला असेल — कधी कधी चिम्पान्झी धावतो त्याप्रमाणे.

पण दोन-तीन पावले जाणे वेगळे आणि पन्नास अथवा शंभर पावले चालणे वेगळे!

पायांनी हातांना काम करण्यास मोकळे कसे केले

आपला जंगलचा पूर्वज झाडांवर रहात होता त्याच काळात पायांपेक्षा हातांनी वेगळी कामे करण्यास शिकला होता. फळे व कठीण कवचीची फळे तो हातांनी तोडायचा, बुंध्यांच्या बेचक्यांमध्ये हातांनी घरटे बांधायचा.

आपल्या नायकाने हाती हत्यार घेतले



पण जो हात कटीण कवचीचे फळ खेचू शकत होता, तोच हात दगड अथवा काठी पकडू शकत होता. हातात दगड अथवा काठी असणे, म्हणजे तोच हात अधिक लांब व अधिक बळकट होणे. दातांनी चावून फोडता न येणारी कठीण कवचीची फळे दगडाने फोडणे शक्य होते. काठीच्या साह्याने जमिनीतील खाण्यालायक कंदमूळ खणून काढणे शक्य होते.

अशा रीतीने माणूस वारंवार नवनव्या पद्धतींनी अन्न मिळवू लागला. जमीन काठीने खणून तो कंदमुळे खेचून काढू लागला. मोठ्या दगडांनी जुन्या झाडांचे बुंधे ठेचून त्यांच्यामधून कीटकांचे कोष तो प्राप्त करू लागला. पण हातांनी काम करण्यासाठी प्रथम त्यांना दुसऱ्या कामातून मुक्त करणे आवश्यक होते – चालण्याच्या. हात जेवढे कामांमध्ये जास्त गुंतू लागले, तेवढे पायांना एकट्याने चालण्याची क्रिया सांभाळावी लागली.

अशा रीतीने हातांनी पायांना चालायला लावले व पायांनी हातांना कामासाठी मोकळे केले.

जमिनीवर नवा, पूर्वी न दिसणारा एक प्राणी अवतरला. हा प्राणी मागील पंजांवर फिरत होता व पुढील पंजांनी काम करीत होता.

दिसायला हा प्राणी अजून खूपसा जनावरासारखा होता. पण तो काठी अथवा दगडाचा कसा वापर करतो हे तुम्ही पाहिले असतेत, तर ताबडतोब म्हणाला असतात: ह्या प्राण्याला अति प्राचीन माणूस म्हणायला हरकत नाही. खरोखर, फक्त माणूस उपकरणांचा वापर करू शकतो. प्राण्यांपाशी उपकरणे नाहीत.

जेर्बोआ अथवा चिचुंद्री जेव्हा जमीन खणतात, तेव्हा हे काम ते स्वतःच्या पंजांनी करतात, फावड्यांनी नव्हे. जेव्हा उंदीर लाकडाचा तुकडा कुरतडतो, तेव्हा दातांनी ते काम करतो, सुरीने नव्हे. आणि सुतारपक्षी झाडाची साल चोचीने सोलतो, कानशीने नव्हे.

पण आपल्या पूर्वजापाशी कानशीसारखी चोच नव्हती, फावड्यासारखे पंजे नव्हते, सुरी-प्रमाणे धारदार सुळे नव्हते.

पण कुठल्याही सुळ्यांपेक्षा अथवा चोचींपेक्षा जास्त चांगली गोष्ट त्याच्यापाशी होती. त्याच्यापाशी हात होते आणि हातांनी जमिनीवरील दगडी सुऱ्या व लाकडी नख्या उचलणे त्याला शक्य होते.

आपला नायक जमिनीवर उतरला

ह्या सर्व गोष्टी घडत होत्या त्या दरम्यान पृथ्वीवरील हवामान थोडेसे बदलले. आपला जंगलचा पूर्वज जेथे रहात होता, तेथे रात्री अधिक गार होऊ लागल्या व हिवाळ्यात जास्त थंडी वाजू लागली. हवा अजून उबदार होती, पण इत:पर तिला गरम म्हणणे शक्य नव्हते.

उत्तरेकडील डोंगरउतारांवर सदाहरित ताडवृक्ष, मॅग्नोलिआ आणि लॉरल यांची जागा ओक व लिंबोणीच्या झाडांनी व्यापली.

अजूनही नदीकाठच्या जमिनीखालील साठ्यांमध्ये लोकांना ओक व लिंबोणीच्या पानांचे ठसे आढळतात. दशलक्षावधी वर्षांपूर्वी वादळी पावसांमध्ये ती पाने नदीतीरांपर्यंत वाहून आली असावीत.

चावऱ्या थंड वाऱ्यांपासून लपून राहण्यासाठी अंजिराची झाडे व द्राक्षवेली दक्षिण-उतारांवर आणि खोलगट भागांमध्ये गेली. उष्ण कटिबंधीय जंगलांचा पट्टा दक्षिणेकडे सरकत चालला होता. ह्या जंगलांबरोबर त्यातील रहिवासीसुद्धा दक्षिणेकडे सरकले. प्राचीन हत्ती दक्षिणेत गेला. तीक्ष्ण सुळ्यांचा वाघ दुर्मिळ बनला.

पूर्वी जेथे घनदाट जंगले होती, तेथे झाडे अलग झाली, त्यांच्या दरम्यान मोकळी कुरणे निर्माण झाली. त्या कुरणांमध्ये हरणांचे व गेंड्यांचे कळप चरू लागले. काही माकडे निघून गेली, काही मेली.

जंगलांमध्ये द्राक्षे कमी होत चालली, अंजिरांची झाडे शोधणे अवघड काम बनले. जंगलातून फिरणेसुद्धा सोपे राहिले नाही. जंगल विरळ बनले. झाडांच्या एका पुंजक्यापासून दुसऱ्या पुंजक्यापाशी जाण्यासाठी जमिनीवरून जाणे आवश्यक ठरले. आणि झाडावर राहणाऱ्याला जमिनीवरून जाणे तेवढे सोपे नाही. कुठल्या क्षणी तो हिंस्र श्वापदाचे भक्ष्य बनेल हे सांगता येणार नाही.

पण तरीही दुसरा उपाय नव्हता. भुकेने आपल्या पूर्वजाला झाडावरून पिटाळले.

अन्नाचा शोध घेण्यासाठी भटकंती करायची पाळी त्याच्यावर वारंवार येऊ लागली.

सवयीच्या पिंजऱ्यामधून बाहेर पडायचे, जुळवून घेतलेल्या जंगलच्या जगामधून बाहेर पडायचे, म्हणजे सजीव प्राण्याच्या दृष्टीने अर्थ काय?

ह्याचा अर्थ जंगलचा कायदा मोडायचा, निसर्गात जनावराला त्याच्या जागेशी बांधून ठेवणाऱ्या साखळ्या तोडायच्या.

अर्थात, जनावरे आणि पक्षी बदलतात. जगात न बदलणारी अशी गोष्ट नाही. पण त्यांना बदलणे एवढे सोपे व सहज नाही. तीक्ष्ण नख्यांच्या छोट्या जंगली जनावराचे घोड्यात रूपांतर घडायला दशलक्षावधी वर्षे उलटावी लागली. प्रत्येक पिलू त्याच्या आई-बापांपेक्षा अगदी कमी

वेगळे निपजते. पूर्वीच्या कुळाशी साम्य नसलेली नवी जात जन्मास येण्यासाठी हजारो पिढ्या उलटाव्या लागतात.

आणि आपला पूर्वज?

जर आपला पूर्वज स्वतःच्या आवडी आणि सवयी बदलू शकला नसता, तर माकडांबरोबर त्यालाही दक्षिणेत जाणे भाग पडले असते. पण ह्या दरम्यान त्याच्यात आणि माकडांमध्ये असा फरक झाला होता, की दगडी व लाकडी सुळ्यांच्या आणि नख्यांच्या मदतीने स्वतःचे अन्न मिळवायला तो शिकला होता. जंगलांमध्ये विरळ होत चाललेल्या रसदार दक्षिणी फळांविना वेळप्रसंगी राहण्यास त्याला जमू लागले होते. जंगले विरळ बनली ह्याचे त्याला भय वाटत नव्हते. कारण एव्हाना जमिनीवरून चालायला तो शिकला होता व झाडे नसलेल्या उघड्या मैदानांची त्याला भीती वाटत नव्हती. जर चुकून त्याची शत्रूशी गाठ पडली, तर प्राचीन माणसांचा संपूर्ण कळप दगडांच्या व काठ्यांच्या मदतीने शत्रूशी सामना करायचा.

कठोर काळांमध्ये आपल्या माकडासदृश पूर्वजाचा नाश झाला नाही आणि माघार घेणाऱ्या दक्षिणी जंगलांबरोबर त्याला माघार घेणे भाग पडले नाही. उलट तो माणूस बनण्याच्या क्रियेला वेग चढला.

आणि आपल्या नातेवाईकांचे – माकडांचे – काय झाले?

दक्षिणी जंगलांबरोबर त्यांनी माघार घेतल्यानंतर, ते तसेच जंगलनिवासी राहिले. माघार न घेणे त्यांना अशक्य ठरले. आपल्या पूर्वजांपेक्षा विकासात ते मागे पडले, हत्यारांचा वापर करायला शिकले नाही. त्यांच्यात जे अधिक चपळ होते, त्यांनी जंगलच्या वरच्या मजल्यांवर पुढे जगत राहताना झाडांवरून वावरण्यात, फांद्यांवरून झोके घेण्यात, जास्त कसब प्राप्त केले.

जी कमी चपळ माकडे होती आणि झाडांवरील जीवनाशी चांगल्या रीतीने जुळवून घेणे ज्यांना जमले नाही, त्यांचे दैव वेगळे ठरले. त्यांच्यातील फक्त सर्वांत मोठी, सर्वांत सामर्थ्यवान तेवढी जगली. पण माकड जेवढे अधिक अवजड व आकाराने मोठे, तेवढे झाडावरती राहणे त्याला अवघड बनले. इच्छा असो वा नसो, पण ह्या महाप्रचंड माकडांना झाडे सोडून जमिनीवर उतरावे लागले. उदाहरणार्थ, आत्तासुद्धा गोरील्ला माकडे जंगलातील पहिल्या मजल्यावर राहतात. आणि जमिनीवर शत्रूंपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ते काठ्या आणि दगडांची मदत घेत नाहीत, तर त्यांच्या बळकट जबड्यांमधून पुढे आलेल्या प्रचंड सुळ्यांचा वापर करतात.

अशा रीतीने माणसाच्या आणि त्याच्या नातेवाईकांच्या वाटा वेगळ्या झाल्या.

हरवलेला दुवा

माणूस दोन पायांवर चालायला ताबडतोब शिकला नाही. बहुधा आरंभी तो लटपटत, अडखळत चालत होता.

तेव्हा माणूस, किंवा त्याहून योग्य म्हणजे माकड-माणूस कसा दिसत होता?


माकड-माणूस जिवंत स्वरूपात कुठेच शिल्लक उरलेला नाही. पण पृथ्वीवर त्याची हाडे कुठेतरी सापडली नाहीत काय?

जर ही हाडे सापडली असती, तर माणूस माकडामधून निर्माण झालाय हे ठामपणे सिद्ध करता आले असते. वस्तुतः माकड-माणूस म्हणजे आदिमानव; माकडे आणि आधुनिक माणूस यांच्या साखळीमधील एक महत्त्वाचा दुवा. पण हा दुवा गाळ आणि वाळूच्या थरांमध्ये, नदीतीराच्या साठ्यांमध्ये, कोणत्याही खुणा मागे न ठेवता हरवून गेला.

पुराणवस्तुशास्त्रज्ञांना उत्खनन कसे करायचे, माहीत आहे. पण जमीन खणायला आरंभ करण्यापूर्वी, कुठे खणायचे, हा हरवलेला दुवा कुठे शोधायचा, त्याचा निर्णय केला पाहिजे.



इथे बेनगावान नदीतीरापाशी पीथेकॅन्थ्रोपचे अवशेष सापडले



पीथेकॅन्थ्रोपची हाडे

भू-मंडळाला पालथे घालणे काही सोपे काम नाही. आदिमानवाची हाडे पृथ्वीवर शोधण्यापेक्षा वाळूत हरवलेली सुई शोधणे जास्त सोपे आहे.

मागील शतकाच्या अखेरी शास्त्रज्ञ हेक्केल यांनी प्रस्ताव मांडला: माकड-माणसाची * हाडे दक्षिण आशियात सापडली तर? ही हाडे नेमकी कुठे सापडतील हेसुद्धा त्यांनी नकाशावर दाखविले: सुन्द बेटावर.

हेक्केल यांचा विचार अनेकांना बिनबुडाचा वाटला. पण त्यांची कल्पना वाया गेली नाही. त्यांच्यावर विश्वास ठेवणारा एक माणूस निघाला. त्याने स्वतःची कामे बाजूला सारली व माकड-माणसाची हाडे शोधायला तो सुन्द बेटाकडे गेला.


हा माणूस म्हणजे डॉक्टर येवगेनी द्यूबूआ. ॲमस्टरडॅम विद्यापीठात ते शरीररचना शास्त्राचे प्राध्यापक होते.

विद्यापीठातील त्यांच्या अनेक सहकारी प्राध्यापकांनी त्यांना वेडचात काढले. ही माणसे लब्धप्रतिष्ठित होती आणि केवळ एकच प्रवासाची त्यांना सवय होती — हातात छत्री धरून स्वतःच्या घरून निघायचे व ॲमस्टरडॅमच्या निवांत रस्त्यांवरून विद्यापीठात जाऊन परतायचे.

स्वतःची धाडसी योजना अंमलात आणण्यासाठी द्यूबूआ यांनी विद्यापीठ सोडले, लष्करी नोकरी पत्करली व लष्करी डॉक्टर ह्या नात्याने दूरच्या सुमात्रा बेटाकडे प्रयाण केले.

सुमात्राला पोहचताच द्यूबूआ ताबडतोब संशोधनकार्याला लागले. त्यांच्या आज्ञेनुसार जमीन

* शास्त्रज्ञांच्या भाषेत त्याला पिथेकॅन्थ्रोप असे म्हणतात.



पीथेकॅन्थ्रोप बहुधा असा दिसत असावा. अजून हा अस्सल माणूस नव्हे, पण ह्याला माकड म्हणता येणार नाही

खोदणाऱ्यांनी मातीचे ढीग उभे केले. एक महिना उलटला, दोन-तीन महिने उलटले, पण माकड-माणसाची हाडे काही सापडली नाहीत.

माणूस जेव्हा एखादी हरवलेली वस्तू शोधत असतो, तेव्हा निदान त्याला त्या वस्तूचा अंदाजे ठावठिकाणा माहीत असतो व त्याने कसून शोध घेतला, तर त्याला ती वस्तू सापडते. पण द्यूबूआ यांचे काम त्याहून अवघड होते: त्यांचा केवळ तर्क होता, पण माकड-माणसाची हाडे अस्तित्वात आहेत असे ते ठामपणे सांगू शकत नव्हते. तरीही, त्यांनी निर्धाराने संशोधनाचे काम पुढे चालू ठेवले. एक वर्ष उलटले, दुसरे गेले, तिसरे संपले, पण "हरवलेला दुवा" सापडला नाही.

संशोधन असे निष्फळ ठरल्यानंतर द्यूबूआ यांच्या जागी दुसऱ्या एखाद्याने नाद सोडून दिला असता. कदाचित खुद्द द्यूबूआ यांना कधी कधी शंकांनी छळले असेल. पण काम अर्धवट सोडणाऱ्या माणसांपैकी ते नव्हते.

सुमात्रा बेटावर माकड-माणसाचे अवशेष मिळण्याची आशा खुंटली तेव्हा सुन्द द्वीपसमूहातील दुसऱ्या बेटावर — जावा बेटावर — शोध घेण्याचे त्यांनी ठरविले.

तेथे अखेर त्यांना यश लाभले.

त्रिनिल खेड्यापासून जवळच, माकड-माणसाच्या कवटीचा वरचा भाग, मांडीचे हाड, काही दात आणि खालच्या जबड्याचे तुटके हाड त्यांना सापडले. नंतर आणखी काही तुटकी मांडीची हाडे मिळाली.

स्वतःच्या पूर्वजाची कवटी पाहिल्यानंतर, त्याचा चेहरा कसा दिसत असावा ते नजरेसमोर आणण्याचा द्यूबूआ यांनी प्रयत्न केला. माकड-माणसाचे बसके, सपाट कपाळ होते, त्याच्या डोळ्यांवर जाड हाडाची कमान होती. त्याचा चेहरा माणसापेक्षा माकडाशी अधिक साम्य दाखविणारा होता. पण कवटीच्या वरच्या भागाचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर द्यूबूआ यांना असे आढळले की, माकड-माणूस माकडापेक्षा जास्त बुद्धिमान होता. माणसाच्या अगदी नजीक असलेल्या माकडापेक्षा त्याच्या मेंदूचा आकार अनेकपटींनी मोठा होता.

कवटीचा वरचा भाग, दात आणि काही तुटकी हाडे—ही अगदी अपुरी सामग्री आहे. तरीसुद्धा, त्यांचा अभ्यास केल्यानंतर, द्यूबूआ यांना अनेक धागे जुळविता आले. मांडीच्या हाडावरून त्यांनी निष्कर्ष काढला की, माकड-माणूस फेंगडया चालीने दोन पायांवर चालत होता.

द्यूबूआ यांनी सहजपणे स्वतःच्या पूर्वजाला नजरेसमोर आणले. जंगलातील मोकळ्या कुरणात, पाठीला कुबड काढून, गुडघ्यांमध्ये पाय वाकवून, लांबोडे हात हालवत तो चाललाय. दाट भुवयांखालील त्याचे डोळे जमिनीवर खिळलेले आहेत: खाद्याच्या शोधात.

आता तो माकड नाही, पण अजून पूर्णपणे माणूसही नाही. द्यूबूआंनी त्यांना सापडलेल्या अस्थींना नाव दिले: "ताठ चालणारा माकड-माणूस." कारण, माकडाच्या तुलनेने तो नक्कीच ताठ चालत होता.

तसे पाहिले तर उद्दिष्ट साध्य झाले होते: माकड-माणूस सापडला होता. पण इथेच द्यूबूआ यांचा सर्वांत खडतर काळ सुरू झाला. जमिनीचे जाड थर खणणे एक वेळ सोपे होते, पण माणसांच्या दूषित पूर्वग्रहांना खोडून काढणे त्याहून महाकठीण ठरले.

माणूस माकडापासून निर्माण झाला हे मान्य करण्याची ज्यांची मुळीच इच्छा नव्हती, त्यांनी द्यूबूआंच्या शोधावर चौफेर हल्ला चढवला, त्यांची हेटाळणी केली. चर्चच्या मंडळींनी सिद्ध करण्याचा चंग बांधला की, द्यूबूआंना सापडलेली कवटी गिब्बोन माकडाची होती व मांडीचे हाड आधुनिक माणसाचे होते. माकड आणि माणूस यांची बेरीज म्हणजे माकड-माणूस असा साधा गणिती हिशेब मांडण्यावरच द्यूबूआंचे शत्रू गप्प बसले नाहीत. द्यूबूआंनी शोधलेल्या अस्थींच्या प्राचीनतेबाबत त्यांनी शंका व्यक्त केल्या व ते सिद्ध करू लागले की, सापडलेली हाडे



कवटीवरून सीनान्थ्रोपचे मूर्त रूप डोळ्यांसमोर आणायचा शास्त्रज्ञांनी प्रयत्न केला

जमिनीखाली लक्षावधी वर्षे पडून राहिलेली नाहीत, तर अगदी अलीकडच्या वर्षांतील आहेत. थोडक्यात, माकड-माणसाला परत पुरून टाकण्यासाठी, त्याला पुरते विसरून जाण्यासाठी, सर्व प्रयत्न करण्यात आले.

द्यूबूआंनी धैर्याने समर्थन केले. त्यांचा शोध विज्ञानाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा होता ह्याची जाणीव असलेल्या लोकांनी त्यांना पाठिंबा दिला.

विरोधकांना उत्तर देताना द्यूबूआ म्हणाले की, गिब्बोन माकडाची ती कवटी असणे शक्य नाही. गिब्बोनला कपाळाची वाकणे नाहीत, पण माकड-माणसाला होती.

अशी काही वर्षे उलटली, पण माकड-माणसाच्या अस्तित्वाबाबत अजूनही शंका घेतल्या जात होत्या.

आणि अचानक शास्त्रज्ञांना नवीन माकड-माणूस सापडला. जावा बेटावर सापडलेल्या माकड-माणसाशी त्याचे खूप साम्य होते.



पीथेकॅन्थ्रोपची हाडे शोधण्यासाठी जावामध्ये पुराणवस्तुशास्त्रज्ञ उत्खनन करतात

विसाव्या शतकाच्या आरंभी एक शास्त्रज्ञ चीनमधील बेईपिन शहरात रस्त्यावरून फिरता फिरता चिनी औषधे पाहण्यासाठी औषध-भांडारात गेला.

तेथे फडताळांवर अत्यंत विचित्र वस्तू मांडलेल्या होत्या : माणसाच्या आकृतीसारखी दिसणारी जिन्सेंग औषधी मुळी, प्राण्यांची हाडे व दात, तऱ्हेतऱ्हेचे ताईत.

शास्त्रज्ञाला त्या हाडांमध्ये एक असा दात सापडला, जो जनावराचा निश्चितपणे नव्हता, पण त्याचवेळी तो आधुनिक माणसाच्या दातांपेक्षा ठळकपणे वेगळा दिसत होता.

शास्त्रज्ञाने तो दात विकत घेतला व युरोपातील एका म्युझियमकडे पाठवून दिला. तेथे ह्या वस्तूला सावधपणे नोंदण्यात आले : "चिनी दात."

त्यानंतर दोन दशकांपेक्षा जास्त काळ लोटला व अगदी अनपेक्षितपणे बेईपिनजवळ चोऊ-कोऊ-त्यान गुंफांमध्ये तसलेच दोन दात सापडले. नंतर त्या दातांचा मालक सापडला. शास्त्रज्ञांनी त्याला सिनान्थ्रोप असे नाव दिले.

वस्तुतः तो पूर्ण सापळ्याच्या स्वरूपात सापडला नव्हता. वेगवेगळी हाडे सापडली होती. तेथे सुमारे पन्नास दात होते, तीन कवटया होत्या, अकरा जबडे होते, मांडीच्या हाडाचा तुकडा होता, मणका होता, गळ्याचे हाड होते, मनगटाचे हाड व पावलाच्या हाडाचा तुकडा होता.

अर्थात ह्याचा असा अर्थ नव्हे की, गुंफेत राहणाऱ्याला तीन डोकी व एक पाय होता.

सर्व खुलासा स्पष्ट आहे. गुंफेत फक्त एक सिनान्थ्रोप रहात नव्हता, तर त्यांचा संपूर्ण गट रहात होता. लाखो वर्षांच्या अवधीत अनेक हाडे कुठेतरी नष्ट झाली. कदाचित जंगली श्वापदे त्यांना उचलून घेऊन गेली. पण जी हाडे शिल्लक राहिली, त्यांच्यावरून गुंफावासी कसे दिसत होते ह्याची कल्पना करणे सहज शक्य ठरले. शास्त्रज्ञाच्या हाती अवघे एक बोट द्या, तो संपूर्ण माणूस तुमच्यासमोर उभा करतो.

आपला नायक त्या अतिप्राचीन काळी जिवंत असताना कसा दिसत होता?

असे सांगणे भाग आहे की, तेव्हा तो देखणा नव्हता.

त्याच्याशी तुमची गाठ पडली असती, तर नक्कीच तुम्ही घाबरून मागे सरकला असतात. लांबुळक्या तोंडाचा आणि लांब केसाळ हातांचा हा माणूस अजून माकडासारखा दिसत होता. पण एक क्षणभर तुम्ही ठरविले की, ते माकड आहे, तर तात्काळ तुम्ही तुमचा निष्कर्ष मागे घेतला असता : माकड माणसाप्रमाणे ताठ थोडेच चालते? माकडाचे तोंड माणसाच्या चेहऱ्याशी एवढे साम्य दाखविणारे असते?

आणि तुम्ही जर हळूच त्या सिनान्थ्रोपमागून थेट त्याच्या गुंफेपर्यंत गेला असतात, तर तुमचे पूर्ण शंकानिरसन झाले असते.

तो पहा फेंगडया पायांनी नदीतीरापाशी चालत गेला. अचानक तो वाळूवर बसतो. एका मोठ्या दगडाकडे त्याचे लक्ष गेले. तो दगड उचलून घेतो, त्याला न्याहाळतो आणि दुसऱ्या दगडावर त्याला आपटतो. मग उठतो आणि सोबत दगड घेऊन पुढे चालू लागतो.

त्याच्या पाठोपाठ तुम्ही तीराच्या उंचवटयावर पोहोचता. तेथे गुंफेच्या प्रवेशद्वारापाशी सगळे गुंफावासी जमलेत. त्यांचा जमाव उभा आहे. दाढीवाला, केसाळ म्हातारा दगडी हत्याराने हरणाचे धूड सोलतोय. त्याच्या शेजारी बायका हातांनी मांसाचे लचके तोडताहेत. मुले छोटया तुकडयांची मागणी करताहेत. आणि ह्या सर्व दृश्यावर गुंफेत खोलवर पेटणाऱ्या शेकोटीचा उजेड पडलाय.

इथेच तुमच्या सर्व शंका नाहीशा होतात: माकड शेकोटी पेटवू शकले असते? दगडापासून हत्यार बनवू शकले असते?

पण वाचक प्रश्न विचारू शकतो: सिनान्थ्रोपला हत्यारे बनविता येत होती व आगीचा उपयोग त्याला ठाऊक होता, हे कुठून समजले?

ह्या प्रश्नाला खुद्द चोऊ-कोऊ-त्यान गुंफा आपल्याला उत्तर देते. तेथील उत्खननात केवळ हाडे सापडली नाहीत, तर इतर खूप वस्तू सापडल्या: मातीत मिसळलेले राखेचे दाट थर आणि अनेक ओबडधोबड दगडी हत्यारे.

हत्यारांची संख्या दोन हजारांपेक्षा जास्त होती आणि राखेचा थर सात मीटर जाडीचा होता.

म्हणजे सिनान्थ्रोप गुंफेत अनेक वर्षे रहात होते आणि खूप काळपर्यंत त्यांनी शेकोटी पेटत ठेवली होती.

पण बहुधा त्यांना आग कशी पेटवायची माहीत नव्हते. खाण्यासाठी ते कंदमुळे गोळा करीत, हत्यारांसाठी दगड गोळा करीत, त्याचप्रमाणे आगसुद्धा ते गोळा करून आणत असावेत.

अरण्यातील वणव्यात त्यांना आग सापडायची. धगधगणारा निखारा उचलून सिनान्थ्रोप काळजीपूर्वक त्याला घरी आणायचा. पाऊस आणि वाऱ्यापासून संरक्षण देणाऱ्या त्याच्या गुंफेत आगीला जणू अत्यंत मौल्यवान वस्तू समजून तो आगीची राखण करायचा व तिला जपून ठेवायचा.

प्रकरण तिसरे

माणूस नियम मोडतो

आपल्या नायकाने हाती दगड अथवा काठी घेतली. त्यामुळे तो तात्काळ अधिक सामर्थ्यवान व स्वतंत्र बनला. आता जवळच्या झाडांवर फळे व कठीण कवचीची फळे आहेत अथवा नाहीत, ह्याचे त्याला फारसे महत्त्व वाटेना. त्याच्या निवाऱ्यापासून दूरपर्यंत खाद्याच्या शोधार्थ तो जाऊ शकत होता, एका जंगली जगातून दुसऱ्या जंगली जगात जाऊ शकत होता, उघड्या मैदानांवर खूप वेळपर्यंत राहू शकत होता, सगळे नियम मोडून त्याला खाण्यास योग्य नसलेल्या पदार्थांची चव घेत होता.

अशा रीतीने, स्वतःच्या साहसांनी पूर्ण भरलेल्या जीवनाच्या आरंभापासून, माणसाने निसर्गाचे नियम मोडायला सुरुवात केली.

झाडावरचा रहिवासी झाड सोडून खाली आला व जमिनीवर भटकू लागला. शिवाय मागील पंजांवर ताठ उभा राहू लागला आणि त्याला नेमून दिल्याप्रमाणे न चालता वेगळ्या रीतीने चालू लागला. एवढेच नव्हे तर पूर्वी न खाण्याच्या वस्तू खाऊ लागला व अन्नप्राप्ती वेगळ्या पद्धतींनी करू लागला.

निसर्गात सर्व प्राणी व वनस्पती एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांच्यात "आहार-साखळी" आहे. जंगलात कुठेतरी खारी पाईनच्या बिया खातात आणि खारींना मार्टेन खातात. म्हणजे साखळी तयार झाली: पाईनच्या बिया – खार – मार्टेन. पण खारी केवळ पाईनच्या बियाच नव्हे, तर आणखीही काही खातात. उदाहरणार्थ: अळंब्या आणि दाणे. आणि खारींना केवळ मार्टेनच खात नाहीत, तर ससाण्यासारखे हिंस्र पक्षीही खातात. दुसरी साखळी बनते: अळंब्या व दाणे – खार – ससाणा. जंगलातील सर्व निवासी अशा साखळयांनी बांधलेले आहेत.

आपला नायकसुद्धा त्याच्या भोवतालच्या संपूर्ण जगाशी साखळयांनी बंधित होता. उदा. तो फळे खायचा आणि त्याला तीक्ष्ण सुळयांचा वाघ खायचा.

अचानक आपला नायक ह्या साखळ्या तोडायचा निर्णय घेतो. पूर्वी न खाल्लेल्या वस्तू तो खाऊ लागतो. शेकडो हजारो वर्षे त्याच्या पूर्वजांना वाघांचे भक्ष्य बनावे लागले होते, पण आता तो वाघांचे भक्ष्य बनण्यास नकार देतो.

असे कसे त्याला धैर्य आले? झाड सोडून जेथे हिंस्र श्वापदांचे तीक्ष्ण दात त्याची वाट पहात होते अशा जमिनीवर उतरण्याचा निर्णय त्याने कसा काय घेतला? असे करणे म्हणजे

खाली पिसाळलेला कुत्रा वाट पहात असताना मांजराने झाडावरून उतरण्यासमान आहे.

माणसाला त्याच्या स्वतःच्या हातांनी धीट बनविले. त्याने हातात उचललेला दगड आणि अन्न मिळविण्यासाठी हातात धरलेली काठी, हीच त्याची स्व-संरक्षणाची शस्त्रे बनली. माणसाची पहिली उपकरणेच त्याची पहिली शस्त्रे बनली.

शिवाय माणूस जंगलांमधून एकटा कधीही फिरत नव्हता.

हिंस्र श्वापदाशी माणसांची सर्व टोळी झुंज द्यायची आणि आता माणसे निःशस्त्र नव्हती.

त्याशिवाय अग्नीबद्दल विसरू नये. आगीच्या मदतीने माणूस अत्यंत भयानक श्वापदालाही घाबरवू आणि पिटाळू शकत होता.

हातांच्या खुणांमागोमाग

झाडावरून जमिनीवर, जंगलातून नदीच्या खोऱ्यात – माणसाला झाडाशी बांधून ठेवणारी साखळी तोडण्यात जेव्हा यश आले, तेव्हा त्याचा प्रवास असा घडला.

पण माणूस नदीच्या खोऱ्याकडे गेला, हे आपल्याला कुठून समजले?

खुणा तेथपर्यंत घेऊन जातात.

आपल्या काळापर्यंत माणसाच्या खुणा कशा काय टिकून राहिल्या?

सर्वसामान्य खुणांबाबत, पायांच्या ठशांबाबत आम्ही बोलत नाही, तर हातांनी मागे ठेवलेल्या खुणांबाबत बोलत आहोत.



केवळ माणसाचा हात ह्या दगडांना असा आकार देऊ शकला. शिंगाचे बाणाचे टोक, कातडी कमावण्याचे हत्यार व सुरा

शंभर वर्षांपूर्वी, फ्रान्समधील सोम्मे नदीच्या खोऱ्यात, खोदकामगार खणत होते. नदीच्या प्राचीन पात्रामधून वाळू, खडी व गोटे काढत होते.

फार फार पूर्वी, जेव्हा सोम्मे नदी अजून तरुण होती, जमिनीमधून नुकतीच स्वतःची वाट कापत जात होती, तेव्हा तिच्या प्रवाहाचा वेग खूप जलद व जोरदार होता. त्यामुळे तिच्या प्रवाहाबरोबर मोठमोठे दगड वाहात जात होते. ते दगड वाहाता वाहाता एकमेकांवर आपटत होते, घासून गुळगुळीत बनत होते, त्यांचा आकार लहान लहान बनत होता. नंतर जेव्हा नदी अधिक शांत झाली व संथ वाहू लागली, तेव्हा तिने ह्या गोटयांवर वाळूचा आणि चिकणमातीचा थर बसविला.

ह्या वाळूच्या व चिकणमातीच्या थरांना खणून त्यांच्याखालील गोटे मजूर काढत होते.

पण आश्चर्यकारक घटना घडली: काही गोटे गोल गुळगुळीत नव्हते, उलट खडबडीत होते आणि त्यांच्या दोन बाजूंचे जणू टवके काढले होते. असा आकार त्यांना कुणी दिला असावा? गोटयांना गुळगुळीत बनविणाऱ्या नदीने नक्कीच नाही!

हे विचित्र दगड स्थानिक रहिवासी बूशे दे पेर्त यांच्या नजरेस पडले. ते शास्त्रज्ञ होते. सोम्मे नदीच्या तीरांवर आढळलेल्या अनेक चित्रविचित्र वस्तूंचा मोठा संग्रह त्यांच्या घरी होता. प्राचीन हत्तींचे सुळे, गेंडयांची शिंगे, गुंफांमधील अस्वलांच्या कवटया अशा वस्तूंचा त्यांच्या संग्रहात समावेश होता. सोम्मे नदीच्या पाण्यात आत्ता घोडे अथवा मेंढया पाणी प्यायला उतरतात, त्याचप्रमाणे पुरातन काळी केव्हातरी ती महाभयंकर जनावरे पाणी प्यायला येत होती.

पण खुद्द आदिमानव कुठे होता? त्याची हाडे मात्र बूशे दे पेर्त यांना सापडली नाहीत.

आणि अचानक त्यांना वाळूत हे विचित्र दगड दिसले. दोन्ही बाजूंना त्यांना कुणी टोकदार बनविले? बूशे दे पेर्त यांनी निष्कर्ष काढला: हे काम फक्त माणूसच करू शकतो.

ह्या पुराणवस्तुशास्त्रज्ञाने दगडांचे अत्यंत कुतूहलाने निरीक्षण केले. एवढे खरे, हे आदिमानवाचे अवशेष नव्हते. पण त्याच्या ह्या खुणा होत्या—त्याच्या कामाचे हे ठसे होते. हे नदीचे नव्हे तर माणसाच्या हातांचे काम होते, एवढे स्पष्ट होते.

बूशे दे पेर्त यांनी स्वतःच्या शोधांबाबत एक पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाला त्यांनी मोठया धिटाईने शीर्षक दिले होते: 'निर्मितीसंबंधी—सजीव प्राण्यांचे मूळ व त्यांचा विकास ह्यासंबंधी निबंध.' इथे लढा सुरू झाला. यूबूआ यांच्या बाबतीत घडले होते त्याचप्रमाणे बूशे दे पेर्त यांच्यावर चहूबाजूंनी हल्ले झाले.

नामवंत पुराणवस्तुशास्त्रज्ञ सिद्ध करण्यास सरसावले की, ह्या प्रांतिक हौशी पुराणवस्तुसंग्राह-काला शास्त्राबाबत काहीही समजत नाही, त्याच्या दगडाच्या "कुऱ्हाडी" खोटया आहेत आणि त्याचे पुस्तक जप्त केले पाहिजे, कारण माणसाच्या निर्मितीसंबंधीच्या चर्चच्या शिकवणीला त्याने आव्हान दिले आहे.

पूर्ण पंधरा वर्षेपर्यंत बूशे दे पेर्त व त्यांचे विरोधक यांच्यात संघर्ष चालू होता.

बूशे दे पेर्त यांचे केस पांढरे झाले, ते म्हातारे बनले, पण त्यांनी खंबीरपणे लढा चालू ठेवला. मानवी वंशाच्या अतिप्राचीनतेला सिद्ध करण्याचा प्रयत्न चालू ठेवला. पहिल्या पुस्तका-पाठोपाठ त्यांनी दुसरे व तिसरे पुस्तक लिहिले.

हा विषम शक्तींमधील लढा होता, पण तरीही बूशे दे पेर्त जिंकले. भूगर्भशास्त्रज्ञ लायेल व प्रेस्त्विच त्यांच्या मदतीला धावले. ते सोम्मेच्या खोऱ्यात आले, उत्खनन स्थळांची त्यांनी पाहणी केली, बूशे दे पेर्त यांच्या संग्रहाचा अभ्यास केला व अत्यंत कसून छाननी केल्यानंतर जाहीर केले की, बूशे दे पेर्त यांना सापडलेल्या वस्तू आदिमानवाची अस्सल उपकरणे होती. हा आदिमानव त्या काळात रहात होता, ज्या काळात तेथे हत्ती व गेंडे वावरत होते.

'माणसाच्या प्राचीनतेबाबतचे भूगर्भशास्त्रीय पुरावे' ह्या लायेल ह्यांच्या पुस्तकाने बूशे दे पेर्त यांच्या विरोधकांची तोंडे बंद केली. मग सारे म्हणू लागले की, बूशे दे पेर्तने खास काही नवा शोध लावला नव्हता, कारण आदिमानवाने बनविलेली उपकरणे त्यापूर्वीसुद्धा सापडली होती. त्यावर लायेलनी खोचक उत्तर दिले: "दर वेळी, जेव्हा शास्त्र काहीतरी महत्त्वाचा शोध लावते, तेव्हा प्रथम म्हणतात की, तो धर्मविरोधी आहे आणि नंतर घोषित करतात की, ती गोष्ट केव्हाची सर्वांना माहीत होती."

दे पेर्त यांना सापडली होती तशी दगडी हत्यारे आता खूप आढळलीत. नद्यांच्या तीरांवरील खाणींमधून जेथे मुरूम आणि वाळू खणून काढतात, तेथे जास्त करून ही हत्यारे सापडतात.

अशा रीतीने आजच्या मजुराच्या फावड्याची जमिनीमध्ये दडलेल्या आदिमानवाच्या आरंभी-च्या श्रम-उपकरणांशी गाठ पडते.

दगडी उपकरणांमधील सर्वांत प्राचीन उपकरणे—दुसऱ्या दगडाने दोन्ही बाजूंना टोकदार बनविलेला दगड. त्याच्याबरोबरच दगडाला तासताना उडालेल्या कपचा सापडतात.

ही दगडी उपकरणे म्हणजेच माणसाच्या हातांच्या खुणा आहेत. ह्या खुणा आपल्याला नद्यांच्या खोऱ्यांमध्ये आणि वाळूच्या ढिगांमध्ये घेऊन जातात. तेथे नदीकाठी माणूस स्वतःच्या कृत्रिम नख्यांना व सुळ्यांना बनविण्यासाठी साहित्य शोधायचा.

एव्हाना माणसाचा हा मुख्य उद्योग बनला होता. जनावर भक्ष्याचा अथवा घरट्यासाठी साहित्याचा शोध घेऊ शकते. पण स्वतःच्या नख्या किंवा दातांना बनविण्यासाठी साहित्य शोधण्याच्या फंदात ते कधीही पडणार नाही.

जिवंत फावडे आणि जिवंत पिंप

बांधकाम करणाऱ्या, पाथरवटाचे, सुताराचे, विणकराचे आणि शिंप्याचेसुद्धा काम करणाऱ्या प्राण्यांविषयी व पक्ष्यांविषयी तुम्ही ऐकले असेल, वाचले असेल. उदाहरणार्थ, आम्हाला माहीत आहे की, बीव्हर प्राणी त्यांच्या तीक्ष्ण व बळकट सुळ्यांनी अस्सल लाकूडतोड्यांप्रमाणे झाडे

तोडतात. त्याचप्रमाणे पडलेल्या झाडांच्या बुंध्यांचा व फांद्यांचा वापर करून अस्सल बांध घालतात. अशा बांधांमुळे नद्यांचे पाणी तीरांपलिकडे पसरते आणि बीव्हरना आवडणारी डबकी तयार होतात.

आणि जंगलात आढळणाऱ्या साध्या तांबड्या मुंग्या! एक काठी घेऊन मुंग्यांच्या वारूळात खुपसून पहा—पाईनच्या कोरड्या सुयांपासून धूर्तपणे बांधलेली अनेकमजली रचना तुमच्या नजरेस पडते.

तेव्हा प्रश्न पडतो: मुंग्या अथवा बीव्हर केव्हातरी माणसाला गाठू शकतील किंवा नाहीत? आणि असे घडू शकणार नाही का, की आणखी दहा लाख वर्षांनंतर मुंग्या स्वतःची मुंग्यांची वर्तमानपत्रे वाचतील, मुंग्यांच्या कारखान्यांमध्ये काम करतील, मुंग्यांच्या विमानांमधून उडतील व रेडिओवर मुंग्यांचे कार्यक्रम ऐकतील? अर्थात, असे कधीही घडणार नाही. कारण माणूस व मुंगी यांच्यात एक फार महत्त्वाचा फरक आहे.

हा कोणता फरक?

माणूस मुंगीपेक्षा आकाराने खूप मोठा आहे, हा फरक?



जिवंत पिंपांसह कोठार

नाही.

मुंगीला सहा पाय आहेत आणि माणसाला फक्त दोन, हा फरक?

नाही, आम्ही अगदी वेगळ्या फरकाबद्दल बोलतोय.

माणूस कसा काम करतो? तो नुसत्या हातांनी आणि दातांनी काम करीत नाही, तर कुऱ्हाड, फावडे, हातोडा यांच्या मदतीने काम करतो. पण मुंग्यांच्या वारूळात तुम्ही कितीही शोधलेत, तरी ना कुऱ्हाड सापडेल, ना फावडे.

मुंगीला जेव्हा काही तोडायचे असते, तेव्हा तिच्या डोक्यावर असलेल्या जिवंत कात्रीचा ती वापर करते. जेव्हा तिला खंदक खणायचा असतो, तेव्हा ती चार जिवंत फावड्यांचा वापर करते. ही फावडी म्हणजे तिचे चार पाय. पुढच्या दोन पायांनी ती जमीन खणते, मागील दोन पायांनी माती मागे उडविते व मधल्या दोन पायांचा आधारासाठी उपयोग करते.

मुंग्यांची भांडीसुद्धा जिवंत आहेत. मुंग्यांची अशी एक जात आहे, ज्यांच्या वारूळात जिवंत पिंपांची आख्खी तळघरे भरलेली आढळतात. अंधाऱ्या, खालच्या तळघरात अगदी एकसारख्या पिंपांच्या रांगा थेट छतापर्यंत खच्चून भरलेल्या असतात. ही पिंपे हलत नाहीत. अचानक एक मुंगी तळघरात सरपटत येते. मिशांचे पिंपावर काही प्रहार करते व एकदम पिंप जिवंत बनते, हालचाल सुरू करते.

असे आढळते की, पिंपाला डोके आहे, छाती आहे, पाय आहेत व खुद्द पिंप म्हणजे मुंगीचे टम्म फुगलेले पोट. छताला उलट टांगलेल्या मुंगीचा जबडा उघडतो आणि तोंडात मधाचा थेंब येतो. अंगात बळ आणण्यासाठी खाली आलेली कामगार-मुंगी मधाचा थेंब चाटून खाते व परत कामावर निघून जाते. आणि मुंगी-पिंप परत दुसऱ्या पिंपांमध्ये झोपी जाते.



चार पायांचे बांधणी-कामगार बांध घालतात

अशी आहे मुंगीची "जिवंत" तंत्रसामग्री. माणसाप्रमाणे तिची उपकरणे कृत्रिम नाहीत, तर अस्सल आहेत आणि त्यांच्यापासून ती कधीही अलग होत नाही.

बीव्हरची उपकरणेही जिवंत आहेत. तो कुऱ्हाडीने नव्हे, तर दातांनी झाड पाडतो. म्हणजे, मुंग्या व बीव्हर स्वतःची उपकरणे बनवीत नाहीत. तयार उपकरणांसहित त्यांचा जन्म होतो.

अथवा क्रॉसबिलचे उदाहरण घ्या.

हा पक्षी जेवताना काटा-सुरी वापरत नाही. त्याच्या टेबलावर फक्त चिमटयांची एक जोडी असते व त्या चिमटयांच्या साह्याने अत्यंत चपळपणे तो पाईनची शंक्वाकार फळे फोडतो आणि त्यांच्यातील बिया खातो. क्रॉसबिल ह्या चिमटयांपासून कधीही अलग होत नाही (झोपेतसुद्धा) ह्याचे साधे कारण म्हणजे त्याची चोच चिमटयांचे काम करते.

कठीण कवचीची फळे फोडायला अडकित्त्याचा अथवा बूच उघडायला कॉर्कस्क्रूचा जसा उपयोग होतो, तसाच पाईनचे शंकू फोडायला चोचीचा उपयोग होतो.

फरक एवढाच की, अडकित्ता माणसाने बनविला आहे, तर हजारो वर्षे पाईनवृक्षांच्या जंगलात राहून आणि शंकू फोडून त्यातील बिया खाऊन क्रॉसबिलने स्वतःला जगण्यालायक बनविले आहे. प्रथमदर्शनी अर्थात हे सोयीस्कर वाटते: जिवंत उपकरण कधी हरवणार नाही. पण नीट विचार केला, तर स्पष्ट होते की, हे उपकरण तेवढे चांगले नाही. त्याच्यात दुरुस्ती करता येत नाही किंवा ते बदलता येत नाही.

बीव्हरचे सुळे म्हातारपणामुळे जेव्हा बोथट बनतात, तेव्हा त्यांना धारवाल्याकडे धार काढण्यासाठी तो नेऊ शकत नाही. आणि जमीन अधिक सोप्या व वेगवान रीतीने खणता यावी म्हणून नव्या, सुधारीत पायाची ऑर्डर मुंगी कर्मशाळेत देऊ शकत नाही.

हातांऐवजी फावडयासहित माणूस

अशी कल्पना करू की, इतर प्राण्यांप्रमाणेच, माणसालासुद्धा फक्त जिवंत उपकरणे होती व लाकडी, लोखंडी, पोलादी उपकरणे त्याच्यापाशी मुळीच नव्हती.

नवी उपकरणे तो बनवू शकत नव्हता आणि जुन्या उपकरणांना बदलणेही त्याला शक्य नव्हते. जर त्याला फावडयाची गरज असती, तर फावडयाच्या आकाराच्या हातांसह तो जन्मला असता. अर्थात अशी कल्पना प्रत्यक्षात उतरणे सर्वथा असंभवनीय आहे. पण तरीही असे समजू की, असा विचित्र प्राणी जन्मला. बहुधा तो उत्तम जमीन खोदणारा ठरला असता. पण चांगली दृष्टी असलेला माणूस ज्याप्रमाणे दुसऱ्याला आपले डोळे देऊ शकत नाही, त्याप्रमाणे स्वतःची खोदकला दुसऱ्याला देणे त्या प्राण्याला शक्य झाले नसते.

स्वतःचे हात-फावडे माणसाला सदैव स्वतःबरोबर बाळगावे लागले असते व दुसऱ्या एखाद्या

कामासाठी अर्थातच त्याचा त्याला उपयोग झाला नसता. आणि जेव्हा माणसाची अखेर आली असती, तेव्हा त्याच्या फावड्याचीही अखेर आली असती. त्या फावड्याला त्याच्यासहित पुरणे आवश्यक ठरले असते. हा जन्मजात खोदक स्वतःचे फावडे त्याच्या वंशजाला केवळ तेव्हाच देऊ शकला असता, जेव्हा त्याच्या नातवंडांपैकी अथवा पंतवंडांपैकी कुणी त्याचा वारसा घेतला असता.

पण एवढ्यावरच संपत नाही. जिवंत उपकरण जेव्हा प्राण्याला उपयुक्त असते, त्याला हानीकारक नसते, तेव्हाच केवळ पुढील पिढ्यांमध्ये त्याचे जतन होते.

माणसे जर चिचुंद्र्यांप्रमाणे जमिनीखाली बिळात राहिली असती, तर अर्थातच त्यांना पंजे-फावडी आवश्यक ठरली असती.

पण जमिनीच्या वरती राहणाऱ्याला तसा हात असणे अनावश्यक चैन ठरेल.

जिवंत आणि नैसर्गिक उपकरण निर्माण करण्यापूर्वी अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. पण आपल्या सुदैवाने माणूस दुसऱ्या वाटेने गेला. हातांऐवजी फावडे निर्माण होईपर्यंत तो वाट पहात बसला नाही. त्याने स्वतःच फावडे बनविले व केवळ फावडेच नव्हे, तर सुरी, कुऱ्हाड आणि इतर खूप उपकरणे बनविली.

पूर्वजांकडून मिळालेल्या वीस बोटांच्या व बत्तीस दातांच्या जोडीला माणसाने आणखी हजारो वेगवेगळया – लांब व आखूड, जाड व पातळ, धारदार व बोथट, टोचणाऱ्या, कापणाऱ्या, प्रहार करणाऱ्या – बोटांना, दातांना, सुळ्यांना, नख्यांना, मुठींना निर्माण केले.

त्यामुळे इतर प्राण्यांपेक्षा तो एवढ्या वेगाने पुढे गेला, की त्याला गाठणे कुणालाही अशक्य ठरले.

उद्योगी माणूस आणि उद्योगी नदी

जेव्हा माणूस नुकताच माणूस बनला होता, तेव्हा आरंभीच्या काळात तो स्वतःच्या दगडी नख्यांना आणि दातांना बनवीत नव्हता, तर गोळा करीत होता. आत्ता आपण अळंब्या अथवा रानफळे गोळा करतो त्याप्रमाणे. नदीच्या उथळ पात्रात निसर्गाने घासून धारदार बनविलेल्या अणकुचीदार दगडांना तो खूप वेळपर्यंत हुडकत रहायचा.

असे आयते "अस्सल" अणकुचीदार दगड अनेकदा पाण्याच्या भोवऱ्याच्या वेगापायी नदीच्या तळाशी दगडांवर दगड आपटून बनत. अर्थात स्वतःच्या "श्रमांच्या" निष्पत्तीबाबत पाण्याच्या भोवऱ्याला फारशी फिकीर नसायची हे स्पष्ट आहे. म्हणून माणसाला उपयुक्त ठरतील असे दगड त्या शेकडो दगडांमध्ये फार कमी असत.

ह्यासाठी माणूस त्याला आवश्यक ती उपकरणे दगडापासून बनवू लागला.

आणि नंतर जे घडले त्याची मानवजातीच्या इतिहासात अनेकदा पुनरावृत्ती झाली:

माणसाने नैसर्गिक, अस्सल गोष्टींच्या जागी कृत्रिम गोष्टी आणल्या. निसर्गाच्या प्रचंड कर्मशाळेच्या एका कोपऱ्यात माणसाने स्वतःची कर्मशाळा स्थापली व निसर्गात नसलेल्या नव्या वस्तू तो बनवू लागला.

दगडी हत्यारांबाबत असे घडले. त्यानंतर हजारो वर्षांनी धातूबाबत तसेच घडले. सापडायला कठीण असलेल्या अस्सल धातूचा वापर करण्याऐवजी माणसाने खनिज मातीमधून धातू वितळवायला आरंभ केला. आणि दरवेळी, जेव्हा माणसाने सापडलेल्या वस्तूपासून स्वतः-च्या हातांनी नवीन वस्तू बनविली, तेव्हा त्याने स्वातंत्र्याकडे नवे पुढचे पाऊल टाकले होते, निसर्गाच्या कठोर सत्तेपासून स्वाधीनता मिळविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले होते.

आरंभी माणसाला स्वतःच्या हत्यारांसाठी साहित्य निर्माण करणे जमत नव्हते. निसर्गात तयार झालेल्या साहित्याला नवा आकार देण्याला शिकण्यापासून त्याने सुरुवात केली.

हाती दगड घेऊन त्यावर दुसऱ्या दगडाचे घाव घालून तो हत्यार बनवू लागला.

अणकुचीदार टोक असलेले प्रचंड हत्यार त्याच्या श्रमातून निर्माण व्हायचे. पुराणवस्तुशास्त्रज्ञ त्याला "घण" अथवा "फरशी-कुऱ्हाड" म्हणतात. कपचासुद्धा उपयोगी पडत. कापण्यासाठी, घासण्यासाठी, खुपसण्यासाठी त्यांचा वापर होई.

भूगर्भात खोलवर सापडणारी अतिप्राचीन हत्यारे निसर्गाची प्रक्रिया घडलेल्या दगडांशी खूप साधर्म्य दाखवितात, त्यामुळे ती कारागिरी नेमकी कुणाची ह्याचा निर्णय करणे अवघड जाते: माणसाची अथवा नदीची, किंवा नुसता थंडीचा आणि उष्णतेचा परिणाम. पाण्याशी सहयोग करून थंड आणि उष्ण तपमान दगडांना तडे पाडते व त्यांचे तुकडे करते.

पण दुसरी काही हत्यारे सापडलीत आणि त्यांच्याबाबत कोणत्याही शंका नाहीत. चिकणमाती व वाळूच्या दाट थरांखाली गाडल्या गेलेल्या प्राचीन नद्यांच्या उथळ पात्रांचे व किनाऱ्यालगतच्या प्रदेशांचे उत्खनन केले, तेव्हा आदिमानवाच्या संपूर्ण कर्मशाळा आढळल्या. तेथे त्याने तयार केलेल्या फरशा-कुऱ्हाडी होत्या व ज्यांच्यापासून त्या बनविल्या ते दगडांचे तुकडेही होते.

रशियात ह्या कुऱ्हाडी दक्षिणेला आढळल्या. सुखुमीच्या किनारपट्टीनजीक व क्रिमिआत कीईक-कोबा गुंफांमध्ये.

जर गारगोटीच्या दगडाची कुऱ्हाड नीट निरखून पाहिली, तर तिला धारदार बनविण्यासाठी दुसऱ्या दगडाने कुठे कुठे आघात केले होते हे स्पष्ट दिसते. तिला गुळगुळीत व चकचकीत केल्याच्या खुणाही आढळतात.

अशा सुबक वस्तू निसर्गात आपोआप बनत नाहीत. त्यांना फक्त माणूस बनवू शकतो.

आणि हे समजण्यासारखे आहे: निसर्गात सर्व गोष्टी विनाउद्दिष्ट, योजनेविना घडतात. पाण्याचा भोवरा दगडांना विचार न करता जमेल तसे तडाखे मारत असतो. माणूस तेच करतो, पण सुजाणपणे, उद्दिष्ट बाळगून. अशा रीतीने जगात उद्दिष्ट व योजना यांचा जन्म झाला.

निसर्गातील दगडाला नवे रूप देऊन माणसाने हळूहळू निसर्गात बदल घडवायला, नव्या गोष्टी आणायला आरंभ केला.

ह्यामुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा आणखी एक पायरी वर गेला, त्याला अधिक स्वातंत्र्य लाभले: कारण आता निसर्गाने अणकुचीदार दगड त्याला दिला नाही, तरी त्याचे काही अडून रहात नाही.

आता तो स्वतःसाठी हवे तसे हत्यार बनवू शकतो.

चरित्राचा आरंभ

सर्वसाधारणपणे माणसाच्या चरित्राचा आरंभ त्याच्या जन्माच्या वर्षापासून व ठिकाणापासून होतो. उदाहरणार्थ:

"इवान इवानोविच इवानोव ताम्बोव शहरात २३ नोव्हेंबर १८९७ साली जन्मले."

हीच माहिती काहीवेळा अधिक डौलदार शैलीत सादर केली जाते:

"१८९७च्या नोव्हेंबरच्या एका पावसाळी दिवशी, ताम्बोव शहराच्या सीमेवरील एका छोटया घरात इवान इवानोविच इवानोव यांचा जन्म झाला, ज्यांनी पुढे स्वतःच्या नावाला व जन्मगावाला कीर्ती प्राप्त करून दिली."

आम्ही आमच्या कहाणीच्या तिसऱ्या प्रकरणापर्यंत येऊन पोहोचलोय, पण आमचा नायक कुठे व केव्हा जन्मला, हे काही अजून सांगितले नाही. कबूल केले पाहिजे की, त्याचे धड नावसुद्धा आम्ही सांगितले नाही. एका ठिकाणी आम्ही त्याला "माकड-माणूस" म्हणतो, दुसऱ्या जागी "आदिमानव" म्हणतो, तर तिसऱ्या स्थळी चक्क "आपला जंगलचा पूर्वज" म्हणतो.

स्वतःच्या समर्थनार्थ काही शब्द सांगण्याचा आम्ही प्रयत्न करतो.

नायकाच्या नावापासून आरंभ करू.

आमची खूप इच्छा असूनही नायकाचे नाव आम्ही सांगू शकलो नाही, कारण त्याला अनेक नावे आहेत.

कुठल्याही चरित्राची पाने चाळा. तुम्हाला दिसेल की, पहिल्या पानापासून अखेरच्या पानापर्यंत नायकाचे एकच एक नाव असते. नायक लहानाचा मोठा होतो, त्याला दाढी-मिशा येतात, पण त्याचे नाव सहसा बदलत नाही. जर जन्मानंतर त्याचे इवान असे नाव ठेवले असेल, तर त्याच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत तो इवानच राहतो.

आमच्या नायकाबाबत मामला जास्त अवघड आहे.

दर प्रकरणागणिक तो स्वतः इतका बदलत जातो, की आमची इच्छा असो वा नसो—त्याचे नाव बदलावे लागते.

माणसाच्या कवटीशी साम्य असलेल्या प्राचीन माकडाच्या कवटीचे तुकडे दक्षिण आफ्रिकेत सापडले. हे ऑस्ट्रेलोपीथेक माकड कसे असावे ते चित्रात दाखविले आहे



अजून खूपसे माकडाशी साम्य असलेल्या आदि-मानवाला घेतले, तरी त्याला पिथेकॅन्थ्रोप, सिनान्थ्रोप आणि हायडेलबेर्गचा माणूस अशी नावे आहेत.

हायडेलबेर्गच्या माणसाचा फक्त जबडा शिल्लक उरलाय. जर्मनीतील हायडेलबेर्ग गावानजीक तो सापडला.

ह्या जबड्यावरून सांगता येते की, त्याचा मालक माणूस होता: त्याचे दात जनावरासारखे नाहीत, तर माणसाचे आहेत आणि माकडांप्रमाणे त्याचे सुळे इतर दातांपेक्षा पुढे आलेले नाहीत.

असे असले तरीसुद्धा, हायडेलबेर्गवाला अद्याप अस्सल माणूस नव्हे. त्याची माकडासारखी मागे सरकलेली हनुवटी हे स्पष्ट करते.

पिथेकॅन्थ्रोप, सिनान्थ्रोप, हायडेलबेर्गचा माणूस!

आख्खी तीन नावे आमच्या नायकाचे एकच वय सांगतात, त्याच्या विकासाची एकच पायरी दाखवतात.

पण आमचा नायक बदलत गेला. आजच्या माणसाशी त्याचे साम्य अधिकाधिक वाढत गेले. लहान मुलाचे कुमारात व कुमाराचे तरुणात जसे रूपांतर होत जाते, तसे आदिमानवाचे नीअँडरथाल माणसात व नीअँडरथाल माणसाचे क्रोमॅनोनमध्ये रूपांतर झाले.

एका नायकाची किती नावे!

पण एकदम पुढे धावायला नको. ह्या प्रकरणात आपल्या नायकाला म्हणतात – "पिथेकॅन्थ्रोप, सिनान्थ्रोप, हायडेलबेर्गचा माणूस."

हत्यारांसाठी साहित्य हुडकत नदीकिनाऱ्याने तो भटकतोय. दगडावर दगड घासून तो ओबडधोबड फरशी-कुऱ्हाड बनवतोय. नदीतीरांजवळच्या प्राचीन भूमिगत साठ्यांमध्ये अजूनही ह्या कुऱ्हाडी सापडतात.

तेव्हा वाचकहो, आता तुम्हाला समजले असेल की, आमच्या नायकाचे नाव सांगणे आम्हाला तेवढे सोपे गेले नाही.

त्याच्या जन्माचे वर्ष सांगणे त्याहून अवघड!

आमचा नायक अमूक एका वर्षात जन्मला असे आम्ही म्हणू शकत नाही. कारण माणूस ह्या एका वर्षात माणूस बनला नाही. माणसाला चालणे शिकण्यासाठी, हत्यारे बनवायला शिकण्यासाठी शेकडो हजारो वर्षांचा अवधी उलटावा लागला. माणसाचे वय किती ह्या प्रश्नाला अंदाजे एवढेच उत्तर देता येईल: सुमारे दहा लाख वर्षे.

आमच्या नायकाचे जन्मस्थळ नेमके सांगणे फारच अवघड आहे.

त्यासाठी आमच्या नायकाची आजी कुठे रहात होती ते स्पष्ट करण्याचा आम्ही प्रयत्न केला. तीच खणून काढलेली माकड-आजी, जिच्यापासून माणूस, चिम्पान्झी व गोरील्ला निर्माण झाले. ह्या माकडाला शास्त्रज्ञ ड्रायोपिथ म्हणतात. ह्या ड्रायोपिथचा पत्ता आम्ही शोधू लागलो, तेव्हा आढळून आले की ड्रायोपिथ खूप होते. काही ठसे आम्हाला मध्य युरोपात घेऊन गेले, तर दुसरे पूर्व आफ्रिकेत आणि तिसरे दक्षिण आशियात.

जाणकार माणसांचा आम्ही सल्ला घेतला, तेव्हा त्यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांमध्ये दक्षिण आफ्रिकेत खूप स्वारस्यपूर्ण अवशेष सापडलेत. मागील पायांवर चालू शकणाऱ्या व जंगलात नव्हे तर मोकळ्या मैदानांमध्ये राहणाऱ्या माकडांची हाडे तेथे सापडली.

इथे आम्हाला आठवण झाली की, पिथेकॅन्थ्रोप आणि सिनान्थ्रोपची हाडे आशियात सापडली होती व हायडेलबेर्गचा जबडा युरोपात सापडला होता. आता माणसाची जन्मभूमी कुठे हे तुम्हीच सांगा! इथे खंड सांगणे अवघड आहे, मग देश सांगणे तर दूरच!

आम्ही परत विचार करू लागलो. माणसाची अतिप्राचीन हत्यारे कुठे सापडली हे पाहिले तर? कारण माणूस हत्यारे बनवू लागला, तेव्हाच माणूस बनला होता. कदाचित हत्यारांच्या मदतीने माणसाचे उदयस्थान निश्चित करता येईल.

आम्ही जगाचा नकाशा घेतला व अतिप्राचीन हत्यारे—फरशी-कुऱ्हाड—जेथे जेथे सापडली त्या सर्व स्थळांवर खुणा केल्या. नकाशावर अनेक ठिपके दिसू लागले. सर्वांत जास्त ठिपके युरोपात होते, पण काही आफ्रिकेत आणि आशियातही होते.

ह्यावरून एकच निष्कर्ष निघत होता: माणूस जुन्या जमात एकाच जागी नव्हे, तर वेगवेगळ्या ठिकाणी एकाचवेळी उदयाला आला होता.

बहुधा असेच घडले असावे. माणसाचा वंश फक्त एका माकड-जोडप्यापासून निर्माण झाला, "माकड-आदाम" आणि "माकड-ईव्ह" यांच्यापासून निर्माण झाला, अशी कल्पना करणे शक्य नाही. माकडांचे माणसात रूपांतर केवळ माकडांच्या एका टोळीत घडले नाही, केवळ एकाच स्थळी घडले नाही, तर अनेक ठिकाणी घडले. दोन पायांवर चालू शकण्यास व हातांनी काम करण्यास जेथे जेथे माकडे समर्थ बनली, तेथे तेथे सर्वत्र. आणि त्यांनी कामाला आरंभ करताच एक नवी शक्ती अस्तित्वात आली व त्या शक्तीने कालांतराने त्यांचे माणसांमध्ये रूपांतर घडवून आणले. ही शक्ती म्हणजे मानवी श्रम.

माणूस काळ प्राप्त करतो

लोखंड कसे काढतात, कोळसा कसा मिळवतात आणि आग कशी पेटवतात, हे सर्वांना माहीत आहे.

पण काळ कसा प्राप्त करतात?

ह्याबद्दल फारच कमी लोक जाणतात.

पण प्रत्यक्षात काळ प्राप्त करायला माणूस फार पूर्वीच शिकला आहे. जेव्हा माणूस हत्यारे बनवू लागला, तेव्हा त्याच्या जीवनात नवीन उद्योग निर्माण झाला, एक अस्सल मानवी उद्योग – श्रम. पण श्रमासाठी काळाची गरज असते. दगडी हत्यार बनविण्यासाठी सर्वप्रथम योग्य दगड शोधणे आवश्यक होते. कारण कुठलाही दगड हत्यार बनवायला उपयोगी ठरतोच असे नाही.

घट्ट, जड दगड हत्यारे बनवायला सर्वांत चांगला ठरायचा. पण असा दगड सर्वत्र पायांखाली पडलेला नसायचा. त्याचा शोध घ्यावा लागायचा. ह्या शोधात माणसाचे अनेक तास खर्च होत व काहीवेळा ह्या शोधामधून काहीच निष्पन्न होत नसे. अशा वेळी कमी जड दगड माणसाला कामासाठी निवडावा लागायचा किंवा वाळूचा दगड आणि चुनखडी असले मऊ दगड घ्यावे लागायचे.

समजा, त्याला योग्य दगड सापडलाय. आता त्याला पाहिजे तसा आकार देण्यासाठी दुसऱ्या दगडाने ठोकले आणि तासले पाहिजे. ह्यासाठी परत काळाची गरज आहे. आत्ता माणसाची हातांची बोटे जशी चपळ व कुशल आहेत, तशी तेव्हा नव्हती. काम करायला ती नुकतीच शिकली होती. त्यामुळे ओबडधोबड दगडी कुऱ्हाड बनविण्यासाठी खूप काळ खर्च होत असावा.

पण काळ कुठून घ्यायचा?

प्राचीन माणसापाशी स्वतंत्र काळ अत्यंत कमी होता. आजच्या काळातील अत्यंत कामसू माणसापेक्षाही कमी. सकाळपासून सध्याकाळपर्यंत तो जंगलांमधून व कुरणांमधून भटकायचा, अन्न गोळा करायचा. स्वतःसाठी आणि स्वतःच्या मुलांसाठी. खाण्यायोग्य सर्व वस्तू त्यांच्या तोंडात जात. अन्न गोळा करणे व खाणे ह्यातच सगळा वेळ खर्च व्हायचा – झोपेचा काळ वगळून. शिवाय अन्न फारसे पोषक नसल्यामुळे खूप खावे लागायचे.

रानफळे, कठीण कवचीची फळे, गोगलगायी, उंदीर, कोवळे कोंब, कंदमुळे, कीटक-कोष आणि तत्सम किरकोळ गोष्टी जेवणात असतील, तर किती खावे लागेल!



दगडी सुरा

सध्या हरणांचे कळप जंगलातून भटकत गवत कुरतडून रवंथ करीत राहतात, त्याप्रमाणे तेव्हा माणसांचे कळप जंगलातून चरत फिरत. पण जर सबंध दिवसभर अन्न शोधून ते चघळत रहायचे, तर मग काम केव्हा करायचे?

आणि माणसाला आढळले की, कामात एक अद्भुत गुण होता: काम केवळ वेळ घेत नाही, तर देतेसुद्धा.

म्हणजे, दुसऱ्याला ज्या कामासाठी आठ तास लागतात ते तुम्ही चार तासात केले, तर तुम्ही चार तासांचा काळ मिळवलात. दुप्पट लौकर काम करणारे हत्यार जर तुम्ही बनवलेत, तर त्या कामासाठी पूर्वी लागत होता त्याच्या निम्म्या वेळाला तुम्ही पदरात पाडून घेतलेत.

अशा रीतीने काळ प्राप्त करण्याची किमया प्राचीन माणसाला अवगत झाली होती.

दगड तासायला अनेक तास खर्च करावे लागत. पण नंतर त्या टोकदार दगडाच्या मदतीने झाडांच्या सालीखालील कीटक-कोष खरवडून काढणे जास्त सोपे बनायचे.

दगडाच्या साह्याने काठी तासायलासुद्धा बरेच श्रम करावे लागत, पण नंतर त्या काठीच्या मदतीने जमिनीखालील कंदमुळे खणून काढणे किंवा गवतावरील छोटे प्राणी ठार मारणे सोपे बनायचे.

ह्यामुळे अन्न लौकर गोळा करता येऊ लागले व माणसापाशी काम करायला अधिक काळ शिल्लक राहू लागला. अन्नाच्या शोधापासून लाभलेल्या फावल्या वेळात माणसाने स्वतःची हत्यारे बनविली, त्यांना अधिक सुबक व धारदार बनविले. पण प्रत्येक नवे हत्यार परत अधिक अन्न मिळवत होते आणि माणसाला अधिक फावला काळ लाभत होता.

शिकारीमुळे माणसाला सर्वांत जास्त मोकळा वेळ मिळाला. अर्धा तासपर्यंत मांस खाल्ल्यास तो आहार सबंध दिवसासाठी पुरेसा ठरायचा. पण आरंभीच्या काळात माणसांना मांस क्वचित खायला मिळायचे. मोठ्या जनावरांना काठीने अथवा दगडाने ठार मारणे अवघड होते व जंगली उंदरांपासून फारसे मांस मिळत नसे.

माणूस अजून अस्सल शिकारी बनला नव्हता.

माणूस – संग्राहक

आपल्या काळात संग्राहक होणे सोपे आहे. आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसभर रानावनात भटकलाय, आपण अळंब्या आणि रानफळे गोळा केलीत. शेवाळामध्ये अचानक तपकिरी टोपीची अळंबी आढळली किंवा गवतात पहाटेसारखी तांबडीलाल अळंबी दिसली, तर किती मजा वाटते! शेवाळात अगर गवतात हाताची पाचही बोटे खुपसून अगदी सावधपणे तेथून अळंबीचा भक्कम देठ पकडून अळंबी उपटायला किती छान वाटते!

पण कल्पना करा, की अळंब्या किंवा रानफळे गोळा करणे तुमचा मुख्य धंदा आहे. मग तुम्ही नेहमी भरल्या पोटी राहिला असतात का? जेव्हा अळंब्या गोळा करायला आपण जातो, तेव्हा काही वेळा टोपलीभर अळंब्या सापडतात आणि शिवाय टोपीतही भरून आणाव्या लागतात. पण काही वेळा सबंध दिवसभर रानात वणवण करूनही करंडीच्या तळाशी एखादी सुरकुतलेली अळंबी आपण घरी आणतो.

आमची एक दहा वर्षे वयाची मैत्रिण रानात जाताना नेहमी फुशारक्या मारायची:

"आज शंभर सुरेख अळंब्या आणीन!"

पण बहुतेकदा घरी रिकाम्या हातांनी परतायची. जर तिच्या घरात दुसरे खाण्याचे पदार्थ नसते, तर भुकेपायी ती मेली असती.

प्राचीन काळात माणसाला फार हाल काढावे लागलेत. आणि जर तो भुकेमुळे मेला नसेल, तर त्याचे एकमेव कारण म्हणजे चोखंदळपणा न करता हाती लागतील ते पदार्थ तो खात होता व सबंध दिवस खाद्याच्या शोधात फिरत होता. झाडांवर राहणाऱ्या त्याच्या पूर्वजांपेक्षा जरी तो अधिक बळकट व स्वतंत्र बनला होता, तरी त्याची एकूण अवस्था दयनीय होती, तो अर्धपोटी जीव होता.

तेवढ्यात आणखी पृथ्वीवर महाभयंकर नैसर्गिक आपत्ती कोसळली.

प्रकरण चौथे

आपत्ती जवळ आली

अजूनपर्यंतही ज्यांचा उलगडा झालेला नाही अशा कारणांपायी, उत्तरेकडील बर्फ स्वतःच्या जागेवरून हलला व दक्षिणेकडे सरकू लागला. महाप्रचंड हिमनद्या टेकड्यांवरून आणि मैदानांमधून वाहू लागल्या; त्यांनी डोंगरउतार खरवडून काढले, कडे मोडून त्यांचा चुरा केला, खडकांचे फुटके तुकडे स्वतःच्या प्रवाहांबरोबर वाहून नेले. हिमनद्यांच्या पुढच्या भागातील बर्फ एव्हाना वितळले होते व त्यांचे पाण्याच्या नद्यांमध्ये रूपांतर झाले होते. त्यांचे जोरदार खळाळते प्रवाह पुढे जाताना जमिनीत खोल चर खणत होते.

दिग्विजयी सेनादलांप्रमाणे उत्तरेकडून बर्फखंड पुढे सरकत होते. वाटेत त्यांना पर्वतमाथ्यांवरच्या आणि खिंडींमधील हिमनद्या येऊन सामील झाल्या.

ह्या हिमप्रवाहांच्या खुणा सोविएत संघात व शेजारच्या देशांमध्ये अजूनही मैदानांमधील पाषाणांवर पाहता येतात. कधीकधी करेलीयातील जंगलभागात पाईन वृक्षांच्या दाटीत अचानक शेवाळमाखला पाषाण आढळतो. कुठून आला तो? त्याला बर्फाचे प्रवाह घेऊन आले.

उत्तरेच्या हिमनद्या स्वतःची जागा सोडून दक्षिणेत घुसल्या, असे पूर्वी काहीवेळा घडले होते. पण एवढ्या दूरपर्यंत मात्र त्या कधीच गेल्या नव्हत्या. सोविएत संघात आज जेथे वोल्गोग्राद आणि द्नेप्रोपेत्रोवस्क शहरे वसली आहेत, तेथपर्यंत हिमनद्या दक्षिणेत पोहोचल्या होत्या. पश्चिम युरोपात त्या मध्य जर्मनीच्या पर्वतप्रदेशापर्यंत गेल्या आणि ब्रिटिश बेटांना त्यांनी पूर्ण आच्छादून टाकले होते. अमेरिकेत त्या दक्षिणेकडील मोठ्या सरोवरांपर्यंत गेल्या.

ह्या हिमनद्या वेगाने वाहात नव्हत्या आणि माणूस जेथे रहात होता, त्या त्या ठिकाणी त्यांचा थंड निःश्वास तात्काळ जाणवला नाही. हिमनद्यांचे थंड फूत्कार सर्वप्रथम जमिनीवरील प्राण्यांना नव्हे, तर समुद्रांमधील प्राण्यांना जाणवले.

समुद्रतीरांवर अजून पूर्वीप्रमाणेच उबदार वातावरण होते. जंगलांमध्ये अजून सदाहरित मऊ पानांची लॉरेल झुडुपे व मॅग्नोलियाची फुलझाडे आढळत होती. मैदानांमध्ये दक्षिणी महाप्रचंड हत्ती आणि गेंडे पावलांखाली उंच गवत तुडवीत हिंडत होते. पण समुद्रांमधील पाणी मात्र जास्त जास्त गार बनत चालले होते. समुद्रांमधील प्रवाहांनी – समुद्रांच्या अंतर्भागांमध्ये वाहणाऱ्या नद्यांनी – उत्तरेकडील नद्यांची थंडी वाहून आणली व कधीकधी बर्फखंडही आणले.

उबदार समुद्र थंड कसे बनले ह्याची कहाणी किनारपट्टीचे प्रदेश अजून आपल्याला सांगतात.

उबदार हवेची आवड असणाऱ्या वनस्पतींची व प्राण्यांची अजून जमिनीवर वस्ती होती, पण दरम्यान सागरनिवासी बदलू लागले होते. त्या काळातील गाळांच्या थरांचा अभ्यास केला, म्हणजे फक्त थंड पाण्यातच जगू शकणाऱ्या शिंपायुक्त प्राण्यांचे अनेक अवशेष आढळतात.

जंगलांचे युद्ध

आणि बर्फ जवळ येत असल्याची जमिनीवर चाहूल लागली.

आर्क्टिक स्वतःच्या जागेपासून हलले होते आणि सावकाशपणे दक्षिणेकडे सरपटत निघाले होते, ही वस्तुस्थिती भयंकर होती. ह्यामुळे तुंद्रा आणि पाईनची जंगले स्वतःच्या जागेपासून ढळली होती व तीसुद्धा दक्षिणेकडे सरकत होती.

तुंद्राने तैगाशी युद्ध पुकारले. तैगाने माघार घेतली व पानांच्या झाडांच्या जंगलांना मागे रेटायला आरंभ केला.

अशा रीतीने जंगलांचे महायुद्ध सुरू झाले.

आपल्या काळातसुद्धा जंगलांचे युद्ध चालू आहे. उदाहरणार्थ, फर आणि ॲस्प यांचे नेहमी कट्टर वैर आहे. ॲस्प सावलीला भिते, तर फर भीत नाही.

फरच्या जगलात ॲस्पची झाडे अगदी खुरटी आढळतात. फरची सावली त्यांना वाढू देत नाही. पण जेव्हा माणूस फरचे जंगल तोडतो, तेव्हा ॲस्प प्रकाशात ताबडतोब तरारते आणि भराभर वाढू लागते.

भोवताली सर्व गोष्टी पटकन बदलतात. फरच्या पायांखाली वाढलेली सावलीप्रेमी शेवाळी मरतात. पुरेशी वाढ न झाल्यामुळे लोकांनी न तोडलेली फरची छोटी झाडे सकाळच्या गोठवणाऱ्या थंडीत सुकून जातात. जोवर त्यांच्या माता, फरची मोठी झाडे, जिवंत होत्या, तोवर त्यांच्या रुंद हिरव्या घागऱ्यांच्या सावलीत छोटी फरची झाडे छान जगत होती. थंडीपासून आता त्यांचे संरक्षण करण्यास कुणीच नसल्यामुळे ती आजारी पडतात व त्यांची वाढ खुंटते.

पण ॲस्पचे झाड विजय साजरा करते. पूर्वी त्याचा प्रतिस्पर्धी फर जेव्हा चुकून एखादा प्रकाशकिरण जमिनीवर सांडायचे, तेव्हा तेवढाच प्रकाशाचा थेंब ॲस्प शोषून घ्यायचे. पण फर तोडून टाकल्यानंतर ॲस्प जंगलचे स्वामी बनले.

आणि अंधाऱ्या फरच्या जंगलाच्या जागी भरपूर वारा खेळणारे, सूर्यप्रकाशित ॲस्पचे जंगल उभे राहते.

पण काळ पुढे जात असतो. काळ हा थोर कामगार आहे. हळूहळू, नकळत, जंगलच्या घराची तो फेरबांधणी करतो. ॲस्पची झाडे जेवढी जास्त जास्त उंच वाढतात, तेवढे त्यांचे शेंडे एकमेकांशी जास्त लगट करू लागतात. पूर्वी त्यांच्या पायांशी विरळ आणि क्वचित

आढळणारी सावली आता अधिक दाट व अंधारी बनू लागते. अॅस्प विजयी ठरले, पण त्याच्या विजयातच त्याचा सर्वनाश असतो.

माणसाला त्याच्या स्वतःच्या सावलीनेच ठार मारले, असे कधी घडलेले नाही. पण झाडांच्या जीवनात असे घडते. अॅस्पच्या छायेखाली त्याचा शत्रू फर वाढतो. अॅस्पची खाली पडलेली पाने जमिनीवर उबदार चादर अंथरतात. लौकरच त्या उबदार जमिनीवर छोट्या फरची हिरवी झाडे उभी राहतात. काही दशक वर्षांत फरचे शेंडे अॅस्पच्या शेंड्यांना टकरा देऊ लागतात. आता जंगल संमिश्र, रंगीबेरंगी बनते. अॅस्पच्या फिकट हिरव्या शेंड्यांमधून फरचे टोकदार गडद शेंडे डोकावत असतात. फर आणखी उंच वाढतात आणि आता त्यांच्या दाट गडद सुया अॅस्पच्या पानांवर सावली टाकतात.

इथे अॅस्पचा अंत घडतो. फरच्या सावलीत ते झडू लागते, सुकू लागते. फर सत्ता गाजवू लागते. फरचे जंगल स्वतःची पूर्वीची जागा व्यापते.

जेव्हा माणसाची कुऱ्हाड जंगलांच्या जीवनात ढवळाढवळ करते, तेव्हा जंगले अशी लढतात.

पण हिमयुगातील थंडीने जेव्हा जंगलांच्या जीवनात ढवळाढवळ केली, तेव्हा त्यांचे युद्ध अधिक भीषण बनले होते.

थंडीने ऊब-प्रेमी झाडांना नष्ट केले आणि उत्तरेच्या जंगलांना वाट मोकळी करून दिली. पाईन, फर आणि भोजाच्या झाडांनी ओक व लिंबोणीच्या झाडांविरुद्ध लढा पुकारला. ओक व लिंबोणीला माघार घ्यावी लागली. तसे करताना त्यांनी सदाहरित लॉरेल, मॅग्नोलिया व अंजिराच्या झाडांना मागे रेटले.

ऊब-प्रेमी, नाजुक झाडांना मोकळया जामी थंडी-वाऱ्यांच्या तडाख्यांना सहन करणे अशक्य बनले. ती नष्ट झाली व विजेत्यांना त्यांनी जागा मोकळी करून दिली. फक्त डोंगराळ भागात ती तग धरू शकली.

ऊब-प्रेमी झाडांनी प्रत्येक दरीचा किल्ला बनवून स्वतःचे वाऱ्यांपासून संरक्षण केले. पण पर्वतमाथ्यांवरून दुसऱ्या हिमनद्या खाली कोसळू लागल्या. त्यांच्या आधी डोंगरी तुंद्रा, डोंगरी फर आणि भोजाची झाडे आली.

जंगलांचे हे युद्ध हजारो वर्षे चालले. ऊब-प्रेमी झाडे – पराभूत सेनेतील उरलेले सैनिक – दक्षिणेकडे पुढे पुढे सरकत गेली.

ह्या युद्धात विजेत्यांसमोर हरून नष्ट झालेल्या जंगलांमधील जनावरांचे काय झाले?

आपल्या काळात एखादे जंगल जेव्हा जंगलतोडीमुळे अथवा वणव्यामुळे नष्ट होते, तेव्हा त्यातील काही रहिवासी त्याच्याबरोबरच नाश पावतात, तर काही त्याच्यापासून दूर पळून जाण्यात यशस्वी होतात. फरच्या तोडलेल्या जंगलाबरोबरच त्यातील अस्सल रहिवासी नाहीसे होतात: क्रॉसबिल, किंग्लेट व इतर.

जेथे त्यांचे सावली देणारे फरचे घर होते, तेथे अॅस्पचे नवे घर उभे राहते. ह्या नव्या

घरात दुसरे पक्षी, दुसरी जनावरे वास्तुशांत साजरी करतात.

त्यानंतर अनेक वर्षांनी जेव्हा फर ॲस्पवर विजय मिळविते, तेव्हा ॲस्पच्या जागी वाढलेले फरचे जंगलही रिकामे रहात नाही. त्यात पुन्हा किंग्लेट, क्रॉसबिल व त्यांचे सहकारी मित्र रहायला येतात.

जंगलाचा नाश व त्याचे पुनरुज्जीवन एक संपूर्ण, अविभाज्य जग ह्या नात्याने घडते. योगायोगाने एकत्र आलेल्या वनस्पती व प्राण्यांचा तो संग्रह नसतो.

हिमयुगात असेच घडले. ऊब-प्रेमी जंगलांबरोबरच त्यातील रहिवासी नष्ट झाले. इतःपर महाप्रचंड प्राचीन हत्ती उरले नाहीत, गेंडे व हिप्पोपोटॅमस दक्षिणेत निघून गेले, माणसाचा जुना शत्रू—तीक्ष्ण सुळयांचा वाघ—नष्ट झाला.

ह्या महाप्रचंड प्राण्यांबरोबर आणखी अनेक जनावरे व पक्षी नष्ट झाले अथवा दक्षिणेत पळाले.

ह्यापेक्षा दुसरे काही घडणे शक्य नव्हते. प्रत्येक प्राणी स्वतःच्या जगाशी, स्वतःच्या जंगलाशी, निगडित असतो. जेव्हा हे जग विध्वंस पावू लागले, तेव्हा त्याने स्वतःच्या नाशाबरोबर त्याच्या अनेक रहिवाशांचा नाश केला.

जेव्हा झाडे, झुडुपे आणि गवते नष्ट झाली, तेव्हा त्यांच्यावर स्वतःचे पोषण करणारे व त्यांच्याआड दडणारे प्राणी उपाशी व उघडयावर पडले. पण ह्या प्राण्यांच्या नाशाबरोबर हिंस्र जनावरांचाही नाश घडला. कारण गवतभक्षक प्राणी जेव्हा मरू लागले, तेव्हा त्यांची शिकार करून जगणाऱ्या मांसभक्षक श्वापदांची उपासमार सुरू झाली.

"पोषण-साखळी"त एकमेकांशी बांधले गेलेले प्राणी व वनस्पती त्यांच्या जंगलाबरोबरच नाश पावले.

पूर्वी जहाजाला साखळदंडांनी बांधलेले गुलाम जहाजाबरोबर असेच बुडून मरत असत.


तेव्हा जिवंत राहण्यासाठी प्राण्याला ही साखळी तोडणे आवश्यक होते: नवीन प्रकारचे अन्न खायला आरंभ करायचा, नख्या व दातांची रचना बदलायची, थंडीपासून संरक्षण करण्यासाठी अंगावर केसाळ कातडी वाढवायची. थोडक्यात, जनावराला बदलणे आवश्यक होते.

पण असे बदलणे जनावराला खूप अवघड जाते हे आपल्याला ठाऊक आहे. घोडयाचा इतिहास आठवा. घोडयाला पायावर खुरासारखा फक्त एक अंगठा निर्माण करण्यासाठी किती दशलक्ष वर्षे खर्चावी लागली.

दक्षिणी प्राण्याला उत्तरेच्या जंगलात टिकून राहणे फार कठीण गेले.

शिवाय उत्तरेकडील जंगलांबरोबर त्यातील केसाळ प्राणीही आले: केसाळ गेंडे, प्रचंड हत्ती, गुंफांमधील सिंह, गुंफांमधील अस्वले. हे पशू उत्तरेच्या जंगलात घरच्याप्रमाणे रहात होते.

त्यांची दाट, केसाळ कातडी म्हणजे त्यांची मोठी संपत्ती होती: उबदार! प्रचंड हत्तींना



गुंफेच्या भिंतीवर आदिचित्रकाराने प्राचीन प्रचंड हत्तीचे चित्र काढले

व केसाळ गेंडयांना थंडीची मुळीच पर्वा नव्हती. नुसती त्वचा असलेल्या दक्षिणी हत्तींपेक्षा, गेंडयांपेक्षा आणि हिप्पोपोटॅमसपेक्षा ते वेगळे होते.

उत्तरेच्या काही प्राण्यांना थंडीपासून स्वतःचे रक्षण करण्याचा दुसरा उपाय माहीत होता: गुंफेत लपून रहायचे.

आणि उत्तरेच्या जनावरांना कष्ट न करता सहजपणे खाद्य मिळत होते. कारण ते त्यांचे जंगल होते, त्यांचे जग होते.

मरणाऱ्या जंगलांमधील प्राण्यांना शिवाय ह्या नव्या मालकांशी संघर्ष करावा लागत होता. त्यांच्यापैकी फक्त थोडयांनाच जिवंत राहणे शक्य झाले ह्याचे आश्चर्य वाटते?

आणि माणूस? माणसाचे काय झाले?

अर्थात माणूस टिकून राहिला, कारण जर तो नष्ट झाला असता, तर तुम्ही हे पुस्तक वाचले नसते.

उष्ण प्रदेशांमध्ये राहणाऱ्या लोकांना जिवंत राहण्यासाठी थंडीविरुद्ध सामना करण्याची गरज पडली नाही, मात्र तेथील हवामान पूर्वीपेक्षा अधिक थंड बनले.

पण हिमनद्यांचा प्रत्यक्ष आघात सोसाव्या लागणाऱ्या लोकांची अवस्था फार बिकट झाली.

दर वर्षी हिवाळा अधिकाधिक भयानक बनत होता. थरथर कापत, कडाकडा दात वाजवत, स्वतःच्या मुलांना व स्वतःला ऊब येण्यासाठी ते एकमेकांना बिलगून बसत होते.

भूक, गोठवणारी थंडी व जंगली श्वापदे यांच्यापायी माणसे नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला होता.

भोवती काय चालले होते हे जर लोकांना समजले असते, तर त्यांना कदाचित कळून चुकले असते की, जगाचा अंत जवळ आला होता.

जगाचा अंत

जगाच्या अंताचे अनेकदा भाकित करण्यात आले आहे.

मध्ययुगात, जेव्हा आकाशात धुमकेतू उगवायचा, तेव्हा लोक क्रूस-चिन्ह करीत व म्हणत: "जगाचा अंत जवळ आलाय!"

जेव्हा प्लेगची साथ पसरायची, हा "काळा मृत्यू" गावेच्या गावे नष्ट करून स्मशानांना भरून टाकायचा, तेव्हा लोक म्हणत :

"जगाचा अंत जवळ आलाय!"


उपासमारीच्या आणि युद्धाच्या संकटकाळात श्रद्धावान माणसे घाबरून पुटपुटायची :

"जगाचा अंत जवळ आलाय..."

पण जगाचा अंत काही झाला नाही.

आता आपल्याला माहीत आहे की, लोकांना भाकित सांगण्यासाठी धुमकेतू आकाशात उगवत नाही. धुमकेतू सूर्याभोवतालच्या स्वतःच्या मार्गाने फिरत असतो आणि पृथ्वीवरचे श्रद्धाळू लोक त्याच्याबद्दल काय विचार करतात ह्याची त्याला मुळीच क्षिती नसते.

त्याचप्रमाणे आपल्याला माहीत आहे की, उपासमार, रोगाची साथ आणि युद्धसुद्धा जगाचा अंत सूचित करीत नाहीत. संकटाचे कारण समजणे महत्त्वाचे आहे. जेव्हा कारण माहीत असते, तेव्हा संकटाशी सामना करणे जास्त सोपे जाते.



गुंफेच्या भिंतीवर चितारलेला हा गेंडा, सध्याच्या गेंड्यांपेक्षा वेगळा आहे. त्याच्या शरीरावर केसाळ लोकरीचे आवरण आहे

पण जगाच्या अंताचे भाकित फक्त अडाणी माणसे करीत नाहीत. जगाच्या आणि एकूण मानवजातीच्या अखेरीचे भाकित करणारे काही शास्त्रज्ञसुद्धा आहेत. उदाहरणार्थ, काही ठामपणे सांगतात की, इंधनाच्या अपुरेपणापायी मानवजातीचा नाश होईल. पुराव्यासाठी ते आकडेवारी सादर करतात. पृथ्वीवरील कोळशाचे साठे सतत कमी होत चाललेत, जंगले विरळ होत आहेत आणि तेल तर काही शतकेसुद्धा पुरणार नाही. जेव्हा पृथ्वीवर इंधन उरणार नाही, तेव्हा

कारखान्यांमधील यंत्रे बंद पडतील, आगगाड्या धावायच्या थांबतील, घरांमधील व रस्त्यांवरील दिवे विझतील. उपासमार व थंडी यांच्यापायी बव्हंश माणसे मरतील आणि जी जिवंत राहतील, ती परत जंगली आदिमानव बनतील.

फार भयानक चित्र आहे!

पण खरेच असे होईल?

इंधनाचे जमिनीखालील साठे महाप्रचंड आहेत व सर्वांचा अद्याप शोध लागलेला नाही.

आपले भूगर्भशास्त्रज्ञ कोळशाच्या व तेलाच्या नवनव्या साठ्यांचे शोध लावत आहेत.

पण खरोखरीच इंधनाचे साठे कधी काळी संपुष्टात आले, तर त्यामुळे जगाचा अंत घडेल काय?

नाही, तसे होणार नाही.

कारण इंधन हा पृथ्वीवरील उष्णतेचा आणि ऊर्जेचा एकमेव उगम नव्हे. सूर्य हा ऊर्जेचा सर्वांत मुख्य उगम आहे. आणि मुळीच शंका बाळगण्याचे कारण नाही की, ज्या काळात इंधनाचे साठे संपलेले असतील, त्या काळात एव्हाना माणसे सौरशक्तीवर आगगाड्या पळवू लागत असतील, घरांना व रस्त्यांना सौरशक्तीने प्रकाशित करू लागत असतील, यंत्रे चालवत असतील आणि जेवणसुद्धा शिजवतील. आत्तासुद्धा आरंभीची प्रायोगिक सौर-वीजस्थानके व पहिले सौर-भटारखाने आहेत.

"जरा थांबा," जगाचे दफन करायला उतावीळ बनलेले लोक म्हणतात, "सूर्यसुद्धा कधी-तरी विझेल. काही नव्या ताऱ्यांइतका तो आता तेवढा गरम आणि तेजस्वी नाही. काही अब्ज वर्षे जातील, सूर्याचे तपमान खाली उतरेल व त्यामुळे पृथ्वीवर थंडी पसरेल.

"महाप्रचंड हिमप्रवाह माणसाची पृथ्वीवरील बांधकामे नामशेष करतील. आत्ता जेथे ताडवृक्ष डोलत आहेत, तेथे पांढरी अस्वले भटकू लागतील. तेव्हा माणसे टिकणार नाहीत."

अर्थात, पृथ्वीवर जर परत हिमयुग अवतरले असते, तर फार वाईट झाले असते. पण आदिमानव हिमयुगातसुद्धा टिकून राहू शकले! अशा स्थितीत, आजच्यापेक्षा अनंत पटींनी शास्त्रीयदृष्ट्या सामर्थ्यवान बनलेली भावी काळातील माणसे हिमखंडांमध्ये मरून जाणे शक्य आहे काय?

थंडीवर मात करण्यासाठी ती माणसे नेमके काय करतील हे आधीसुद्धा सांगणे शक्य आहे. सूर्याच्या ऊर्जेला मदत करायला ती आण्विक ऊर्जेचा वापर करतील.

आण्विक ऊर्जा कधीही संपणार नाही, फक्त तिला मुक्त करण्याचे कसब माहीत हवे.

पण ह्या दूरच्या काळापासून, अतिदूरच्या भविष्यकाळापासून, आपण भूतकाळाकडे, आदि-मानवाकडे परतायची वेळ झालीय.

नव्या जगाचा आरंभ

जर माणसाने त्याचे जंगलाशी असलेले मूळ बंध तोडले नसते, तर जंगलाच्या नाशाबरोबर त्याचाही नाश झाला असता.

पण जगाचा अंत झाला नाही, फक्त जग बदलले. जुने जग संपले व नव्या जगाचा आरंभ झाला.

ह्या नव्या, बदलत्या जगात टिकून राहण्यासाठी माणसाला स्वत: बदलणे आवश्यक होते. पूर्वीचे खाद्यपदार्थ नाहीसे झाले होते, नवे प्राप्त करायला शिकणे भाग होते. फर वृक्षाची आणि पाईनची टणक फळे माणसाच्या दातांना मानवणारी नव्हती. दक्षिणी जंगलांमधील रसदार फळांशी त्यांचे मुळीच साम्य नव्हते.

उबदार हवेऐवजी थंडी आली. सूर्याने जणू पृथ्वीची प्रतारणा केली होती. त्याच्या गरम प्रकाशाविना जगायला शिकणे आवश्यक बनले.

अत्यंत अल्पावधीत बदलून जायचे!

सर्व सजीव प्राण्यांमध्ये असे करणे फक्त माणसाच्या आवाक्यात होते.

कारण ह्या दरम्यानच्या काळात माणूस स्वत:ला बदलून टाकायला जेवढा शिकला होता, तेवढ्या प्रमाणात स्वत:ला बदलणे एकाही प्राण्याला जमले नव्हते.

माणसाचा प्रतिस्पर्धी – तीक्ष्ण सुळयांचा वाघ – स्वत:च्या शरीरावर केसाळ झूल वाढवू शकला नव्हता, पण माणूस तसे करू शकला. फक्त त्यासाठी त्याने अस्वलाला ठार मारायचे व त्याची केसाळ कातडी सोलून घ्यायची.

तीक्ष्ण सुळयांचा वाघ शेकोटी पेटवू शकत नव्हता, पण माणूस पेटवू शकत होता. एव्हाना अग्नीचा उपयोग कसा करायचा हे त्याला ठाऊक झाले होते.

स्वत:मध्ये बदल करण्यापर्यंत आणि निसर्गात बदल करण्यापर्यंत माणसाची मजल गेली होती.

तेव्हापासून हजारो वर्षांचा काळ जरी लोटला असला, तरी माणसाने त्यावेळी निसर्गात नेमके कोणते बदल केले व स्वत: तो कसा बदलला, हे आजही पाहता येते.

दगडी पानांचे पुस्तक

एखाद्या प्रचंड पुस्तकाप्रमाणे पृथ्वी आपल्या पायांखाली पसरली आहे.

पृथ्वीच्या कवचाचा प्रत्येक थर, भूगर्भाच्या साठ्यातील प्रत्येक थर – म्हणजे पुस्तकाचे पान.

आपण सर्वांत वरच्या आणि शेवटच्या पानावर राहतो. पुस्तकाची पहिली पाने कुठेतरी खोलवर महासागरांच्या तळाशी आहेत, खंडांच्या तळाशी आहेत.

ह्या पहिल्या पानांपर्यंत, पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांपर्यंत, माणूस अजून पोहोचला नाही. तेथे काय लिहिले आहे, ह्याबद्दल आपण अद्याप फक्त तर्क करू शकतो.

पण पाने जेवढी आपल्या अधिक जवळ, तेवढी ती वाचणे अधिक सोपे.


लाव्हारसामुळे जळून गेलेली आणि वाकडी बनलेली काही पाने आपल्याला सांगतात, पृथ्वीवर पर्वतरांगा कशा उभ्या झाल्या. दुसरी पाने बोलतात, पृथ्वीच्या कवचाच्या खाली-वर होण्यामुळे समुद्र किनारा सोडून पुढे कसे गेले व परत मागे कसे हटले.

समुद्र-शिंपल्यांप्रमाणे शुभ्र असे पानांचे काही थर आहेत. ह्या शिंपल्यांचीच ती पाने बनली आहेत. त्यांच्या पाठोपाठ कोळशासारखी काळीकुट्ट पाने येतात.

आणि ती खरेच कोळशाची आहेत. पृथ्वीवर एकेकाळी अस्तित्वात असलेल्या घनदाट अरण्यांचा इतिहास ह्या कोळशाच्या जाड थरांवर वाचता येतो.

पुस्तकात मधून मधून चित्रे असतात, त्याप्रमाणे पूर्वी जंगल असलेल्या व नंतर कोळसा बनलेल्या ठिकाणी राहिलेल्या प्राण्यांची हाडे अथवा झाडांच्या पानांचे ठसे आढळतात.

अशा रीतीने पानामागून पान वाचत, आपण पृथ्वीचा संपूर्ण इतिहास वाचू शकतो. आणि अगदी शेवटच्या पानांवर, अगदी वरच्या पानांवर, अखेरीस नवा नायक – माणूस – अवतरतो. आरंभी मनात येते की, महान पुस्तकाचा तो मुख्य नायक नाही. प्राचीन महाप्रचंड हत्ती किंवा गेंडे ह्यांच्यासमोर तो दुय्यम आहे असे भासते. पण जसे पुढे जावे, तसे नवा नायक धिटाईने पहिल्या पदाला पोहोचल्याचे दिसते.



आणि अशी एक वेळ येते, जेव्हा माणूस त्या महान पुस्तकाचा केवळ नायकच रहात नाही, तर त्याच्या अनेक लेखकांपैकी एक लेखक बनतो.

नदीच्या बांधाच्या छेदात, हिमयुगाच्या अवशेषांमध्ये, आपल्याला एक ठळक काळी रेषा आढळते.

ही काळी रेषा अति प्राचीन कोळशाने ओढली आहे. वाळू आणि चिकणमातीमध्ये अतिप्राचीन कोळशाचा थर अचानक कुठून उगवला? कदाचित इथे अरण्यात वणवा पेटला होता?

पण वणव्यापायी आसपासचा मोठा प्रदेश जळून

ठिकाणी पुस्तकातील चित्रांप्रमाणे कोळशांच्या थरांमध्ये नेचरीचे ठसे आढळतात

जातो आणि ही कोळशाची रेषा तर अगदी लहान आहे. केवळ शेकोटीमुळे कोळशाचा असा लहान थर राहू शकतो.

आणि शेकोटी फक्त माणूस पेटवू शकतो.

शिवाय, शेकोटीपाशी आपल्याला माणसाच्या हाताच्या करामतीच्या दुसऱ्या खुणा आढळतात: दगडी हत्यारे आणि शिकारीत ठार मारलेल्या जनावरांची तुटकी हाडे.

अग्नी व शिकार — हिमयुगाला आरंभ झाला तेव्हा ह्या दोन गोष्टींनी माणसाला वाचविले.

माणूस जंगलातून बाहेर पडतो

उत्तरेच्या कठोर जंगलांमध्ये गोळा करण्यासारख्या काहीच वस्तू माणसाला आढळल्या नव्हत्या. म्हणून तो अशा भक्ष्याच्या शोधार्थ जंगल धुंडाळू लागला, जे एका जागी पडून रहात नव्हते, कुणी उचलून घेईपर्यंत जे वाट पहात नव्हते, तर दूर पळत होते, लपत होते, प्रतिकार करत होते.

उष्ण प्रदेशांमध्येसुद्धा माणूस वारंवार स्वतःच्या आहारात मांसाचा समावेश करू लागला.

मांसामुळे पोट भरायचे, मांसामुळे काम करायला जास्त बळ मिळायचे, जास्त वेळ मिळायचा. माणसाच्या वाढणाऱ्या मेंदूला पोषक मांसाहाराची गरज भासू लागली.

आणि माणसाची हत्यारे जेवढी अधिक सुबक बनली, तेवढ्या अधिक प्रमाणात शिकारीने त्याच्या जीवनात जागा व्यापली.

उत्तरेत शिकारीविना जगणे अशक्य होते.

छोट्या प्राण्यांवर गुजराण करणे माणसाला इतःपर जमेना. त्याला मोठ्या भक्ष्यांची गरज भासू लागली. उत्तरेकडील जंगलांमध्ये हिमवर्षाव, हिमवादळे आणि गोठवणारी थंडी शिकारीत अडथळे आणत. म्हणजे मांसाचे दीर्घकाळपर्यंत साठे करून ठेवणे आवश्यक होते.

कोणत्या जनावरांची माणूस शिकार करीत होता?

जंगलांमध्ये अनेक मोठी जनावरे वावरत होती. जंगलातील उघड्या कुरणांमध्ये हरणांचे कळप चरत होते. रानटी डुकरे माती उकरीत होती. पण सर्वांत मोठी जनावरे जंगलांमध्ये नव्हती, स्तेप प्रदेशांमध्ये होती. तेथे असीम उघड्या मैदानांमध्ये जंगली, केसाळ घोड्यांचे कळप चरत होते; पाठीवर वशिंड असलेल्या रानगव्यांच्या खुरांखाली जमीन हादरायची. लांब केसांचे महाप्रचंड हत्ती गडगडाट करीत संथपणे जायचे. ते अक्षरशः जिवंत डोंगर भासत.

आदिमानवाला हे सर्व फिरते, निसटून जाणारे मांस आमीष वाटत होते. ह्या आमीषापाठी तो धावत होता.

आणि असे धावता धावता माणूस जंगलातून बाहेर पडला; ज्या जंगलात तो जन्मला होता आणि वाढला होता.

स्तेपमध्ये माणूस जास्त जास्त दूर जाऊ लागला. त्याच्या शेकोट्यांच्या, त्याच्या शिकारी छावण्यांच्या खुणा आपल्याला जंगलापासून खूप दूर आढळतात. ह्या मैदानी प्रदेशांमध्ये संग्राहक-माणूस पूर्वी कधी राहिला नव्हता व राहू शकला नसता.

शब्द वाचता आला पाहिजे

आदिमानवाच्या शिकारींच्या छावण्यांपाशी शिकार झालेल्या जनावरांची हाडे अजूनपर्यंत पडून आहेत. त्यात घोड्यांच्या पिवळट पडलेल्या बरगड्या आहेत, बैलांच्या शिंगांसकट कवट्या आहेत, रानटी डुकरांचे वाकडे सुळे आहेत. काहीवेळा अशा हाडांचे प्रचंड ढीग आढळतात. माणूस एका जागी खूप काळ राहिल्याचे ते चिन्ह आहे.

सर्वांत स्वारस्यपूर्ण म्हणजे घोडे, रानटी डुकरे आणि रानगव्यांच्या हाडांमध्ये शिकारी छावण्यांच्या स्थळी प्रचंड प्राचीन हत्तींची हाडेही आढळतात: त्यांच्या अगडबंब कवट्या, त्यांचे लांब कमानदार सुळे, करवतीसारखे त्यांचे दात, त्यांचे शरीरापासून अलग केलेले प्रचंड पाय.

प्राचीन हत्तीसारख्या महाबलाढ्य प्राण्याला ठार मारण्यासाठी केवढे धैर्य व बळ अंगी असले पाहिजे! पण नंतर त्याच्या शरीराचे तुकडे करण्यास व ते मांस छावणीपर्यंत ओढून आणण्यास त्याहून जास्त बळाची आवश्यकता होती. कारण प्राचीन हत्तीच्या एकेका पायाचे वजन जवळ जवळ टनभर होते आणि कवटीचा आकार एवढा मोठा होता, की आख्खा माणूस तिच्यात मावायचा.

हत्तींच्या शिकारींसाठी खास बनविलेल्या बंदुकांनी सुसज्ज अशा आजच्या शिकाऱ्यांनाही प्राचीन हत्तींची शिकार करणे खूप अवघड गेले असते. पण आदिमानवापाशी बंदूक नव्हती. दगडी सुरा अथवा दगडी टोकाचा भाला, एवढीच त्याची शस्त्रे होते.

एवढे खरे, हजारो वर्षांच्या काळात दगडी हत्यारे बदलली होती. ती अधिक तीक्ष्ण व सुबक बनली होती. दगडी सुरा अथवा भाल्याचे टोक बनविण्यासाठी माणूस प्रथम दगडाचा वरचा थर छिनून काढायचा. मग त्यावरील टेंगळे आणि खळगे तासून दगडाच्या कपच्या बनवायचा. शेवटी त्या कपच्यांपासून त्याला हवी तशी धारदार पाती बनवायचा.

गारगोटीसारख्या अयोग्य आणि हाताळण्यास कठीण अशा दगडामधून सुरा बनविण्यासाठी फार मोठे कसब आवश्यक होते. म्हणून, माणसाने दगडी हत्यारांचा वापर केल्यानंतर त्यांना फेकून दिले नाही, तर जपून ठेवले आणि ती बोथट होत तेव्हा त्यांना परत धार काढली. माणूस हत्यारांना जपायचा, कारण स्वतःच्या कामाचे, स्वतःच्या वेळाचे, त्याला मोल वाटत होते.

पण त्याने कितीही प्रयत्न केले, तरी दगड शेवटी दगडच राहणार. प्राचीन हत्तीची शिकार करायच्या वेळी गारगोटीच्या टोकाचा भाला अयोग्य शस्त्र ठरायचा. कारण पोलादी चिलखता-प्रमाणे प्राचीन हत्तीची कातडी भक्कम टणक होती.

असे होते तरीसुद्धा, माणूस प्राचीन हत्तींना ठार मारायचा. शिकारी छावण्यांजवळ पडलेल्या प्राचीन हत्तींच्या कवटचा व सुळे आपल्याला हे सांगतात.

आदिशिकारी त्या महाप्रचंड प्राचीन हत्तींना कसा काय ठार मारू शकायचा? ज्याला "माणूस" हा शब्द वाचता येतो, जो "माणूस" म्हणतो तेव्हा ज्याला "लोक" अभिप्रेत असतात, त्यालाच हे समजू शकेल. केवळ एक माणूस नव्हे, तर सगळ्या लोकांनी मिळून हत्यारे बनविण्याची कला अवगत केली; ते शिकार करायला शिकले, आग पेटवायला शिकले, घरे बांधायला शिकले, जमिनीची मशागत करायला शिकले. केवळ एका माणसाने नव्हे, तर मानवी समाजाने दशलक्षावधींच्या श्रमांमधून संस्कृती व शास्त्रांची स्थापना केली.

एकाकीपणात माणूस तसाच पशू राहिला असता.

समाजात श्रमामुळे पशूचे माणसात रूपांतर झाले.

काही पुस्तकांमध्ये आदिशिकाऱ्याचे चित्रण काहीसे रॉबिन्सन क्रूसोप्रमाणे केलेले आहे. त्याने श्रमांची पराकाष्ठा करून अखेर प्रचंड यश मिळविले.

पण जर माणूस खरोखरीच रॉबिन्सन क्रूसोप्रमाणे एकाकी असता, जर माणसे संपूर्ण टोळीत



निर्जन बेटावर रॉबिन्सन


न राहता अलग अलग कुटुंबांमध्ये जगली असती, तर ती कधीही माणसे बनली नसती आणि त्यांनी संस्कृती निर्माण केली नसती.

आणि देफो यांनी वर्णन केले आहे तसे जीवन प्रत्यक्षात रॉबिन्सनच्या वाटयाला आले नव्हते. स्वतःच्या पुस्तकाच्या आधारासाठी देफो यांनी एका खलाशाची कहाणी घेतली होती. तो खलाशी खरोखरीच कधीतरी अस्तित्वात होता. त्या खलाशाने जहाजावर बंडाळी करण्यात पुढाकार घेतला होता. त्याला महासागराच्या मध्यभागी असलेल्या एका छोटया निर्जन बेटावर टाकून देण्यात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी बेटावर जेव्हा प्रवासी उतरले, तेव्हा बेटावरचा एकमेव रहिवासी त्यांना पूर्ण जंगली आढळला. म्हातारा खलाशी बोलायला अगदी विसरला होता आणि माणसापेक्षा जनावराशी त्याचे अधिक साम्य आढळत होते.

आत्ताच्या माणसालासुद्धा एकलेपणात माणूस राहणे फारसे सोपे नाही.

आदिकाळातील माणसांबद्दल काय बोलायचे!

त्यांचे मानवांमध्ये रूपांतर होण्याचे एकमेव कारण म्हणजे ती माणसे एकत्र रहात होती, एकत्र शिकार करीत होती, एकत्र हत्यारे बनवीत होती.



प्राचीन आदिचित्रकारांनी रेखाटलेले
हत्ती, रानगवा आणि घोडा

माणसांची सगळी टोळी प्राचीन हत्तीच्या शिकारीत भाग घ्यायची. हत्तीच्या केसाळ कुशीत एक नव्हे, तर अनेक भाले खुपसले जात होते. एखाद्या अनेक पायांच्या आणि अनेक हातांच्या प्राण्याप्रमाणे माणसांचा कळप प्राचीन हत्तीचा पाठलाग करायचा. इथे केवळ अनेक हात श्रमत नव्हते, तर कित्येक डोकीही काम करत होती.

प्राचीन हत्ती माणसापेक्षा अनेक पटींनी मोठा व सामर्थ्यवान होता, पण लोक धूर्त होते. प्राचीन हत्तीचे धूड एवढे प्रचंड होते की, माणसाला पायांखाली चिरडून टाकणे त्याला सहज शक्य होते. पण धरती ज्याला कष्टाने पेलत होती त्या महाबलाढ्य हत्तीच्या अवजडपणाचाच फायदा घेऊन माणसे त्याच्यावर मात करीत होती.

प्राचीन हत्तीला वेढा घालून माणसे स्तेपला आग लावत. आगीच्या ज्वालांना घाबरून भेदरल्या डोळ्यांनी, अंगावरील केस पेटून त्यांच्यातून धूर येऊ लागलेल्या अवस्थेत, आग रेटत नेईल त्या दिशेने प्राचीन हत्ती धावू लागायचा. आणि माणसाच्या धूर्त योजनेनुसार आग हत्तीला थेट दलदलीत रेटत न्यायची. हत्तीचे धूड एखाद्या दलदलीत बांधलेल्या दगडी घराप्रमाणे कोसळायचे. सोंडेने मोठमोठे चीत्कार करीत हत्ती दलदलीतून एकेक पाय वर ओढायचा प्रयत्न करायचा. पण त्या प्रयत्नांच्या परिणामी तो चिखलात आणखीच खोल बुडत जायचा.

आणि माणसे त्याला ठार मारायला तुटून पडायची.

प्राचीन हत्तीला सापळ्यात पकडून ठार मारणे सोपे नव्हते. पण त्याला छावणीपर्यंत ओढत नेणे त्याहून अवघड होते. ही छावणी सर्वसाधारणपणे उंच, कोरड्या नदीतीरावर असायची. नदी लोकांना पाणी पाजायची आणि तिचे उथळ पात्र व किनारे त्यांना दगड पुरवायचे— कामासाठी साहित्य.

म्हणजे अत्यंत सखल अशा दलदलीपासून उंच नदीतीरापर्यंत मेलेल्या हत्तीचे धूड फरफटत न्यावे लागत होते.

इथे परत दोन नव्हे, तर अनेक हात कामाला लागत होते. टोकदार दगडांनी माणसे चिकाटीने हत्तीची जाड कातडी फाडून काढत, त्याचे भक्कम स्नायुपुच्छ तोडून काढत, त्याचे प्रचंड स्नायू कापून काढत. अनुभवी म्हातारी माणसे मार्गदर्शन करीत—कुठे कापले म्हणजे शीर आणि पाय धडापासून लौकर वेगळे होतील. शेवटी धडाचे लहान लहान तुकडे करून त्यांना माणसे वरती छावणीपर्यंत घेऊन जात.

काम एकत्रपणे आणि सहजपणे पार पडावे म्हणून एकसुराने तालबद्ध ओरडत अनेक लोक हत्तीचा प्रचंड केसाळ पाय अथवा जमिनीवर लोळणाऱ्या लांब सोंडेसकटचे डोके उचलून नेत.

घामाघूम होत, हातपाय गळून गेलेल्या अवस्थेत ते लोक त्यांच्या तळापर्यंत पोहोचत. पण नंतर छावणीत केवढा जल्लोष! लोकांना माहीत असायचे की, हत्ती म्हणजे प्रचंड मेजवानी. खूप काळापासून ते ह्या मेजवानीची वाट पहात असायचे. हत्ती म्हणजे आगामी खूप खूप दिवसां-पर्यंतची मांसाची बेगमी, हे त्यांना माहीत असायचे

स्पर्धेची अखेर

दुसऱ्या प्राण्यांबरोबरची माणसाची स्पर्धा संपली. सर्वांत मोठ्या जनावरावर मात करून माणूस स्पर्धेच्या अखेरीस विजयी ठरला.

पृथ्वीवर माणसांची संख्या जलद वाढू लागली. दर शतकागणिक, दर हजार वर्षांगणिक, त्यांची संख्या वाढतच होती. सरतेशेवटी सबंध जगभर त्यांची वस्ती पसरली. .

दुसऱ्या एकाही प्राण्याच्या बाबतीत जे घडू शकत नाही, ते माणसाच्या बाबतीत घडले.

उदाहरणार्थ, माणसांप्रमाणे सशांची अशी प्रचंड संख्या वाढू शकेल काय?

अर्थात, नाही. कारण सशांची संख्या वाढताच लांडग्यांची संख्या वाढेल आणि सशांची संख्या परत कमी करण्याची जबाबदारी लांडगे निश्चित पार पाडतील.

म्हणजे जंगली प्राण्यांची संख्या अखंडपणे वाढू शकत नाही. एक अशी सीमा आहे, जी ओलांडणे त्यांना कठीण जाते.

माणसासारख्या प्राण्यांना निसर्गाने घालून दिलेल्या सीमा व मर्यादा माणसाने केव्हाच पुढे सरकवल्या आहेत. हत्यारे बनविण्यास शिकल्यानंतर, पूर्वी कधी न घेतलेला आहार तो खाऊ लागला; निसर्गाला त्याच्याशी अधिक उदारपणे वागायला त्याने भाग पाडले. पूर्वी जेथे माणसांच्या फक्त एका कळपाला खाऊ घालणे शक्य होते, तेथे आता दोन अथवा तीन कळप राहू शकत होते.

नंतर, जेव्हा तो मोठ्या जनावरांची शिकार करू लागला, तेव्हा त्याने निसर्गातील स्वतःची जागा आणखी विस्तृत केली.

आता माणसाला कंदमुळे व वनस्पती गोळा करीत चरायची गरज राहिली नाही. रानगवे, घोडे, प्राचीन प्रचंड हत्ती, त्याच्याऐवजी हे चरण्याचे काम करीत होते. गवतांचे डोंगर फस्त करीत ह्या प्राण्यांचे कळप मैदानांमधून भटकत होते. दर दिवसागणिक, दर वर्षागणिक, त्यांचे वजन वाढत होते. टनावारी गवताचे अनेक किलोग्राम मांसात रूपांतर घडत होते. जेव्हा माणूस रानगव्याला किंवा हत्तीला ठार मारायचा, तेव्हा अनेक वर्षांच्या क्रमात निर्माण केलेल्या शक्तीच्या साठ्यांचा एकदम तो मालक बनायचा.

ह्या साठ्यांची फार गरज होती. तुफानात, हिमवादळात, बर्फाळ थंडीत, खाद्याच्या शोधाला जाणे शक्य नव्हते. हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात अशा दोन्ही मोसमात उबदार हवा असण्याचा पूर्वीचा काळ संपला होता.

पण एका बदलापाठोपाठ दुसरा बदल आला.

माणसाने साठे करायला सुरुवात केल्यानंतर, त्याला एकाच ठिकाणी दीर्घ काळपर्यंत वास्तव्य करणे प्राप्त झाले. मुक्काम हलविणे अवघड बनले. कारण हत्तीचे धूड बरोबर वाहून नेणे शक्य नव्हते.

आणखी दुसऱ्या कारणांमुळेसुद्धा माणसाला घराविना भटकेगिरी थांबवणे प्राप्त झाले. पूर्वीच्या काळी प्रत्येक झाड एका रात्रीपुरते झोपायला व हिंस्र पशूंपासून रक्षण करायला माणसाला उपयोगी पडायचे. आता माणूस हिंस्र पशूंना कमी घाबरत होता. पण त्याला दुसराच शत्रू निर्माण झाला – थंडी.

थंडीपासून, हिमवादळांपासून संरक्षण करायला, खात्रीशीर निवाऱ्याची माणसाला गरज होती.

माणूस दुसरा निसर्ग उभारतो

अखेर अशी एक वेळ आली, जेव्हा माणसाने निर्णय घेतला की, महाप्रचंड थंड जगात स्वतःचे छोटे व उबदार जग निर्माण करायचे. कुठेतरी गुंफेच्या प्रवेशद्वाराशी अथवा कड्याखालच्या पोकळीत त्याने पाऊस, बर्फ व वारा यांच्यापासून स्वतःचे रक्षण करायला जनावरांच्या कातड्यांचे आणि झाडांच्या फांद्यांचे आकाश बनविले. त्याच्या ह्या छोटुकल्या जगाच्या मध्यभागी त्याने सूर्य पेटविला. हा सूर्य रात्री प्रकाश देत होता व हिवाळ्यात ऊब देत होता.

प्राचीन शिकारी छावण्यांच्या जागी अजूनही कुठे कुठे तंबूंच्या खांबांचे खड्डे आढळतात. खांबांच्या दरम्यान मध्यभागी जळलेले दगड अजूनही दिसतात. आदिमानवाच्या कृत्रिम सूर्याचे ते अवशेष आहेत.

तंबूच्या भिंती केव्हाच कोसळल्या, धुळीत मिळाल्या. पण त्या आता नसल्या तरीही नेमक्या कुठे होत्या ते सांगता येते. छोट्या जगातील सगळी धरती माणसाबद्दल बोलते – त्या जगाच्या संस्थापकाबद्दल.

दगडी सुरे, गारगोटीचे कपचे व तुकडे, जनावरांची तुटकी हाडे, शेकोटीमधील कोळसे व राख – ह्या सर्वांचे वाळूशी व चिकणमातीशी असे मिश्रण बनलेय, जे माणसाने स्पर्श न केलेल्या निसर्गात नाही व असू शकत नाही.

पण खूप पूर्वीच नाहीशा झालेल्या घराच्या अदृश्य भिंती ओलांडून आपण काही पावले पुढे गेलो, म्हणजे मानवी श्रमाच्या आठवणी करून देणाऱ्या सर्व गोष्टी एकदम अदृश्य होतात. जमिनीत गाडलेली हत्यारे नाहीत, शेकोटीमधले कोळसे व राख नाहीत, हाडे नाहीत.

अशा रीतीने माणसाने निर्माण केलेला दुसरा निसर्ग त्याच्या भोवतालच्या सर्व गोष्टींपासून एका अदृश्य रेषेने अजूनपर्यंत विभक्त आहे.

माणसाच्या हाताच्या खुणा जपून ठेवणारी ही पृथ्वी खणून काढताना, दगडी सुरे व खरवडण्याची हत्यारे पाहताना, शेकोटीतील फार पूर्वीच विझलेले कोळसे चाळून काढताना, आपल्याला स्पष्ट दिसते की, पूर्वीच्या जगाचा अंत माणसाच्या दृष्टीने त्याचा स्वतःचा अंत ठरला नाही, कारण माणूस स्वतःचे खास छोटे जग निर्माण करू शकला.

प्रकरण पाचवे

भूतकाळात पहिली सफर


रानगवे आणि प्राचीन हत्तींची शिकार करणाऱ्यांच्या तळांवर सापडलेल्या हत्यारांमध्ये वारंवार दोन दगडी हत्यारे आढळतात: दोन बाजूंना धारदार बनवलेले त्रिकोणी हत्यार व धारदार कडेची अर्धवर्तुळाकार थाळी. स्पष्ट आहे की, ह्या प्रत्येक हत्याराचे स्वत:चे ठरलेले काम होते, अन्यथा त्यांच्यात फरक दिसले नसते.


पण कोणते काम होते हे कसे ओळखायचे?

हत्यारांना पाहिल्यानंतर काही प्रमाणात सांगता येते.

पण त्यापेक्षा पाषाणयुगात जाऊन लोक दगडाच्या हत्यारांनी कसे काम करत होते हे पाहणे जास्त चांगले.

कादंबऱ्यांमध्ये वारंवार लिहितात: "दहा वर्षे मागे जाऊ या." कादंबरीलेखकांचे बरे असते – इच्छा होईल त्याप्रमाणे वाचकाला मागे-पुढे नेतात. आणि त्यांना हव्या त्या पद्धतींनी नायकांच्या व्यक्तिरेखा चित्रित करतात.





ही हत्यारे बनविण्यासाठी खूप श्रम व वेळ खर्चावे लागले



आॅस्ट्रेलियन शिकारी

पण आपल्या सत्य इतिहासाशी आम्ही कसे वागायचे? कल्पनारंजनाचा आम्हाला मुळीच हक्क नाही. आणि आम्हाला काही दशके मागे जायचे नाही, तर कित्येक दशक हजार वर्षे मागे जायचे आहे.

असे असले तरीसुद्धा, पाषाणयुगात जाणे शक्य आहे.

तुम्हाला हे करायची इच्छा असेल, तर दूरच्या प्रवासाची पूर्ण पूर्वतयारी करणे आवश्यक आहे: दिशादर्शक यंत्र, नकाशा, बंदूक (पाषाणयुगात शिकारीविना जगता येणार नाही). त्यानंतर जहाजाचे तिकीट काढायला सर्वांत जवळच्या बंदराला जा.

तिकीट काढून ऑस्ट्रेलियाला जाणाऱ्या महासागरगामी आगबोटीत बसा.

काही आठवड्यांनंतर तुम्ही इच्छित स्थळी पोहोचाल.

कोरड्या आणि वाळवंटी मैदानांमधून, अधूनमधून वाढलेल्या काटेरी झुडूपांमधून, देशाच्या खोलवर प्रवास करीत आपण ऑस्ट्रेलियन शिकाऱ्यांच्या तळांपर्यंत पोहोचू. नदीपाशी झाडांखाली साली व फांद्यांनी बनविलेले त्यांचे तंबू आपल्या नजरेला पडतील.

तंबूंपाशी मुले खेळत आहेत, स्त्रिया व पुरुष बसून काम करीत आहेत. तो पहा केसांच्या जटा वाढलेला म्हातारा शिकार केलेल्या कांगारूची कातडी सोलून काढतोय. त्रिकोणी दगडी सुऱ्याने म्हातारा काम करतोय. होय, हेच ते दगडी हत्यार, ज्याने आपल्याला एवढ्या दूरवरचा प्रवास करायला भाग पाडले.

अर्थात, ऑस्ट्रेलियन शिकारी म्हणजे आदिमानव नव्हेत. आदिमानव आणि ते यांच्या दरम्यान हजारो पिढ्यांचे अंतर आहे. त्यांच्यापाशी असलेली दगडी हत्यारे, म्हणजे भूतकाळातील शिल्लक राहिलेल्या वस्तू. पण हे भूतकालीन अवशेष आपल्याला खूप काही खुलासा करू शकतात. ऑस्ट्रेलियनांच्या कामाचे निरीक्षण केल्यानंतर आपल्याला आढळते की, दगडी त्रिकोण हे पुरुष शिकाऱ्याचे हत्यार आहे. अशा त्रिकोणांच्या साह्याने जनावराला शिकारीत ठार करतात, त्याचे धूड कापतात, त्याची कातडी सोलून काढतात.

दुसऱ्या प्राचीन हत्याराचे – अर्धवर्तुळाकार सुऱ्याचे – काम पाहण्यासाठी आणखी पुढे जावे लागेल. ऑस्ट्रेलियाच्या दक्षिणेस असलेल्या टास्मानिया बेटावर. तेथे अगदी परवा परवापर्यंत तशा सुऱ्यांनी बायका कपडे बेतत होत्या, पट्टे बनवीत होत्या, कातडी खरवडत होत्या.

हत्यारांमधील श्रमविभागणी सांगते की, आदिमानवांच्या – शिकाऱ्यांच्या काळापासून लोकांमध्येही श्रमविभागणीचा आरंभ झाला होता.

श्रमाचे स्वरूप अधिकाधिक अवघड होत गेले. अधिक काम पार पाडण्यासाठी काही माणसे एक काम करीत, काही दुसरे करीत. पुरुष जोवर जनावरांच्या मागावर शिकारीला जात, तोवर बायका रिकाम्या बसत नसत. त्या तंबू बनवीत, कपडे शिवीत, कंदमुळे गोळा करीत आणि अन्नाचे साठे करून ठेवीत.

आणखीही श्रमविभागणी होती: वृद्ध आणि तरुणांमध्ये.

हजार वर्षांची शाळा

कोणत्याही कामासाठी कसब आवश्यक असते. आणि हे कसब आकाशातून पडत नाही, ते कुणाकडून तरी मिळवावे लागते.

जर प्रत्येक सुताराला स्वतःच कुऱ्हाड, करवत आणि रंधा बनविणे आवश्यक ठरले असते, शिवाय ही हत्यारे कशी वापरायची हे शोधून काढावे लागले असते, तर ह्या जगात एकही सुतार अस्तित्वात आला नसता.

भूगोलाचा अभ्यास करण्यासाठी जर आपल्यापैकी प्रत्येकाला सबंध जगाचा प्रवास करणे भाग पडले असते, नव्याने अमेरिका शोधावी लागली असती, आफ्रिकेचा मागोवा घ्यावा लागला असता, एव्हरेस्ट शिखर चढावे लागले असते, सर्व भूशिरे आणि उपसागर मोजावे लागले असते, तर माणसाचा एक जन्म पुरला नसता; जरी तो हजारपट दीर्घ असता.

जेवढे अधिक पुढे जावे, तेवढे लोकांना जास्त जास्त शिकावे लागते. प्रत्येक नव्या पिढीला मागच्या पिढीकडून ज्ञानाचा, माहितीचा, शोधांचा अधिक साठा लाभतो. प्रत्येक शास्त्रात प्रत्येक वर्षी नवे शोध लागत असतात. शास्त्रांची संख्याही वाढतेय. केव्हातरी एकदा फक्त भौतिकशास्त्र होते. पण आता भू-भौतिकशास्त्र आणि ख-भौतिकशास्त्र आहेत. पूर्वी नुसते रसायनशास्त्र होते, पण आता भू-रसायनशास्त्र, जैव-रसायनशास्त्र आणि कृषि-रसायनशास्त्र आहेत. नव्या ज्ञानाच्या दबावाखाली शास्त्रे विस्तारतात, त्यांची विभागणी होते व संख्या वाढते. अगदी सजीव पेशींप्रमाणे.

अर्थात, पाषाणयुगात कोणतीही शास्त्रे नव्हती. मानवजातीचा अनुभव नुकता कुठे गोळा होऊ लागला होता, संचित होऊ लागला होता. आत्ताप्रमाणे माणसाचे श्रम अवघड बनले नव्हते. म्हणून शिक्षणात माणसांचा वेळ कमी खर्च होत होता. पण तरीसुद्धा, त्यावेळीही शिकावे लागत होते.

जनावराचा पाठलाग करायला, त्याची कातडी सोलून काढायला, तंबू उभा करायला, दगडी सुरा बनवायला—ह्या सर्व गोष्टींसाठी कसब आवश्यक होते, कारागिरी आवश्यक होती.

हे कसब कुठून घ्यायचे?

माणूस जन्मतः कारागीर नसतो, तो कारागिरी शिकतो.

इथेच दिसून येते, प्राण्यांपासून माणूस किती दूर गेला आहे.

प्राण्याला त्याची स्वतःची सर्व जिवंत हत्यारे, त्याचे कसब, आई-बापाकडून वारसाने लाभते. जसा त्याच्या लोकरीचा रंग किंवा शरीराचा आकार त्याला त्यांच्यापासून लाभत असतो. डुकराला जमीन उकरणे शिकावे लागत नाही, कारण त्यासाठी त्याला जन्मतःच भक्कम मुसकट लाभलेले असते. लाकूड चघळणे आणि कापणे बीव्हरला शिकायला अवघड नाही, कारण त्याच्या

तोंडात तीक्ष्ण सुळे आपोआपच वाढतात. म्हणून प्राण्यांच्या कर्मशाळा नाहीत आणि शाळाही नाहीत.

अंड्यातून नुकतेच बाहेर पडलेले बदकाचे पिलू तावडतोब माशा आणि पाणकिडे पकडू लागते. वस्तुतः ही गोष्ट त्याला कुणीही शिकवलेली नव्हती. कोकिळेची पिले परक्याच्या घरट्यात आई-बापाविना वाढतात. पण जेव्हा शरदाचा मोसम सुरू होतो, तेव्हा वडीलधाऱ्यां-विना ती प्रवासाला निघतात आणि कुणीही त्यांना वाट दाखविलेली नसते, तरी बरोब्बर आफ्रिकेचा मार्ग धरतात.

अर्थात प्राणी त्यांच्या आई-बापाकडून काही गोष्टी शिकतात. पण इथे कोणत्याही शाळेचा प्रश्न नसतो.

पण माणसाची गोष्ट वेगळी.

तो स्वतःच त्याची हत्यारे बनवितो. हत्यारांसह त्याचा जन्म होत नाही. म्हणजे त्या हत्यारांना वापरण्याचे कसब आई-बापाकडून वारसाने त्याला मिळत नाही, तर शिक्षकांकडून आणि कामाच्या ठिकाणी वडीलधाऱ्यांकडून मिळते.

जर माणसांना जन्मतःच व्याकरणाचे सर्व नियम माहीत असते आणि गणिताच्या सर्व समस्या सोडविता येत असत्या, तर बहुधा सगळे आळशी अत्यंत खूष झाले असते. तेव्हा लोकांना शाळांची गरज भासली नसती. पण असे घडणे त्यांच्या मुळीच हिताचे ठरले नसते. शाळेविना माणसांना काहीही नवीन माहीत झाले नसते. एखाद्या खारीच्या कसबाप्रमाणे आणि ज्ञानाप्रमाणे, माणसाचे कसब व ज्ञान त्याच पातळीवर राहिले असते.

मानवजातीच्या सुदैवाने, तयार ज्ञानासकट माणसे जन्माला येत नाहीत. ती खूप खूप शिकतात आणि एकूण मानवी अनुभव-भांडारात प्रत्येक पिढी स्वतःकडून काही ना काही भर टाकत असते. अनुभव सतत वाढत असतो. मानवजात स्वतःच्या अज्ञानाच्या सीमा पुढे पुढे सरकवत जाते.

सोविएत देशात सात वर्षे पूर्ण झालेली सर्व मुले शिकतात.

आणि सगळा सोविएत देश एकत्रितपणे शाळेतून पार पडतोय, नवीन गोष्टी अधिकाधिक प्रमाणात माहीत करून घेतोय.

हजार वर्षांच्या शाळेने, श्रमाच्या शाळेने, माणसाला आज तो जसा आहे तसा घडवलाय. तिने त्याला शास्त्र दिले, तंत्रज्ञान दिले, कला दिली आणि सगळी संस्कृती दिली.

हजार वर्षांच्या शाळेत माणूस पाषाणयुगातच जाऊ लागला होता. म्हातारे, अनुभवी शिकारी तरुणांना शिकारीची अवघड कला शिकवत. जनावराचे जमिनीवरील ठसे ओळखायला त्यांनी त्या तरुणांना शिकवले, जनावराला न बिथरवता त्याच्यापर्यंत कसे पोहचायचे ते दाखविले.

आपल्या काळातसुद्धा शिकार करायला कसब लागते. तरीसुद्धा आत्ता शिकारी होणे सोपे

आहे, कारण शिकाऱ्यांना स्वतःची हत्यारे स्वतःलाच बनवावी लागत नाहीत. पण पाषाणयुगात शिकारी स्वतःच दंडुके, सुरे, भाल्यांची टोके बनवीत. इथे म्हातारा कारागीर तरण्याला खूप काही शिकवू शकत होता.

बायकांची कामेसुद्धा बायकांना शिकावी लागत होती. कारण घराचा कारभार पाहणे, वास्तुशिल्प जाणणे, लाकडे फोडणे आणि कपडे शिवणे, अशी सर्व कामे बाईला एकाच वेळी पार पाडावी लागत.

माणसांच्या प्रत्येक टोळीत म्हातारे, ज्ञानी स्त्री-पुरुष असत. स्वतःच्या अनेक वर्षांच्या श्रमिक जीवनाचा अनुभव ती माणसे तरुणांना देत.

पण स्वतःचे कसब, स्वतःचा अनुभव, दुसऱ्याला कसा द्यायचा?

दाखवून आणि सांगून.

त्यासाठी भाषा पाहिजे.

जिवंत हत्यारांचा—पंजांचा आणि दातांचा—वापर कसा करायचा हे प्राण्यांना स्वतःच्या पिलांना शिकवावे लागत नाही. म्हणून प्राण्यांना बोलण्याची कला अवगत असण्याची गरज नाही.

पण माणसाला बोलणे अत्यावश्यक होते.

इतरांबरोबर एकत्रपणे काम करण्यासाठी आणि वडीलधाऱ्यांकडून तरुणांना कामाचा अनुभव व कामाचे कसब देण्यासाठी, भाषेची गरज होती.

पाषाणयुगातील माणूस कसा बोलत होता?

भूतकाळातील दुसरी सफर

आता परत एकदा भूतकाळात जाऊ या, पण ह्यावेळी कमी अवघड मार्गाचा अवलंब करू.

केवळ जहाजातूनच प्रवास करता येतो असे नव्हे, तर स्वतःच्या घरात, जागच्या जागी राहूनही प्रवास करता येतो.

जेव्हा आपण रेडिओची कळ फिरवतो, तेव्हा खोलीतून बाहेर न पडता एका क्षणात मॉस्को-पासून व्लादीवस्तोकला, व्लादीवस्तोकपासून आल्मा-आताला जाऊ शकतो. आणि आपल्या दिमतीला जर टेलीव्हिजन असेल, तर आपल्यापासून कित्येक किलोमीटर दूर असलेल्या लोकांचे केवळ बोलणेच आपण ऐकू शकतो असे नव्हे, तर त्यांना पाहूसुद्धा शकतो. रेडिओ व टेलीव्हिजन दूर अंतरांना जवळ आणण्यास आपल्याला मदत करतात.

पण आपल्यापासून काही मैलांवर अथवा काही किलोमीटर अंतरावर नव्हे, तर कित्येक वर्षे दूर असलेल्या लोकांचे बोलणे कसे ऐकायचे व त्यांना कसे पहायचे?

पण प्रक्षेपित कार्यक्रमांमार्फत आपण जसा प्रवास करू शकतो, तसा काळामधून प्रवास करण्यास मदत करणारे एखादे यंत्र आहे काय?

होय : बोलपट.

सपाट पडद्यावर आपण संपूर्ण जग पाहू शकतो — केवळ आजचेच नव्हे, तर काही काळापूर्वीचेसुद्धा.

मॉस्कोत लाल चौकात आर्क्टिकच्या वीरांच्या स्वागतासाठी लोकांची प्रचंड गर्दी जमलेली आपण पाहतो. मग एक महाप्रचंड पांढरा फुगा हवेत वर जाताना दिसतो — अगदी पृथ्वीच्या नव्या स्पुत्निकसारखा. तो स्ट्रॅटोस्फीअरचा बलून आहे.

चित्रपटाचा कॅमेरा म्हणजे असे जहाज आहे, जे त्याच्या रचनेच्या वर्षापेक्षा अधिक मागे आपल्याला नेऊ शकत नाही. आणि त्याची रचना अलीकडेच झालेली आहे.

पहिले बोलपट १९२७ साली अवतरले.

नंतर आपल्या "काळाच्या सफरीत" आपल्याला एका जहाजातून दुसऱ्या जहाजात अशा बदल्या कराव्या लागणार. आणि जहाजे अधिकाधिक वाईट असणार: आगबोटीमधून उतरून आपण शिडांच्या जहाजात बसणार आणि शिडाच्या जहाजातून साध्या होडीत.

आता पडद्यावर मूकपट दिसतोय. आपण त्यावर भूतकाळ पाहतोय, पण ऐकत नाही.

हा पहा फोनोग्राफ. आपण स्पष्ट आवाज ऐकतो, पण कोण बोलतोय तो मात्र दिसत नाही.

परत ही जहाजे आपल्याला केवळ त्याच किनाऱ्यांवर नेतात, जेथून ती निघाली होती.

१८९५ सालापूर्वी काय घडले होते ते चित्रपट आपल्याला दाखवू शकत नाही.

आणि फोनोग्राफ आपल्याला फक्त त्याच्या शोधाच्या वर्षापर्यंत, म्हणजे १८७७ पर्यंत मागे नेऊ शकतो.

आवाज विरून जातात आणि फक्त पुस्तकातील एकसुरी व सरळ ओळींच्या शब्दांच्या स्वरूपात उरतात.

छायाचित्रांमध्ये, जुन्या दागेरोपद्धतीमध्ये, स्मिते व कटाक्ष थिजतात.


जुने कौटुंबिक आल्बम पहा. हिरव्या मखमाली आवरणाखाली, ब्राँझच्या पट्ट्यांखाली, अनेक पिढ्यांचे आयुष्य तुम्ही पहाल.

एका कार्डबोर्डच्या पानावर एका लहान मुलीचा फोटो आहे — १८७० नंतरच्या काळात लहान मुली जसा पोषाख करीत तसा तिचा पोषाख आहे. ती मुलगी बागेच्या नक्षीदार फाटकावर रेलून उभी आहे. तसे फाटक फक्त फोटोग्राफरच्या स्टुडिओतच आढळायचे.

त्याच पानावर शेजारी शुभ्र झग्यातील नववधू आणि लठ्ठ, टकल्या नवरदेव उभे आहेत. नवरदेवाचा अंगठीचा हात काटेकोर तासलेल्या अर्ध्या संगमरवरी खांबावर टेकलेला आहे. नवरदेव वधूपेक्षा निदान तीस वर्षांनी मोठा दिसतोय. शेजारच्या पानावरील छोट्या मुलीप्रमाणेच ह्या वधूचे डोळे भाबडे आणि भेदरलेले दिसतात.

आता तीच आणखी चाळीस अथवा पन्नास वर्षांनंतर. तुम्ही मोठ्या मुष्कीलीने तिला ओळखता. काळ्या लेसच्या रुमालाखालील सुरकुत्यांनी भरलेले कपाळ, थकलेले डोळे, खप्पड







भूतकाळाचे साक्षीदार : रोममधील चर्मपत्रावरील हस्तलिखित ; असीरीयन बाणाकृतींची चिकणमातीची पाटी ; आदिमानवांनी कड्यावर कोरलेले चित्र

तोंड. फोटोच्या मागील बाजूस हातात कॅमेरा धरलेल्या छोट्या देवदूताचे चित्र. त्या चित्रावर म्हाताऱ्या, कापऱ्या हाताने लिहिलेली अक्षरे : "माझ्या लाडक्या नातीला, तिच्या प्रेमळ आजी-कडून."

आल्बमच्या एका पानावर व्यक्तीचे सबंध आयुष्य दिसते.

आपल्यापासून काळ जेवढा जास्त दूर, तेवढे फोटोमधील व्यक्तींचे चेहऱ्यावरील भाव, डोक्यांची ठेवण, हातांची लकब कमी ठळक आढळतात. आज आपण भरधाव जाणाऱ्या घोडे-स्वाराचा अथवा पाण्यात उडी मारणाऱ्या जलतरणपटूचा उत्तम फोटो सहजपणे काढू शकतो. पण कोणे एके काळी, माणसाचा फोटो काढायचा असेल, तर त्याला एका खास खुर्चीत बस-

वीत, त्याचे डोके व खांदे अशा रीतीने बांधून ठेवत, की तो बसल्या जागेवरून रेसभर हलू शकत नसे. त्यामुळे माणसांचे फोटो माणसांसारखे न दिसता पुतळयांसारखे दिसत, यात काही नवल नाही.

१८३८ साल. ह्या सीमेपलिकडे फोटोही नाहीत. यापुढील आपल्या सफरीत आपल्याला भूतकाळातील दुसऱ्या साक्षीदारांवर विसंबावे लागणार. मात्र हे साक्षीदार फोटोच्या कॅमेराप्रमाणे अचूक आणि वस्तुनिष्ठ नाहीत.

भूतकाळाची पुनर्रचना करण्यासाठी, कलासज्जांमधील, दफतरखान्यांमधील व ग्रंथालयांमधील जतन करून ठेवलेल्या पुराव्यांच्या साक्षींची तुलना करणे आपल्याला भाग पडणार.

रस्त्यांवरील मैलांच्या खांबांवरील आकडयांप्रमाणे शेकडो वर्षे व शेकडो तारखा आपल्या-जवळून भराभरा पुढे सरकत जातात.

परत एकदा आपल्या सफरीत बदलण्याचा टप्पा येतो. १४४० साल. ह्या सीमेपलिकडे गेल्यास आपल्याला छापील पुस्तक आढळत नाही. सुबक छापील अक्षरांची जागा लेखनिकाची तिरपी अक्षरे घेतात.

त्याची हंसाच्या पिसाची लेखणी सावकाशपणे चर्मपत्रावरून सरकत जाते आणि आपण त्या-च्यामागून, एकेका पावलाने, दर अक्षरागणिक, फरपटत जातो.

चर्मपत्रांपासून भूर्जपत्रांपर्यंत आणि मंदिरांवरील शिलालेखांपर्यंत आपला भूतकाळातील प्रवास घडत जातो.

भूतकाळातील लोकांनी आपल्यासाठी मागे ठेवलेली अक्षरे अधिक अगम्य व गूढ बनत जातात.

अखेरीस अक्षरे नाहीशी होतात, भूतकाळाचे आवाज पूर्ण बंद होतात. मग पुढे काय?

मग आपण माणसाच्या खुणा पृथ्वीच्या पोटात शोधतो, विसरून गेलेली थडगी उकरतो, प्राचीन हत्यारे न्याहाळून पाहतो, प्राचीन घरांचे ढासळून पडलेले दगड आणि फार पूर्वीच विझून गेलेल्या शेकोटयांमधील कोळसे अभ्यासतो.

भूतकाळातील हे अवशेष आपल्याला हकीकत सांगतात: माणूस कसा रहात होता, कसा काम करीत होता.

पण माणूस कसा बोलत होता आणि विचार करीत होता, हे आपल्याला ते सांगू शकतील?

भाषेविना भाषा

खोल गुंफांमध्ये, शिकाऱ्यांच्या तळांवर, अनेकदा खुद्द आदिमानव आढळतात, किंवा त्याहून नेमके म्हणजे त्यांचे अवशेष सापडतात.

१९२४ साली सिम्फेरोपोलपासून जवळच सोविएत पुराणवस्तुशास्त्रज्ञांना कीइक-कोबा गुंफेत

आदिमानवाची हाडे सापडली. गुंफेच्या मध्यभागी काटकोनी खळग्यात त्याला पुरलेला होता. तेथे जवळच, कड्यापाशी, हरणाची हाडे व दगडी हत्यारे सापडली.

पाषाणयुगाच्या आरंभी राहणाऱ्या लोकांचा असाच एक तळ उझ्बेकीस्तानात तेशिक-ताश गुंफेत सापडला.

अतिप्राचीन शिकारी इथे दरीच्या उतारावर रहात होते. ही माणसे बहुधा खप चपळ असावीत. डोंगरी बकरे त्यांचे मुख्य भक्ष्य होते. डोंगरी बकऱ्यांना पकडून मारणे सोपे नसते.

दगडी हत्यारे व प्राण्यांची हाडे यांच्याशिवाय गुंफेत आठ वर्षांच्या मुलाची कवटी व हाडे सापडली.

पाषाणयुगाच्या आरंभी राहणाऱ्या माणसांचे अवशेष केवळ रशियातच नव्हे, तर इतर अनेक ठिकाणी सापडले. अमेरिका सोडून जगातील सर्व भागांमध्ये.

सर्वप्रथम नेअँडर खोऱ्यातील उत्खननात असे अवशेष सापडले, म्हणून ह्या काळातील माणसांना शास्त्रज्ञांनी "नेअँडरथाल माणूस" असे नाव दिले.

आपणही आपल्या नायकाला "नेअँडरथाल माणूस" म्हणू. त्याला नवे नाव देणे आवश्यक आहे, कारण लाखो वर्षांच्या काळात—त्यापूर्वी तो पीथेकॅन्थ्रोप होता—तो वेगळा बनला.

त्याची पाठ ताठ झाली, हात अधिक चपळ बनले, चेहरा अधिक प्रमाणात माणसासारखा दिसू लागला.

कादंबरीकार सर्वसाधारणपणे स्वतःच्या नायकाचे वर्णन अत्यंत कल्पकतेने आणि तपशीलवार करतात: त्याचे डोळे "जळते निखारे," त्याचे "मानी गरुडनाक," त्याचे केस "कावळ्याच्या पंखांप्रमाणे काळेभोर." पण त्याच्या कवटीच्या आकाराबाबत ते कधीही बोलत नाहीत.

आपली वेगळी परिस्थिती आहे. आपल्या दृष्टीने नायकाच्या कवटीचा आकार सर्वप्रथम महत्त्वाचा आहे व त्याच्या डोळ्यांमधील भावापेक्षा अगर केसांच्या रंगापेक्षा तो आपल्याला अनेक पटींनी स्वारस्याचा वाटतो.

नेअँडरथाल माणसाच्या कवटीचे काटेकोर मोजमाप घेतल्यानंतर आपण खुषीने सांगू शकतो की, पीथेकॅन्थ्रोप माणसापेक्षा त्याच्या मेंदूचा आकार वाढला होता.

अनेक हजार वर्षांचे श्रम वाया गेले नव्हते असे दिसते. त्यांनी माणसाला बदलून टाकले होते व सर्वांत जास्त बदल झाला होता माणसाच्या हातांमध्ये आणि डोक्यामध्ये. कारण हातांना काम करावे लागत होते व डोके हातांना हुकूम देत होते.

दगडी कुऱ्हाड हाती घेऊन दुसऱ्या दगडाला नवा आकार देण्याच्या प्रयत्नात माणूस नकळत स्वतःच्या बोटांना बदलत गेला. त्याची बोटे अधिक चपळ व कसबी बनत गेली, त्याचा मेंदू बदलत बदलत जास्त गुंतागुंतीचा बनला.


नेअँडरथालवर नजर टाकल्यानतर आता तुम्ही म्हणणार नाही की, तो माकड आहे.

पण अजून तो खूपसा माकडासारखा दिसतो!

त्याचे उतरते कपाळ डोळ्यांवर कमान धरतेय. त्याचे तिरपे दात तोंडातून पुढे आलेले दिसतात.

कपाळ आणि हनुवटी – ह्या दोन गोष्टी आपल्यात व नेअँडरथालमध्ये भेद दाखवतात. त्याचे कपाळ मागे सरकलेय आणि हनुवटी दिसतच नाही.

जवळ जवळ कपाळ नसलेल्या ह्या कवटीतील मेंदूमध्ये आजच्या माणसाच्या मेंदूपैकी काही भाग नाहीत. आणि तिरपा छेद गेलेल्या हनुवटीचा खालचा जबडा अजून मानवी बोलण्यास सक्षम नव्हता.



डावीकडे – नेअँडरथाल माणसाचे त्याच्या मृत्यूनंतर हजारो वर्षांनी काढलेले चित्र; उजवीकडे – नेअँडरथालची कवटी

तशा कपाळाचा व तशा जबड्याचा माणूस आपल्याप्रमाणे विचार करण्यास आणि बोलण्यास समर्थ नव्हता.

पण तरीसुद्धा बोलणे त्याला आवश्यक होते. एकत्रितरीत्या काम करीत असताना बोलणे आवश्यक होते. माणसे जेव्हा एकत्रपणे काम करतात, तेव्हा कामाबद्दल त्यांना बोलावे लागते. हनुवटीचा विकास होईपर्यंत आणि जबडा रुंद होईपर्यंत माणूस थांबू शकत नव्हता. कारण हजारो वर्षे त्यासाठी वाट पहावी लागली असती.

माणूस खुलासा कसा करायचा?

त्याला जमेल त्या रीतीने तो खुलासा करायचा. स्वतःच्या सर्वांगाने. त्याची जीभ अजून बोलण्याचे खास इंद्रिय बनली नव्हती, म्हणून तो सर्व देहाने बोलायचा : चेहऱ्याचे सर्व स्नायू बोलत, खांदे बोलत, पाय बोलत, पण सर्वांत जास्त हात बोलत.

कुत्र्याशी बोलण्याचा तुमच्यावर कधी प्रसंग आलाय? जेव्हा कुत्रा स्वतःच्या मालकाला काही सांगू इच्छितो, तेव्हा तो मालकाच्या डोळ्यांकडे पाहतो, नाकाने ढुशा देतो, गुडघ्यावर पंजा ठेवतो, शेपटी हलवतो, घायकुतीपायी अंग ताणतो व जांभया देतो. कुत्रा शब्दांनी सांगू शकत नाही, म्हणून त्याला सर्व अंगाने बोलावे लागते. नाकाच्या टोकापासून ते शेपटीच्या टोकापर्यंत.

आदिमानवालासुद्धा शब्दांनी बोलता येत नव्हते. पण दुसऱ्या माणसांना त्याचे विचार समजावून देण्यास त्याला त्याच्या हातांची मदत झाली. हातांनी तो काम करत होता आणि कामासाठी भाषा आवश्यक होती.

"तोड" असे सांगण्याऐवजी माणूस हातांनी हवेत घाव घालायचा. "दे" म्हणण्याऐवजी हात पुढे करायचा. "इकडे ये" सांगण्याऐवजी हातांनी स्वतःकडे येण्याची खूण करायचा. शिवाय आवाजाने तो स्वतःच्या हातांना मदत करायचा. तो गर्जायचा, घशात गुरगुरायचा, सोबत्याचे लक्ष वेधण्यासाठी व त्याने हातवारे पहावेत यासाठी मोठ्यांदा ओरडायचा.

पण हे सर्व आपल्याला कुठून समजले?

जमिनीखाली सापडलेला दगडी हत्याराचा प्रत्येक तुकडा म्हणजे भूतकाळाचा एक तुकडा पण हातवाऱ्यांचे तुकडे कुठे शोधायचे? केव्हाच मातीत मिळालेल्या हातांच्या हालचाली परत कशा जुळवायच्या?

प्राचीन माणसे जर आपले पूर्वज नसती व आपल्यासाठी, आधुनिक माणसांसाठी, त्यांनी काही वारसे शिल्लक ठेवले नसते, तर हे काम शक्य नव्हते.

हावभाव-चित्रे

काही वर्षांपूर्वी एक रेड-इंडियन आला होता. तो नेमेप टोळीमधला होता—म्हणजे "टोचलेल्या नाकांच्या". फेनीमोर कूपर यांनी वर्णन केलेल्या लढाऊ कुऱ्हाडसज्ज रेड-इंडियनांशी त्याचे काहीही साम्य नव्हते.

अमेरिकेमधून आलेल्या पाहुण्याने हरणाच्या कातड्याचे मऊ जोडे पायात घातले नव्हते आणि डोक्यावर पिसेही लावली नव्हती, त्याने तुमच्या-आमच्यासारखाच पोषाख परिधान केला होता. तो इंग्रजीत आणि स्वतःच्या टोळीच्या भाषेत सारख्याच सफाईने बोलू शकत होता.

पण ह्या दोन भाषांशिवाय त्याला आणखी एक भाषा येत होती. ही भाषा फार प्राचीन काळापासून इंडियनांमध्ये टिकून आहे.

ही जगातील अत्यंत साधी भाषा आहे. जर तुम्हाला ही भाषा शिकायची इच्छा झाली असती, तर क्रियापदे व विभक्त्या चालविण्याची भानगड करावी लागली नसती. तिच्यात आप-

त्यापैकी अनेकांना डोकेदुखी देणारी क्रियाविशेषणे नाहीत, संशयार्थ नाहीत, धातुसाधित विशेषणे नाहीत, उच्चार शिकण्याचे श्रम तुम्हाला कधी करावे लागले नसते, कारण ह्या भाषेत उच्चार करण्याची गरजच नाही.

पाहुण्या इंडियनला येणारी भाषा ध्वनीत नव्हती, तर हावभावांमध्ये होती.

ह्या भाषेचा शब्दकोश बनविण्याचा जर तुम्ही प्रयत्न केला असतात, तर तो असा दिसला असता :

हावभावांच्या शब्दकोशातील एक पान

धनुष्य – एक हात अदृश्य धनुष्य धरतो, दुसरा हात अदृश्य दोरी ताणतो.

तंबू – एकमेकात गुंफलेल्या बोटांनी दुहेरी छप्पर.

गोरा माणूस – टोपीची किनार दाखविण्यासाठी कपाळावर हाताचा तळवा आडवा.

लांडगा – दोन कान दाखविण्यास दोन बोटे ताणलेला हात.

ससा – तोच दोन बोटे ताणलेला हात, शिवाय सशाचे लांब कान व गोल पाठ चितारणारी हाताची हालचाल.

मासा – हाताची बोटे एकमेकांना चिकटवून मासा पोहण्याची नक्कल करणारी हाताची नागमोडी हालचाल. हा मासा शेपटी उजवी-डावीकडे वळवत पोहतो.

बेडूक – हाताच्या पाचही बोटांची टोके आलटून-पालटून उघडत-मिटवत उड्या मारण्याची क्रिया दाखवायची.

मेघ – डोक्यावर हातांच्या दोन मुठी धरून ओठंगलेला मेघ दाखवायचा.

हिम – त्याच दोन मुठी, पण सावकाशपणे उघडून खाली येतात व भिरभिरत पडणाऱ्या हिमकणांची हालचाल दाखवतात.

पाऊस – त्याच दोन मुठी, पण पटकन उघडून जोरात खाली येतात.

तारा – दोन बोटे एकत्र मिटतात व डोक्यावर गेल्यानंतर अलग होतात : ताऱ्याची चमचम दाखवितात.

इथे प्रत्येक खूण म्हणजे चित्र आहे : हातांनी हवेत चितारलेले.

ज्याप्रमाणे अत्यंत प्राचीन लिपी शब्दांची नव्हती, चित्रांची होती, त्याचप्रमाणे बहुधा प्राचीन हावभाव हावभाव-चित्रे होते.

अर्थात, आजच्या इंडियनांची हावभाव-भाषा प्राचीन काळच्या माणसांची भाषा नव्हे. इंडियनांच्या भाषेत प्राचीन हावभावांव्यतिरिक्त आदिमानवांचे नसलेले हावभाव सापडणेही शक्य आहे. उदाहरणार्थ, अगदी अलीकडचे प्रचलित हावभाव :

मोटार — दोन चाके दाखविणारी हातांची गोलाकार हालचाल. मग चक्र धरण्याचा आविर्भाव.

आगगाडी — तशीच दोन चाके, शिवाय आगगाडीच्या इंजिनामधून बाहेर पडणाऱ्या धुराचे चित्र दाखविणारी हातांची लाटांसारखी हालचाल.

हे अगदी नवे हावभाव आहेत. आणि त्यांच्या शेजारीच आदिमानवांपासून चालत आलेले हावभाव आपल्याला ह्या हावभाव-शब्दकोशात आढळतात:

अग्नी — शेकोटीमधून वर जाणाऱ्या धुराला दाखविणारी हाताची खालून वर लाटांसारखी हालचाल.

काम — हवा कापणारा तळवा.

कुणास ठाऊक, अशी शक्यता आहे की, प्राचीन काळच्या माणसांनी जेव्हा हाताच्या तळव्याने हवा कापून दाखवली असेल, तेव्हा त्यांना म्हणायचे असेल: "काम कर!"

आपली स्वतःची हावभाव-भाषा

हावभावांची भाषा आपण जपलीय.

जेव्हा आपल्याला "हो" म्हणायचे असते, तेव्हा आपण नेहमीच "हो" म्हणत नाही. त्याऐवजी मानेची होकारार्थी हालचाल करतो.

जेव्हा "तिथे" किंवा "तिकडे" म्हणायचे असते, तेव्हा बोटांनी दिशा दाखवितो. असे खास बोलणारे बोट आपल्यापाशी आहे. त्याला आपण "तर्जनी" म्हणतो.

जेव्हा आपण अभिवादन करतो, तेव्हा किंचित झुकतो. आपण डोके हलवतो, खांदे उडवतो, दोन्ही हात अलग करतो, भुवया संकुचित करतो, ओठ चावतो, बोटांने दटावतो, टेबलावर मूठ आपटतो, पाय दणदण आपटतो, हात उडवतो, हातांनी डोके गच्च आवळतो, काळजाशी हात दाबतो, दंड पकडतो, हात पुढे करतो, निरोपादाखल उडते चुंबन धाडतो.

पहा, एकही शब्द नसताना आख्खे संभाषण!

ही "भाषेविना भाषा", हावभावांची भाषा, जाऊ इच्छित नाही. तिच्यात काही चांगले गुण आहेत. कधी कधी आख्खे भाषण देण्यापेक्षा केवळ एक हावभाव जास्त परिणामकारक ठरतो. चांगला नट अर्धा तासपर्यंत एकही शब्द न बोलता केवळ भुवया, डोळे, ओठ यांच्या साह्याने शेकडो शब्दांपेक्षा जास्त सांगू शकतो.

अर्थात, हावभावांच्या भाषेचा वापर करणे शिष्टसंमत मानले जात नाही.

शब्दांनी जे सांगणे शक्य आहे, ते हातांनी आणि पायांनी दाखविण्याची काय गरज? आपण काही आदिमानव नाही. पाय आपटणे, जीभ बाहेर काढणे, माणसाला बोटाने दाखविणे — ह्या सवयी आहेत आणि त्या सुटणे अधिक चांगले.

पण असे काही प्रसंग येतात, जेव्हा "भाषेविना भाषा" अटळ ठरते.

एका जहाजावरून दुसऱ्या जहाजावर निशाणांच्या हालचालींमार्फत इशारे कसे देतात, हे कधी तुमच्या पाहण्यात आलेय? वाऱ्याच्या झोतांना, लाटांच्या आवाजाला व काही वेळा तोफांच्या गडगडाटाला तोंड देऊन मोठ्यांदा ओरडून इशारे द्यायला कसला आवाज लागला असता! अशा प्रसंगी माणसाचे कान काम करत नाहीत व तेव्हा डोळे मदतीला धावतात.

तुम्ही स्वतः वारंवार "भाषेविना भाषेचा" वापर करता. वर्गात धडा चालू असताना मास्तरांचे लक्ष वेधण्यासाठी तुम्ही हात वर करता. तुमचे असे करणे बरोबर आहे: एकाच वेळी जर तीस अगर चाळीस लोक बोलू लागले, तर शिकणे अशक्य होईल.

असे आढळते की, हावभावांची भाषा कित्येक हजार वर्षे टिकलीय आणि अजूनही तिची लोकांना गरज भासतेय, त्याअर्थी ती तेवढी वाईट नाही.

ध्वनीची भाषा जिंकली, पण प्राचीन हावभावांच्या भाषेला तिने पुरते पराभूत केले नाही. जित जेत्याचा गुलाम बनला. (म्हणूनच अनेक लोकांमध्ये हावभावांची भाषा ही कनिष्ठांची, सेवकांची, लहानांची भाषा बनलीय.)

कॉकेशसमध्ये, महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीपूर्वी, आर्मेनियातील खेड्यामधील बाईला परपुरुषांशी वाचा-भाषेत बोलण्याचा अधिकार नव्हता. त्यांच्याशी ती फक्त हातांनी खाणाखुणा करून बोलायची.

सीरीया, इराण व इतर अनेक ठिकाणी हावभावांची भाषा आढळली.

उदाहरणार्थ, इराणमध्ये शहाच्या राजवाड्यात सेवक फक्त खुणांनी बोलत. फक्त त्यांच्या समान दर्जाच्या लोकांशी ते शब्दांमार्फत बोलत. ह्या दुर्दैवी लोकांचा "आवाजाचा हक्क" शब्दशः छिनावून घेण्यात आला होता.

अशा रीतीने वर्तमानकाळात आपल्याला फार पूर्वीच अदृश्य झालेल्या भूतकाळाचे अवशेष आढळतात.

माणूस स्वतःची बुद्धी घडवतो

जंगलामधील प्रत्येक जनावर त्याच्यापाशी सगळीकडून येणारे हजारो इशारे ऐकत व पहात असते.

फांदीचा काडकन आवाज झाला—बहुधा शत्रु लपतछपत येतोय. पळाले पाहिजे अथवा त्याच्याशी सामना देण्याची तयारी केली पाहिजे.

मेघगर्जना झाली, झाडांची पाने ओरबाडत वारा जंगलातून सुसाट धावत गेला—आगामी वादळी पावसापूर्वी बिळात अथवा घरट्यात लपले पाहिजे.

जमिनीवर कुजणाऱ्या पानांच्या आणि अळंब्यांच्या वासात भक्ष्याचा किंचित वास मिसळून वाहात आला—भक्ष्याचा मागोवा घेऊन त्यावर झडप घातली पाहिजे.

प्रत्येक सळसळ, प्रत्येक वास, गवतावरील प्रत्येक ठसा, प्रत्येक किंचाळी अथवा शीळ, ह्यांना काही ना काही अर्थ आहे. त्यांच्याकडे ताबडतोब लक्ष देणे आवश्यक आहे.

आदिमानवसुद्धा जगाने त्याच्याकडे पाठवलेले इशारे लक्षपूर्वक ऐकायचा. पण त्याशिवाय, त्याच्या टोळीतील इतर माणसांनी पाठविलेले दुसरे इशारे समजून घ्यायलाही तो लौकरच शिकला.

जंगलात कुठेतरी शिकाऱ्याला हरणाचे ठसे आढळले. हात हलवून तो त्याच्या पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या शिकाऱ्यांना त्याबद्दल इशारा देतो. त्या शिकाऱ्यांना अद्याप जनावर दिसलेले नाही, पण त्यांच्याकडे पाठवलेल्या इशाऱ्यानंतर, जणू समोर हरणाची शिंगे व टवकारलेले कान दिसताहेत अशा रीतीने ते आपापली शस्त्रे सज्ज करतात.

जनावराचे जमिनीवरील ठसे—हा इशारा आहे.

ठसे सापडले असे सांगणारी हातांची हालचाल, म्हणजे इशाऱ्याबद्दलचा इशारा.

प्रत्येक वेळी, शिकाऱ्यांपैकी कुणा एकाला जेव्हा जमिनीवर ठसे आढळतात अथवा लपून बसलेल्या जनावराची सळसळ ऐकू येते, तेव्हा ह्या इशाऱ्याबद्दलचा इशारा तो टोळीतील इतर लोकांना पाठवतो.

अशा रीतीने निसर्गाने माणसाला पाठवलेल्या इशाऱ्यांशी बोलणे जोडले गेले—टोळीतील एका माणसाने दुसऱ्या माणसाला पाठवलेला "इशाऱ्याबद्दलचा इशारा."

इवान पेत्रोविच पावलोव त्यांच्या एका पुस्तकात माणसाच्या वाचेबद्दल असेच म्हणतात—हे "इशाऱ्यांबद्दलचे इशारे.'

प्रथम हे इशारे फक्त हावभाव आणि आरोळ्या होते. मध्यवर्ती दूरध्वनी केंद्राकडे संदेश जावेत त्याप्रमाणे डोळ्यांनी व कानांनी ग्रहण केलेले हे "इशाऱ्यांबद्दलचे इशारे" माणसाच्या मेंदूकडे पाठवले जात. "जनावर जवळ येतेय" हा "इशाऱ्याबद्दलचा इशारा" मिळताच मेंदू ताबडतोब हुकूम द्यायचा: हातांना—भाला घट्ट धरा; डोळ्यांना—झुडूपांमध्ये काळजीपूर्वक लक्ष ठेवा; कानांना—जंगलातील प्रत्येक सळसळ आणि फांदी तुटण्याचा आवाज लक्षपूर्वक ऐका. जनावर अजून दिसत नसले, तरी त्याची चाहूल ऐकू येत होती आणि त्याला सामोरा जायला माणूस एव्हाना सज्ज होता.

हावभाव आणि उद्गार जेवढे अधिक वाढले, मेंदूकडे "इशाऱ्यांबद्दलचे इशारे" जेवढे जास्त वाढले, तेवढे माणसाच्या कवटीच्या कपाळाच्या भागातील "मध्यवर्ती स्थानका"चे काम जास्त वाढले. त्यामुळे "मध्यवर्ती स्थानक" अधिकाधिक व्यापक होणे आवश्यक होते. मेंदूत नव्या पेशी निर्माण झाल्या, ह्या पेशींमधील दळणवळण अधिक गुंतागुंतीचे बनले. मेंदू वाढला, त्याचा आकार मोठा झाला.

नेअँडरथालच्या मेंदूचा आकार पीथेकन्थ्रोपपेक्षा ४००-५०० घन सेंटीमीटरनी मोठा होता. माणसाच्या मेंदूचा विकास झाला, माणूस विचार करायला शिकला.

जेव्हा त्याने "सूर्य" हा इशारा पाहिला अथवा ऐकला, तेव्हा तो सूर्याबद्दल विचार करू लागला. आणि हा विचार ऐन मध्यरात्रीसुद्धा त्याच्या डोक्यात येणे शक्य होते.

जेव्हा त्याला जाण्याचा व भाला आणण्याचा इशारा दिला, तेव्हा त्याने भाल्याबद्दल विचार केला, जरी त्यावेळी भाला त्याच्या हातापाशी नव्हता.

सामायिक कामामुळे माणूस बोलायला शिकला आणि बोलायला शिकल्यानंतर तो विचार करायला शिकला.

माणसाला त्याची बुद्धी निसर्गाकडून मिळालेली देणगी नव्हे. स्वतःच्या हातांनी त्याने तिला प्राप्त केले.

जीभ व हात यांनी भूमिका कशा बदलल्या

जोवर हत्यारे कमी होती, जोवर माणसाचा अनुभव फार मोठा नव्हता, तेव्हा अनुभव दुसऱ्याला सांगण्यासाठी अत्यंत साधे हावभाव पुरेसे होते.

पण श्रम जेवढे गुंतागुंतीचे होत गेले, तेवढे हावभावसुद्धा अवघड बनत गेले. प्रत्येक वस्तुसाठी स्वतंत्र हावभाव आवश्यक होता व त्या हावभावाने त्या वस्तूचे अचूक वर्णन करणे आवश्यक होते, तेव्हा हावभाव-चित्र निर्माण झाले. माणूस हवेत जनावराचे, शस्त्राचे, झाडाचे चित्र काढू लागला.

तो पहा, माणूस साळिंदराचे चित्र काढतोय. तो केवळ साळिंदर रेखाटत नाही, क्षणभर तो स्वतःच साळिंदर बनतो. साळिंदर जमीन कशी उकरतो, पंजांनी माती एका बाजूला कशी फेकतो, स्वतःच्या साळपिसांना धार कशी काढतो, ह्या गोष्टी माणूस हावभावांनी दाखवितो.

अशा मूक कथनासाठी प्रचंड निरीक्षणशक्ती पाहिजे. आपल्या काळात अशी निरीक्षणशक्ती फक्त अस्सल चित्रकारापाशी असते.

जेव्हा तुम्ही म्हणता: "मी पाणी पितो," तेव्हा तुमच्या शब्दांमधून तुम्ही पाणी कसे पिता हे समजत नाही – ग्लासातून, बाटलीतून अथवा हातांच्या ओंजळीतून.

हातांनी खुलासा करायची कला अद्याप न विसरलेला माणूस वेगळ्या रीतीने बोलतो.

तो स्वतःच्या तोंडापाशी हाताचा तळवा नेतो आणि अदृश्य पाणी आधाशीपणे जिभेने लपालपा पितो. त्यामुळे समजते की, पाणी चवदार आहे, गार आहे व छानपैकी तहान भागवतेय.

आपण केवळ म्हणतो: "पकडणे," "शिकार करणे." पण प्राचीन माणूस स्वतःच्या



हावभावांमधून शिकारीचे संपूर्ण दृश्य चितारायचा.

हावभावांची भाषा एकाचवेळी दरिद्री व श्रीमंत होती.

ती श्रीमंत होती, कारण वस्तूचे आणि प्रसंगांचे वर्णन ती झटपट, ठळकपणे करायची, पण त्याचवेळी ती गरीबही होती.

हावभावाने डावा आणि उजवा डोळा दाखविता येत होता, पण नुसता "डोळा" म्हणणे त्याहून खूप अवघड जायचे.

हावभावांच्या साह्याने वस्तूचे हुबेहूब वर्णन करता यायचे, पण अमूर्त कल्पनेचे चित्रण सर्वथा अशक्य होते.

हावभावांच्या 'भाषेत आणखीही काही उणीवा होत्या.

ही भाषा रात्री बोलणे शक्य नव्हते. रात्रीच्या अंधारात कितीही हातवारे केले, तरी कुणालाही ते दिसणार नाहीत. आणि सूर्याच्या प्रकाशातसुद्धा नेहमीच हावभावांनी बोलणे शक्य नव्हते.

मैदानांमध्ये माणसे सहजपणे खुणांनी बोलत. पण जंगलात जेव्हा शिकाऱ्यांच्या दरम्यान झाडांची भिंत उभी असे, तेव्हा तसे संभाषण पूर्णपणे अशक्य होते.

अशा वेळी माणसाला ध्वनींमार्फत सांगणे भाग पडले.

आरंभीच्या काळात जीभ व घसा ही इंद्रिये माणसाच्या विशेष आज्ञेत नव्हती. एका ध्वनी-पासून दुसरा ध्वनी फारसा वेगळा निघत नव्हता. स्वतंत्र ध्वनी गुरगुरीत, ओरडण्यात, किंचा-ळीत मिसळून जात. जिभेवर विजय मिळवून तिला स्पष्ट बोलायला लावण्यासाठी माणसाला बराच काळ खर्च करावा लागला.

तोंडातील जिभेच्या हालचाली सर्व हावभावांमध्ये अत्यंत कमी दिसत. पण त्यांचा एक फायदा होता, की त्या ऐकू येत.

काही अशा टोळ्या आहेत ज्यांच्यात केवळ "चालणे" म्हणत नाहीत, तर म्हणतात: "ठाम चालणे"; "लठ्ठ माणसे चालतात तसे धप धप चालणे"; "भरभर चारणे"; "छोटी पावले ठाकीत चालणे"; "किंचित लंगडत डोके पुढे झुकवून चालणे." प्रत्येक अभिव्यक्ती एक

ध्वनी-चित्र आहे. माणसाच्या चालीचा प्रत्येक बारीक तपशील त्यात आहे.

जेवढ्या चाली, तेवढ्या अभिव्यक्ती.

हावभाव-चित्राच्या जागी शब्द-चित्र आले.

नदी आणि तिचे उगम

आपल्या भूतकाळातील सफरींमध्ये आपण काय शोध लावले?

प्रवासी ज्याप्रमाणे नदीच्या वरच्या अंगाने जात तिच्या उगमाचा शोध घेतो, त्याप्रमाणे मानवी अनुभवाच्या महानदीच्या उगमाचा आपण शोध घेतला.

त्या उगमापाशी आपल्याला मानवी समाजाचा आरंभ सापडला, भाषेचा आणि विचाराचा आरंभ गवसला.

नदीला येऊन मिळणाऱ्या प्रत्येक उपनदीबरोबर ज्याप्रमाणे तिचे पाणी वाढत जाते व प्रवाह अधिक सखोल बनतो, त्याचप्रमाणे मानवी अनुभवाची नदी अधिक विस्तृत व सखोल बनत जाते, कारण प्रत्येक पिढीने गोळा केलेला अनुभव तिच्यात मिसळला.

भूतकाळात पिढीमागून पिढी नाहीशी झाली. माणसे व टोळ्या मागमूस न ठेवता नाहीशी झालीत, शहरे व वस्त्या स्वतःची स्मारक न ठेवता धुळीत मिळाली. काळाच्या संहारक शक्तीसमोर जगातील कोणतीही गोष्ट टिकू शकत नाही असे भासले. पण मानवजातीचा अनुभव अदृश्य झाला नाही. काळावर विजय मिळवून तो भाषेच्या रूपाने, कारागिरीच्या व शास्त्राच्या रूपाने, टिकून राहिला. भाषेतील प्रत्येक शब्द, श्रमातील प्रत्येक हालचाल, शास्त्रातील प्रत्येक संकल्पना, म्हणजे माजी पिढ्यांचा संचित अनुभव.

नदीत ज्याप्रमाणे एकही उपनदी कधी वाया जात नाही, त्याप्रमाणे ह्या पिढ्यांचे श्रम मुळीच वाया गेले नाहीत. आपल्यापूर्वी जगलेल्या सर्व माणसांचे श्रम आणि आत्ता जगणाऱ्या माणसांचे श्रम, मानवी अनुभवाच्या नदीत एकत्र मिसळून गेले आहेत.

अशा रीतीने आपण नदीच्या वरच्या अंगाला पोहोचलो. आपल्या सर्व आरंभांच्या सुरुवातीपाशी. काम करणारा, बोलणारा, विचार करणारा माणूस नावाचा प्राणी असा उदयाला आला.

माकडापासून माणसाला अलग करणाऱ्या हजारो वर्षांकडे नजर टाकली, म्हणजे श्रमाने माणूस निर्माण केला हे फ्रेड्रिक एंगल्स यांचे शब्द आपल्याला हमखास आठवतात.

प्रकरण सहावे

टाकून दिलेल्या घरात

माणसे जेव्हा घर सोडून जातात, तेव्हा त्यात त्यांनी टाकून दिलेल्या वस्तू नेहमी राहतात. रिकाम्या खोल्यांमध्ये फरशीवर कागदांचे ढिगारे, फुटलेल्या कपांचे तुकडे, जुन्या बरण्या पडलेल्या असतात. खूप काळ न पेटवलेल्या शेगडीवर फुटक्या भांड्यांचे व तव्यांचे ढीग अस्ताव्यस्त पडलेले असतात. खिडकीच्या चौकटीत उभा असलेला काचेविना फुटका दिवा हे सर्व दृश्य उदासपणे पहात असतो.

कातडी आवरणामधून पेंढा बाहेर डोकावणारी आरामखुर्ची भिंतीशी शांत झोप घेत असते. माणसांबरोबर ही खुर्ची न जाण्याचे एकमेव कारण म्हणजे फार काळापासून तिला एक पाय नाही.

ह्या उरलेल्या वस्तूंच्या आधारे येथील माणसे पूर्वी कशी रहात होती त्याचे चित्र कल्पनेने उभे करणे अवघड गेले असते. पण पुराणवस्तुशास्त्रज्ञाला नेमके हेच काम करावे लागते. पुराणवस्तुशास्त्रज्ञ नेहमी सर्वांत शेवटी घरात अवतरतो. आणि घर पूर्वीच्याच जागी उभे असलेले त्याला सापडले, तर तो सुदैवी म्हटला पाहिजे. बहुधा शेवटच्या मालकाने त्या घराला टाकून दिल्यानंतर शेकडो वर्षांनी तो तेथे प्रवेश करतो. काहीवेळा घराऐवजी त्याला फक्त कोसळलेल्या भिंती व पायाचे अवशेष आढळतात. अशा प्रसंगी मातीचे भाजलेले प्रत्येक भांडे म्हणजे शोध आणि प्रत्येक फुटका तुकडा म्हणजे सुदैव.


ज्याला त्यांची भाषा समजते अशा माणसाला जुनी घरे खूप हकीकत सांगू शकतात!

दगडांच्या जीर्ण वस्त्रांना परिधान केलेल्या ह्या बुरुजांनी, गवतांचे रान माजलेल्या ह्या भिंतींनी किती माणसांना आणि किती घटनांना पाहिले!

पण दुसऱ्या घरांनी, जगातील सर्वांत प्राचीन घरांनी—गुंफांनी—स्वतःच्या काळात त्याहून जास्त पाहिले होते.

अशा काही गुंफा आहेत, ज्यांच्यात माणसे पन्नास हजार वर्षांपूर्वी रहात होती! आपल्या सुदैवाने, माणसांनी बांधलेल्या इमारतींच्या भिंतींप्रमाणे, डोंगर आणि गुंफांच्या भिंती लौकर ढासळून पडत नाहीत.

ही बघा एक तशी गुंफा. तिने अनेकवेळा स्वतःचे मालक बदलले. प्रथम तिचे मालक होते भूमिगत पाण्याचे झरे. त्यांनी तिच्यात खूप चिकणमाती, वाळू आणि खडी आणली.



ही माणसे आता गुंफांमध्ये अथवा जमिनीखालील निवाऱ्यांमध्ये रहात नाहीत, तर घरांमध्ये राहतात. १६ व्या शतकातील व्हर्जिनियामधील इंडियनांचे खेडे

मग पाणी निघून गेले. गुंफेत माणसे राहू लागली. चिकणमातीत सापडलेली दगडी अणकुचीदार ओबडधोबड हत्यारे त्यांच्याबद्दल काही हकीकत सांगतात. तशा अणकुचीदार हत्यारांच्या मदतीने आदिमानव जनावरांची शरीरे कापत, हाडे व मांस अलग करत व नंतर चरबी काढण्यासाठी हाडे फोडत. म्हणजे येथे आलेल्या माणसांना शिकार करणे आधीच माहीत होते.

अनेक वर्षे उलटली. माणसांनी गुंफा सोडली. तिच्यात नवीन रहिवासी आले. गुंफेच्या भिंती गुळगुळीत आणि चकचकीत बनल्या. गुंफेतील अस्वलाने स्वतःच्या घरातील भिंतींवर आपली केसाळ पाठ वारंवार घासल्यामुळे असे घडले. हे पहा खुद्द तेच अस्वल, अथवा अधिक नेमके सांगायचे तर त्याची रुंद कपाळाची व अरुंद तोंडाची कवटी.

वरच्या थरात पुन्हा माणसाच्या वस्तीचे अवशेष सापडले: शेकोटीमधील कोळसे व राख, तुटकी हाडे, दगडी व हाडांची हत्यारे. माणसे परत गुंफेत रहायला आली होती. आपल्याला ही माणसे दिसत नाहीत, पण तरीसुद्धा त्यांच्याबद्दल खूप माहिती आपण सांगू शकतो. त्यांच्या शिल्लक राहिलेल्या वस्तूंवर नुसती नजर टाकणे पुरेसे आहे. अननुभवी डोळ्यांना ते नुसते गारगोटीचे तुकडे वाटतील. पण त्यांना जर बारकाईने निरखून पाहिले, तर त्यांच्यात भावी सुरा व आरी दिसतात. एका हत्याराला सुऱ्याप्रमाणे पाते आहे, तर दुसऱ्याला आरीप्रमाणे तीक्ष्ण टोक आहे.

हे आपल्या उपकरणांचे पूर्वज. त्यांच्यात सर्वांत जुना पूर्वज आहे हातोड्याचा: गोल दगडी पिकाव.

गुंफेच्या तळाशी साचलेल्या कचऱ्यात आपण जर काळजीपूर्वक शोधाशोध केली, तर हातोड्यापासून जवळच ऐरण सापडेल.

हातोडा दगडापासून बनवलेला आहे.

ऐरण हाडाची बनवलेली आहे.

ती आपल्या आत्ताच्या ऐरणीसारखी मुळीच दिसत नाही. पण तिने आपले काम चोख बजावले होते असे तिच्याकडे लक्षपूर्वक पाहिल्यास ध्यानात येते. तिच्यावर अनेक घाव आणि खड्डे आहेत. स्पष्ट दिसते की, जेव्हा हत्यारांना पाहिजे तसा आकार देण्यात येत होता, तेव्हा ऐरणीला सगळे घाव सोसावे लागले होते.

हत्यारे आपल्याला काय सांगतात?

ती सांगतात की, गुंफेचे नवे मालक पूर्वीच्या मालकांपेक्षा खूप पुढारलेले होते. मध्यंतरीच्या हजारो वर्षांच्या काळात मानवी श्रमात विविधता आली होती व ते अधिक अवघड बनले होते.

पूर्वी एकाच टोकदार दगडाने सर्व कामे केली जात होती. आता एका हत्याराने कापत होते, दुसऱ्याने फोडत होते, तिसऱ्याने खरवडत होते, तर चौथ्याने तोडत होते. अरुंद तीक्ष्ण टोकाचे हत्यार—कपडे बनविण्यासाठी जनावराच्या कातडीत खुपसण्याचे दाभण. छोट्या पात्याचे

हत्यार — मांसाचे तुकडे करायला आणि कातडी खरवडायला. धारदार कडांचे टोक — भाल्याचे टोक.

माणसाची कामे व चिंता वाढलेल्या दिसतात. हवामान कठोर आणि थंड बनले होते. अस्वलांच्या कातडींपासून वस्त्रे बनविण्याची, हिवाळ्यासाठी मांसाची बेगमी करून ठेवण्याची आणि उबदार निवाऱ्याची तरतूद करण्याची माणसावर जबाबदारी पडली होती. ह्या सर्व कामांसाठी केवळ एक हत्यार चालणार नव्हते, तर वेगवेगळ्या हत्यारांच्या संपूर्ण संचाची गरज होती.


अशा रीतीने आपल्या दस्तुरखुद्द पूर्वजाच्या घरात आपल्या वस्तूंचे पूर्वज आपल्याला आढळतात.

पण काळाच्या ओघात जेवढ्या वस्तू टिकून राहिल्या, तेवढ्याच आपल्याला सापडल्या. काळ अगदी वाईट राखणदार आहे. त्याने केवळ सर्वांत टिकाऊ अशा फक्त दगडी व हाडांच्या वस्तू राखल्या. पण लाकडापासून आणि जनावरांच्या कातड्यांपासून बनवलेल्या सर्व वस्तू काळाने स्वतःच्या वाटचालीत नष्ट करून टाकल्या. म्हणूनच आपल्यापर्यंत दाभण टिकून राहिले, पण ह्या दाभणाच्या साहृयाने शिवलेली वस्त्रे टिकून राहिली नाहीत. भाल्याचे टोक टिकून राहिले, पण भाल्याचा लाकडी दांडा टिकला नाही.

ह्या उरलेल्या वस्तूंच्या साह्याने नाहीशा झालेल्या वस्तूंबद्दल आपल्याला तर्क करावा लागणार आहे. आपल्या जन्माच्या हजारो वर्षांपूर्वी मातीत मिसळून गेलेल्या वस्तूंची आपल्याला ह्या अस्पष्ट खुणांच्या व अर्धवट तुकड्यांच्या साह्याने फेररचना करावी लागणार आहे.



हत्यारे वेगवेगळ्या प्रकारची बनली. दोन बाणांची टोके, दाभण, चामडे खरवदण्याची चाती



दगडी हत्यारांशी हाडांची व शिंगांची हत्यारे जोडली गेली. रेनडीअरच्या शिंगाची कट्यार व हार्पूनचे टोक

तरीही आपले संशोधन पुढे चालू ठेवू.

सर्वसाधारणपणे उत्खननाचे काम वरून खालपर्यंत जाते: प्रथम सर्वांत वरचे थर खणतात, मग खाली खाली खणत जातात – जमिनीच्या आणि इतिहासाच्या गाभ्यात. पुराणवस्तुशास्त्रज्ञ नव्याने शेवटापासून पुस्तक वाचतो: शेवटच्या प्रकरणापासून आरंभ करतो व पहिल्या प्रकरणापाशी संपवतो. आम्ही आमची कथा वेगळ्या रीतीने सांगतोय. आम्ही सर्वांत खालच्या थरापासून, गुंफांच्या इतिहासाच्या पहिल्या प्रकरणापासून, आरंभ केला. आता आम्ही वर वर चढतोय, आपल्या काळाच्या नजीक येतोय.

गुंफेत पुढे काय घडले?

साठलेल्या थरांचा अभ्यास केल्यानंतर असे आढळते की, माणसांनी अनेकदा गुंफा सोडली व अनेकदा परत तिच्यात वस्ती केली. जेव्हा माणसे गुंफेत रहात नव्हती, तेव्हा अस्वलांचा व तरसांचा तेथे मुक्काम होता. त्यावेळी चिकणमातीचे आणि धुळीचे थर गुंफेत साठत होते. छताच्या दगडाच्या कपच्या खाली पडत होत्या. आणि अनेक वर्षांनंतर जेव्हा माणसांची टोळी गुंफेत परत रहायला यायची, तेव्हा पूर्वीच्या मालकांच्या कोणत्याही खुणा तिच्या दृष्टीला पडत नसत.

वर्षे, शतके, हजार वर्षे उलटली. उघड्या आकाशाखाली लोकांनी स्वतःसाठी घरे बांधली, निसर्गाने पुरविलेल्या निवाऱ्यांचा वापर करणे त्यांनी थांबविले. गुंफा रिकामी पडली. फक्त डोंगरी कुरणांमध्ये कळप चारायला आणणारे गुराखी गुंफेत क्वचित थोड्या काळासाठी मुक्काम करीत अथवा वाईट हवेत सापडलेले वाटसरू गुंफेचा निवारा घेत.

आणि अखेरीस गुंफेच्या इतिहासाचे शेवटचे प्रकरण सुरू झाले. गुंफेत परत माणसे आली.

पण ह्यावेळी ती तिच्यात रहायला आली नव्हती, तर एकेकाळी माणसे तिच्यात कशी रहात होती त्याचे ज्ञान करून घ्यायला.

त्यांनी स्वतःबरोबर अत्याधुनिक धातूची उपकरणे आणली होती – अतिप्राचीन दगडी हत्यारे खणून काढण्यासाठी.

थरामागून थर खणत भूतकाळाचे संशोधन करणाऱ्या ह्या लोकांनी गुंफेचा अथपासून इति-पर्यंत इतिहास वाचून काढला.

हत्यारांची तुलना करताना त्यांना समजले की, दर पिढीगणिक माणसांची कारागिरी कशी वाढत गेली, माणसाचा अनुभव कसा वाढत गेला. माणसाची हत्यारे हजारो वर्षांच्या काळात बदलत गेली, अधिकाधिक सुबक बनत गेली, असे त्यांना आढळले. ओबडधोबड फरशी-कुऱ्हा-डीच्या जागी त्रिकोणी धारदार हत्यारे आणि अर्धवर्तुळाकार कडेची खरवडण्याची हत्यारे आली, व त्यानंतर काही काळाने वेगवेगळी धारदार बाणांची टोके, खरवडण्याची हत्यारे, आऱ्या वगैरे सुबक गारगोटीपासून बनविण्यात आली. दगडांच्या हत्यारांच्या जोडीला हाडांची व शिंगांची हत्यारे आली. कामांसाठी हाडांपासून, कातड्यांपासून, लाकडापासून उपकरणे तयार करण्यात आली. त्याच दगडापासून माणसाने हाड कापायला सुरा बनवला, कातडी सोलायला खरवडायचे हत्यार बनवले, शिंपले फोडायला गिरमिट बनवले. माणसाच्या कृत्रिम नख्या व त्याचे कृत्रिम दात अधिकाधिक धारदार बनत होते, भक्ष्यांना पकडणारे त्याचे हात जास्त जास्त लांब बनत चालले होते.

लांब हात

जेव्हा माणसाने भाला बनवला – काठीला गारगोटीचे धारदार टोक बांधले – तेव्हा त्याने स्वतःचा हात अधिक लांब केला.

त्यामुळे तो अधिक सामर्थ्यवान आणि धैर्यवान बनला.

पूर्वी माणसाला वाटेत जर अस्वल भेटले, तर घाबरून तो माघार घ्यायचा. गुंफेत राह-णाऱ्या त्या केसाळ प्राण्याशी झुंजण्याचे तो टाळायचा. एखाद्या छोट्या प्राण्याला माणूस सहज ठार मारायचा, पण अस्वलाशी झुंज देण्याची त्याची हिंमत होत नव्हती. अस्वलाच्या पंजाच्या नख्यांमधून आपण जिवंत सुटणार नाही ह्याची त्याला चांगली कल्पना होती.

माणसाने भाला हाती धरेपर्यंत असेच चालले होते. भाल्याने त्याला धीटपणा दिला. आता अस्वल दिसताच तो पळून जात नव्हता, उलट स्वतःच अस्वलावर चालून जात होता. मागील पायांवर उभे राहून धिप्पाड अस्वल शिकाऱ्यावर हल्ला करायला जायचे. पण अस्वलाच्या पंजांनी माणसावर झडप घालण्याच्या आतच गारगोटीचे धारदार टोक जोरात अस्वलाच्या केसाळ पोटात घुसायचे. कारण अस्वलाच्या पंजापेक्षा भाला अधिक लांब होता.

जखमी अस्वल संतापाने आणखी पुढे धावायचे व त्यामुळे गारगोटीच्या टोकाचा भाला त्याच्या पोटात जास्त जास्त खोलपर्यंत घुसत जायचा.

मात्र भाल्याचा लाकडी दांडा जर हातातच तुटला, तर शिकाऱ्याची परिस्थिती वाईट बनायची.

अस्वल माणसावर झडप घालायचे, नख्यांनी आणि दातांनी त्याच्या चेहऱ्याचे व खांद्यांचे लचके तोडायचे.

पण माणसावर विजय मिळविणे अस्वलाला क्वचितच जमायचे. कारण त्या काळात माणूस शिकारीला एकटा कधीही जायचा नाही. मदतीसाठी ठोकलेली आरोळी ऐकताच माणसांची सबंध टोळी धावून जायची. सर्व बाजूंनी माणसे अस्वलावर तुटून पडायची आणि दगडी सुऱ्यांचे प्रहार करून त्याला ठार मारायची.


पूर्वी स्वप्नातसुद्धा पाहिली नसेल अशी शिकार माणसाला भाल्यामुळे मिळू लागली. गुंफांमध्ये अजूनही दगडी फरशांच्या कोठ्या आढळतात व त्या कोठ्यांमध्ये अस्वलांच्या हाडांचे ढीग. ज्याअर्थी अस्वलांचे मांस साठवून ठेवणे माणसांना शक्य होते, त्याअर्थी शिकारी यशस्वी होत होत्या.

अस्वलासारख्या अजागळ प्राण्यांशीच जर माणसाची नेहमी गाठ पडत असती, तर भाला सर्वोत्तम हत्यार ठरले असते. पण अधिक चपळ आणि जलद धावणाऱ्या जनावरांचीही माणसाला शिकार करावी लागत होती.


मैदानांमधून भटकताना शिकाऱ्यांना घोड्यांचे व रानगव्यांचे कळप भेटत होते. त्या कळपांपाशी शिकारी चोरटेपणाने सरपटत जात. पण पहिल्याच चाहुलीसरशी कळप सावध व्हायचा आणि चौखूर उधळायचा.

घोड्यांची अथवा रानगव्यांची शिकार करायला माणसाचे हात अजून थोटे पडत होते. तेवढ्यात खुद्द शिकारीमधूनच माणसाला नवीन, भक्कम साहित्य गवसले – हाड.

दगडी सुऱ्याच्या साह्याने माणसाने हाडापासून हलके व धारदार टोक तयार केले. ह्या टोकाला त्याने आखूड लाकडाला बांधले. एक नवीन हत्यार निर्माण झाले – बरची. धावणाऱ्या घोड्यावर अवजड भाला फेकणे माणसाला जमायचे नाही, पण हलक्या हाडाच्या टोकाची बरची अधिक दूरपर्यंत फेकणे शक्य होते.



ठार झालेले अस्वल (आदिचित्रकाराने काढलेले चित्र)



शिकाऱ्यापाशी धनुष्य आले (गुंफेतील चित्र)

माणसाचा हात आणखी लांब बनला. उडत्या हत्याराच्या–बरचीच्या–साह्याने धावत्या घोड्याला तो नाहीसा व्हायच्या आत माणूस ठार मारू शकत होता.

एवढे खरे, धावत्या लक्ष्यावर अचूक घाव घालणे सोपे नव्हते. त्यासाठी बळकट हाताची आणि तीक्ष्ण नजरेची गरज होती.

लहानपणापासून शिकारी बरची फेकायचा सराव करायचा. तरीसुद्धा, शिकारीच्या वेळी शंभरपैकी अवघ्या दहा बरच्यांचा अचूक नेम साधायचा.

काही शतके आणि हजारो वर्षे उलटली. घोड्यांचे आणि रानगव्यांचे कळप विरळ बनले. माणसाने त्यांचा फडशा पाडला होता. शिकारी वारंवार रिकाम्या हातांनी परतू लागले. अधिक दूरवर फेकता येईल असे नवे हत्यार बनविणे आवश्यक ठरले. हात आणखी लांब करावा लागणार होता.

आणि माणसाने नवे हत्यार तयार केले.

त्याने कोवळे, भक्कम लाकडाचे झाड तोडले, त्या लाकडाला वाकवून त्याची कमान बनविली आणि कमानीच्या दोन टोकांना दोरी ताणून बांधली. शिकाऱ्यापाशी धनुष्य आले.

शिकारी जेव्हा सावकाशपणे दोरी ताणायचा, तेव्हा तिच्यात त्याच्या ताणलेल्या स्नायूंची शक्ती एकवटायची.

मग जेव्हा शिकारी दोरी सोडायचा, तेव्हा ती एकवटलेली सगळी शक्ती बाणात जायची. आणि स्वतंत्र सुटलेला बाण बहिरीससाण्यासारखा सुसाट भक्ष्यावर आघात करायचा.

हाताने फेकलेल्या बरचीपेक्षा धनुष्यामधून सोडलेला बाण अनेक पटींनी दूर उडत जायचा.

बाण आणि बरची भावा-बहिणीप्रमाणे सारखे आहेत. पण बाण बरचीपेक्षा हजार वर्षांनी लहान आहे.

बाण बनविण्यासाठी माणसांना काही हजार वर्षांचा अवधी लागला.

आरंभी धनुष्यातून बाण मारत नव्हते, तर बरच्या फेकत होते. त्यामुळे तेव्हा धनुष्याला माणसाच्या उंचीएवढे प्रचंड आकाराचे बनवावे लागे.

अशा रीतीने माणसाने स्वतःचा दुबळा व आखूड हात लांब व सामर्थ्यवान बनवला. हरणाच्या शिंगापासून अथवा प्राचीन हत्तीच्या सुळ्यापासून तीक्ष्ण टोके बनवून त्याने प्राण्यांची शस्त्रे त्याच प्राण्यांविरुद्ध शिकारीसाठी रोखली. ह्यामुळे तो जगात सर्वांत सामर्थ्यवान बनला.

बरची फेकणारा आणि धनुष्याची दोरी खेचून सोडणारा हात आता साधासुधा हात नव्हता, तर महाबलाढ्याचा हात होता.

आणि जेव्हा तरुण बलाढ्य शिकारीला बाहेर पडायचा, तेव्हा तो फक्त एकाच पशूचा नव्हे, तर पशूंच्या सबंध कळपाचा माग घेऊन त्याची शिकार करायचा.


पण हिमयुगाची अखेर झाल्यानंतर धनुष्याची निर्मिती झाली होती. आपला नायक अजून हिमयुगामधून बाहेर पडलेला नाही.

जिवंत धबधबा

फ्रान्समध्ये सोल्यूत्रे नावाचा एक उंच कडा आहे.

ह्या कड्याच्या पायथ्याशी पुराणवस्तुशास्त्रज्ञांना हाडांचा प्रचंड साठा सापडला. त्यात प्राचीन हत्तींचे खांदे होते, प्राचीन बैलांची शिंगे होती आणि गुंफेतील अस्वलांच्या कवट्या होत्या.

पण सर्वांत जास्त घोड्यांची हाडे होती. काही ठिकाणी त्यांचे ढीग माणसाच्या उंचीपेक्षा जास्त होते. जेव्हा संशोधकांनी ह्या हाडांची संगतवार विभागणी केली, तेव्हा किमान एक लाख घोड्यांची हाडे तेथे पडलेली होती असे त्यांना आढळले.



घोडे व हरीणे (हाडावरील चित्र)

घोड्यांची एवढी महाप्रचंड स्मशानभूमी कशी बनली?

संशोधकांनी बारकाईने हाडांचा अभ्यास केला तेव्हा त्यांना दिसले की, बहुतेक हाडे तुटलेली, फुटलेली, जळून गेलेली होती. स्पष्ट होते की, आदिमानवांमधील बल्लवाचार्यांच्या हातून गेल्यानंतर ही हाडे येथे पडली होती. ही घोड्यांची स्मशानभूमी नव्हती, तर मुदपाकखान्यांमधून टाकून दिलेल्या निरुपयोगी पदार्थांचा महाप्रचंड उकीरडा होता.

असा प्रचंड उकीरडा अवघ्या एका वर्षात साठणे शक्य नव्हते. म्हणजे ह्या जागी माणसे सलग अनेक वर्षे राहिली होती.

पण नेमक्या ह्याच जागी, वाकड्या कड्याखाली, उकीरडा का बनला? आदिकाळातील शिकाऱ्यांनी सपाट मैदानात छावणी न टाकता केवळ योगायोगाने इथे मुक्काम ठोकला होता काय?

कदाचित असे घडले असावे.

घोड्यांचे कळप मैदानात पाहिल्यानंतर, उंच दाट गवतामधून लपतछपत शिकारी सावधपणे त्यांच्यापाशी जात. प्रत्येक शिकाऱ्याच्या हातात काही बरच्या होत्या. पुढचे शिकारी खुणांनी घोड्यांची जागा, घोड्यांची संख्या व घोड्यांच्या जाण्याची दिशा दाखवत.

शिकाऱ्यांची साखळी घोड्यांच्या कळपाभोवती घट्ट घट्ट आवळत जाते. पूर्वी मैदानात ठिपक्यांप्रमाणे भासणारे घोडे आता स्पष्ट दिसत होते. त्यांची डोकी मोठी होती, पाय सडपातळ होते, शरीरांवर खरबरीत लांब केस होते.

घोडे सावध झाले. शत्रूची त्यांना चाहूल लागली व पळून जायला ते सज्ज झाले. पण एव्हाना उशीर झाला होता. बिनपंखांच्या आणि लांब चोचींच्या पक्ष्यांच्या कळपाप्रमाणे त्यांच्या दिशेने बरच्यांचे मेघ कोसळू लागले.

घोड्यांच्या पुठ्ठ्यांवर, पाठींवर, मानांवर बरच्या खुपसल्या जात होत्या. कुठे पळणार? घोड्यांना शत्रूंनी तीन बाजूंनी घेरले होते. ह्या अचानक उभ्या झालेल्या जिवंत भिंतीमधून बाहेर पडण्याचा फक्त एकच मार्ग आहे, एकच दरवाजा आहे. शिकाऱ्यांपासून जीव वाचविण्यासाठी घोड्यांची झुंड मोठमोठ्याने खिंकाळत, टापा आपटत, एकमेव मोकळ्या मार्गाकडे दौडू लागते

पण शिकाऱ्यांना नेमके हेच घडायला हवे आहे. झुंडीला ते एकाच दिशेने पिटाळत नेतात—वर वर उंच कड्याकडे. भीतीने गाळण उडालेले घोडे समोरचे काही न पाहता भरधाव पळत राहतात. शेपट्या फुलारलेल्या आणि पाठी फेसाळलेल्या घोड्यांचा तो धावता कळप एखाद्या जिवंत प्रवाहासारखा भासतो. हा प्रवाह उंच डोंगराकडे धावत असतो. आणि अचानक—तुटलेला कडा. पुढचे घोडे एव्हाना कड्याच्या टोकाला पोहोचले. त्यांना धोका दिसला. नाके फुरफुरत ते मागील पायांवर उंचावतात. पण थांबणे शक्य नाही. त्यांच्या मागचे घोडे दाटी करताहेत, पुढे ढकलताहेत.

आणि जिवंत प्रवाह उंचावरून धबधब्यासारखा खाली कोसळतो व खाली त्याचे रक्ताळलेल्या शरीरांच्या ढिगात रूपांतर होते.

शिकार संपली.


कड्याच्या पायथ्याशी शेकोट्यांमधून धूर निघू लागतो. छावणीत म्हातारे शिकारीची वाटणी करतात. शिकार सर्व टोळीच्या मालकीची आहे. पण सर्वांत चांगले तुकडे अत्यंत धैर्यवान व चपळ शिकाऱ्यांना देण्यात येतात.

नवी माणसे

जेव्हा आपण तास काट्याकडे पाहतो, तेव्हा असे भासते की, तो पुढे सरकतच नाही. पण आणखी एक तास उलटल्यानंतर आपल्या ध्यानात येते की, तास काटा पुढे सरकलाय.

लोकांच्या आयुष्यात असेच घडते. आपल्या भोवताली होणारे व खुद्द आपल्यात होणारे बदल चटकन आपल्या ध्यानात येत नाहीत. इतिहासाचा तास काटा एका जागेवरून हलत नाही असे आपल्याला भासते. आणि काही वर्षांनंतर अचानक आपण पाहतो की, काटा पुढे सरकलाय, आपण स्वतःही बदललोय आणि भोवतालचे सर्व काही बदलून गेलेय.

जुन्या-नव्याची तुलना करण्यासाठी आपल्यापाशी रोजनिशी आहेत, फोटो आहेत, वर्तमानपत्रे व पुस्तके आहेत. तुलनेसाठी आपल्याजवळ साहित्य आहे. पण आपल्या पूर्वजांपाशी तुलना करायला काहीच नव्हते. त्यांना आयुष्य स्थिर भासत होते, न बदलणारे भासत होते. ज्या तबकडीवर आकडे नाहीत अशा तबकडीवर काट्याची हाल-



क्रोमानोन माणसाचे त्याने स्वतःच काढलेले चित्र (प्राचीन हत्तीच्या हाडावरील चित्र)

चाल पाहणे जसे शक्य नाही, त्याप्रमाणे नव्याची जुन्याशी तुलना केल्याविना बदल लक्षात येणे शक्य नाही.

दगडी हत्यारे बनविणाऱ्या प्रत्येक कारागिराने त्याला कारागिरी शिकविणाऱ्याच्या सर्व हालचालींची व रीतींची हुबेहूब नक्कल करण्याचा प्रयत्न केला.

नव्या घराची मांडणी करताना बायका चुलीची अशी मांडणी करीत, जशी त्यांच्या आजी-बाया करत होत्या.



क्रोमानोनचा माणूस आपल्या काळातील माणसांपेक्षा दिसायला वेगळा नाही. क्रीमिआमध्ये सापडलेल्या कवटीच्या आधारे क्रोमानोनचे चित्र

रूढ झालेल्या पद्धतीनुसार शिकारी जनावरांचा पाठलाग करीत होते.

असे असले तरीसुद्धा, लोकांनी स्वतःला नकळत स्वतःची हत्यारे बदलली, घरे बदलली आणि कामही बदलले.

प्रत्येक हत्यार आरंभीच्या काळात जुन्या हत्याराशी अजून खूप साम्य राखणारे होते. पहिली बरची भाल्यापेक्षा फारशी वेगळी नव्हती. पहिला बाण अजून खूपसा बरचीसारखा होता. पण बाण आणि भाला एव्हाना अगदी भिन्न वस्तू होत्या. आणि धनुष्य-बाणाने शिकार करणे, भाल्याने शिकार करण्यापेक्षा अगदी वेगळे होते.

माणसाची केवळ हत्यारे बदलली नाहीत, खुद्द माणूसही बदलला. उत्खनन-स्थळांवर सापडलेल्या सापळयांवरून हे दिसून येते. गुंफेत रहायला गेलेल्या माणसाची हिमयुगाच्या अखेरी गुंफेतून बाहेर पडलेल्या माणसाशी तुलना केली, तर हे दोन लोक अगदी भिन्न होते असे दिसून येते. गुंफेत रहायला गेलेल्या नेअँडरथाल माणसाच्या पाठीला कुबड होते, त्याची चाल अडखळती होती, त्याच्या चेहऱ्यावर कपाळाचा व हनुवटीचा जवळ जवळ पत्ताच नव्हता. आणि गुंफेतून बाहेर पडलेला पिळदार अंगाचा, ताठ चालणारा क्रोमानोन दिसायला आपल्यापेक्षा फारसा वेगळा नव्हता.

घराच्या इतिहासाचे पहिले प्रकरण

माणसाचे आयुष्य ज्या प्रमाणात बदलले, त्याप्रमाणात त्याचे घरही बदलले. जर घराचा इतिहास लिहायचे आपण ठरवले असते, तर गुंफेपासून आपल्याला आरंभ करावा लागला असता. हे घर खुद्द निसर्गाने तयार केले, माणसाने ते बांधले नाही, पण शोधले.

पण निसर्ग फार वाईट बांधकाम करणारा आहे. जेव्हा त्याने डोंगर उभे करून त्यांच्यात गुंफा निर्माण केल्या, तेव्हा त्यांच्यात कुणी रहायला येईल अथवा नाही याबद्दल त्याने फिकीर बाळगली नव्हती. त्यामुळे माणसे जेव्हा स्वतःसाठी रहायला गुंफा शोधू लागली, तेव्हा त्यांच्या गरजा भागवू शकतील अशा जागा क्वचितच त्यांना सापडल्या. कधी छत फार बैठे असायचे, कधी भिंती कोसळायचा धोका असायचा, तर कधी दार एवढे लहान असायचे की हाता-पायांवर सरपटत जाणेसुद्धा अवघड व्हायचे.

घरामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सगळी टोळी कामाला लागायची. गुंफेतील जमीन व भिंती यांना दगडी खरवडण्याच्या हत्यारांनी आणि लाकडी काठचांनी त्यांनी गुळगुळीत व सपाट बनविले. दारापासून जवळच शेकोटीसाठी खड्डा खणला व त्याभोवती दगड रचले, छोटया बाळांसाठी माता काळजीपूर्वक "पाळणे" तयार करीत. पाळणा तयार करण्यासाठी जमिनीत खळगे बनवीत आणि गादीऐवजी शेकोटीतील उबदार राख त्या खळग्यात पसरीत.

गुंफेतील दूरच्या एका कोपऱ्यात अस्वलाचे मांस व इतर वस्तूंचा साठा करण्यासाठी कोठीची खोली बनवीत. अशा रीतीने निसर्गाकडून मिळालेल्या गुंफेचे माणसांनी स्वतःच्या श्रमांमार्फत घरामध्ये रूपांतर केले.

काळाच्या गतीबरोबर माणसांचे घराला सजविण्याचे श्रम वाढत गेले.

कडयाच्या रूपाने त्यांना आयते छप्पर मिळाले, तर त्याभोवती त्यांनी भिंती उभारल्या. जर त्यांना चार भिंतींचा निवारा आढळला, तर त्यांच्यावर त्यांनी छप्पर बांधले.

दक्षिण फ्रान्समध्ये डोंगरात आदिमानवांचे घर अजून टिकून राहिले आहे. स्थानिक रहिवाशांनी ह्या घराला विचित्र नाव दिलेय: "सैतानाची शेकोटी." प्रचंड खडकांपासून बनलेल्या

ह्या निवाऱ्यात फक्त सैतान ऊब घेत बसणे शक्य होते, असे त्यांना वाटले. जर त्यांना स्वतःच्या पूर्वजांचा इतिहास अधिक चांगला माहीत असता, तर समजले असते की, "सैतानाची शेकोटी" सैतानाने बनविलेली नव्हती, तर माणसांच्या हातांनी तयार केलेली होती.


आदिमानव शिकाऱ्यांना येथे केव्हातरी ओठंगणाऱ्या कडयाखाली दोन भिंती आढळल्या होत्या. डोंगरामधून गडगडत खाली कोसळलेल्या दगडांमुळे त्या दोन भिंती बनल्या होत्या. शिकाऱ्यांनी आणखी दोन भिंती बांधल्या व आधीच्या दोन भिंतींना जोडल्या. एक भिंत मोठ्या दगडी फरशांची बांधली व दुसरी झाडांच्या फांद्या विणून, त्यांच्यावर जनावरांच्या कातडी झाकून बनविली. ह्या भिंतीबद्दल आपण फक्त तर्क करू शकतो, कारण काळाने तिला नष्ट केले.

भिंतींभोवती चर खणलेला होता — विस्तीर्ण खळगा. त्याच्या तळाशी गारगोटचांचे कपचे, हाडांची व शिंगांची हत्यारे सापडली.

"सैतानाची शेकोटी" म्हणजे अर्धे घर व अर्धी गुंफा. अस्सल घराची उभारणी इथून आता फार दूर नव्हती.

माणूस जेव्हा दोन भिंती बांधायला शिकला, तेव्हा त्यानंतर चार भिंती उभारणे त्याला फारसे अवघड नव्हते.

आणि गुंफेत नव्हे, ओठंगणाऱ्या कडयाखाली नव्हे, तर उघडया आकाशाखाली पहिली घरे उभी झाली.



आदिमानव स्वतःच्या घराचे असे चित्र काढत

आदिशिकाऱ्यांची घरे

१९२५ साली दॉन नदीवरील गागारोनो खेडयात आन्तोनोव नावाचा शेतकरी घरासमोरच्या अंगणात चिकणमाती खणून काढत होता.

नव्याने बांधलेल्या कोठीला गिलावा देण्यासाठी त्याला चिकणमातीची गरज होती.

त्याचे फावडे जमिनीत गाडल्या गेलेल्या कसल्यातरी हाडांवर आपटत होते.

घराजवळून चालत जाणाऱ्या व्लादीमिरोव मास्तरांपाशी आन्तोनोव तक्रारीच्या सुरात म्हणाला :

"इथं एवढी हाडं कुठून आली! खणायला अडचण होतेय. थोडक्यात फावडं मोडायचं चुकलं..."

मास्तरांऐवजी दुसरं कुणी असता, तर त्याने आन्तोनोवशी आणखी चार गप्पा मारल्या असत्या व पुढे स्वतःची वाट धरली असती.

पण खेड्यातील शाळामास्तर शास्त्राचे भोक्ते होते.

ते अंगणात आले व खड्ड्यातून नुकत्याच खणून काढलेल्या जाड, पिवळसर, अगदी गुळगुळीत दिसणाऱ्या सुळ्याच्या तुकड्याला निरखून पाहू लागले.

स्पष्ट होते की, एवढा प्रचंड सुळा फक्त महाबलाढ्य प्राचीन हत्तीचा असू शकत होता.

दॉनवर प्राचीन हत्ती! फार मोठी आश्चर्याची घटना होती.

मास्तरांनी खड्ड्यातून उकरून काढलेल्या हाडांचा ढीग गोळा केला आणि शेजारच्या शहरातील वस्तुसंग्रहालयात त्या हाडांना ते घेऊन गेले.

असल्या छोट्या वस्तुसंग्रहालयात जाण्याचा तुम्हाला कधी योग आला असेल, तर तुम्हाला माहीत आहे की, अनेक चित्रविचित्र गोष्टी एकमेकींशेजारी उभ्या असतात. एकाच खोलीत संगमरवरी मदनाचा पुतळा असतो आणि १७ व्या शतकातील एखाद्या उमरावाचे तैलचित्र असते.

आणि दुसऱ्या खोलीत स्थानिक खनिजांच्या व वनस्पतींच्या संग्रहापाशी कागदाच्या लगद्यापासून बनविलेली, केसाळ हातात दंडुका घेतलेली पीथेकॅन्थ्रोपची आकृती उभी असते.

गागारीनो खेड्यात सापडलेली हाडे शाळामास्तर अशा वस्तुसंग्रहालयात घेऊन गेले.

प्राचीन हत्तीचा सुळा व इतर हाडे यांची नोंदणीवहीत नोंद करायची आणि खनिजे व पीथेकॅन्थ्रोप यांच्याशेजारीच त्यांना मांडून ठेवायचे, एवढेच वस्तुसंग्रहालयाच्या प्रमुखांचे खरे म्हणजे काम होते.

पण वस्तुसंग्रहालयाचे प्रमुख तेवढ्यावरच थांबले नाहीत. ते तात्काळ टेबलाशी बसले आणि लेनिनग्रादमधील मानुष्यकशास्त्र व मानववंशशास्त्राच्या वस्तुसंग्रहालयाला त्यांनी पत्र लिहिले. नेवा नदीच्या तीरावर एका जुन्या इमारतीत हे वस्तुसंग्रहालय वसलेले आहे. रशियन संशोधकांनी आणि प्रवाशांनी जगाच्या सर्व भागांमधून गोळा केलेल्या वस्तूंचा तेथे फार संपन्न संग्रह आहे.

काही काळ उलटला व पुराणवस्तुशास्त्रज्ञ झाम्यातिन लेनिनग्रादहून गागारीनोला आले. लेनिनग्रादचे संशोधक आणि गागारीनोचे शाळामास्तर, असे दोघे मिळून उत्खनन करू लागले.

असे अनेकदा घडते: स्वतःला सापडलेल्या एखाद्या प्राचीन वस्तूबद्दलची माहिती मास्तर

अथवा शालेय विद्यार्थी शहरात कळवतात. आणि शहरातून संशोधकांना पुढील उत्खनन-कार्यासाठी पाठविण्यात येते.

गागारीनोमध्ये काय सापडले?

उत्खननाच्या पहिल्याच दिवसांमध्ये गारगोटीचे सुरे व खरवडण्याची हत्यारे, हाडाची आरी, भोक पाडलेला ध्रुवीय कोल्ह्याचा दात, शेकोटीच्या कोळशात मिसळलेली प्राचीन हत्तींची व इतर प्राण्यांची हाडे.

गारगोटीची हत्यारे व सुळ्याचे तुकडे केवळ खड्ड्यातच आढळले नाहीत, तर कोठीच्या भिंतीना गिलावा दिलेल्या चिकणमातीतसुद्धा सापडले. असे दिसते, हाडे व दगडी हत्यारे एवढी विपुल होती, की गिलाव्यामधून त्यांना वेगळे काढण्याची तसदी घेण्यात आली नव्हती.

उत्खननाचे काम अनेक महिने चालू होते व अधिकाधिक वस्तू सापडत होत्या. तेथे सापडलेली दगडी हत्यारे, अलंकार, छोटे पुतळे, जनावरांची हाडे वगैरे वस्तू अत्यंत काळजीपूर्वक रीतीने खोक्यांमध्ये भरून लेनिनग्रादला पाठविण्यात आल्या. तेथे वेगवेगळया विषयांमधील तज्ज्ञ मंडळी संशोधनाच्या कामाला लागली.

कोणत्या दगडापासून हत्यारे बनविली होती ते खनिजशास्त्रज्ञांनी निर्णित केले. पाषाणयुगातील अवशेषांचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी सापडलेल्या हाडांचा अभ्यास केला व आदिमानव कोणत्या जनावरांची शिकार करीत हे निर्णित केले. कुशल जीर्णोद्धारकर्त्यांनी काळाच्या ओघात खराब झालेल्या हाडांच्या छोटया पुतळयांना पूर्ववत बनविले.


दरम्यान, स्वतःच्या शास्त्राच्या सर्व नियमांचे पालन करीत, पुराणवस्तुशास्त्रज्ञ उत्खननाचे काम पुढे चालवीत होते. प्राचीन शिकाऱ्यांचे घर त्यांच्यासमोर अधिकाधिक स्पष्ट स्वरूपात उभे राहू लागले.

त्याचा आकार गोल खंदकासारखा होता. भिंतींना बाहेरील बाजूने दगडी लाद्या, प्राचीन हत्तींचे सुळे व जबडयांच्या हाडांनी संरक्षित केले होते. लाकडी खांबांवर जनावरांच्या कातडया झाकून बहुधा भिंती बनविलेल्या होत्या. खांब एकमेकांना वरती मिळाले होते व त्यांचे छप्पर बनले होते. भिंती बळकट व्हाव्यात म्हणून जड दगडी लाद्या व प्राचीन हत्तींची हाडे थेट भिंतींना बाहेरून लगडली होती.

हे घर मोठया तंबूसारखे दिसत होते.

भिंतींपाशी प्राचीन हत्तीच्या सुळयामधून कोरलेल्या स्त्रीच्या दोन छोटया आकृती सापडल्या. एक आकृती खूप लठ्ठ स्त्रीची होती, दुसरी कृश स्त्रीची होती. बहुधा शिल्पकाराने प्रत्यक्षातून हे छोटे पुतळे बनविले असावेत. स्त्रियांच्या अवघड केशरचना काटेकोरपणे कोरलेल्या होत्या.

तंबूच्या मध्यभागी जमिनीवर वर्तुळाकार खळगा होता. त्याचा पेटीसारखा उपयोग केला जात होता. त्यात जपून ठेवलेल्या वस्तू आढळल्या: हाडाची सुई, ध्रुवीय कोल्ह्याच्या सुळ्यांचे मणी, प्राचीन हत्तीची शेपूट.

टॉम्सन नदीवरील इंडियनांचे हिवाळी घर. आदिमानवांच्या घरांच्या रचनेचे त्याच साम्य आढळते

सुईने शिवणकाम करीत, मणी गळयात माळत, पण प्राचीन हत्तीची शेपूट कशासाठी जपून ठेवली होती?

दुसऱ्या ठिकाणी सापडलेल्या आकृतींवरून असे आढळते की, आदिशिकारी अनेकदा स्वतः-च्या अंगांवर जनावरांची कातडी पांघरत, पाठीमागे शेपटी चिकटवत व जनावराचे सोंग आणत. कशासाठी ते असे करायचे? याबाबत आम्ही नंतर बोलू. तूर्तास आदिमानवाच्या घरासंबंधी आपला विषय चाललाय.

गागारीनोमध्ये सापडले तसे तळ रशियात आणखी अनेक ठिकाणी सापडले. वोरोनेझजवळ-च्या एका खेडयात वारंवार एवढया वेळा हाडे सापडली, की त्या खेडयाला कोस्तेन्की (हाडांचे खेडे) असे नाव पडले.

हाडांवरून असा निष्कर्ष निघतो की, कोणे एके काळी तेथे राहणारी माणसे प्राचीन हत्तींची, गुंफांमधल्या सिंहांची व अस्वलांची, घोडयांची शिकार करीत होती.

कोस्तेन्कीमधल्या तळाचे सोविएत पुराणवस्तुशास्त्रज्ञ येफीमेन्को व झाम्यातिन यांनी कसून संशोधन केले.

असे आढळले की, कोस्तेन्कीमध्ये माणसे एकाच खंदकात नव्हे, तर अनेक खंदकांमध्ये रहात होती. ती एकत्रितपणे, आख्खी टोळी मिळून, शिकार करीत. अत्यंत सुबक बनविलेली दगडी व हाडांची हत्यारे तळावर सापडली. हत्तींच्या हाडांपासून बनविलेल्या स्त्रियांच्या आकृतीही तेथे सापडल्या. एका आकृतीवर गोंदण व कातडी मलवस्त्र आढळले. म्हणजे तेव्हा कातडी कमाव-ण्याची कला एव्हाना अवगत झाली होती.

आदिशिकाऱ्यांचे घर आपल्या आत्ताच्या घराशी फारसे साम्य दाखविणारे नाही. बाहेरून त्याचे फक्त छप्पर दिसायचे, छोटया टेकडीची आठवण करून देणारे. "धुराच्या चिमणी" मधून घरात शिरावे लागायचे, कारण ज्यातून धूर बाहेर जायचा असे छपरावरील भोक, एवढा एकच मोकळा मार्ग होता.



हाडाच्या मण्यांची गळ्यातील माळ

मातीच्या भिंतींपाशी बाकड्यांऐवजी प्राचीन हत्तींचे जबडे ठेवलेले होते. धरतीमाताच पलंगाचे काम करीत होती. उशी म्हणून मातीची ढेकळे डोक्यांखाली धरून काटकोनी सपाट भूमीवर माणसे झोपत.

हाडांची बाकडी व जमिनीचे पलंग असलेल्या ह्या घरात टेबले दगडांची होती.

सर्वांत प्रकाशित जागी, शेकोटीपाशी, सपाट दगडी लाद्यांपासून तयार केलेले कामाचे टेबल ठेवले होते. अशा कामाच्या टेबलावर अजूनही उपकरणे सापडतात, दगडांचे व हाडांचे कपचे, अपुऱ्या राहिलेल्या वस्तू सापडतात. तेथे टेबलावर हाडांचे मणी विखुरले होते. काही मण्यांना तर चकाकी केलीय, त्यांना भोके पाडलीत. बाकीच्या मण्यांचे काम अजून पूर्ण झालेले नाही. कारागिराने हाडाच्या सळप्याला अनेक ठिकाणी खाचा पाडल्यात, पण त्यांचे वेगवेगळे मणी बनवायला त्याला सवड मिळाली नव्हती. कामात काहीतरी अडथळा आला व माणसांना घर सोडून जावे लागले. धोका फार मोठा असावा असे दिसते, अन्यथा ही उत्तम बाणांची टोके, छिद्रे असलेल्या हाडांच्या सुया, वेगवेगळ्या कामांसाठी वापरण्याची दगडी हत्यारे त्यांनी अशी टाकून दिली नसती.

ह्या वस्तू घडविणे काही सोपे नव्हते. प्रत्येक वस्तूसाठी कित्येक तासांचे श्रम खर्ची पडले होते. उदाहरणार्थ, हाडाची सुई—मानवजातीच्या इतिहासातील पहिली सुई. दिसायला ही वस्तू अगदी क्षुल्लक भासते, पण ती तयार करण्यासाठी फार मोठ्या कलाकुसरीची गरज लागली होती.

एका तळावर सर्व उपकरणांनी सुसज्ज अशी सुया बनविण्याची कर्मशाळा सापडली. तेथे कच्चा माल पडला होता, अपूर्ण उत्पादनवस्तू पडल्या होत्या. सर्व काही जसेच्या तसे सापडले.


जर कुणाला हाडांच्या सुयांची गरज असती, तर उद्याच उत्पादन सुरू करता आले असते.

पण आत्ता हे काम करू शकतील असे कारागीर धुंडाळणे आपल्याला अशक्य ठरले असते.

सुया अशा बनवत. प्रथम सशाचे हाड दगडी सुऱ्याने कापून सळपा बनवत. मग दगडी कानशीने ह्या सळप्याला घासून धारदार टोक बनवत. मग टोकदार दगडाने त्या टोकाला छिद्र पाडत. शेवटी दगडी लादीवर सुईला घासून चकचकीत करत.

एक सुई बनवायला बघा किती हत्यारे आणि किती श्रम आवश्यक होते!

हाडाच्या सुया आणि त्या बनविण्याची चकती



सुया बनवू शकणारे कुशल कारागीर प्रत्येक टोळीत होतेच असे नाही. हाडाची सुई एक अमूल्य वस्तू मानली जायची.


आदिकाळातील शिकाऱ्यांच्या तळावर एक मिनिटभर नजर टाकू.

हिम पसरलेल्या मैदानात काही टेकाडे दिसत आहेत व त्यांच्यातून धुराच्या रेषा उमटत आहेत. आपण एका टेकाडापाशी येतो व डोळ्यांना चुरचुरणाऱ्या धुराची पर्वा न करता छपरावरील भोकातून घरात घुसतो.


आपण डोक्यावर जादूची टोपी घातलेली आहे, त्यामुळे कुणीही आपल्याला पहात नाही. खंदकात धूर आणि अंधार भरलाय, खूप गोंगाट ऐकू येतोय. इथे किमान दहा मोठी माणसे आहेत आणि त्याहून मुलांची संख्या जास्त आहे.

आपल्या डोळ्यांना जेव्हा धुराची सवय होते, तेव्हा लोकांचे चेहरे व त्यांची शरीरे स्पष्ट दिसू लागतात. ह्या माणसांमध्ये माकडाचा कोणताही अंश उरलेला नाही. ती उंच आहेत, सडपातळ आहेत, बळकट आहेत. त्यांची गालफडे उंच आहेत आणि डोळ्यांची रचना जवळ आहे. त्यांच्या काळपट शरीरांवर लाल रंगाने वेगवेगळ्या आकृती चितारलेल्या आहेत.

जमिनीवर बसून हाडांच्या सुयांच्या साह्याने जनावरांच्या कातडयांची वस्त्रे बनविण्याचे काम बायका करीत आहेत. खेळणी नसल्यामुळे घोडयाचा पाय, हरणाचे शिंग, अशा वस्तू घेऊन मुले खेळताहेत. शेकोटीपासून पायांची मांडी घालून कारागीर बसलाय. बरचीच्या लाकडाला हाडाचे टोक बसविण्याचा त्याचा उद्योग चाललाय. त्याच्या शेजारी दुसरा कारागीर दगडी सुऱ्याने कसलेतरी चित्र कोरतोय.




घोडयाचे चित्र काढल्यावर चित्रकाराने त्यावर काही तंबू चितारले



प्राचीन प्रचंड हत्ती व त्यावर चितारलेले दोन तंबू

अधिक जवळ जाऊ व तो काय कोरतोय ते पाहू.

हाडाच्या पट्टीवर बारीक रेषा ओढून कुरणात चरणाऱ्या घोड्याची आकृती तो कोरतोय. अत्यंत आश्चर्यकारक कलाकुसरीने व चिकाटीने तो घोड्याचे सडपातळ पाय, आखूड आयाळीची ताणलेली मान व मोठे डोके रेखाटतो. घोडा जिवंत भासतो: आत्ता तो पाय पुढे टाकील.



हाडावरील ह्या चित्राचा अर्थ काय?

चित्रकार घोड्याला जणू स्वतःसमोर पाहतोय अशा रीतीने पायाची हालचाल व वळवलेले डोके दिसतात.

चित्र पूर्ण झालेय, पण चित्रकार न थांबता पुढे काम करीत राहतो. एक तिरपी रेषा तो घोड्यावर ओढतो. मग दुसरी रेषा, तिसरी रेषा. त्या घोड्यावर एक विचित्र आकृती निर्माण होते. हा आदिकाळातील कलाकार काय करतोय? आपल्या काळातील चित्रकाराला हेवा वाटला असता अशा त्या चित्राला तो खराब का करतोय?

आकृती अधिक गुंतागुंतीची बनते. आणि अत्यंत चकित नजरेने आपण पाहतो की, घोड्याच्या चित्रावर तंबूचे चित्र उमटते. पहिल्या तंबूशेजारी चित्रकार आणखी दोन तंबू रेखाटतो— संपूर्ण छावणी.

ह्या विचित्र चित्राचा अर्थ काय? कदाचित, चित्रकाराच्या कल्पनेची भरारी, कसलातरी योगायोग?

नाही, आदिमानवांच्या गुंफांमध्ये अशा विचित्र चित्रांचे आख्खे संग्रह आपण गोळा करू शकलो असतो. ह्या प्राचीन हत्तीवर दोन तंबू रेखाटले आहेत; त्या रानगव्यावर तीन तंबू आहेत. हे संपूर्ण दृश्य पहा. चित्राच्या मध्यभागी अर्धवट खाल्लेल्या रानगव्याचा सांगाडा. फक्त डोक्याला, मणक्याला आणि पायांना अद्याप हात लावलेला नाही. महाप्रचंड, दाढीवाले मुंडके पुढच्या पायांमध्ये पडलेय. रानगव्याच्या मुड्याशेजारी माणसांच्या दोन रांगा उभ्या आहेत.

प्राणी, माणसे व घरांच्या आकृत्या कोरलेली अशी अनेक गूढ चित्रे हाडांच्या पट्ट्यांवर,

दगडी लाद्यांवर व कड्यांवर टिकून राहिलीत. पण सर्वांत जास्त गुंफांच्या भिंतींवर ती आढळतात.

मात्र जेव्हा आपण गुंफेत खणत होतो, तेव्हा तिच्या भिंतींवर चित्रे सापडली नाहीत.

त्याचे कारण आपण फक्त गुंफेच्या तोंडाशी होतो, जेथे माणसे खात, झोपत आणि काम करीत. आता गुंफेच्या आत अधिक खोलवर डोकावून पाहू, तिचे कानाकोपरे धुंडाळू, शेकडो मीटर वळसे घेत गेलेले तिचे बोगदे फिरून येऊ.

भूमिगत चित्रसज्जा

सोबत विजेरी घेऊन गुंफेत प्रवेश करू. वाटेत प्रत्येक वळण, प्रत्येक फाटा लक्षात ठेवू. जमिनीखालील वेटोळ्यात वाट हरवणे चांगले नाही.

दगडी बोळकंडी जास्त जास्त अरुंद होत चाललीय. छतावरून पाणी ठिपकतेय. विजेरीचा झोत वरती फेकून लक्षपूर्वक भिंती पाहू.


भूमिगत प्रवाहांनी गुंफेला चमकदार स्फटिकांनी सजवलेय. पण इथे माणसाच्या हाताने काम केलेले नाही.

आपण पुढे जातो. अचानक कुणीतरी ओरडतो : "बघा!"

भिंतीवर काळ्या व तांबड्या रंगात रानगव्याचे चित्र काढलेले आहे. तो पुढील पायांवर पडलाय. त्याच्या कुबड्या पाठीवर बरच्या खुपसलेल्या आहेत.

हजारो वर्षांपूर्वी इथे काम केलेल्या चित्रकाराची कलाकृती पहात आपण खूप वेळ उभे राहतो.

आणखी पुढे थोड्या अंतरावर आपणाला दुसऱ्या चित्राचा शोध लागतो. भिंतीवर कुठला तरी राक्षस नाचतोय : अर्धा माणूस आणि अर्धा पशू. ह्या दाढीवाल्या राक्षसाच्या डोक्यावर लांब वाकडी शिंगे आहेत, पाठीवर कुबड आहे, केसाळ शेपूट



गुंफेतील भिंतीवर चितारलेले रानगवे



हाती धनुष्य घेतलेला हा विचित्र प्राणी कोण: ना जनावर, ना माणूस?

आहे. त्याचे हात व पाय माणसाचे आहेत. त्याच्या हातांमध्ये धनुष्य धरलेले आहे.

खूप लक्षपूर्वक पाहिल्यानंतर आपल्याला दिसते की, रानगव्याची कातडी पांघरलेला हा माणूस आहे.

ह्या चित्रापाठोपाठ दुसरे, तिसरे, चौथे...

हा कसला विचित्र चित्रसज्जा आहे?

आपल्या काळात चित्रकार भरपूर उजेडाच्या रंगशाळांमध्ये काम करतात. वस्तुसंग्रहालयांमध्ये चित्रे आपण अशा तऱ्हेने टांगतो, की त्यांच्यावर भरपूर उजेड पडावा.

माणसांच्या दृष्टीपासून दूर अंधाऱ्या भुयारांमध्ये, चित्रांचे असे प्रदर्शन आदिमानवाने का मांडले असावे?

दुसऱ्या कुणी पहावीत म्हणून त्याने ही चित्रे काढली नव्हती हे स्पष्ट आहे.

पण असे असेल, तर मग कशासाठी आदिचित्रकाराने ही चित्रे काढली? जनावरांचे मुखवटे घालून नाचणाऱ्या, आपल्याला न समजणाऱ्या ह्या आकृतींचा अर्थ काय?

कोडे आणि उकल

"अनेक शिकारी नाचात भाग घेतात. प्रत्येक शिकाऱ्याच्या डोक्यावर रानगव्याच्या डोक्यावरून सोलून काढलेले कातडे पांघरलेले आहे, अथवा शिंगांसह रानगव्याच्या मुंडक्याचा मुखवटा आहे. प्रत्येक तद्देशीयाच्या हातात धनुष्य अथवा भाला आहे. रानगव्याच्या शिकारीचा नाच आहे'.

जेव्हा तद्देशीयांमधला एखादा दमतो, तेव्हा तो पडण्याचा आविर्भाव करतो. मग दुसरा तद्देशीय धनुष्यामधून त्याच्यावर बोथट बाण मारतो. "रानगवा" जखमी झाला. त्याच्या पायांना धरून त्याला नाचाच्या वर्तुळाबाहेर उचलून नेतात, त्याच्यावर सुऱ्यांचे वार केल्याचे आविर्भाव करतात. मग त्याला सोडून देतात व तात्काळ वर्तुळात त्याची जागा रानगव्याचा मुखवटा घातलेला दुसरा घेतो. काही वेळा हा नाच मुळीच खंड न पाडता दोन किंवा तीन आठवड्यांपर्यंत चालतो."

आदिशिकाऱ्यांचा नाच प्रत्यक्ष पाहिलेला साक्षीदार असे वर्णन करतो. पण कुठे पाहिला त्याने हा नाच?

त्याने हा नाच उत्तर अमेरिकेत पाहिला. तेथे राहणाऱ्या रेड इंडियनांच्या टोळ्यांनी प्राचीन शिकाऱ्यांचे काही रिवाज अजून राखून ठेवलेत.

गुंफेच्या भिंतीवर आदिचित्रकाराने रंगवलेल्या शिकाऱ्यांच्या नाचाबद्दलच प्रवाशाच्या टिपणां-मध्ये आपल्याला अनपेक्षितपणे वर्णन वाचायला मिळाले.

आपल्याला पूर्वी न समजलेल्या चित्राचा अर्थ आता उमजला. पण ह्या उकलीमध्येच दुसरे कोडे सामावले आहे. अनेक आठवडेपर्यंत चालणारा कसला हा विचित्र नाच?

आपल्या दृष्टीने नाच म्हणजे मनोरंजन अथवा कला. पण केवळ कलेच्या प्रेमाखातर अथवा मनोरंजनाखातर अगदी खाली कोसळेपर्यंत इंडियन नाचत होते अशी समजूत करून घेणे अवघड आहे. त्यांचा नाच हा नाचापेक्षा एखादा धर्मविधी वाटतो.

चेटक्या स्वतःच्या पाईपमधून ज्या दिशेला धूर सोडतो, त्याच दिशेला काल्पनिक जनावराचा पाठलाग करीत नर्तक जातात. धुराच्या साह्याने चेटक्या नाचाचे संचालन करतो व कधी उत्तरेला, तर कधी पूर्वेला, कधी दक्षिणेला, तर कधी पश्चिमेला लोकांना नाचवतो.

पण जर नाचाचे नेतृत्व चेटक्या करतो, तर तो नाच नव्हे – चेटक्याचा, जादूचा विधी आहे.

स्वतःच्या विचित्र हालचालींनी इंडियन रानगव्यांवर चेटूक करू पाहतात, प्रेअरीमधून मंत्रा-च्या गूढ शक्तीने भारून आणू पाहतात.


गुंफेच्या भिंतीवर चितारलेल्या नाचणाऱ्या माणसाचा हा अर्थ आहे. तो केवळ नर्तक नाही, तर जादूचा विधी करणारा माणूस आहे. आणि जमिनीखाली जाऊन मशालींच्या उजेडात चित्र काढणारा चित्रकार केवळ चित्रकार नाही, तर चेटक्यासुद्धा आहे.

जनावरांचे मुखवटे घातलेल्या शिकाऱ्यांच्या आणि जखमी रानगव्यांच्या चित्रांमार्फत चेटूक करून तो शिकारीच्या यशाची हमी मिळवू पाहतो.

आणि नाच निश्चितपणे शिकारीला यश मिळवून देईल अशी त्याची ठाम श्रद्धा आहे.

आपल्याला हे जंगली व निरर्थक भासते.

घराची बांधणी सुरू करताना, पाथरवटांच्या आणि सुतारांच्या हालचालींची नक्कल करीत आपण नाचत नाही. शिकारीपूर्वी हातात बंदूक घेऊन आपण नाचत नाही. पण आपल्याला जी गोष्ट मूर्खपणाची वाटते, ती आपल्या पूर्वजांना अत्यंत गंभीर वाटायची.



गील्याकोवांचा "अस्वल-सण". अस्वलाच्या मुसकटापाशी बळी ठेवलाय — काही मासे

गूढ चित्रांपैकी एकाचे कोडे आपण सोडविले. गुंफेच्या भिंतीवर नाचणारा माणूस का चितारला होता हे आपल्याला समजले.

पण तशीच बुचकळ्यात पाडणारी दुसरी चित्रेही आपण पाहिलीत.

तुम्हाला आठवते, हाडाच्या चकतीवर संपूर्ण कथा कोरलेली गुंफेत आपल्याला सापडली होती. चकतीच्या मध्यभागी रानगव्याचा सांगाडा व भोवती शिकारी. रानगव्याचे डोके व पुढचे पाय तेवढे खायचे उरलेले होते.

ह्या चित्राचा अर्थ काय?

ह्या कोड्याची उकल करण्यासाठी ह्यावेळी अमेरिकेत नव्हे, तर रशियाच्या उत्तरसीमेकडे गेले पाहिजे.

सैबेरियात काही जागा आहेत जेथे ह्या शतकाच्या आरंभापर्यंत अस्वलाच्या शिकारीनंतर "अस्वलाचा सण" साजरा करायची चाल होती. ठार मारलेल्या अस्वलाला घरी आणत व

मोठ्या समारंभपूर्वक मानाच्या जागी त्याची स्थापना करत. अस्वलाचे मुंडके त्याच्या पंजांमध्ये ठेवत. पावापासून अगर भोजाच्या सालीपासून बनवलेल्या हरणांच्या काही आकृती मुंडक्यासमोर ठेवत. हा अस्वलासमोर दिलेला बळी होता. अस्वलाचे तोंड भोजाच्या सालीच्या सुरळ्यांनी शृंगारत, अस्वलाच्या डोळ्यांवर चांदीची नाणी ठेवत. मग अस्वलापाशी शिकारी जात व त्याच्या तोंडाचे चुंबन घेत.

हा सणाचा केवळ आरंभ होता. मग तो उत्सव अनेक दिवस, अथवा अधिक बरोबर सांगायचे तर अनेक रात्रींपर्यंत चालायचा. रोज रात्री अस्वलाच्या धुडापाशी जमून माणसे गाणी म्हणत व नाचत. भोजाच्या सालींचे आणि लाकडी मुखवटे चढवून शिकारी अस्वलापाशी येत, त्याला लवून मुजरा करत आणि नंतर अस्वलाच्या बेंगरूळ चालण्याची नक्कल करत नाचत.

गाणी व नाच झाल्यानंतर खाण्याचा उद्योग सुरू व्हायचा. अस्वलाचे मांस खात, पण त्याच्या मुंडक्याला व पुढच्या पायांना स्पर्श करीत नसत.

हाडाच्या चकतीवरील चित्राचा अर्थ आता आपल्याला उमजला. तो "रानगव्याचा सण" आहे. रानगव्याभोवती जमलेली माणसे मांस मिळाल्याबद्दल रानगव्याचे आभार मानत आहेत व पुढील वेळी त्याने तसेच उदार वागावे अशी त्याची प्रार्थना करत आहेत.

जर आपण इंडियनांकडे परत गेलो असतो, तर आपल्याला त्यांच्याही शिकारी-उत्सवांचा शोध लागला असता.

इंडियनांच्या गूइचोलोव टोळीचे शिकारी ठार मारलेल्या हरणाचे मागील पाय नेहमी पूर्वेला राहतील अशा रीतीने धूड ठेवतात. हरणाच्या तोंडासमोर वेगवेगळ्या खाद्यांनी भरलेले भांडे ठेवतात. शिकारी रांगेने हरणापाशी येतात, उजव्या हाताने त्याला तोंडापासून शेपटीपर्यंत गोंजारतात, त्याने स्वतःला ठार मारू दिले म्हणून त्याचे आभार मानतात.

"आराम कर, मोठ्या बंधू!" त्या ठार झालेल्या जनावराला उद्देशून ते म्हणतात.

चेटक्या त्या जनावराला उद्देशून बोलतो:

"तुझी शिंगं तू आमच्यापाशी घेऊन आलास, म्हणून आम्ही तुझे आभार मानतो!"

प्रकरण सातवे

"तिथे चमत्कार : तिथे पिशाच भटकते..."

आपण सगळ्यांनी लहानपणी परीकथा वाचलेल्या आहेत. त्या कथांमध्ये प्राण्यांचे माणसांमध्ये रूपांतर घडते, माणसांचे त्यांच्या इच्छेनुसार प्राण्यांमध्ये रूपांतर घडते.

जर परीकथांवर विश्वास ठेवला, तर सबंध जग गूढ प्राण्यांनी भरलेले आहे — प्रेमळ आणि दुष्ट, दृश्य आणि अदृश्य. कुणा चेटक्याचा अथवा दुष्ट जादूगाराचा आपल्यावर कोप घडू नये म्हणून ह्या जगात सतत दक्ष रहावे लागते.

इथे स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास ठेवून चालत नाही : अत्यंत कुरूप बेडकी क्षणार्धात सुंदर तरुणी बनते, तर प्रेमळ तरुणाचे सर्पराक्षसात रूपांतर घडते. इथे सर्व काही इथल्या खास नियमांनुसार चालते : मृत जिवंत बनतात, तोडलेली मुंडकी बोलतात, बुडालेली माणसे मच्छीमारांना पाण्याकडे आकर्षित करतात.

पूष्कीनच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे :

तिथे चमत्कार : तिथे पिशाच भटकते,
जलपरी झाडाच्या फांदीवर बसते...

जोपर्यंत आपण परीकथा वाचत असतो, तोपर्यंत ह्या सगळ्या गोष्टींवर विश्वास ठेवतो. पण ज्या क्षणी पुस्तक मिटतो, त्या क्षणी वास्तव जगात परत येतो. ह्या वास्तव जगात चेटक्या नाहीत, जादूगार नाहीत, इथे सर्व गोष्टींची शहानिशा करता येते, त्यांचा खुलासा करता येतो. कथा कितीही मनोरंजक असली, तरी त्या परीकथेच्या जगात राहण्याची इच्छा होणे आपल्याला शक्य नाही. त्या जगात विवेक दुबळा ठरतो आणि लांडगारूपी माणसाच्या अथवा चेटकीच्या पहिल्याच भेटीत मरू नये म्हणून झारपुत्र इवानप्रमाणे नशीबवान जन्म घेणे आवश्यक असते.

पण आपल्या पूर्वजांना नेमके असेच जग वाटत होते. अद्भुत आणि वास्तव जगांमधील भेद त्यांना दिसत नव्हता. सर्व सुष्ट-दुष्ट घटना जगाचा कारभार हाकणाऱ्या अदृश्य शक्तींमार्फत घडतात, असे त्यांना भासायचे.

जेव्हा आपण दगडाला ठेचकाळून पडतो, तेव्हा स्वतःच्या बेसावधपणाबद्दल स्वतःला बोल लावतो.



नव्या पोमेरानीयामध्ये मांत्रिक नाच

पण आदिमानवाने ह्याचा ठपका स्वतःवर न ठेवता, रस्त्यावर दगड ठेवून देणाऱ्या दुष्ट पिशाचावर ठेवला असता.

कटयारीच्या घावामुळे माणूस जेव्हा मरतो, तेव्हा आपण म्हणतो: कटयारीच्या घावामुळे माणूस मेला.

पण आदिमानव उलट म्हणाला असता: माणूस मेला, कारण त्याच्यावर आघात करणारी कटयार चेटूकाने भारलेली होती.

अर्थात, अजूनही अशी काही माणसे आहेत, जी विश्वास ठेवतात की, "वाईट नजरे" मुळे आजार येतो, सोमवारी कोणत्याही नव्या कामाला आरंभ न करणे चांगले, रस्त्यावरून आडवा धावलेला ससा संकट आणतो.

अशा माणसांना आपण हसतो. आपल्या काळात अशी भाबडी श्रद्धा ठेवणे अक्षम्य आहे;

कारण जेथे ज्ञान नाही, तेथे अदृश्य शक्तीवर विश्वास बसतो. कोळयाप्रमाणे अज्ञान अंधाऱ्या कोपऱ्यात जाळी विणते.

पण चेटक्यांवर आणि पिशाचांवर विश्वास ठेवणाऱ्या आपल्या पूर्वजांना आपण हसू नये. भोवताली घडणाऱ्या सर्व गोष्टींचा अर्थ लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण योग्य खुलासा करण्यास त्यांचे ज्ञान फार अपुरे होते.

काही ऑस्ट्रेलियन रानटी टोळ्या अगदी परवा परवापर्यंत अशा स्थितीत वावरत होत्या.

विसाव्या शतकाच्या आरंभी एका प्रवाशाने म्हटले होते: "किनारपट्टीचे सगळे लोक नव्या प्रकारचे शिडाचे जहाज अथवा इतर आगबोटींपेक्षा जास्त बंबांची नळकांडी असलेली आगबोट पाहताच उत्तेजित होतात. ओला न होणारा रेनकोट, विचित्र टोपी, डोलती आरामखुर्ची, पूर्वी न पाहिलेले एखादे उपकरण, अशा वस्तू तद्देशीय माणसांच्या मनात संशय निर्माण करतात."

नेहमीपेक्षा कोणतीही वेगळी वस्तू ह्या लोकांना चेटूकाने भारलेली भासायची.

अनुभव त्यांना सांगतो की, जगातील सर्व वस्तू एकमेकींशी संबंधित आहेत. पण हा संबंध कशामुळे आहे ह्याची माहिती नसल्यामुळे, काही वस्तूंचा दुसऱ्या वस्तूंवर जादूचा परिणाम असतो ह्यावर ते लोक विश्वास ठेवतात.

स्वतःवर मंत्रशक्तीचा प्रभाव पडू नये म्हणून एखादा ताईत वापरला पाहिजे अशी त्यांची समजूत असते. मग सुसरीच्या दातांची माळ, अथवा हत्तीच्या शेपटाच्या टोकाशी वाढणाऱ्या केसांचे कंकण, अशा वस्तू ते अंगावर घालतात. जो माणूस ताईत वापरतो, त्याचे सर्व संकटां-पासून ताईत रक्षण करतो.

बहुधा आदिमानवांचा जादूटोण्यावर, चेटूक-मंत्रांवर, असाच विश्वास होता. उत्खनन-स्थळी सापडणारे ताईत ह्याबद्दल सांगतात, गुंफांच्या खोलवर रेखाटलेली जादूची चित्रे हेच सांगतात.

आपल्या पूर्वजांची जगाबद्दल काय कल्पना होती

ज्या जगाचे नियम माहीत नाहीत अशा जगात जगणे माणसाला फार अवघड जात होते. अदृश्य शक्तीच्या साम्राज्यात त्याला दुबळे व असहाय वाटायचे. त्याच्या समजुतीप्रमाणे प्रत्येक वस्तू ताईत भासायची, प्रत्येक माणूस चेटक्या भासायचा. मेलेल्या माणसांची सूडवादी, अशांत पिशाचे सर्वत्र वावरत होती, जिवंत माणसांवर झडप घालत होती, अशी त्याची धारणा होती. शिकारीत ठार केलेले प्रत्येक जनावर परत येऊन शिकाऱ्याचा सूड घेईल, अशी शक्यता त्याला वाटत होती. संकटांना टाळण्यासाठी पिशाचांची सतत मनधरणी करणे, प्रार्थना करणे, याचना करणे आवश्यक होते, त्यांना भेटवस्तू द्यायला पाहिजे होत्या, त्यांना शांत करायला हवे होते

अज्ञानातून भीती जन्मते. आणि माणसाला ज्ञान नव्हते, त्यामुळे जगात तो मालकासारखा वावरायचा नाही, तर भ्यायलेला, दीनवाणा याचक म्हणून वावरायचा.



शिकार यशस्वी व्हावी अशी लाप्लान्द पूर्वजांपाशी प्रार्थना करताहेत (१७ व्या शतकातील कोरीव चित्र)


निसर्गाचा स्वामी म्हणून स्वतःला समजणे त्याच्या दृष्टीने अद्याप लौकर होते. जगातील सर्व प्राण्यांमध्ये तो सर्वांत सामर्थ्यवान ठरला होता, प्राचीन प्रचंड हत्तींवर त्याने जय मिळवला होता, पण निसर्गाच्या बलिष्ठ शक्तींच्या तुलनेने अद्याप तो दुबळा प्राणी होता, त्या शक्तींवर वर्चस्व गाजविण्याची कला अद्याप त्याला अवगत नव्हती.


एक शिकार अयशस्वी झाली, तर त्याला अनेक आठवडे उपास घडायचा. एका हिमवावटळीत सबंध शिकारी छावणी बर्फात गाडली जायची.

लढा द्यायला व हळूहळू, एकेका पावलाने, निसर्गावर स्वामित्व मिळविण्यासाठी पुढे जायला, माणसाला कशापायी सामर्थ्य लाभले?

तो एकटा नव्हता, म्हणून त्याला हे सामर्थ्य लाभले.

माणसांचा सर्व समाज, त्यांची संपूर्ण टोळी, निसर्गातील वैरी शक्तींशी झुंजत होती. त्यांचा सर्व समाज काम करत होता व श्रमांमध्ये त्यांनी अनुभव गोळा केला, ज्ञानाचा संचय केला.





"जादूची काठी". शिकारी एस्कीमोंचा ताईत

एवढे खरे, खुद्द त्यांना हे नीटसे समजत नव्हते, किंवा अधिक बरोबर सांगायचे, तर स्वतः-च्या कुवतीप्रमाणे समजून घेत होते.

मानवी समाज म्हणजे काय, त्यांना माहीत नव्हता. पण त्यांना जाणवायचे, की ते एकमे-कांशी निगडित होते, एका टोळीतील माणसे म्हणजे एकच, फार मोठा, अनेक हात असलेला माणूस होता.

त्यांना एकत्र कशामुळे बांधले होते? त्यांना रक्ताच्या नात्याने जोडले होते. माणसे कुटुंबात रहात होती: मुले मातांबरोबर रहात, ह्या मुलांना पुढे मुले होत व ती भावा-बहिणींबरोबर, काका-मावशांबरोबर, माता व आजींबरोबर रहात होती.

कुटुंब असे वाढत गेले.

आदिशिकाऱ्याचा समाज म्हणजे सामायिक पूर्वजांमधून निर्माण झालेले कुटुंब. माणसे पूर्णपणे पूर्वजांना देणे लागत होती. पूर्वजांनी माणसांना शिकार करायला व हत्यारे बनवायला शिकवले, पूर्वजांनी त्यांना घर व अग्नी दिले.

काम करणे, शिकार करणे – म्हणजे पूर्वजांची इच्छा पूर्ण करणे. जो पूर्वजांचे ऐकतो, त्याचे संकटापासून व धोक्यापासून रक्षण होते. पूर्वज स्वतःच्या वंशजांबरोबर राहतात, शिकारीच्या वेळी व घरात ते अदृश्यपणे वावरतात. त्यांना सर्व दिसते व सगळे माहीत असते. वाईट वागल्यास ते शासन करतात व चांगले वागल्यास बक्षिस देतात.

अशा रीतीने सामायिक उपभोगासाठी



गुंफेतील जादूटोण्याचे चित्र: हार्पून खुप-सलेला रानगवा

सामायिक श्रम म्हणजे आदिमानवाच्या दृष्टीने केवळ सामायिक पूर्वजांचे आज्ञापालन करणे होते, त्यांच्या इच्छा पूर्ण करणे होते.

आणि श्रमाबद्दल आपली जी कल्पना आहे, तशी आदिमानवाची मुळीच कल्पना नाही.

आपल्या समजुतीप्रमाणे, रानगव्यांची शिकार शिकाऱ्याचे पोषण करत होती. पण आदिशिकारी समजायचा की, त्याला रानगवा खाऊ घालत होता. ह्या जुन्या आठवणीला स्मरून आपणसुद्धा अजून म्हणतो – अन्नपूर्णा गाय, धरती माता. वस्तुतः गायीची संमती न घेता आपण तिचे दूध काढतो. पण बोलतो मात्र, गाय आम्हाला दूध "देते."


रानगवा, प्राचीन प्रचंड हत्ती, हरीण, ही जनावरे आदिशिकाऱ्याची "अन्नदाते" होती. शिकाऱ्याच्या समजुतीनुसार, तो जनावराला ठार मारत नव्हता, तर जनावर स्वतःच त्याला स्वतःचे मांस व स्वतःची कातडी भेट देत होते. इंडियनांची श्रद्धा आहे की, जनावराच्या इच्छेविरुद्ध जनावराला ठार मारायचे नाही. जर रानगवा ठार झाला, तर त्याचे एकमेव कारण म्हणजे, लोकांसाठी त्याने स्वतःचा बळी दिला, ठार करून घ्यायची त्याची इच्छा होती.

रानगवा हा टोळीचा अन्नदाता व रक्षक होता. पण त्याचवेळी, सामायिक पूर्वजाला टोळीचा रक्षक मानले जात होते.

अशा रीतीने, जगाचे अजून अंधुक आकलन घडलेल्या डोक्यात, पूर्वज-रक्षक आणि टोळीला खाऊ घालणारे जनावर-रक्षक, अशा दोन्ही कल्पना एकत्र मिसळायच्या.

"आम्ही – रानगव्याची मुले," शिकारी म्हणतात. आणि त्यांचा खरोखरीच विश्वास आहे की, रानगवा त्यांचा पूर्वज होता. जेव्हा आदिचित्रकार रानगवा चितारतो व त्यावर तीन तंबू रेखाटतो, तेव्हा त्याचा अर्थ, "रानगव्याच्या मुलांची छावणी."

माणूस स्वतःच्या श्रमात जनावराशी संबंधित आहे. पण रक्ताच्या नात्याविना तो संबंध समजत नाही. जेव्हा तो जनावराला ठार करतो, तेव्हा तो जनावराची क्षमा मागतो, त्या



ह्या प्रत्येक इंडियनाच्या डोक्यावर त्याच्या टोळीचे चिन्ह गोंदले होते

जनावराला स्वतःचा मोठा भाऊ म्हणतो. स्वतःच्या धार्मिक विधींमध्ये, नाचांमध्ये, जनावराशी साम्य साधण्याचा तो प्रयत्न करतो. स्वतःच्या मोठ्या भावाशी साम्य साधू पाहतो, त्याची कातडी अंगावर घालतो, त्याच्या हालचालींची नक्कल करतो.

माणूस अजून स्वतःला "मी" म्हणत नाही. तो स्वतःला टोळीचा एक भाग मानतो, एक हत्यार मानतो . प्रत्येक टोळीला स्वतःचे नाव आहे, वंशचिन्ह आहे. हे नाव जनावराचे— पूर्वजाचे आणि रक्षणकर्त्याचे. एका टोळीला "रानगवा" म्हणतात, दुसरीला "अस्वल", तिसरीला—"हरीण" माणसे स्वतःच्या वंशासाठी प्राण द्यायला तयार आहेत. टोळीचे रिवाज त्यांच्या दृष्टीने वंशचिन्हाच्या आज्ञा मानल्या जातात आणि वंशचिन्हाच्या आज्ञा म्हणजे त्यांचा कायदा.

पूर्वजांशी संभाषण

आणखी एकदा आदिमानवाच्या गुंफेत जाऊ, त्याच्याबरोबर शेकोटीपाशी बसू व त्याच्या धार्मिक श्रद्धांबद्दल आणि चालीरीतींबद्दल त्याच्याशी बोलू.

खुद्द त्यालाच सांगू दे, आपले तर्क बरोबर आहेत अथवा नाहीत, गुंफांच्या भिंतींवर आणि हाडांच्या व शिंगांच्या ताईतांवर त्याने मुद्दाम आपल्यासाठी मागे ठेवलेल्या चित्रांचा अचूक अर्थ आपण ओळखला अथवा नाही.

गुंफेच्या मालकाला बोलता कसा करायचा?

शेकोटीमधील राख फार पूर्वीच वाऱ्याने उडवून लावलीय. कधी काळी आगीपाशी बसून गारगोटीची व शिंगांची हत्यारे बनविणाऱ्या, जनावरांच्या कातडीपासून वस्त्रे शिवणाऱ्या माणसांची हाडे केव्हाच धुळीत मिसळून गेलीत. अगदी क्वचित जमिनीखाली पिवळट, सुकून गेलेली एखादी कवटी आढळते. त्या कवटीला बोलती करण्यासाठी काय केले पाहिजे?

गुंफेत जेव्हा आपण उत्खनन केले, तेव्हा आपण हत्यारांचे तुकडे व कपचे गोळा केले होते. माणूस त्या हत्यारांच्या मदतीने कसा काम करत होता हे जाणून घेण्यासाठी.

पण प्राचीन बोलींचे अवशेष आणि तुकडे कुठे शोधायचे?

आज अस्तित्वात असणाऱ्या भाषांमध्ये त्यांना शोधले पाहिजे.

अशा उत्खननासाठी फावड्याची गरज नाही. इथे जमिनीत नव्हे, तर शब्दकोशात खणले पाहिजे. प्रत्येक शब्दकोश, प्रत्येक भाषा, स्वतःमध्ये भूतकाळाच्या अमूल्य अवशेषांचे जतन करते. आणि तसेच असले पाहिजे. कारण शेकडो आणि हजारो पिढ्यांचा अनुभव आपल्यापर्यंत भाषेमार्फत येऊन पोहोचलाय.

भाषेचा अभ्यास करणे, तिचे संशोधन करणे अगदी साधा मामला आहे असे भासते: टेबलापाशी बैस आणि शब्दकोशाची उलट पाने!

पण प्रत्यक्षात तेवढे सोपे नाही.

प्राचीन शब्दांच्या शोधासाठी संशोधकांना दूरदूरचे प्रवास करावे लागतात, पर्वत ओलांडावे लागतात, महासागर पार करावे लागतात. दुसऱ्या भाषांमध्ये शिल्लक न राहिलेले काही अति-प्राचीन शब्द कधी कधी एखाद्या डोंगराआड राहणाऱ्या माणसांच्या अगदी छोट्या जमातीत आढळतात.

प्रत्येक भाषा म्हणजे अक्षरशः मानवतेच्या वाटेवरचा एक तळ. ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, अमेरिका येथील शिकारी टोळ्यांची भाषा—हे तळ आपण फार पूर्वीच ओलांडून गेलोय. पण आपण विसरून गेलेल्या प्राचीन शब्दांना आणि अभिव्यक्तींना शोधण्यासाठी पोलीनेशियाच्या आसपास संशोधक महासागर ओलांडून जातात.

शब्दांच्या शोधार्थ संशोधक दक्षिणेतील वाळवंटे तुडवतात आणि उत्तरेचा तुंद्रा प्रदेश पालथा घालतात.

ज्यावेळी वैयक्तिक मालकीची भावना नव्हती, "माझी बंदूक," "माझे घर", म्हणजे काय हे जेव्हा लोकांना माहीत नव्हते, अशा काळातील शब्द उत्तर सीमाप्रदेशातील लोकांच्या भाषेत अजून राहिले आहेत.

पुराणवस्तुशास्त्रज्ञ तळांवरील घरांचे व हत्यारांचे अवशेष जसे खणून काढतात, तसे प्राचीन बोलींचे अवशेष ह्या भाषांमधून आपण खणून काढले पाहिजेत.

अर्थात, शब्दकोशाचा पुराणवस्तुशास्त्रज्ञ बनणे प्रत्येकाला शक्य नाही.

पूर्वतयारीशिवाय, ज्ञानाशिवाय, इथे जमणार नाही. कारण वस्तुसंग्रहालयात वस्तू जतन होतात, त्याप्रमाणे जुने शब्द भाषेत जतन होत नाहीत. अनेक शतकांच्या अवधीत शब्द अनेकदा बदलले. ते एका भाषेतून दुसऱ्या भाषेत गेले, ते एकमेकांमध्ये मिसळून गेले, त्यांचे प्रारंभ आणि अंत बदलले. काही वेळा, एखाद्या जळून गेलेल्या झाडाप्रमाणे, शब्दाचे फक्त जुने मूळ शिल्लक राहिले. फक्त त्या मूळावरून शब्दाचा उगम ओळखता येतो.

हजारो वर्षांच्या अवधीत फक्त शब्दाचे रूपच बदलले नाही, तर त्याचा अर्थही बदलला. जुन्या शब्दाला नवा अर्थ लाभल्याचे वारंवार घडले.

आत्तासुद्धा तसेच घडते. जेव्हा नवी वस्तू अवतरते, तेव्हा तिच्यासाठी आपण नेहमीच नवा शब्द शोधून काढतो असे नाही. आपल्या जुन्या शब्दभांडारातून आपण एखादा शब्द घेतो व त्या नव्या वस्तूला लेबलाप्रमाणे चिकटवून टाकतो.

असले बदल अगदी अलीकडे घडलेले आहेत, भाषेच्या वरच्या थरामधील आहेत. म्हणूनच ह्या सर्व शब्दांचे जुने अर्थ आपल्याला सहज सापडले.

पण अधिक खोलात गेल्यास मामला जास्त अवघड बनतो. शब्दामधील हरवलेला प्राचीन अर्थ शोधून काढण्यासाठी भाषेच्या इतिहासाचे सखोल ज्ञान असावे लागते.

काही भाषांमध्ये सिंहाला "मोठा कुत्रा" व कोल्ह्याला "छोटा कुत्रा" म्हणतात. त्याचे कारण, "सिंह" आणि "कोल्हा" ह्या शब्दांआधी "कुत्रा" शब्द अवतरला होता.

प्राचीन बोलीचे तुकडे

अकादमीशिअन इ. इ. मेश्चानीनोव यांनी त्यांच्या एका पुस्तकात सांगितलेय की, यूकागोरांच्या भाषेत असा एक शब्द आहे, ज्याचा शब्दशः अनुवाद "माणूसहरीणहत्या" असा होतो. असा लांबलचक शब्द उच्चारायला कठीण आणि त्याचा अर्थ समजून घेणे त्याहून कठीण.


इथे कुणी कुणाची हत्या केली हे समजणे अवघड आहे. माणसाने हरीणाची, अथवा हरीणाने माणसाची, किंवा त्या दोघांनी मिळून तिसऱ्या कुणाची हत्या केली, अथवा तिसऱ्या कुणी माणसाची व हरीणाची हत्या केली.

पण यूकागीरला हा शब्द समजतो. "माणसाने हरीणाला ठार मारले" असे सांगायला तो हा शब्द वापरतो.

पण असा विचित्र शब्द कसा निर्माण झाला?


हा शब्द ज्या काळात निर्माण झाला, त्या काळात माणूस अद्याप स्वतःला "मी" म्हणत नव्हता; तो स्वतः काम करत होता, शिकार करत होता, हरीणाचा पाठलाग करून त्याला ठार मारत होता, ह्याची त्याला अद्याप जाणीव नव्हती. त्याला वाटायचे की, त्याने स्वतः हरीणाला ठार केले नव्हते, तर सबंध टोळीने ठार केले होते आणि त्याच्या टोळीनेसुद्धा नव्हे, तर जगाचा कारभार हाकणाऱ्या त्या गूढ, अदृश्य शक्तीने ठार केले होते. माणूस अजून स्वतःला निसर्गासमोर खूप दुबळा समजत होता, असहाय समजत होता. निसर्ग त्याचे ऐकत नव्हता.

आज कुठल्यातरी अनाकलनीय शक्तीच्या इच्छेनुसार "माणूसहरीणहत्या" छान घडली, उद्या शिकार अपयशी ठरली व माणसे रिकाम्या हातांनी घरी परतली. "माणूसहरीणहत्या" ह्या शब्दात कृती करणारी व्यक्ती नाही. आणि निश्चित कृती कुणाची, स्वतःची अथवा हरीणाची, हे आदिमानवाला कसे समजणार? कारण त्याची समजूत होती की, त्याच्या अदृश्य रक्षणकर्त्याने —



"माणूसहरीणहत्या" (आदिचित्रकाराने काढलेले चित्र)

चोचीतून वीज चमकवत उडणारा ग्रोम (गड-गडाट) नावाचा गूढ पक्षी. (डाकोटा-मधील इंडियनांच्या टोळीमधील चित्र)



हरीणाच्या आणि त्याच्या अशा दोघांच्या समान पूर्वजाने – त्याला हरीण दिले होते.

जर आपण आपल्या उत्खननांमध्ये बोलींच्या अतिप्राचीन थरांपासून नंतरच्या थरांपर्यंत गेलो, तर माणूस स्वतःला गूढ शक्तीच्या हातचे बाहुले समजत होता त्या काळातील बोलींचे अवशेष आपल्याला दीर्घ वेळपर्यंत आढळत राहतील.

चूकचींच्या भाषेतील हे वाक्य पहा: "माणसामार्फत मांस त्याच्या कुत्र्याला देते."

आपल्याला हे वाक्य समजत नाही. माणूस जेव्हा आपल्यासारखा विचार करत नव्हता, तेव्हाच्या प्राचीन काळात भाषेत बसलेल्या बोलीच्या थरातून आपण हे वाक्य खणून काढलेय.

"माणूस कुत्र्याला मांस देतो" असे म्हणण्याऐवजी तेव्हा बोलत: "माणसामार्फत मांस त्याच्या कुत्र्याला देते." "माणसामार्फत" मांस कोण देतो?

माणसाला हत्यारासारखी वापरणारी कुणी गूढ शक्ती.

डाकोटातील इंडियन "मी विणतो" असे म्हणण्याऐवजी "माझ्यामार्फत विणकाम" म्हणतो.

युरोपीय भाषांमध्येही प्राचीन बोलींचे अवशेष उरले आहेत.

फ्रेंच माणूस म्हणतो: «Il fait froid» म्हणजे "थंडी वाजते". पण शब्दशः अनुवाद असा होतो: "तो थंडी करतो." परत एकदा "तो" – जगाचा कारभार हाकणारा.

रशियन भाषेतही प्राचीन बोलींचे अवशेष, म्हणजेच प्राचीन विचार, सापडतात.

आम्ही म्हणतो: "त्याला विद्युत्घाताने मारले." कुणी मारले? "त्या" गूढ शक्तीने.

अथवा, "तो गारठला", "तो तापाने फणफणला". माणसाला गारठवून टाकणारी आणि त्याला तापाने फणफणून टाकण्यात आनंद मानणारी ही व्यक्ती कोण?

तीच अदृश्य, गूढ "शक्ती". "पहाटले", "उजाडतेय", "गोठवतेय" ह्या शब्दांमागे हीच शक्ती वास करते.

आपण कोणत्याही गूढ शक्तींवर विश्वास ठेवत नाही, पण त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्राचीन लोकांच्या भाषेतील अवशेष अजून आपल्या भाषेत शिल्लक आहेत.

अशा रीतीने बोलींचे थर खणताना, आपल्याला आदिमानवांचे केवळ शब्दच भेटले नाहीत, तर त्यांचे विचारही भेटले. आदिमानव एका गूढ, अबोध जगात रहात होता. तेथे तो काम करत नव्हता आणि शिकार करत नव्हता, तर **त्यांच्यामार्फत** कुणीतरी काम करत होता, **त्यांच्यामार्फत**



जादूच्या खुणांनी चितारलेल्या महान पिशाचाच्या गौरवार्थ गाणे (ओद्झीब्वेयच्या इंडियनांच्या टोळीमधील चित्र)

कुणी हरणांना ठार मारत होता, तेथे सर्व काही अदृश्याच्या इच्छेने चालत होते.

पण काळ उलटला. माणूस जसा जास्त सामर्थ्यवान बनत गेला, तसे त्याला जगाचे व जगातील स्वतःच्या स्थानाचे अधिक स्पष्ट आकलन होत गेले. भाषेत "मी" आला; कृती करणारा, लढणारा, वस्तू आणि निसर्गाला स्वतःच्या इच्छेप्रमाणे राबविणारा माणूस आला.

"माणसामार्फत हरीण मारले" असे आता आपण म्हणत नाही, तर म्हणतो: "माणसाने हरीण मारले." पण तरीसुद्धा आपल्या भाषेत भूतकाळाची छाया डोकावते. अजूनही आपण म्हणतो: "तसे घडायचे नव्हते," "प्रारब्धात होते," "नशीबात नव्हते."

कोण घडवत नाही? कुणी नशीब ठरवले?

नशीबाने!

हे नशीब "अदृश्य" होते. त्यालाच आदिमानव थरकाप घाबरायचा.

"नशीब" हा शब्द अजून आपल्या भाषेत असला, तरी भावी काळात तो नाहीसा होईल

आपला शेतकरी वाढत्या विश्वासाने जमिनीची मशागत करतोय. भावी पीक चांगले अथवा वाईट निघणे खुद्द त्याच्यावरच अवलंबून आहे, हे त्याला माहीत आहे.

नापेर जमिनीला सुपिक बनवणारी यंत्रे त्याच्या सेवेला आहेत. आणि वनस्पतींच्या जीवनाला दिशा देण्यास शास्त्र त्याला मदत करते.

खलाशी अत्यंत धीटपणे प्रवासाला निघतो. पाण्याखालचे उथळ तळ त्याला दिसतात, तुफानांची त्याला आधीच माहिती मिळते.

"प्रारब्धात" होते, "नशीबात लिहिले होते"—असले शब्द कमी कमी प्रमाणात ऐकू येत आहेत. अज्ञान भीतीला जन्म देते. ज्ञान आत्मविश्वास देते. ते माणसाला निसर्गाचा गुलाम बनवत नाही, तर मालक बनवते.

प्रकरण आठवे

हिमनद्यांनी माघार घेतली

दर वर्षी जेव्हा बर्फ वितळू लागते, तेव्हा सर्वत्र – जंगलात आणि मैदानात, खेड्यातल्या रस्त्यांवर व रस्त्यांलगतच्या चरांमधून – पाण्याचे खळाळते ओहोळ वाहू लागतात, धबधबे कोसळू लागतात.

जमिनीवर गच्च बसलेल्या बर्फाच्या चिखलभरल्या ढिगांना फोडून ते पाण्याचे ओहोळ धावत असतात. वसंताच्या मोसमात घरातून सतत बाहेर धूम ठोकणाऱ्या लहान मुलांसारखे. दगडांवरून उड्या मारत, रस्ते ओलांडत, पाण्याचे ते ओहोळ जोरात पुढे धावत असतात; भोवतालचे वातावरण आनंदी खळखळाटाने भरून टाकत असतात.

सूर्यप्रकाशित डोंगरउतारांवरून, उघड्या मैदानांमधून, बर्फ घळींमध्ये माघार घेते. चरांमध्ये व भिंतींपाठीमागील अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये ते दडून बसते. काहीवेळा मे महिन्यापर्यंत सूर्याच्या उष्ण किरणांपासून ते लपून बसते.

निसर्गाचे रूप चुटकीसरशी पालटून जाते. अवघ्या काही दिवसांच्या अवधीत बोडक्या डोंगरांवर हिरव्या गवताचे वस्त्र पांघरले जाते आणि वाळक्या फांद्यांवर पानांची पालवी फुटते.

हिवाळ्यात घातलेले बर्फाचे पांघरूण जेव्हा वितळू लागते, तेव्हा प्रत्येक वसंतात असे घडते.

पण पृथ्वीच्या टाळूवर पांढऱ्या टोपीप्रमाणे बसलेल्या बर्फाचे महाप्रचंड ढीग जेव्हा वितळू लागले होते, तेव्हाच्या काळात काय घडले होते?

त्यावेळी बर्फाखालून पाण्याचे छोटे ओहोळ वाहात नव्हते, तर विशाल, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या धावत होत्या. त्यांपैकी अनेक नद्या अजूनपर्यंत समुद्रात वाहाताहेत, वाटेत भेटणाऱ्या सर्व ओहोळांचे, निर्झरांचे, छोट्या नद्यांचे पाणी गोळा करून समुद्रात ओतत आहेत.

ती निसर्गाला आलेली फार मोठी जाग होती, तो प्रचंड वसंताचा मोसम होता. उत्तरेकडील बोडक्या मैदानांवर त्याने घनदाट अरण्ये निर्माण केली.

पण वसंत तात्काळ स्वतःची सगळी रूपे दाखवत नाही. मे महिन्यात एक दिवस छान उबदार ऊन असते, तर दुसऱ्याच दिवशी चावऱ्या थंड वाऱ्याचे झोत झोंबतात, असे घडते. सकाळी उठून पहावे तर परत भोवताली सर्व पांढरेशुभ्र, छपरांवर बर्फ. जणू वसंताचा मोसम आलाच नव्हता. महान वसंतानेसुद्धा एकदम थंडी पळवली नाही. हिमनद्या अगदी मंद गतीने माघार घेत होत्या, अगदी अनिच्छेने. काही ठिकाणी तर त्यांनी शेकडो वर्षे मुक्काम केला.



तुंद्रामध्ये फक्त हरीण माणसाला खाऊ घालत होते

असेही घडले की, हिमनद्या थोडी माघार घेऊन काही काळ थांबल्या व जणू परत ताकद एकवटून त्यांनी पुनश्च चढाई केली. तेव्हा त्यांच्याबरोबर दक्षिणेकडे तुंद्रा सरकले व तुंद्राबरोबर त्याचा विश्वासू साथी असलेले रेनडीअरही गेले.

मैदानांमध्ये शेवाळ आणि दगडफुलांनी गवतांशी दाटी केली. दक्षिणी गवताळ कुरणांमध्ये रानगवे व घोडे निघून गेले.

उबदार आणि थंड हवामानांची ही लढाई खूप काळपर्यंत चालली व अखेरीस उबदार हवेचा विजय झाला.

वितळणाऱ्या हिमनद्यांखालून खळाळते पाण्याचे प्रवाह धावत होते. धरतीची हिमटोपी आकसू लागली, लहान होऊ लागली. बर्फाची सीमा उत्तरेकडे सरकली व तिच्यापाठोपाठ तुंद्राची सीमा सरकत गेली. पूर्वी जेथे शेवाळ व दगडफुले वाढत होती, जेथे क्वचित पाईनची खुरटी झाडे दिसत होती, तेथे आता दोन माणसांनी मिठी घालता येतील अशा प्रचंड बुंध्यांच्या पाईनवृक्षांची जंगले उभी झाली.

दरम्यान हवा जास्त जास्त उबदार बनत होती.

पाईनच्या काळसर टोकदार पानांच्या दाटीतून ॲस्प व भोजाच्या झाडांचे चकचकीत हिरवे शेंडे अधिक प्रमाणात डोकावू लागले.

त्यांच्या पाठोपाठ रुंद पानांच्या ओकवृक्षांची आणि देवदारांची बलाढ्य सेना उत्तरेकडे आली.

"पाईन-युगा" चे आता "ओक-युगा" त रूपांतर झाले. एका जंगलच्या घराने दुसऱ्या जंगलच्या घराला जागा करून दिली.

पण प्रत्येक जंगलच्या घरात स्वतःचे रहिवासी असतात.

पानांच्या झाडांच्या जंगलांबरोबर, झुडूपांबरोबर, अळंब्या व रानफळांबरोबर, उत्तरेकडे ती जनावरे सरकली, ज्यांना हा रानमेवा खायला आवडत होता. रानडुकरे, सांबरे, रानगवे, डौलदार शिंगांची लाल हरीणे, ह्या रानांमध्ये रहायला आली. गोड खायची आवड असलेले तपकिरी अस्वल जंगली मधाच्या शोधात खुरटी झाडे तुडवू लागले. जमिनीवर पडलेल्या पानां-

वरून सावधपणे धावत लांडगे सशांचा पाठलाग करू लागले. गोल तोंडांचे व आखूड पायांचे बीव्हर जंगलांमधल्या ओढ्यांना बांध घालू लागले. पक्ष्यांच्या प्रचंड थव्यांनी जंगलचे वातावरण दुमदुमून टाकले. जंगलच्या सरोवरांवर बदकांचे व हंसांचे कलकलाट घुमू लागले.

बर्फाचे कैदी

निसर्गात हे सगळे बदल जेव्हा घडत होते, तेव्हा माणूस एका बाजूला अलिप्तपणे बसून केवळ प्रेक्षकाची भूमिका घेऊ शकत नव्हता. रंगभूमीवर नेपथ्ये बदलतात, त्याप्रमाणे भोवतालची सर्व दृश्ये बदलत होती. रंगभूमीपेक्षा फक्त फरक एवढाच की, इथे प्रत्येक अंक हजारो वर्षेपर्यंत चालत होता व रंगमंचाचे क्षेत्र दशलक्षावधी चौरस किलोमीटर पसरलेले होते.

ह्या जागतिक नाटकात माणूस प्रेक्षक नव्हता, तर एक भूमिका वठवत होता.

दर वेळी नेपथ्य बदलले, म्हणजे टिकून राहण्यासाठी माणसाला स्वतःच्या जीवनाची फेर-रचना करावी लागत होती, आयुष्य बदलावे लागत होते.

जेव्हा तुंद्रा दक्षिणेकडे सरपटत आला, तेव्हा जणू साखळदंडांनी बांधून त्याने स्वतःचे कैदी सोबत आणले – रेनडीअर. ह्या अदृश्य साखळदंडाच्या एका टोकाला होती रेनडीअर व दुसऱ्या टोकाला – शेवाळ आणि दगडफुले.

शेवाळ व दगडफुले खात रेनडीअर तुंद्रामधून भटकत होती व त्यांच्या पाठलागावर माणूस भटकत होता.

मैदानांमध्ये माणूस घोड्यांची व रानगव्यांची शिकार करत होता. तुंद्रात त्याला रेनडी-अरांची शिकार करावी लागली.

आणि तुंद्रात तो रेनडीअरांची शिकार नाही करणार, तर दुसऱ्या कुणाची?

प्राचीन प्रचंड हत्ती नष्ट झाले होते. माणसाने त्यांचा हजारोंच्या संख्येने संहार केला होता. त्याच्या शिकारी तळांपाशी प्राचीन हत्तींच्या हाडांचे डोंगर पडले होते. घोड्यांचाही त्याने भरपूर संहार केला. जे घोडे टिकून राहिले, ते दूर दक्षिणेकडे गेले. कारण मैदानांमधील रसदार गवताची जागा आता सुक्या दगडफुलांनी घेतली होती.

तुंद्रामध्ये माणसाला फक्त रेनडीअर खाद्य पुरवीत होते. माणूस रेनडीअरचे मांस खात होता, रेनडीअरच्या कातड्यांची वस्त्रे अंगावर घालत होता, रेनडीअरच्या शिंगांपासून भाले व हार्पून बनवत होता. त्यामुळे रेनडीअरच्या जीवनाशी माणसाला स्वतःचे जीवन जुळवून घ्यावे लागले.

जेथे रेनडीअर जायचे, तेथे माणूस जायचा. तळावर बायका पटकन तंबू उभारीत, चटकन त्यांच्यावर कातड्यांची आच्छादने घालीत. एका जागी दीर्घ काळ रहावे लागणार नाही, हे त्यांना माहीत होते. जेव्हा चिलटांचे थवे रेनडीअरच्या कळपांना दुसऱ्या कुरणांकडे पिटाळून लावत, तेव्हा पहिली जागा सोडून त्यांच्या पाठोपाठ दुसरीकडे तळ टाकण्याखेरीज माणसांपुढे

दुसरा मार्ग नसायचा. तंबू गुंडाळून, त्यांची ओझी स्वतःच्या पाठींवर लादून, थकल्याभागल्या बायका तुंद्रातून वाट तुडवीत चालत. आणि त्यांचे पुरुष त्यांच्या शेजारून हातात फक्त भाले व हार्पून घेऊन चालत. घराच्या चिंता वाहणे पुरुषाचे काम नव्हते.

पण तुंद्रा मागे सरकू लागला, स्वतःबरोबर रेनडीअरनाही मागे नेऊ लागला. तुंद्राच्या जागी महाप्रचंड, घनदाट अरण्ये वाढली. तेव्हा लोकांचे काय झाले?

काही शिकारी टोळ्या नकळतपणे रेनडीअरच्या पाठोपाठ उत्तरेकडे आर्क्टिकमध्ये गेल्या. हे करणे सोपे होते: कारण उत्तरेचे हवामान माणसाच्या अंगवळणी पडले होते. थंडीचा, कठोर हवामानाचा कालखंड हजारो वर्षेपर्यंत चालू होता. ह्या हजारो वर्षांच्या अवधीत माणूस थंडीशी सामना करायला शिकला होता, जनावरांची उबदार कातडी छिनावून घ्यायला शिकला होता. भोवती थंडी जेवढी वाढायची, तेवढी भुयारामधील शेकोटीची आग जास्त तेजस्वी बनायची.

आहे त्याच जागी थांबण्यापेक्षा आर्क्टिकमध्ये जाणे सोपे होते. पण सोपी वाट नेहमीच सर्व वाटांमध्ये सर्वोत्तम ठरते असे नव्हे. तुंद्राबरोबर मानवजातीचा जो भाग उत्तरेत गेला, त्याने खूप काही गमावले: कारण त्या लोकांच्या दृष्टीने हिमयुगाचा कालखंड जास्त लांबला.

पण ज्या टोळ्या पूर्वीच्याच जागी थांबून राहिल्या, त्यांचे दैव वेगळे ठरले. आरंभीच्या काळात भोवती वाढणाऱ्या जंगलांमध्ये राहणे त्यांना खूप अवघड गेले. पण त्यामुळे बर्फाच्या कैदेतून मुक्तता करून घेणे त्यांना शक्य झाले. त्यांचे पूर्वज हजारो वर्षेपर्यंत बर्फाचे कैदी होते.

माणूस जंगलांशी लढतो

पूर्वीच्या तुंद्राच्या जागी वाढलेली जंगले आत्ताच्या आपल्या जंगलांसारखी मुळीच नव्हती. ही जंगलांची अभेद्य भिंत हजारो किलोमीटर दूरपर्यंत पसरली होती. नद्यांच्या आणि सरोवरांच्या किनाऱ्यांपर्यंत व काही ठिकाणी थेट समुद्रापर्यंत ही जंगले पसरली होती.

ह्या नव्या, अपरिचित जगात राहणे माणसाला सोपे गेले नाही.

जंगलाने स्वतःच्या केसाळ पंजांमध्ये माणसाला घुसमटवून टाकले, त्याला ना राहू दिले, ना जाऊ दिले. जंगलाशी सतत लढाई करावी लागत होती, जंगल तोडावे लागत होते, मोकळी मैदाने निर्माण करावी लागत होती.

तुंद्रात अगर सपाट मैदानांमध्ये छावणीसाठी जागा शोधायला माणसाला मुळीच अडचण पडत नव्हती. सभोवार भरपूर मोकळी जागा होती. पण जंगलात ह्या जागेसाठी प्रथम लढावे लागत होते.

जंगलात जमिनीचा प्रत्येक तुकडा झाडांनी आणि झुडूपांनी व्यापला होता. शत्रूच्या किल्ल्यावर हल्ला चढवावा, त्याप्रमाणे जंगलावर हल्ला करून त्याला सर करावे लागत होते.

पण शस्त्रांविना युद्ध करणे शक्य नाही.





दगडी कुऱ्हाडीचा लाकडी दांडा.
दांड्यासाठी खाचा असलेली दगडी कुऱ्हाड

झाडे तोडण्यासाठी माणसाला कुऱ्हाडीची गरज होती.

म्हणून माणसाने लांब दांड्याला जड दगडी त्रिकोण बसविला.

पूर्वी जंगलात जेथे फक्त सुतार पक्ष्याची टोक टोक ऐकू यायची, तेथे पहिल्या कुऱ्हाडीचे आवाज घुमू लागले, पक्ष्यांना व जनावरांना भिववू लागले.

तीक्ष्ण दगड झाडाच्या शरीरात खोल घुसायचा. त्या जखमांमधून दाट चीक गळायचा. लाकूडतोड्याच्या पायांशी कोसळताना झाड कडकडायचे, कण्हायचे.

माणसे दिवसांमागून दिवसपर्यंत चिकाटीने झाडे तोडत होती, जंगलाच्या जगात मोकळी जागा मिळवायला धडपडत होती.

मोकळे मैदान बनविल्यानंतर झाडांचे खुंट व खुरटी झुडूपे लोक जाळून टाकीत.

अशा रीतीने जंगलाशी लढून लोकांनी त्याच्यावर विजय मिळविला. पण जिंकलेल्या शत्रूला त्यांनी पुढे शांत बसू दिले नाही.

झाडाच्या फांद्या तोडल्यानंतर, बुंध्याचे एक टोक ते तासून तीक्ष्ण बनवीत. त्या तीक्ष्ण टोकाला जमिनीत घुसवून दगडी हातोड्याचे झाडावर प्रहार करीत. पहिल्या खांबाशेजारी दुसरा, तिसरा, चौथा खांब लोक रोवत. अशा रीतीने भिंत बनायची व फांद्यांच्या साह्याने खांब एकमेकांना जोडण्यात यायचे. जंगलामध्ये लाकडी खोपट तयार व्हायचे. ते खोपट जंगलासारखेच दिसायचे. जंगलाप्रमाणेच त्या खोपटात झाडांचे बुंधे उभे होते, त्यांना फांद्यांनी जोडले होते. पण हे बुंधे वेडवाकडे पसरले नव्हते, तर माणसाने त्यांना जसे बसविले त्या रीतीने ते उभे होते.

जंगलच्या जगात स्वतःला जागा प्राप्त करून घेणे माणसाला अवघड गेले. अन्न मिळविणे तर आणखीच अवघड होते.

मैदानांमध्ये कळपांनी भटकणाऱ्या जनावरांची माणूस शिकार करीत होता. दूरवरून कळप पाहणे सोपे होते. मैदानातील एखाद्या टेकाडावर उभे राहिल्यास चौफेर पाहता यायचे.

पण जंगलात तसे नव्हते. जंगलचे घर भाडेकरूंनी गच्च भरलेले होते, पण ते भाडेकरू दिसत नव्हते. त्यांच्या आवाजांनी, सळसळींनी, किरकिरींनी सगळे मजले भरून जात होते. पण त्यांचा माग पकडणे अवघड होते.

पायांखाली काहीतरी सळसळ व्हायची, डोक्यावरून काहीतरी उडत जायचे, पानांची हालचाल व्हायची.

ठिपकेदार बुंध्यांच्या गर्दीत, जनावरांचे ठिपके शोधून काढणे ह्या सळसळींमध्ये व वासांमध्ये माणसाला कसे शक्य होते?

जंगलातील प्रत्येक जनावराला, प्रत्येक पक्ष्याला, स्वसंरक्षणासाठी रंग लाभला होता. पक्ष्यांची पिसे झाडांच्या ठिपकेदार सालींसारखी दिसत. जंगलाच्या पानगळीच्या रंगात व अर्धवट अंधारात जनावरांची तांबूस तपकिरी केसाळ कातडी लपून जायची.

जनावराचा पाठलाग धरणे अवघड जायचे. एकदा जनावर दृष्टीस पडल्यानंतर, ते पुन्हा अदृश्य होण्याच्या आत, त्याच्यावर तात्काळ घाव घालणे आवश्यक होते.

त्यामुळे शिकाऱ्याला बर्चीऐवजी वेगवान आणि अचूक बाणाचा वापर करावा लागला.

हातात धनुष्य व पाठीवर बाणांचा भाता लटकावून शिकारी जंगलात रानडुकरांची शिकार करू लागला, दलदलींमध्ये बदके व हंस मारू लागला.

चार पायांचा मित्र

प्रत्येक शिकाऱ्याला एक मोठा मित्र असतो. ह्या मित्राला चार पंजे असतात, मोठे मऊ कान असतात व काळे चौकस नाक असते.

शिकारीच्या वेळी हा चार पायांचा मित्र स्वतःच्या धन्याला सावज शोधायला मदत करतो. जेवणाच्या वेळी तो मालकाशेजारी बसतो, त्याच्या डोळ्यांमध्ये पहात जणू विचारतो: माझा वाटा कुठे आहे?

शिकाऱ्याचा चार पायांचा मित्र एक-दोन वर्षे नव्हे, तर हजारो वर्षे विश्वासूपणे व प्रामाणिकपणे त्याची सेवा करीत आहे. माणूस अजून बंदूकीने नव्हे, तर धनुष्य-बाणाच्या साह्याने सावज टिपत होता, त्या काळापासून त्याने कुत्र्याला माणसाळविले आहे.

येनीसेईवर आफोन्तोवा पर्वतामध्ये सोविएत पुराणवस्तुशास्त्रज्ञाना प्राचीन शिकाऱ्यांच्या तळावर कुत्र्याची हाडे सापडली. ती हाडे खूपशी लांडग्याच्या हाडांसारखी होती, पण मुसकट मात्र अगदी लहान होते.

बहुधा त्या काळात कुत्रा एव्हाना माणसाच्या घराची राखण करीत होता व शिकारीत जनावराचा माग काढायला आणि पाठलाग करायला मदत करीत होता. जंगलांमधील वस्त्यांचे उत्खनन करताना, कुत्र्यांच्या दातांचे वण असलेली जनावरांची हाडे अजूनपर्यंत सापडतात. आत्ताप्रमाणे त्याही वेळी कुत्रा जेवणाच्या वेळी धन्यापाशी बसायचा व हाडांची मागणी करायचा.

पण कुत्र्याने माणसाची जर सेवा केली नसती, तर कुत्र्याला जवळ बाळगून खाऊ घालण्याची माणसाने उठाठेव केली असती का?

कुत्र्याच्या पिलाला शिकवून माणसाने त्याला स्वतःचा मदतनीस बनविले, सावजाचा माग काढायला शिकविले.

माणसाने केलेली ही निवड चुकीची ठरली नाही. माणसाला रानडुकराच्या खुणा दिसायच्या आधी किंवा हरीणाच्या पावलांचा आवाज ऐकू येण्याच्या आधी, कुत्र्याचे शरीर ताठ व्हायचे व नाक वर करून तो जनावराचा वास हुंगू लागायचा.

झुडूपांना कशाचा वास येतोय? इथून कोण गेले? दोन-तीनदा हवा हुंगताच कुत्रा सावजाचा माग काढू शकत होता. भोवती काही न पाहता आणि काही न ऐकता, केवळ स्वतःच्या कामावर चित्त एकाग्र करून – सावजाचा पाठलाग करण्याच्या – कुत्रा ठामपणे जंगलामधून धावू लागायचा. त्याच्या मागोमाग जाणे एवढेच पुढे माणसाचे काम उरायचे.

कुत्र्याला माणसाळवल्यानंतर माणूस पूर्वीपेक्षा जास्त सामर्थ्यवान बनला. त्याच्या स्वतःच्या नाकापेक्षा अधिक चांगल्या रीतीने वेगवेगळे वास ओळखू शकणाऱ्या कुत्र्याच्या नाकाला त्याने स्वतःच्या सेवेसाठी लावले.


पण त्याने केवळ कुत्र्याचे नाक स्वतःच्या सेवेला घेतले नाही, तर कुत्र्याचे पायसुद्धा राबविले. घोड्याला गाडीशी जुंपण्याच्या खूप आधीपासून कुत्रा माणसाची ओझी वाहून नेत होता.

सैबेरियात प्राचीन शिकाऱ्यांच्या तळावर गाडीच्या ओढणाच्या अवशेषांबरोबर कुत्र्याची हाडे आढळली.

म्हणजे कुत्रा माणसाला केवळ शिकारीत मदत करीत नव्हता, तर गाडी ओढण्याचे कामही करीत होता.

अशा रीतीने माणसाच्या चरित्रात आपली त्याच्या मित्राशी – कुत्र्याशी – पहिली ओळख झाली.

डोंगरांमध्ये वाटसरूंचे जीव वाचविणाऱ्या आणि लढायांमध्ये घायाळांना वाहून आणणाऱ्या ह्या शहाण्या प्राण्यांबद्दल कितीतरी कथा लिहिण्यात आल्या आहेत. घरांच्या उंबरठ्यांची व देशांच्या सीमांची त्यांनी दक्षतेने राखण केली आहे. घरात, शिकारीत, लढाईत आणि शास्त्रीय प्रयोगशाळेत कुत्रा माणसाची प्रामाणिकपणे सेवा करतो.



कुत्र्यांची घसरगाडी

शास्त्रासाठी, मानवजातीच्या हितासाठी, शास्त्रज्ञ जेव्हा कुत्र्याला शस्त्रक्रियेच्या टेबलावर निजवतो, तेव्हा कुत्रा त्याच्याकडे विश्वासू नजरेने पहात असतो, धन्यासाठी प्राण द्यायला तो सज्ज असतो.

लेनिनग्रादजवळ पावलोवो येथे मेंदूच्या कार्याचा अभ्यास करण्याच्या प्रयोगशाळेच्या इमारती-समोर एक उंच स्मारक उभे आहे.

हे स्मारक आपल्या विश्वासू चार पायांच्या मित्राच्या गौरवार्थ उभारले आहे.

माणूस नदीशी लढतो

सगळीच माणसे जंगलात दाट झाडीत राहिली नाहीत. काही माणसे जंगलांमधून बाहेर पडली व नदीतीरावर आणि सरोवराकाठी रहायला गेली.

तेथे, पाणी आणि जंगल यांच्या दरम्यानच्या अरुंद पट्टीत माणसांनी स्वतःची लाकडी ओंडक्यांची खोपटे बांधली.

जंगलापेक्षा नदीवर अधिक मोकळी जागा होती. पण तेथे जगणे सोपे नव्हते.

नदी अशांत शेजारीण होती. वसंतामध्ये तिला पूर यायचा व तीराला ती पाण्याखाली बुडवून टाकायची. बर्फखंडांबरोबर, कोसळून पडलेल्या झाडांबरोबर, माणसांनी बांधलेली खोपटेही अनेकदा महापुरात वाहून जायची. महापुरापासून स्वतःचे जीव वाचविण्यासाठी माणसे जवळच्या उंच झाडांवर चढून बसत व नदीचा राग केव्हा शांत होईल त्याची वाट पहात. जेव्हा नदीचे पाणी माघारी जायचे, तेव्हा माणसे किनाऱ्यावरील स्वतःची उध्वस्त वारुळे दुरुस्त करण्याच्या उद्योगाला लागत.

आरंभी प्रत्येक महापूर माणसांना अनपेक्षितपणे घेरायचा. पण नंतर नदीच्या एकूण राग-रंगांचे बारकाईने निरीक्षण करून, माणसे तिच्यापेक्षा जास्त चतुर बनली.

काही झाडांना तोडून, त्यांचे ओंडके एकत्र बांधून, माणसांनी त्यांना नदीतीराशी रचून ठेवले. पहिल्या ओंडक्यांच्या रांगेवर दुसरी रांग रचली. हळूहळू त्या ओंडक्यांचे उंच, रुंद व्यास-पीठ बनले. ह्या व्यासपीठावर लोकांनी आपली खोपटी उभारली. आता लोकांना महापूर भयानक वाटेनासा झाला. पाणी तीरापलिकडे घुसले तरी खोपटांच्या उंबरठ्यांना त्याचा स्पर्श व्हायचा नाही

माणसाचा हा फार मोठा विजय होता. सखल तीराला उंच बनविणे म्हणजे काही थट्टा नव्हे! ह्या लाकडी व्यासपीठांमधून पुढे नद्यांना आवर घालण्यासाठी आपली धरणे व बांध यांची निर्मिती झाली.

नदीशी लढण्यात माणसाने खूप श्रम व वेळ खर्ची घातले.

पण नदीपाशी त्याने वस्ती करण्याचे कारण काय? पाण्याकडे तो कशामुळे आकर्षित झाला?

गळांच्या तरंगणाऱ्या काड्यांवर चिकाटीने लक्ष ठेवून दिवसच्या दिवस नदीवर घालवणाऱ्या मच्छीमारांना याबद्दल विचारा.

नदीने माणसाला स्वतःकडे आकर्षित केले, कारण नदीत मासे होते.

शिकारी मच्छीमारसुद्धा बनला, हे कसे घडले? कारण मासे पकडायला शिकारीपेक्षा अगदी वेगळ्या हत्यारांची गरज असते, अगदी वेगळी साधने आवश्यक असतात.

जेव्हा घटनांच्या साखळीत आपल्याला खंड पडलेला दिसतो, तेव्हा हरवलेला दुवा शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शिकारी एकदम मच्छीमार बनू शकत नाही. म्हणजे मासे धरायला आरंभ करण्यापूर्वी, तो माशांची शिकार करीत असला पाहिजे.



मच्छीमार-आयनी (चिनी चित्र)

प्रत्यक्षात तसेच घडले होते. **प्रारंभीचे** मासे धरण्याचे हत्यार हार्पून होते व भाल्यापेक्षा ते विशेष भिन्न नव्हते.

कंबरभर खोल पाण्यात फिरत, दगडांआड लपलेल्या माशांना माणूस हार्पूनने मारायचा. नंतर दुसऱ्या मार्गांनीसुद्धा मासे पकडायला माणूस शिकला. एव्हाना जाळ्यांच्या साह्याने पक्षी धरायला तो शिकला होता.

त्याने पाण्यात जाळी फेकून पाहिली. अशा रीतीने हळूहळू माणूस जाळ्यांमध्ये मासे धरू लागला.

पुराणवस्तुशास्त्रज्ञांना जमिनीखाली हार्पूनबरोबर आणि मासे मारण्याच्या भाल्यांबरोबर जाळ्यांना वजन लावण्याचे दगड व मासे धरण्याचे हाडांचे आकडे सापडतात.

शिकारी-मच्छीमारांचे घर

कीझील-कूम वाळवंटात, अमूदार्या नदी अराल समुद्राला मिळते त्या जागेपासून जवळच, सोविएत संशोधक से. पे. तोल्स्तोव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्राचीन शिकारी-मच्छीमारांचा तळ सापडला.

एका वाळूच्या टेकडीच्या माथ्यावर, वाळूच्या व चिकणमातीच्या थराखाली, गारगोटीपासून बनविलेली सुबक हत्यारे, चिकणमातीच्या भांडयांचे तुकडे, स्वयंपाकघरातून टाकलेल्या कचऱ्याचे ढीग संशोधकांना सापडले. त्या ढीगांमध्ये रानडुकरांची, हरीणांची, बकऱ्यांची खूप हाडे होती. पण सर्वांत जास्त हाडे होती पाईक आणि दुसऱ्या एका माशाची. त्या तळावर राहणाऱ्या माणसांचे मुख्य खाणे मासे होते, असे आढळले.

इथे जळलेल्या घराचे अवशेषही सापडले. राखेने व कोळशाने भरलेले खळगे, जळक्या लव्हाळयांचे तुकडे आणि एका वर्तुळाच्या केंद्राशी मिळणाऱ्या काळया कोळशाच्या रेषा, एवढयाच गोष्टी उरल्या होत्या. घराच्या मध्यभागी स्वच्छ पांढऱ्या राखेचा दाट थर होता व त्याखाली तापवलेल्या तांबडया लाल वाळूचा थर होता.

ह्या मध्यभागी असलेल्या शेकोटीभोवती इतर शेकोटया पसरल्या होत्या. त्यांच्यात घाणेरडी, काळी राख व इतर कचरा भरलेला होता.

संशोधकांना तळावर फक्त एवढयाच वस्तू सापडल्या. त्यांच्यापुढे आता काम होते — ह्या खुणांच्या आधारे त्या जीवनाचे पूर्ण चित्र कल्पनेने उभे करायचे, फार फार पूर्वी जळून गेलेल्या घराची पूर्ववत रचना करायची.

पुराणवस्तुशास्त्राचे ज्ञान नसलेल्या लोकांना हे काम पार पाडणे अशक्य होते. पण शास्त्रज्ञांना स्पष्ट समजले की, कोळसा व राख भरलेले खळगे जेथे होते, तेथे घराच्या छपराला आधार देणारे खांब होते. जळक्या लव्हाळयांच्या तुकडयांवरून समजले की, छप्पर लव्हाळयांपासून बनविले होते. कोळशाच्या रेषा एकाच बिंदूशी योगायोगाने भेटलेल्या नव्हत्या: आगीच्या वेळी घराचे खांब जेथे कोसळून पडले, तेथे त्या रेषा उमटल्या होत्या.

मध्यभागीच्या शेकोटीत अन्न शिजवत नव्हते, अन्यथा तिच्यातील राख एवढी स्वच्छ व पांढरी राहिली नसती. आणि राखेचे खूप दाट थर साचण्याचे कारण म्हणजे प्राचीन रूढीनुसार त्या शेकोटीत दिवस-रात्र अखंडपणे आग पेटती ठेवण्यात येत होती.

फक्त आग लागल्यास ती शेकोटी विझायची.

घराच्या खांबांमधल्या चुलींमधून बायका अन्न शिजवायचा. म्हणून तेथे घाणेरडी राख व सभोवार हाडांचे ढीग.

चुली खूप होत्या, म्हणजे बायकांची संख्या जास्त होती. ह्या सर्व बायका, त्यांचे पुरुष व त्यांची मुले, यांचा मिळून नात्याने बांधलेला एक समाज होता.

समाज लहान नव्हता — शंभर अथवा त्याहून जास्त माणसे होती. म्हणूनच त्यांना एवढे प्रशस्त घर बांधावे लागले. पण अजूनही ह्या घराचे रूप पूर्वीच्या टोकदार छपराच्या गोल तंबूसारखे होते.

प्रवेशद्वारापासून सतत पेटणाऱ्या अग्नीपर्यंत खांबांच्या दुहेरी रांगेमधून लांबलचक मार्ग होता. ह्या मार्गाच्या उजव्या बाजूला स्वयंपाकाच्या चुली होत्या आणि डावीकडे मोकळा चौक होता.

लोकांना हा चौक कशाला हवा होता?

हे समजून घेण्यासाठी, मध्य आशियापासून खूप दूरच्या अंदमान बेटांवर सापडलेल्या सामायिक खोपटांची आठवण शास्त्रज्ञांना करावी लागली. तेथे अशा चौकात मांत्रिक विधी व उत्सव चालत.

इथेच, लांबलचक मार्गाच्या डावीकडे, शास्त्रज्ञांना मच्छीमारांच्या घरात भिंतीपाशी अगदी लहान चुली सापडल्या. इथे बहुधा लग्न न झालेली माणसे रहात असावीत.

अशा रीतीने थोडचा अवशेषांच्या आधारे, कोणे एके काळच्या मच्छीमारांचे घर, शास्त्रज्ञ कल्पनेने परत उभारू शकले.

पण हे मच्छीमार मासे कसे धरत, त्यांच्यापाशी होडचा होत्या अथवा नाही, याबाबत सापडलेल्या अवशेषांनी काही सांगितले नाही.

प्राचीन होडी रशियात सापडली — लादोगा सरोवरापाशी.

आपल्या जहाजांचा आजोबा

साठ वर्षांपूर्वी, लादोगा सरोवरापासून जवळच कामगार एक कालवा खणत होते. जमिनीतील कुजलेल्या वनस्पतींचे सर्पण व वाळू खणता खणता त्यांना मानवी कवटचा व दगडी हत्यारे सापडली.

पुराणवस्तुशास्त्रज्ञांना ही बातमी समजली. ज्या दलदलीत काहीही नव्हते अशी कल्पना होती, त्या दलदलीमधून कुजलेल्या वनस्पतींच्या सर्पणाशिवाय, जणू वस्तुसंग्रहालयाच्या कपाटा-मधून काढाव्यात तशा विविध वस्तू पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी खणून काढल्या. दगडी कुऱ्हाड, दगडी सुरा, मासे पकडण्याचा आकडा आणि बाणांची टोके, दातेरी हार्पून आणि सील माशासारखा दिसणारा हाडाचा कोरलेला ताईत, एवढचा वस्तू त्यांनी काढल्या. दगडी व हाडांच्या हत्यारां-पाठोपाठ पुराणवस्तुशास्त्रज्ञांना एक फार मोठी वस्तू सापडली : संपूर्ण धडधाकट होडी. ही होडी एवढी छान राहिलीय, की आपण आत्तासुद्धा तिच्यात बसून जलविहार करू शकू.

ही होडी दिसायला आपल्या आत्ताच्या बोटींसारखी मुळीच नाही. आपल्या सर्व होडचांचा, आगबोटींचा आणि मोटारबोटींचा आजोबा एका आख्ख्या जाड ओकच्या ओंडक्यापासून बनविलेला होता.

ओकचा हा ओंडका न्याहाळताना, त्याच्यावर दगडी कुऱ्हाडीने कसे घाव घातले होते हे स्वतःच्या डोळ्यांनी स्पष्ट पाहता येते.

जेथे कुऱ्हाडीचे घाव बसलेत त्या जागी परिस्थिती काही वाईट नाही : लाकूड गुळगुळीत आहे. पण पुढच्या व मागील बाजूस, लाकडाच्या ठेवणीच्या विरुद्ध दिशेने घाव घालताना मात्र मामला अवघड बनलाय. लाकडाचे सर्व दिशांना कपचे उडालेत. जणू दगडी दातांनी चावे



हरीणाच्या शिंगाचे हार्पून

घ्यावे, तशी सर्वत्र खडबडीत टेंगळे व खळगे पडलेत. लाकडात जेथे गाठी आहेत अथवा वाकडी वाढ झालीय, तेथे कुऱ्हाडीने काम करणे नाकारलेय. तेव्हा कुऱ्हाडीने लाकडाविरुद्ध केलेल्या ह्या लढाईत कुऱ्हाडीच्या मदतीला अग्नी आलाय.

होडीची मागची बाजू जळलीय आणि तिच्यावर कोळशाचे काळे फुटके आवरण चढलेय.

कुजलेल्या वनस्पतींच्या सर्पणात, होडीच्या शेजारीच दगडी कुऱ्हाड सापडली. ह्या कुऱ्हाडीच्या साह्यानेच होडी बनविण्यात आली होती. कुऱ्हाडीचे पाते चकचकीत तासलेले व धारदार आहे. तेथून जवळच धार काढण्याचे चाक होते. म्हणजे हत्यारांना नुसताच आकार देत नव्हते, तर त्यांना तासून धार काढत होते.

धार नसलेल्या कुऱ्हाडीचा भक्कम लाकडावर थोडाच परिणाम घडला असता?

ओकच्या लाकडाच्या ओंडक्याचे होडीत रूपांतर करण्यासाठी माणसाला दीर्घ काळ श्रमावे लागले होते.

अखेरीस काम पूर्ण झाले. होडी पाण्यात सोडण्यात आली. हार्पून, आकडे, मासे मारायचे भाले आणि सर्व प्रकारची जाळी घेऊन माणसे मासे धरायला निघाली.

सरोवर मोठे आहे, मासे त्यात भरपूर आहेत, पण माणसे किनाऱ्यापासून जास्त दूर जात नाहीत.

कारण पाणी माणसांना नवीन आहे. ह्या महाभूताची त्यांना अजून सवय नाही. पाण्याच्या आवडीनिवडी कशा समजून घ्यायच्या, त्याच्या हालचाली कशा जाणायच्या? कधी ते शांत, संथ पडून असते, तर कधी अचानक खवळते आणि त्याच्या प्रचंड लाटा उमटतात.



आदिकालीन होडी—आपल्या गलबतांचा आजोबा


ओकचा प्रचंड ओंडका कुठल्याही तुफानाला जुमानीत नाही व लाकडाच्या फळकुटाप्रमाणे लाटांवर हिंदकळत, तरंगत राहतो.

माणसे घाबरून किनाऱ्याकडे वल्हवत येतात. किनाऱ्यावर घट्ट जमीन आहे, त्या जमिनीवर चालण्याची माणसांच्या पायांना सवय झालीय. जमीन हिंदकळत नाही, उसळत नाही, तिच्यावर लाटा उठत नाहीत.

आईला बिलगावे तसा माणूस धरतीमातेला बिलगतो. तिनेच त्याला वाढवलेय.

आकाशाच्या सीमेला भिडलेल्या ह्या अविश्वासू पाण्यावरून मासे धरायला जाण्याऐवजी, खुद्द मासे किनाऱ्यावर येण्याची वाट पहात मच्छीमार बसून राहतो.

माणूस हळूहळू, सावधपणे पाण्यावरील संचाराच्या कक्षा विस्तारत जातो.



लाकडी दांडयासह दगडी कुऱ्हाड

एक असा काळ होता, जेव्हा माणसाचे जग जमिनीच्या सीमेपर्यंत मर्यादित होते. प्रत्येक किनाऱ्याला जणू भिंत होती व तिच्यावर अक्षरे होती: "प्रवेश बंद."

आणि माणसाने ह्या अदृश्य भिंतीला भेदून पार केले. अजून त्याच्या दृष्टीने नव्या असलेल्या ह्या पाण्याच्या जगाच्या सीमेपासून तो फार दूर जात नव्हता. पण प्रत्येक कामात नेहमी सुरुवात अवघड असते. एक वेळ अशी येईल, जेव्हा माणूस किनाऱ्यांपासून संपूर्ण दूर जाईल. छोटयाशा होडीतून नव्हे, तर मोठया जहाजातून तो उघडया समुद्रात जाईल, त्याच्यासारख्याच लोकांची वस्ती असलेल्या नव्या भूमीचे शोध घ्यायला.

पहिले कारागीर

तुम्ही, बाल-कारागिरांनो, अगदी अलीकडेच तुम्ही हातात कुऱ्हाड आणि करवत, हातोडा आणि गिरमिट, यांना धरलेत!

तुम्ही आहात भावी धातुशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ, यंत्रांचे व विमानांचे रचनाकार, घरांचे आणि जहाजांचे बांधणीकार!

हे पुस्तक तुमच्यासाठी लिहिलेय, स्वतःच्या हत्यारांवर आणि कामावर प्रेम करणाऱ्यांसाठी!

साहित्याशी हत्यारांची कशी झटापट चालते आणि विजयानंतर केवढा आनंद होतो, हे तुम्हाला माहीत आहे.

हातात लाकडाचा तुकडा घेतल्यानंतर, तुम्हाला त्याचे ज्या वस्तूत रूपांतर घडविण्याची इच्छा असते, ती वस्तू एव्हाना तुमच्या नजरेसमोर उभी असते. असे भासते, सगळे अगदी सोपे आहे. इथे तासले पाहिजे, तेथे भोक पाडले पाहिजे आणि इथे एक तुकडा कापून काढला पाहिजे. पण लाकूड ऐकत नाही. त्याला कापणाऱ्या सुऱ्याच्या पात्याला ते सर्व बळ एकवटून प्रतिकार करते.

एकामागून एक हत्यार लढ्यात उतरते. जेथे सुरा माघार घेतो, तेथे कुऱ्हाड लढायला पुढे सरसावते. जेथे कुऱ्हाडीची मात्रा चालत नाही, तेथे करवतीचे डझनावारी दात लाकडाला कापून काढतात.

आणि तुम्हाला हव्या त्या वस्तूच्या आकाराव्यतिरिक्त जादा असलेले लाकूड तुकड्यांच्या, भुश्शाच्या स्वरूपात बाजूला पडलेले आढळते.

तुमचा जय झाला. पण हा जय तुमचा एकट्याचा नव्हे. अनेक शतकांच्या दरम्यान ज्यांनी हत्यारे तयार केली, त्यांना अधिकाधिक सुबक बनविले, नवनव्या साहित्यांना शोधून ज्यांनी कामाच्या नव्या रीती हुडकून काढल्या, त्या सर्व कारागिरांचाही तुमच्या जयात वाटा आहे.


सुरा, कुऱ्हाड, हातोडा ह्यांना प्रथम तयार करणाऱ्या कारागिरांशी ह्या पुस्तकात एव्हाना तुमची ओळख झाली आहे.

ते काम करीत असताना तुम्ही त्यांना पाहिलेय. तुमच्या कामाप्रमाणेच त्यांचे कामही अवघड आणि आनंद देणारे होते.

ह्या पहिल्या सुतारांनी, पहिल्या शेतकऱ्यांनी, पहिल्या पाथरवटांनी जनावरांच्या कातड्यांची वस्त्रे अंगावर घातली होती. त्यांची हत्यारे ओबडधोबड आणि अवजड होती. आपल्याला पुतळा बनवायला जेवढे अवघड जाते, त्यापेक्षा चिकणमातीचे भांडे बनविणे त्यांना जास्त अवघड जात होते.

पण ह्या सुतारांमधून, शेतकऱ्यांमधून, कुंभारांमधून आज स्वतःच्या श्रमांमार्फत पृथ्वीला बदलून टाकणारे बांधणीकार, रसायनशास्त्रज्ञ, धातुशास्त्रज्ञ निर्माण झाले आहेत.

उदाहरणार्थ, प्राचीन कुंभार. निसर्गात उपलब्ध नसलेले साहित्य त्यांनी सर्वप्रथम चिकणमातीतून निर्माण केले. त्यापूर्वी, जेव्हा आदिकारागीर दगडातून कुऱ्हाड किंवा हाडापासून हार्पून बनवायचा, तेव्हा तो नवे साहित्य बनवायचा नाही, तर केवळ त्या साहित्याला नवा आकार द्यायचा. पण इथे पूर्वी कधी न घडलेले घडले. माणसाने चिकणमातीपासून भांडे बनविले व शेकोटीत ते भाजून काढले. आगीने चिकणमातीचे गुणधर्म बदलून टाकले, तिचे रूप पालटून टाकले.



दगड खोदण्याचे आदिकाळातील यंत्र

पूर्वी चिकणमातीला पाण्याचा स्पर्श होताच तिचा चिखलाचा गोळा बनायचा. पण आगीमधून भाजून निघताच ती पाण्याला घाबरेनाशी झाली. आता तिच्यात पाणी ओतले तरी चालायचे, त्यामुळे ती स्वतःचे रूप बदलत नव्हती, तिचा चिखल होत नव्हता.

आगीच्या मदतीने माणसाने चिकणमातीपासून नवे साहित्य बनविले. हा दुहेरी विजय होता: चिकणमातीवरील विजय आणि अग्नीवरील विजय. खरे आहे, पूर्वीसुद्धा अग्नी माणसांची सेवा करीत होता. तो त्यांचे थंडीपासून रक्षण करायचा, रानटी जनावरांना त्यांच्यापासून दूर पळवून लावायचा, जंगले साफ करायला त्यांना त्याने मदत केली आणि कुऱ्हाडीच्या साह्याने होडी बनविण्यात आली, तेव्हा कुऱ्हाडीच्या मदतीला तो आला. अग्नी मिळविण्याची कला लोकांना एव्हाना चांगली अवगत झाली होती. लोक जेव्हा लाकडाचा एक तुकडा दुसऱ्या तुकड्यावर घासत, तेव्हा अग्नी त्यांच्यासमोर आज्ञाधारकपणे हजर व्हायचा.

पण आता माणसाने अग्नीवर नवी, अधिक अवघड कामगिरी सोपवली होती: एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूमध्ये रूपांतर करायचे.

अग्नीचे गुणधर्म जाणून घेतल्यावर माणसाने त्याला चिकणमाती भाजायला लावले, अन्न शिजवायला लावले, भाकरी भाजायला लावले, तांबे वितळवायला लावले.


खाणमातीमधून लोखंड काढण्यास, वाळूमधून काच बनविण्यास, लाकडापासून कागद तयार करण्यास अग्नी आपल्याला मदत करतो. कारखान्यांच्या भट्ट्यांमधून पेटणाऱ्या अग्नीवर धातु-

शास्त्रज्ञांची आणि रसायनशास्त्रज्ञांची आख्खी फौज सत्ता गाजविते. आणि ह्या सर्व भट्ट्यांचे मूळ त्या शेकोटीत आहे, जिच्यात प्राचीन कुंभाराने स्वतःचे पहिले वेडेबागडे, अरुंद तळाचे मातीचे भांडे भाजले.

धान्याचा दाणा – साक्षीदार

आदिमानवांच्या एका शिकारी-तळावर इतर अनेक वस्तूंमध्ये काही चिकणमातीची भाजलेली मडकी पुराणवस्तुशास्त्रज्ञांना सापडली.

मडक्यांवर रेषारेषांची साधी नक्षी होती. काही संशोधकांचे मत आहे की, आदिमानव कोणत्या प्रकारे मडकी बनवत आणि त्यांना भाजून काढत ह्याचे रहस्य त्या नक्षीमधून उलगडते.



खापरांवर नक्षी काढलेल्या होत्या

विणलेल्या वेताच्या करंडीला आतून चिकणमातीचा लेप देत. मग ती करंडी शेकोटीत भाजून काढत. करंडी जळून जायची व मडके शिल्लक रहायचे. वेताच्या खुणा मात्र मातीवर कायम रहायच्या, त्यांची नक्षी बनायची.

नंतर जेव्हा चिकणमातीची भांडी करंडीच्या साह्याविना अधिक धिटाईने लिंपू लागले, तेव्हा कुंभार मुद्दामच सवयीची तिरक्या रेषांची नक्षी भांड्यांवर कोरू लागले. त्यांना वाटायचे की, त्यांच्या आजी व आजोबांनी ज्या मडक्यांमधून अन्न शिजवले होते, त्या मडक्यांसारखी जर नवी मडकी दिसली नाहीत, तर अन्न नीट शिजणार नाही.

त्या काळातील कारागिरांना वाटत होते की, प्रत्येक वस्तूमध्ये कुठलीतरी गूढ शक्ती व गुणधर्म लपून होते. कोण जाणे: कदाचित मडक्याचे सगळे सामर्थ्य त्या नक्षीत असेल! जर नक्षी बदलली, तर दुःख वाट्याला यायचे! मडके संकट आणील, उणीव निर्माण करील, उपासमार करील. काहीवेळा, मडक्याला दृष्ट लागू नये म्हणून कुंभार त्या मडक्यावर कुत्र्याचे चित्र कोरायचा.

कुत्रा माणसाला केवळ शिकारीतच मदत करीत नव्हता. तो माणसाच्या घराची राखणही करायचा.

मडक्यावर कुत्र्याचे चित्र काढताना कुंभार मनाशी म्हणायचा: कुत्रा राखणदार आहे, तेव्हा ह्या मडक्याची व मडक्यातील पदार्थांची तो राखण करील.

चौकडीची नक्षी काढलेली चिकणमातीची मडकी अनेक ठिकाणी सापडलीत. पण फ्रान्समधील काम्पीनी गावाजवळ सापडलेले एक मडके विशेष प्रसिद्ध पावले. पुराणवस्तुशास्त्रज्ञांना त्या मडक्यावर बार्लीच्या दाण्याचे चित्र कोरलेले आढळले.

त्यांनी अत्यंत उत्तेजित होऊन मडके न्याहाळले. तो केवळ दाणा नव्हता, तर एक साक्षीदार होता – माणसाच्या जीवनात घडलेल्या अत्यंत महान स्थित्यंतराचा छोटा साक्षीदार.

जेथे धान्याचा दाणा होता, तेथे शेती असली पाहिजे. त्याच तळावर धान्य दळायची जाती आणि दगडी कुदळी सापडल्या, ते काही उगाच नव्हे.

असे दिसते, आपले शिकारी आणि मच्छीमार आता शेतकरीही बनले होते. हे कसे काय घडले?

हे सांगितले पाहिजे की, टोळीतील सर्वच माणसे शिकारीत आणि मच्छीमारीत गुंतत नव्हती. पुरुष जेव्हा शिकारीला जात, तेव्हा बायका व मुले हातात करंड्या अगर मडकी घेऊन छावणीभोवती खाद्यपदार्थ गोळा करीत फिरत. समुद्रकिनाऱ्यावर ती शिंपले गोळा करीत. जंगलात अळंब्या, रानफळे, कठीण कवचीची फळे गोळा करीत. ओक झाडाची फळेही ती खात. ओकची फळे कुटून त्यांचे पीठ बनवीत आणि त्या पिठाच्या भाकऱ्या भाजत. म्हणूनच काही लोकांच्या भाषेत बराच काळपर्यंत भाकरीला "ओकचे फळ" म्हणत होते.

जेव्हा मधमाशांचे पोळे आढळायचे, तेव्हा आदिमानवांना अमाप आनंद व्हायचा.

एका कड्यावर एक चित्र अजून टिकून आहे: मध गोळा करणारी स्त्री. ही बाई झाडावर चढलीय. तिचा एक हात पोळ्याकडे ताणलाय आणि दुसऱ्या हातात खुजा धरलाय. भोवती संतापलेल्या मधमाशा उडताहेत. पण त्या मधमाशांकडे लक्ष न देता ती स्त्री मधाने थबथबलेले पोळ्याचे तुकडे ओढून काढतेय.

प्रत्येक भटकंतीनंतर स्त्रिया व मुले स्वत:सोबत रानफळे, मध, जंगली सफरचंदे आणि नासपाती अशा खाण्याच्या वस्तूंची ओझी वाहून आणत.

आता मेजवानी! पण बायका अन्नाचे साठे पुरवून वापरत. मुलांना दूर पळवून लावून शक्य होतील तेवढे पदार्थ त्या मडक्यांमधून, भांड्यांमधून, पिंपांमधून लपवून ठेवत.



कुंभार मडक्यांवर सवयीची नक्षी काढायचा

साठे नेहमीच उपयोगी पडत. कारण शिकारीची नेहमीच खात्री नव्हती.

उबदार मोसम सुरू होताच माणसे परत अन्नपदार्थ गोळा करायला बाहेर पडत. जणू हे एक पाऊल मागे होते. पण प्रत्यक्षात मात्र पुढे मारलेली उडी होती. अन्नपदार्थ गोळा केल्यानंतर, माणसे पेरणीकडे वळली. गोळा करणारा आणि शेती करणारा यांच्यातील सीमारेषा ओलांडून.

फळे आणि बोरे यांच्यासह जंगली बार्लीचे, जंगली गव्हाचे दाणेही बायका गोळा करून आणत. हे धान्य त्या करंड्या-मडक्यांमधून साठवून ठेवत. पण असे करताना काही दाणे जमिनीवर सांडत. त्यांपैकी काही दाणे उगवत. पेरणी अशी आपोआप सुरू होई.

आरंभीच्या काळात माणसांनी धान्याची पेरणी मुद्दाम केली नव्हती. फक्त त्यांच्या हातून धान्याचे दाणे जमिनीवर सांडत. मग मात्र धान्याची मुद्दाम पेरणी करू लागली.


धान्याच्या पेरण्याबद्दल आणि पुनरुत्थानाबद्दल अनेक लोकांमध्ये दंतकथा प्रचलित आहेत.

प्राचीन काळी बायका जेव्हा कुदळींनी जमीन खणत, मग तिच्या धान्याचे दाणे पेरत, तेव्हा त्यांची श्रद्धा असायची की, गूढ देवाला त्या जमिनीत पुरत आहेत आणि नंतर तो देव सोनेरी कणसांच्या रूपाने त्यांच्याकडे परत येईल. शरदात जेव्हा त्या पीक गोळा करत, तेव्हा भूमिगत जगातून देव परत आल्याबद्दल त्यांना आनंद व्हायचा.

धान्याची शेवटची पेंढी बांधून जमिनीवर ठेवून त्या तिच्याभोवती नाचत व गाणी म्हणत. हा नाच साधासुधा नव्हता. तो मांत्रिक विधी होता. धान्याचा दाणा पुनर्जन्माला आला म्हणून बायका त्याची स्तुती-स्तोस्त्रे गात आणि माणसांशी अशीच उदार वाग म्हणून धरतीची प्रार्थना करीत.



दगडी जात्यात नीग्रो स्त्री धान्य दळतेय



आदिकाळातील स्त्रिया ह्या दगडी जात्यात धान्य दळायच्या

जुने नव्यात

ह्या शतकाच्या आरंभापर्यंत, महान समाजसत्तावादी ऑक्टोबर क्रांती होण्यापूर्वी, रशियात काही ठिकाणी बायका प्रत्येक शरदात पीक-कापणीनंतर "कापणी" उत्सव साजरा करीत होत्या.

पिकाची शेवटची पेंढी घेऊन तिला त्या बायका रुमाल बांधत व घागरा नेसवत. मग एकमेकींचे हात पकडून त्या बायका पेंढीभोवती फेर धरून नाचत व गाणी गात:

आमच्या शेतात
आज पिकाची कापणी,
देवाजीची कृपा.
एका शेताची झाली कापणी,
दुसऱ्याची केली नांगरणी,
देवाजीची कृपा.

ह्या प्रार्थनावजा गाण्याचे जंगली, एकसुरी ओरडणे व खेड्यात संध्याकाळच्या वेळांना ऐकू येणारी तरुण-तरुणींची उल्हसित चुटकेवजा गाणी, यांच्यात फार फरक होता.

"कापणी" हा प्राचीन धार्मिक विधी आहे, पहिल्या शेतकऱ्यांच्या काळापासून चालत आलेली प्रथा आहे. खेळांच्या आणि गाण्यांच्या रूपाने असे अनेक विधी आपल्यापर्यंत चालत आलेत.

मुले हातात हात गुंफून गातात:

आम्ही पेरली बाजरी, पेरली,
अहो बाजरी, पेरली, पेरली...

हे खेळवजा गाणे कधी कधी धार्मिक विधी होते. हजारो वर्षांच्या काळात त्यातील मांत्रिक विचार पूर्ण नाहीसा झालाय. आता उरलीय फक्त गंमत.

आणि फर वृक्ष! कोणे एके काळी फर हा पवित्र वृक्ष मानायचे. झोपलेल्या जंगलांना आणि शेतांना परत जिवंत करण्यासाठी, हिवाळ्यानंतर वसंताला परत आणण्यासाठी, मांत्रिक हालचाली म्हणून माणसे फरभोवती नाचत.

नववर्षानिमित्त फरच्या झाडाला सजविणाऱ्या मुलांना जर सांगितले की, फरचे झाड पवित्र आहे, तर ती खदखदून हसतील. त्यांच्या दृष्टीने फरचे झाड म्हणजे हिवाळ्याच्या मधल्या काळातील आनंदी उत्सव, अभ्यासानंतरची सुटी.

अनेक प्राचीन धार्मिक विधी मंत्र अजूनही मुलांच्या गाण्यांमधून टिकून आहेत.

पावसा, पावसा, निघून जा! ..
पावसा, पावसा, आणखी पड! ..

पावसाला बोलावण्यासाठी अगर पावसाच्या ढगांना पळवून लावण्यासाठी म्हणून हे गाणे मुले मुळीच गात नाहीत. शब्दांमुळे पावसावर काहीही परिणाम घडणार नाही हे त्यांना चांगले माहीत आहे. गाणे म्हणायला त्यांना मजा वाटते, म्हणून केवळ ती गातात.

आणि एकेकाळी अगदी दुसरा हेतू असलेली गाणी म्हणायला व खेळ खेळायला प्रौढांनासुद्धा काही हरकत वाटत नाही.

अशा रीतीने प्राचीन धर्मविधी आणि श्रद्धा मजेदार खेळांमधून आपल्या काळापर्यंत टिकून राहिले आहेत.

पण केवळ खेळांमधूनच ते टिकून राहिले नाहीत.

चर्चमध्ये ईस्टरच्या प्रार्थना होतात, तेव्हा प्रार्थनांमधील शब्दांमधून प्राचीन मांत्रिक गाण्यांचे प्रतिबिंब दिसते.

आदिकाळातील शेतकऱ्यांच्या गाण्यांप्रमाणे ह्या प्रार्थना मृत्यू व पुनर्जन्माबद्दल बोलतात.

चर्चबाहेर ज्यांचे खेळात व नाचात रूपांतर घडले, त्या गोष्टी चर्चच्या आत तशाच धार्मिक विधींच्या रूपात राहिल्या.

अनेक भाबड्या श्रद्धा आणि दूषित पूर्वग्रह प्राचीन काळापासून आपल्यापर्यंत टिकून राहिलेत.

अजून असे लोक भेटतात, ज्यांची श्रद्धा असते की, घोड्याचा नाल सापडला म्हणजे भाग्य लाभते आणि चंद्राची नवी कोर डाव्या बाजूने पाहिल्यास काहीतरी संकट येते.

ऊग्लीचमधील एका सामुदायिक शेतकरी बाईने आम्हाला सांगितले की, क्रांतीपूर्वीच्या काळात त्यांच्या खेड्यात शेतकरी कोंबड्यांच्या खुराड्यावर "कोंबडीचा देव" टांगून ठेवत.

हा "कोंबडीचा देव" म्हणजे मध्यभागी भोक असलेला एक दगड. कोंबड्यांनी चांगली अंडी घालावीत म्हणून तो टांगून ठेवत.

भाबड्या श्रद्धा काहीवेळा अशा टिकून राहतात. दगडाचा देव – पाषाणयुगातील एक अवशेष – थेट विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत टिकून राहिला.

अद्भुत भांडार

त्या काळात बायका जेव्हा कुदळींनी जमीन खणत होत्या, तेव्हा पुरुष काही स्वस्थ बसत नव्हते. सबंध दिवस ते शिकारीत घालवायचे. शिकारीची ओझी सोबत घेऊन संध्याकाळी उशीरा ते घरी परतायचे.

शिकार यशस्वी झाली अथवा नाही हे लौकर समजावे म्हणून स्वतःचे बाप आणि थोरले

भाऊ दूरवर दिसताच मुले त्यांना भेटायला धावत जायची. तोंडाबाहेर वाकडे सुळे डोकावणारे रानडुकराचे रक्ताळलेले मुंडके अथवा हरीणाची लोंबणारी शिंगे ती मुले कुतूहलाने पहायची. पण शिकाऱ्यांनी जर स्वतःसोबत जिवंत जनावरे आणली – छोटी भेदरलेली मेंढीची कोकरे अथवा असहाय, शिंग नसलेले वासरू – तर मुलांना खूप आनंद व्हायचा.


ह्या चार पायांच्या कैद्यांना शिकारी ताबडतोब ठार मारत नसत. कैद्यांना बंद आवारात ठेवत आणि त्यांची वाढ व्हावी म्हणून त्यांना खाऊ घालत. घराशेजारी वासरांचे हंबरणे आणि कोकरांचे बेंबटणे ऐकले, म्हणजे शिकाऱ्यांचे मन शांत होई. शिकार फसली तरी ते मांसाविना उपाशी राहणार नाहीत, अशी त्यांची खात्री पटायची. कोंडवाड्यात त्यांच्यापाशी आता मांसाचे साठे असायचे व विशेष म्हणजे हे साठे आपोआपच मोठे व्हायचे आणि त्यांची संख्या वाढायची.

आरंभी केवळ मांस व कातडीसाठी माणसे गुरांना बाळगत. पशुपालनाचे सगळे फायदे त्यांना एकदम समजले नाहीत. शिकारी गुरांना स्वतःचे सावज समजत आणि सावजाला ठार मारायची त्यांना सवय होती. गायीला अथवा मेंढीला ठार मारण्यापेक्षा जिवंत ठेवणे जास्त फायद्याचे होते, हे त्यांना समजणे अवघड गेले.

गायीचे मांस फक्त एकदाच खाता येते, पण तिचे दूध अनेक वर्षेपर्यंत ओळीने पिता येते. शिवाय हिशोब केला तर तिच्यापासून शेवटी जास्त मांस मिळते, कारण प्रत्येक गाय दरवर्षी एका वासराला जन्म देते.

मेंढीच्या बाबतीत तसेच. तिची कातडी सोलून काढणे सोपे होते. पण एका कातडीचा फारसा उपयोग नाही. त्यापेक्षा मेंढीची कातडी तशीच ठेवून तिची लोकर कापणे अनेक पटींनी फायद्याचे. कारण प्रत्येक कापणीनंतर लोकर परत वाढते. त्यामुळे एका मेंढीपासून एक नव्हे, दहा कातड्या मिळू शकतात.

चार पायांच्या कैद्यांना ठार मारण्याऐवजी, त्यांना जीवदान देणे आणि त्यांच्यापासून खंडणी घेणे अधिक फायद्याचे होते.



चार पायांचे कैदी (गुंफेच्या भिंतीवर खरवडलेले चित्र)

गाय, मेंढी, घोडा ह्यांना माणसाळवून त्यांचे स्वतःच्या इच्छेप्रमाणे माणूस संगोपन करू लागला. त्यांना थंडीच्या मोसमात निवारा मिळावा, ती उपाशी राहू नयेत, अशी तो काळजी घेऊ लागला. पण त्यामुळे गायीला पूर्वीपेक्षा जास्त दूध द्यावे लागले, कारण फक्त वासरालाच नव्हे, तर धन्यालाही दूध देणे आवश्यक ठरले. कोणत्याही प्रकारचे ओझे वाहून नेण्याची घोड्याला सवय लागली. मेंढयांना आता स्वतःसाठी आणि माणसासाठीही लोकर पुरू लागली.

सर्वांत दुधाळ गायी, सर्वांत लांब लोकरीच्या मेंढया व सर्वांत बळकट घोडेच फक्त माणसे कळपात बाळगू लागली. अशा रीतीने घरगुती जनावरांच्या नवनव्या जाती हळूहळू निर्माण होऊ लागल्या.

पण हे सर्व लोकांना एकदम सुचले नाही. शिकाऱ्याचे पशुपालकात रूपांतर होण्यापूर्वी अनेक शतके उलटावी लागली.

सरतेशेवटी काय आढळले?

लोकांना स्वतःसाठी अद्भुत भांडार गवसले. गोळा केलेले धान्य त्यांनी जमिनीत लपवले आणि जमिनीने एका दाण्याऐवजी अनेक दाणे परत केले.



जुन्या रूढीला धरून, इजिप्तमधील लोक देवांची चित्रे **जनावरांची अथवा पक्ष्यांची** मुंडकी असलेल्या माणसांच्या रूपात काढत

शिकारीची सावजे त्यांनी जिवंत ठेवली व सावजांची संख्या वाढली आणि ती मोठी झाली.

माणूस अधिक स्वतंत्र बनला, निसर्गावरील त्याचे अवलंबून राहणे कमी झाले. पूर्वी त्याला कधीही माहीत नव्हते—जनावराचा माग धरून त्याला ठार मारणे शक्य होईल अथवा नाही, करंडीभर धान्य गोळा होईल अथवा नाही. निसर्गातील गूढ शक्ती त्याला खाद्य पाठवायच्या किंवा पाठवायच्या नाहीत. आता निसर्गाला मदत करायला माणूस शिकला: कणसे पिकवायला तो शिकला, गायी आणि मेंढ्या पाळायला शिकला. कणसांच्या शोधासाठी आता बायकांना दूर जावे लागत नव्हते. जंगलात जनावराचा शोध घेण्याची, त्याचा माग काढण्याची शिकाऱ्यांना गरज नव्हती.

कणसे घरापाशी पिकत होती. गायी आणि मेंढ्या जवळच चरत होत्या.

माणसाने स्वतःसाठी अद्भुत भांडार शोधून काढले. पण त्याने भांडार शोधले असे म्हणण्यापेक्षा स्वतःच्या श्रमांनी निर्माण केले, असे म्हणणे अधिक बरोबर ठरेल.

शेते व कुरणांसाठी जमीन आवश्यक होती. ही जमीन जंगलापासून हिरावून घेणे भाग होते. नंतर पेरणीपूर्वी तिला खणणे आणि उकरणे आवश्यक होते. फार प्रचंड श्रम करावे लागले!

निसर्गापासून स्वातंत्र्याकडे, स्वाधीनतेकडे जाताना माणूस सहज फिरायला गेल्याप्रमाणे गेला नव्हता, तर हजारो अडथळ्यांना पार करून त्याला स्वतःची वाट काढावी लागली. नव्या उद्योगांमध्ये आनंद होते, तशा चिंताही होत्या. सूर्य पीक जाळू शकत होता, कुरणांमधले गवत जाळू शकत होता. पाऊस धान्य कुजवू शकत होता.

आदिशिकारी रानगव्यापाशी अथवा अस्वलापाशी विनंती करायचा, की त्यांनी त्याला स्वतःचे मांस द्यावे. आदिशेतकऱ्याने जमिनीपाशी, आकाशापाशी, सूर्यापाशी, पाण्यापाशी विनंती केली, की त्यांनी त्याला पीक द्यावे.

लोकांनी नवे देव निर्माण केले. हे देव अजून पूर्वीच्या देवांसारखे दिसतात. जुन्या रीतीप्रमाणे त्यांना जनावराच्या अथवा जनावराचे डोके असलेल्या माणसांच्या स्वरूपात चितारतात. पण ह्या जनावरांना नवी नावे आणि नवे उद्योग आहेत.

एकाला **नभ** म्हणतात, दुसऱ्याला **सूर्य** म्हणतात, तिसऱ्याला **धरती** म्हणतात. प्रकाश आणि अंधार पाठवणे, पाऊस आणि दुष्काळ पाठवणे, ही त्यांची कामे.

आपला महाबलाढ्य माणूस वाढला, अधिक बळकट बनला, पण अजूनही त्याला स्वतःच्या ताकदीची जाणीव नाही. त्याची पूर्वीप्रमाणेच श्रद्धा आहे, की नभ त्याला भाकरी देते, त्याचे स्वतःचे श्रम नव्हेत.

प्रकरण नववे

काटा पुढे सरकवला

इतिहासाचा काटा काही हजार वर्षांनी पुढे सरकवू. मग आपल्या काळापासून फक्त पन्नास शतकांचे अंतर राहील.

पन्नास शतके! एका माणसाच्या आयुष्याबद्दल अथवा एकूण लोकांबद्दल बोलताना हा काळ फार मोठा आहे. पण आपण एका विशिष्ट माणसाबद्दल नव्हे, तर मानवजातीबद्दल बोलत आहोत.

मानवजात सुमारे दहा लाख वर्षांची आहे. तिच्या दृष्टीने पन्नास शतके म्हणजे फार नव्हेत.

तर काटा पुढे सरकवला. पृथ्वीने सूर्याभोवती आणखी काही हजार प्रदक्षिणा केल्या. ह्या काळात पृथ्वीवर काय घडले? पहिल्याच दृष्टीक्षेपात दिसते की, तिला टक्कल पडलेय.

हिमाच्या पांढऱ्या टोपीभोवती काळी, कुरळी घनदाट जंगले होती तो काळ फार पूर्वीचा होता काय! आता जंगले विरळ बनली, त्यांच्यात विस्तीर्ण मैदानांच्या जिभा पसरल्या. दाट झाडीत अधूनमधून मोकळी कुरणे डोकावू लागली. नद्या व सरोवरांपासून जंगले मागे हटली. किनाऱ्यांवर लव्हाळी आणि झुडूपे उरली.

तेथे नदीच्या वळणाशी टेकडीवर काय आहे? उतारावर जणू पिवळा रुमाल टाकलाय...

माणसाच्या हातांनी बदलून टाकलेला हा जमिनीचा तुकडा आहे. कणसांमध्ये पाठींवर ओणव्या झालेल्या बायका आहेत. त्यांचे कोयते कणसांवर सपासप चालताहेत.

हातोड्याशी आपली फार पूर्वीच भेट झालीय, पण कोयता प्रथमच पहात आहोत. आपल्या आत्ताच्या कोयत्याशी त्याचे मुळीच साम्य नाही. गारगोटीचा दगड व लाकूड यांपासून तो बनवलाय. लाकडी चौकटीत दगडी पाती बसवलीत.

आपण पाहिलेले शेत — पृथ्वीवरील पहिल्या शेतांपैकी एक. जंगली, माणसाने स्पर्श न केलेल्या निसर्गात असे पिवळे रुमाल अजून खूप कमी आहेत.

कणसांना चहूबाजूंनी तण रेटते आहे. तणाशी लढा कसा करायचा हे माणसांना अजून माहीत नाही. तरीसुद्धा कणसांचा विजय होतो. एक वेळ येईल आणि जमिनीवर ती पिवळा महासागर पसरवतील.

नदीजवळच्या हिरव्या कुरणावर दूरवर काही छोट्या आकृती दिसतात: पांढऱ्या, पिवळ्या, ठिपकेदार. आकृती हलताहेत, कधी अलग होतात, तर कधी परत एकत्र येतात.

काही आकृती मोठ्या आहेत, काही छोट्या आहेत. हे गायींचे, बकऱ्यांचे व मेंढ्यांचे कळप. माणसाच्या श्रमांमार्फत बदललेले, माणसाळलेले असे प्राणी अजून कमी आहेत. पण ह्या प्राण्यांच्या जंगली नातेवाईकांपेक्षा ह्यांची संख्या लौकर वाढेल. त्यांच्या जंगली भाईबंदांना स्वतःची काळजी स्वतःच वाहावी लागते.

आणखी दोन-तीन हजार वर्षे जातील व पाळीव बैल-गायींपेक्षा जंगली बैलांची पृथ्वीवरील संख्या कमी होईल.

शेते, गुरांचे कळप... म्हणजे आसपास कुठेतरी माणसांची वस्ती असणार. ती पहा— नदीच्या उंच तीरावर. ही आता पूर्वीची शिकारी छावणी नव्हे. खांब आणि फांद्यांची लाकडी खोपटे इथे नाहीत. त्याऐवजी चांदई छपराची अस्सल लाकडी घरे आहेत. घरांच्या भिंतींना चिकणमाती थापलीय. दाराशी छपराचा वासा पुढे आलाय. त्यावर लाकडात कोरलेले शिंगवाल्या बैलाचे मुंडके लावलेय. बैल म्हणजे घराची राखण करणारा देव. संपूर्ण वस्तीभोवती उंच खुंटांचे आणि मातीच्या तटांचे कुंपण आहे.

धुराचा, शेणाचा आणि धारोष्ण दुधाचा वास घमघमतोय.

घरांपाशी मुले खेळताहेत, चिखलात डुकरे आणि त्यांची पिले लोळताहेत. घराच्या उघड्या दारामधून आतील चूल पेटलेली दिसतेय. चुलीपाशी एक म्हातारी भाकऱ्या भाजतेय. प्रथम ती गरम राखेवर त्यांना ठेवते आणि त्यांच्यावर चिकणमातीचे मडके झाकते. हे मडके म्हणजे आपली भट्टी! जवळच बाकड्यावर नक्षीदार लाकडी वाट्या व कप.

वस्तीमधून बाहेर पडू व नदीकडे जाऊ. किनाऱ्यापाशी पाण्याने भरलेली होडी डुलतेय. जर आपण नदीवरून तिचा जेथे उगम होतो त्या सरोवरापर्यंत गेलो, तर तेथेही आपल्याला एक वस्ती आढळली असती, पण अगदी वेगळी दिसणारी. ही वस्ती किनाऱ्याशी उभी नाही, तर बेटाप्रमाणे—पाण्याच्या मध्यभागी.

सरोवराच्या तळाशी लाकडी ओंडक्यांचा पाया रचला. त्यांच्यावर खांब उभे केले व खांबांवर फळया टाकल्या. ह्या लाकडी बेटाकडे किनाऱ्यापासून पूल येतात. घरांच्या भिंतींवर जाळी व मच्छीमारीची साधने टांगलीत. सरोवरात भरपूर मासे आहेत असे दिसतेय. पण वस्ती-मधील माणसे केवळ मच्छीमारीवर जगत नाहीत. घरांच्या मध्यभागी टोकदार छपरांची गोलाकार कोठारे दिसतात. ही कोठारे वेताची बनविलेली आहेत. त्यांच्यात धान्य साठवतात. कोठारां-शेजारी गायींचे गोठे आहेत.

आपण कल्पनेने डोळ्यांसमोर ठळकपणे उभी केलेली ही प्राचीन वस्ती केव्हाच नाहीशी झालीय. कोणे एके काळी जेथे घरे उभी होती, तेथे पाणी पसरले आहे. सरोवराच्या तळाशी घरांचे अवशेष कसे शोधून काढायचे? हे अशक्य भासते. पण कधी कधी असे घडते की, सरोवर स्वतःच विभागते आणि शतकानुशतके त्याने जतन केलेल्या वस्तू आपल्या डोळ्यांसमोर उघड्या मांडते.

सरोवराची गोष्ट

१८५३ साली स्वित्झर्लंडमध्ये जोरदार दुष्काळ पडला होता. दऱ्यांमधील नद्या कोरड्या पडल्या. सरोवरांचे पाणी किनाऱ्यांपासून मागे हटले व गाळाने माखलेले त्यांचे तळ उघडे पडले. झूरीच सरोवराच्या काठी वसलेल्या ओबेरमेयलेन गावाच्या रहिवाशांनी त्या दुष्काळाचा फायदा घेऊन सरोवरापासून जमिनीचा तुकडा पदरात पाडण्याचे ठरविले.

त्यासाठी, पाण्यामधून बाहेर आलेल्या जमिनीला आणि सरोवराला अलग करणारा बांध घालणे आवश्यक होते.

सरोवरावर काम सुरू झाले. सुंदर सुंदर पोषाख घालून रविवारच्या दिवशी जेथे निळ्या व हिरव्या नौकांमधून नागरिक जलविहार करीत, तेथे आता गाडीवान बांधाकडे माती वाहून नेताना घोड्यांवर खेकसू लागले. सरोवराच्या कोरड्या पडलेल्या तळाचीच माती बांधासाठी वापरत होते. आणि जमीन खोदणाऱ्या एकाचे फावडे अचानक अर्धवट कुजलेल्या ओंडक्यावर आपटले. एका ओंडक्यापाठोपाट दुसरा, तिसरा सापडला. ह्या ठिकाणी कधीतरी माणसे काम करीत होती हे स्पष्ट झाले. फावड्याच्या प्रत्येक घावाबरोबर दगडी कुऱ्हाडी, मासे धरण्याचे आकडे, मातीची मडकी बाहेर पडू लागली. पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी ह्या कामात लक्ष घातले.



न्यू गिनीमध्ये आतामुद्धा पाण्याच्या मध्यभागी फळ्यांवर वसलेले खेडे पहायला मिळते



झूरीच सरोवरात कोणे एके काळी उभ्या असलेल्या वस्तीचे चित्र काढण्याचा संशोधकांनी प्रयत्न केला

सरोवराच्या तळाशी सापडलेल्या प्रत्येक ओंडक्याचा, प्रत्येक वस्तूचा अभ्यास करून, झूरीच सरोवरावरील खांबांवरच्या वस्तीचे चित्र त्यांनी पुस्तकाच्या पानांवर रेखाटले.

खांबांचा आधार घेऊन फळ्यांवर उभारलेली तशाच प्रकारची खेडी कोणे एके काळी रशियात क्ल्याझ्मा नदीवर होती. ही जागा आताच्या मॉस्को शहराच्या नजीक आहे. मूरोम गावात वेलेत्मा नदीवरही तशी वस्ती आढळली. तेथे माशांची खूप हाडे, हार्पून, मासे धरण्याचे आकडे मिळाले...

अलीकडेच पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी स्वित्झर्लंडमध्ये न्यूशातेल सरोवराचे संशोधन केले. तळाशी काही छेद घेताच त्यांना आढळले की, तेथे अनेक थरांपासून तळ बनवला होता.

पाय पक्वान्नात भरलेल्या पदार्थापासून वरचे पिठाचे कवच अलग करणे जसे सोपे असते, त्याचप्रमाणे इथे एक थर दुसऱ्या थरापासून सहज वेगळा करता येत होता. खाली वाळूचा थर

होता, मग मानवी वस्तीच्या अवशेषांसकट गाळाचा थर, सामान व हत्यारे, नंतर – परत वाळू. अशी अनेकदा पुनरावृत्ती. फक्त एका ठिकाणी, वाळूच्या दोन थरांदरम्यान कोळशाचा जाड थर होता.

हे सगळे थर कसे तयार झाले?

वाळू पाण्याने आणली असेल. पण कोळसा कुठून आला?

इथे अग्नी काम करीत होता हे स्पष्ट झाले.

थरांचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांना सरोवराचा सर्व इतिहास माहीत झाला. फार फार वर्षांपूर्वी केव्हातरी माणसे आली व सरोवराच्या किनाऱ्यावर त्यांनी वस्ती मांडली. नंतर अनेक वर्षांनी, सरोवराचे पाणी वाढले व किनारा पाण्याखाली बुडाला.

पाण्यात बुडालेली वस्ती सोडून माणसे निघून गेली. बांधकामे पाण्यात कुजली व मोडून पडली. छपरांच्या वाशांखाली कोणे एके काळी पोकोळ्यांनी जेथे घरटी बांधली होती, तेथे छोटचा मासोळींच्या झुंडी आता सुळकांडचा मारत होत्या. घराच्या कोसळून पडलेल्या दारां-मधून तीक्ष्ण दातांचा पाईक पोहत होता. चुलीजवळच्या बाकडचाखाली खेकडयांच्या नांग्या वळवळत होत्या. ते उध्वस्त अवशेष लौकरच गाळात बुडून गेले व नंतर त्यांच्यावर वाळूचा थर बसला.

पण सरोवर न बदलता तसेच राहिले नाही. पाणी हळूहळू किनाऱ्यांपासून मागे हटू लागले, तळ उघडा पाडू लागले. कोणे एके काळी जेथे वस्ती उभी होती तो वाळूचा पट्टा जगात अवतरला. पण आता वस्ती दिसत नव्हती. तिचे अवशेष वाळूत खोलवर पुरले गेले होते.

किनाऱ्यावर परत माणसे आली. कुऱ्हाडींचे आवाज घुमू लागले. पिवळ्या वाळूत लाकडाचे तुकडे उडू लागले. नवी भक्कम घरे किनाऱ्यावर एका पाठोपाठ एक उभी राहिली.

अशा रीतीने आलटून पालटून भाग्य बदलत माणसे व सरोवर यांच्यातील लढा चालू होता. माणसे घरे उभारायची, सरोवर त्यांना उध्वस्त करायचे.


सरतेशेवटी लोकांना ह्याचा वीट आला. त्यांनी पाण्याशेजारी नव्हे, तर पाण्यावरच वस्ती केली. सरोवराच्या तळात उंच ओंडके रोवून. फळयांच्या फटींमधून त्यांना खालचे खोल पाणी दिसायचे. आता त्यांना पाण्याचे भय वाटत नव्हते. पाण्याची पातळी कितीही वर चढली तरी त्यांना चिंता वाटत नव्हती. फळयांपर्यंत पाणी चढणे शक्य नव्हते.

पाण्याशिवाय माणसांचा आणखी एक वैरी होता – अग्नी.

प्राचीन काळी, माणसे जेव्हा गुंफांमध्ये रहात होती, तेव्हा अग्नी भयानक वाटत नव्हता. गुंफेच्या दगडी भिंती जळून जाणे शक्य नव्हते.

पण पहिल्या लाकडी घरांबरोबर पहिल्या आगी आल्या. तांबडचा आगीच्या जनावराने कित्येक हजार वर्षे माणसाची सेवा केल्यानंतर आता स्वतःच्या नख्या बाहेर काढल्या होत्या.

न्यूशातेल सरोवराच्या तळाशी सापडलेला कोळशाचा जाड थर – म्हणजे प्राचीन आग.



प्राचीन काळी जेथे फळयांवरील खेडे होते, तेथे स्कॉट लोकांना हे सापडले

सरोवरावर तेव्हा फार भयंकर होते! जीव वाचविण्यासाठी माणसांनी मुलांना उरांशी कवटाळून पाण्यात उड्या मारल्या. बिथरलेली गुरे गोठ्यांमध्ये ओरडत होती. पण त्यांची सुटका करायला माणसांपाशी सवड नव्हती. लाकडी वस्ती एखाद्या प्रचंड शेकोटीप्रमाणे धगधगत होती व चौफेर ठिणग्या उडवत होती.

वस्तीत राहणाऱ्या माणसांच्या दृष्टीने ती आग म्हणजे मोठे संकट होती.

पण त्यांची घरे जाळणाऱ्या त्याच अग्नीने आपल्यासाठी, आपल्या वस्तुसंग्रहालयांसाठी, अमूल्य वस्तू जतन केल्या: लाकडी भांडी, मासे पकडायची जाळी, एवढेच नव्हे तर धान्याचे दाणे व वनस्पतींचे दांडोरे.

ह्या वस्तू जाळून टाकणे सहज शक्य असताना, कोणत्या अद्भुत शक्तीमुळे अग्नीने ह्या वस्तू आपल्यासाठी जपून ठेवल्या?

असे घडले.

पेटलेल्या वस्तू पाण्यात पडल्या. पाण्याने त्यांचे रक्षण केले – आग विझवून टाकली. वस्तूंची हानी न होता त्या तळाशी बुडाल्या. तेथे त्यांना दुसरा धोका भेडसावत होता: त्या कुजणे शक्य होते. पण त्यांचा जळून कोळसा बनल्यामुळे कुजण्यापासून वाचल्या. कोळशाच्या पातळ आवरणामुळे त्या कुजल्या नाहीत.

अग्नी व पाणी वेगवेगळ्या रीतींनी वागले असते, तर ह्या वस्तू नष्ट झाल्या असत्या. पण ते एकत्र वागले. त्यामुळे हजारो वर्षांपूर्वी विणलेल्या कापडाच्या तुकड्यासारखी नाजुक वस्तूसुद्धा आपल्यासाठी शिल्लक उरली.

पहिले कापड

पहिले कापड यंत्रावर विणले नव्हते, ते हातांनी विणले होते.

अजूनसुद्धा एस्कीमो माग वापरत नाहीत, ते हातांनी कापड विणतात. ते एका चौकटीला उभे धागे बांधतात. मग धोटा न वापरता हातांनी आडवे धागे गुंफत जातात.


आधुनिक यंत्रमागाशी त्या छोटया लाकडी चौकटीची तुलना करणे अवघड आहे. तरीसुद्धा, आधुनिक यंत्रमागाचे मूळ ह्या साध्या लाकडी चौकटीत आहे.

सरोवराच्या तळाशी सापडलेला जळका, काळा कपड्याचा तुकडा आपल्याला माणसाच्या जीवनातील एक फार महत्त्वाची घटना सांगतो. पूर्वी जनावरांच्या कातडी पांघरणारा माणूस आता तागापासून कृत्रिम कातडी बनवत होता आणि ह्या तागाची तो शेतात लागवड करत होता.


तागाचा जन्म होण्याआधी हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या सुईने अखेरीस स्वतःला लायक काम पत्करले: कातडी न शिवता तागाच्या कापडाचे तुकडे ती शिवू लागली.

निळ्या फुलांच्या तागाच्या शेतांनी बायकांना खूप नव्या उठाठेवी व चिंता दिल्या.

कोयता चालवून दमलेल्या हातांना अजून विश्रांती मिळाली नाही, तोच तागाला मूळापासून उपटण्याचे काम हाती घ्यावे लागत होते. मग तागाला सुकवून, धुवून, परत सुकवायचे. एवढ्यावरच सगळे संपत नव्हते. सुकवलेला ताग तोडायचा, झटकायचा, विंचरून काढायचा. आणि खेड्यातील पोरांच्या स्वच्छ धुतलेल्या केसांप्रमाणे अखेरीस विंचरलेला पांढरा ताग तयार



फळ्यांवरील [घरांच्या] अवशेषांमध्ये सापडलेला कापडाचा तुकडा



पहिले कापड विणण्याचे हातमाग बहुधा ह्या ब्राझिलच्या इंडियनांच्या हातमागासारखे होते

व्हायचा. त्यानंतर चात्या फिरू लागत, तागाचे धागे बनत. धागा बनल्यानंतर केवळ विणायला आरंभ व्हायचा.

तागाशी बायकांना खूप खटपट करावी लागायची, पण त्यामुळे आता त्यांच्यापाशी सुरेख रुमाल, मलवस्त्रे, रंगीत किनारीचे घागरे होते.

पहिले खाणकामगार आणि धातुकामगार

आता प्रत्येक घरात कृत्रिम साहित्यापासून बनविलेल्या अनेक वस्तू आढळतील—निसर्गात न सापडणाऱ्या साहित्यापासून.

निसर्गात विटा नाहीत, चिनी माती नाही, बिडाचे लोखंड नाही, कागद नाहीत. चिनी माती अथवा बिडाचे लोखंड प्राप्त करण्यासाठी माणसाला निसर्गातून साहित्य घेऊन त्यांचे ओळखू न येणाऱ्या प्रकारात रूपांतर करावे लागत होते. ज्या खाणमातीला वितळवून बिडाचे लोखंड बनवतात, त्याचे त्या मातीशी साम्य आहे का? अगदी पातळ, पारदर्शी चिनी मातीच्या पेल्याचे त्याला घडविणाऱ्या चिकणमातीशी साम्य दाखविणे शक्य आहे का?

काँक्रीट, पारदर्शक कागद, प्लास्टिक, कृत्रिम रेशिम, कृत्रिम रबर यांचे काय? डोंगरांमध्ये काँक्रीटचा कडा सापडेल? आणि लाकडापासून रेशिम बनवणारा किडा कुठे आहे?

वस्तुमात्रावर प्रभुत्व मिळवून माणूस निसर्गाच्या कर्मशाळेत अधिकाधिक खोलवर घुसतो. दगडाला दगडाने तासण्यापासून त्याने आरंभ केला. आता तो डोळ्यांना दिसू न शकणाऱ्या अत्यंत सूक्ष्म कणांपासून हत्यारे बनवितो.

हे काम खूप पूर्वी सुरू झाले, जेव्हा रसायनशास्त्र उदयाला आले नव्हते, वस्तुमात्राच्या शास्त्राची निर्मिती झाली नव्हती. आपण काय करतोय ह्याची जाणीव नसताना माणूस वस्तू बदलायला शिकला.

पहिल्या कुंभारांनी जेव्हा चिकणमाती भाजली, तेव्हा त्यांच्या नकळत त्यांनी वस्तूवर प्रभुत्व मिळवले. हे काम सोपे नव्हते. दगडाला हवा तसा आकार देता येतो त्याप्रमाणे वस्तूच्या अत्यंत बारीक कणांना मनासारखा आकार देणे, त्यांना नव्याने घडविणे शक्य नसते. इथे हातांचे बळ नव्हे, तर वस्तूला नवा आकार देऊ शकणाऱ्या दुसऱ्या शक्तीची गरज होती.

आणि माणसाने अग्नीला जेव्हा मदतीला घेतले, तेव्हा त्याला ही शक्ती गवसली. अग्नी चिकणमाती भाजत होता व पिठाची भाकरी बनवत होता. तो तांबे वितळवत होता.

दगडी हत्यारांबरोबरच सरोवरांच्या तळाशी आपल्याला तांब्याची हत्यारे आढळतात.

हजारो वर्षे दगडाची हत्यारे बनविणाऱ्या माणसाने अचानक धातूपासून हत्यारे बनविण्याची कला कशी काय अवगत केली? आणि त्याला धातू कुठे सापडली?

जेव्हा आपण जंगलांमधून आणि मैदानांमधून भटकतो, तेव्हा आपल्या नजरेला तांब्याचे तुकडे पडलेले दिसत नाहीत. मूळ स्वरूपातील तांबे आपल्या काळात दुर्मिळ बनलेय. पण नेहमीच अशी परिस्थिती नव्हती. काही हजार वर्षांपूर्वी आजच्यापेक्षा अनेकपटींनी अधिक वेळा तांबे सापडायचे. लोकांच्या पायांखाली तांबे विपुल प्रमाणात लोळत पडलेले असायचे, पण लोक त्या-च्याकडे लक्ष देत नसत. कारण गारगोटीच्या दगडापासून ते आपली हत्यारे बनवत होते.

जेव्हा गारगोटी अपुरी पडू लागली, तेव्हा कुठे लोकांचे लक्ष तांब्याकडे गेले. गारगोटीचा तुटवडा पडण्याचे कारण माणसांनी गारगोटीचा जपून वापर केला नाही. काम करताना त्यांनी गारगोटीच्या बारीक बारीक तुकड्यांचे प्रचंड ढीग स्वतःभोवती निर्माण केले, ज्यांचा पुढे काही उपयोग नव्हता. आत्तासुद्धा जुळणीकाराच्या कर्मशाळेत बारीक तुकडे किती पडलेत त्यावरून त्याचे कसब ओळखता येते.


लाखो वर्षांच्या काळात चांगल्या गारगोटीचे साठे नाहीसे झाले.

अनेक देशांमध्ये गारगोटीचा दुष्काळ पडला. ही मोठी आपत्ती होती. कल्पना करा, जर आपल्याकडे लोखंडाचा तुटवडा पडला असता, तर आपल्या कारखान्यांचे व गिरण्यांचे काय झाले असते. लोखंडाचा शोध घेण्यासाठी आपल्याला जमिनीत खूप खूप खोलपर्यंत लोहखनिजाची माती खणून काढावी लागली असती.

प्राचीन लोकांनी तसेच केले. त्यांनी खाणी खणण्याचे काम हाती घेतले — जगातील पहिल्या खाणी.

दहा ते बारा मीटर खोल अशा प्राचीन खाणी चुनखडीच्या साठ्यांमध्ये कुठे कुठे सापडतात. याचे कारण चुनखडी व गारगोटी अनेकदा जवळ जवळ आढळतात.

त्या काळात जमिनीखाली काम करताना माणसांना फार भीती वाटायची. दोरीच्या साह्याने अथवा खाचा पाडलेल्या खांबाच्या साह्याने खाणीत उतरावे लागत होते. खाली अंधार व धूर. लाकडाच्या जळक्या ढलप्याच्या अथवा छोट्या तेलाच्या दिव्याच्या उजेडात माणसे काम करीत. आता सुरक्षिततेसाठी खाणींमध्ये लाकडाचे भक्कम आधार लावतात. पण त्या काळी



सोविएत संघाच्या दक्षिणेस उत्खननात आढळलेली प्राचीन चूल

जमिनीखालील बोगद्याच्या भिंतींना व छताला असे भक्कम आधार लावणे कुणाला माहीत नव्हते. ढासळलेल्या दगडांखाली अनेकदा माणसे गाडली जात. प्राचीन गारगोटींच्या खाणींमध्ये चुनखडीच्या ढिगांखाली ठार झालेल्या खाणकामगारांचे सापळे सापडतात व त्यांच्या शेजारी त्यांची हत्यारे आढळतात – हरीणाच्या शिंगांपासून बनवलेले पिकाव.

एका जागी दोन सापळे सापडले: प्रौढ माणसाचा एक सापळा व दुसरा लहान मुलाचा. असे दिसते की, बाप मुलाला सोबत घेऊन कामावर आला आणि दोघेही अपघातात ठार झाले.

दर शतकाबरोबर गारगोटीचे साठे कमी होत गेले, गारगोटी मिळविणे जास्त जास्त अवघड बनत गेले. पण गारगोटी माणसाच्या दृष्टीने अत्यावश्यक होती. गारगोटीपासून कुऱ्हाडी, सुरे व कुदळी बनवीत होते.

गारगोटीऐवजी दुसरी एखादी वस्तू वापरणे भाग होते.

इथे नैसर्गिक स्थितीतील तांब्याने लोकांना मदत केली. लोक तांबे न्याहाळू लागले: हा कसला हिरवा दगड आहे, त्याचा आपल्याला काही उपयोग होईल काय?

तांब्याचा तुकडा घेऊन माणसे त्याच्यावर हातोडयाचे प्रहार करू लागली. तांब्याला ती दगड समजत होती, म्हणून गारगोटीवर जसे काम करीत, तशा पद्धतीने माणसे तांब्याशी झटापट करू लागली. हातोडयाच्या प्रहारांमुळे तांब्याचा तुकडा जास्त घट्ट बनायचा व त्याचा आकार बदलायचा. पण प्रहार कसे करायचे हे जाणायला हवे होते. फार जोरात प्रहार केल्यास तांबे टिसूळ बनायचे आणि फुटून त्याचे तुकडे उडायचे.

अशा रीतीने माणूस धातू प्रथम घडवू लागला. धातूवर काम करू लागला. पण हे थंड घडवणे होते. थंडया घडवण्यापासून गरम भट्टीत धातू घडवण्याची क्रिया फार दूर नव्हती.

नैसर्गिक तांब्याचा तुकडा अथवा तांब्याची खनिज माती कधी कधी शेकोटीत पडायची. किंवा माणसाने चिकणमाती जशी भाजून पाहिली, तसे तांबे मुद्दाम जाळून पाहिले असावे. जेव्हा शेकोटी विझून गेली, तेव्हा राखेच्या ढिगाऱ्यात खाली वितळलेल्या तांब्याचा वाटोळा गोळा आढळला.

स्वतःच्या हातांनी घडविलेल्या त्या "चमत्कारा" कडे माणसे चकित नजरांनी पहात होती. त्यांना भासले की, तो चमत्कार त्यांनी घडवला नव्हता, तर हिरवट-काळसर रंगाच्या त्या दगडाचे चकचकीत तांबडया तांब्यात रूपांतर करण्याची किमया "अग्नीपिशाचा"ची होती.

तांब्याच्या वाटोळया गोळयाचे त्यांनी तुकडे पाडले आणि त्या तुकडयांवर दगडी हातोडयाने घण मारून त्यांच्या कुऱ्हाडी, पिकाव आणि कटचारी बनविल्या.

अशा रीतीने अद्भुत भांडारात माणसाला तेजस्वी, कठीण धातू सापडली. तो खनिजमाती शेकोटीत फेकायचा आणि ती माती तांबे बनून त्याच्याकडे परतायची.

हा चमत्कार माणसाच्या श्रमांनी घडविला.

रशियातील पहिले शेतकरी

गेल्या शतकाच्या अखेरीस, रशियन पुराणवस्तुशास्त्रज्ञ वि. वि. ख्वोयको यांना कीयेव प्रदेशातील त्रीपोले खेडयाजवळ प्राचीन शेतकरी वस्तीचे अवशेष सापडले.

मग अशा अनेक वस्त्या रशियाच्या दक्षिणेत आढळल्या.

सोविएत काळात त्यांचे संशोधन करण्याचे कार्य पास्सेक आणि बोगायेवस्की ह्या पुराणवस्तु-शास्त्रज्ञांनी हाती घेतले. त्यांच्या कामामुळे आपण आता पाच हजार वर्षांपूर्वीच्या शेतकऱ्यांचे जीवन स्पष्टपणे नजरेसमोर आणू शकतो.

त्या वस्तीभोवती उंच कुंपण होते. मध्यभागी गुरांच्या कोंडवाडयासकट चौक होता. चौकाच्या सभोवती टोकदार छपरांची, चिकणमातीचा गिलावा दिलेली लाकडी घरे उभी होती.

त्या काळात बनवलेली चिकणमातीची घराची प्रतिकृती अजूनही सुरक्षित असलेली सापडली. बहुधा हे छोटे घर म्हणजे खेळणे नसावे, तर कसल्यातरी मांत्रिक हेतूसाठी बनविले असावे. बायकांच्या आकृत्या असलेले तसले छोटुकले घर बनविले, तर अस्सल मोठ्या घराचे दुष्ट पिशाचांपासून, सर्व प्रकारच्या संकटापासून, रक्षण होईल अशी लोकांची समजूत असावी.

छोटुकल्या घराच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला चुलाणा आहे, डाव्या बाजूला उंचवटा आहे व त्यावर वेगवेगळया पदार्थांची साठवण करणारी मोठमोठी भांडी आहेत.

इथेच जात्यावर ओणव्या झालेल्या बाईची आकृती आहे. प्रवेशाच्या विरुद्ध दिशेला,

खिडकीपाशी देव्हारा. चुलाण्यापाशी आणखी एका बाईची आकृती – चुलाण्याची देखरेख करणारी.

असे घर एव्हाना घर म्हणण्यास लायक होते. त्याच्या छपराला वासे होते. निजण्याच्या जागेसकटचा चुलाणा रशियन खेड्यातील चुलाण्यांची आठवण करून देतो. भाजलेल्या घट्ट चिकणमातीची जमीन होती. चिकणमाती भाजण्यासाठी घर बांधत असताना जमिनीवर शेकोटी पेटवत. चिकणमाती लिंपलेल्या भिंतींवर नक्षी कोरल्या होत्या.

प्रत्येक घरात आडोशांनी अलग केलेल्या अशा अनेक खोल्या होत्या.

वस्त्यांमध्ये घरांखेरीज मोठे जमिनीखालचे निवारे आढळतात.

वस्तीतील रहिवाशांमध्ये कुशल कुंभार, लोहार आणि तांब्याचे कारागीर होते.

एक मीटर उंचीची भांडी कुंभार बनवू शकत होते व त्यांच्यावर रंगीबेरंगी नक्षी काढत होते. गुलाबी चिकणमातीच्या भांड्यांवर फिती, वेटोळी आणि झिरमिळ्यांची चतुर नक्षीकामे होती. त्या नक्षींमधून काही ठिकाणी डोळे विस्फारलेल्या माणसाचा चेहरा पाहिल्याचा भास होतो, तर कधी जनावर भासते, तर कधी सूर्य दिसतो.

वस्तीच्या जागी जमिनीत सापडलेली हत्यारे पाहता स्पष्ट आढळते, दगडी हत्यारांपासून तांब्याच्या हत्यारांकडे स्थित्यंतर कसे घडत गेले.

अत्यंत प्राचीन हत्यारे – सुरे, खरवडण्याची पाती, बाणांची टोके – गारगोटीची व हाडांची बनवलेली होती.

गारगोटीच्या कुदळीने अथवा हरीणाच्या शिंगाने जमीन खणत. लाकडी दांडा बसविण्यासाठी कुदळीच्या पात्यावर भोक पाडलेले होते.

गायीच्या खांद्याच्या हाडापासून अथवा लाकडापासून बनविलेल्या कोयत्याने पीककापणी करीत. लाकडी कोयता कणीस कापू शकत नव्हता. म्हणून त्याला गारगोटीचे धारदार दात जोडत.

ह्याच वस्त्यांवर पहिल्या तांब्याच्या हत्यारांना घडविण्याचे साचे आढळतात – रुंद पात्याच्या कुऱ्हाडी.

तेव्हा कोणती पिके पेरत होते हेसुद्धा आपल्याला माहीत आहे. कोलोमीयश्चीनो खेड्यातील घरांना फासलेल्या चिकणमातीमध्ये गव्हाचे, बार्लीचे, रायचे आणि बाजरीचे दाणे पुराणवस्तुशास्त्रज्ञांना सापडले.

श्रमाची दिनदर्शिका

काळाचे वर्षांमध्ये, शतकांमध्ये, हजार वर्षांमध्ये मोजमाप करण्याची आपल्याला सवय झालीय. पण प्राचीन माणसाच्या आयुष्याचा अभ्यास करणाऱ्यांना दुसऱ्या दिनदर्शिकेचा, काळाच्या दुसऱ्या मापाचा, वापर करावा लागतो. "अमूक इतक्या हजार वर्षांपूर्वी" असे म्हणण्या-

ऐवजी आपण म्हणतो : "प्राचीन पाषाणयुगात", "नव्या पाषाणयुगात", "ताम्रयुगात", "ब्राँझयुगात". ही वर्षाची नव्हे, तर श्रमाची दिनदर्शिका आहे. माणूस कुठल्या पायरीपर्यंत, कुठल्या स्थानकापर्यंत स्वतःच्या वाटेवरून पोहोचलाय ते ताबडतोब समजते.

साध्या "वार्षिक" दिनदर्शिकेत काळाची मोठी व छोटी मापे असतात : शतक, वर्ष, महिना, दिवस, तास.

श्रमाच्या दिनदर्शिकेतही स्वतःची मोठी व छोटी मापे असतात. उदाहरणार्थ, असे म्हणता येते : "पाषाणयुग, ओबडधोबड हत्यारांचा काळ," अथवा "पाषाणयुग, सुबक घडणीच्या हत्यारांचा काळ."

आमच्या कथनात आपण मानवजातीच्या इतिहासाच्या अशा पायरीपर्यंत पोहोचलोय, जेव्हा दगडी हत्यारांच्या जागी धातूची हत्यारे प्रचारात आली होती, जेव्हा शेती व पशुपालन सुरू झाले होते. श्रमविभागणीबरोबर वस्तूंची देवघेव सुरू झाली. जर कुठे तांब्याच्या कुऱ्हाडी निर्माण झाल्या, तर त्यांचा हळूहळू एका टोळीपासून दुसऱ्या टोळीपर्यंत प्रसार घडत होता.

धान्याऐवजी कातडी अगर कापडाऐवजी चिकणमातीची भांडी घेण्यासाठी माणसे होडक्यांमध्ये बसून एका खेड्यापासून दुसऱ्या खेड्यापर्यंत नद्यांवरून संचार करू लागली. एक टोळी तांब्याच्या बाबतीत श्रीमंत असायची, दुसरीपाशी भरपूर कुंभार असायचे. सरोवरावरील उंच फळ्यांवर वसलेल्या वस्तीमधील रहिवासी त्यांच्यापाशी अदलाबदल करण्यासाठी स्वतःच्या वस्तू घेऊन आलेल्या दुसऱ्या वस्तीच्या लोकांना भेटायचे. त्या वस्तूंबरोबर एक टोळी दुसऱ्या टोळीशी अनुभवांचीसुद्धा देवघेव करायची, श्रमाच्या नव्या तऱ्हा सांगायची.

इथे लोकांना खुणांच्या भाषेचा आश्रय घ्यावा लागायचा, कारण टोळ्यांच्या बोली भाषा भिन्न होत्या. असे होते तरीसुद्धा, जाताना पाहुणे सोबत फक्त परक्यांच्या वस्तूच नेत नव्हते, तर नकळत अवगत केलेले परकी शब्दही नेत होते. अशा रीतीने टोळ्यांच्या बोलीभाषा सरमिसळ बनल्या. त्याचवेळी प्रत्येक शब्दामागील अर्थ नव्या शब्दाबरोबर स्वीकारण्यात आला. स्वतःच्या देवांशेजारी परक्यांचे देवही येऊन बसले. अनेक धर्मांमधून नवे धर्म वाढीला लागले व भविष्यकाळात त्यांनी संपूर्ण देशांना ग्रासले.

देव प्रवास करू लागले. नव्या स्थळी त्यांना सतत नवी नावे देत. पण त्यांना ओळखणे सोपे आहे.



स्वतःच्या वस्तूंची परक्यांशी देवघेव करण्यासाठी लोक सागरांवरून आणि नद्यांवरून प्रवास करीत. चित्रात — प्राचीन स्कँडीनेव्हीयाचे गलबत



प्राचीन इजिप्तमध्ये देवघेवीचा व्यापार

प्राचीन लोकांच्या धर्मांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला एकच एक देव बाबीलोनीयाच्या ताम्यूझमध्ये, इजिप्तच्या ओझीरीसमध्ये आणि ग्रीकांच्या आदोनीसमध्ये सापडतो. प्राचीन शेतकऱ्यांचा मरणारा व पुनर्जन्म घेणारा देवसुद्धा हाच.

देवांचा प्रवास कसा घडत गेला हे काहीवेळा आपण नकाशावरसुद्धा दाखवू शकतो.

उदाहरणार्थ, आदोनीस देवाचे ग्रीसमध्ये आगमन सीरीया व यहुद्यांची वस्ती असलेल्या देशांमधून झाले. खुद्द "आदोनीस" हे नावच ह्याबद्दल बोलते. यहुद्यांच्या भाषेत त्याचा अर्थ "धनी." ग्रीकांना शब्दाचा अर्थ माहीत नव्हता, पण त्यांनी तो नाव म्हणून स्वीकारला.

वस्तू, शब्द, धर्म यांची देवघेव अशी घडत गेली.

देवघेव नेहमी शांततेने आणि संघर्ष न होता पार पडली असे म्हणता येणार नाही. तांबे, कापड, धान्य ह्यांना जबरदस्तीने हिसकावून घेणे "पाहुण्यांना" जेव्हा शक्य व्हायचे, तेव्हा तसे करायला ते लाजत नसत. त्याशिवाय देवघेवीत वारंवार लवाडया व्हायच्या, ती दिवसाढवळ्या केलेली दरोडेखोरी असायची. पाहुणे आणि यजमान हाती शस्त्रे घेत व बळाच्या जोरावर वादाचा निकाल लावत. परक्याला लुटणे व ठार मारणे पाप नव्हते.

वस्त्यांना किल्ल्यांचे स्वरूप प्राप्त झाले यात आश्चर्य नाही. पाहुणे अचानक टपकू नयेत म्हणून त्यांच्याभोवती मातीच्या तटांचे व खुंटांचे कुंपण घालू लागले.

परक्या टोळीच्या माणसांवर विशेष विश्वास ठेवत नसत. प्रत्येक टोळी स्वतःला माणसे म्हणवून घ्यायची, पण इतरांना माणसे समजायची नाही. स्वतःला म्हणवून घेत: "सूर्याची लेकरे," "आकाशीची माणसे", पण परक्यांना अपमानकारक टोपणनावे ठेवायची.

परक्या टोळीबद्दलच्या ह्या प्राचीन वैराबद्दल जेव्हा इतिहासकारांच्या आणि प्रवाशांच्या पुस्तकांमधून आपण वाचतो, तेव्हा आपल्या काळात वंशवादी जाणूनबुजून इतर माणसांबद्दल द्वेष पसरवत असल्याची त्रासदायक आठवण आपल्याला नकळत होते. हे वंशवादी फक्त स्वतःला माणसे समजतात, पण दुसरी माणसे त्यांच्या मते माणसे नव्हेत, तर नीच कुळातील प्राणी.

इतिहास आपल्याला शिकवतो की, पृथ्वीवर उच्च आणि नीच माणसे नाहीत. काही जास्त विकसित माणसे आहेत आणि संस्कृतीच्या मार्गावर काही मागे पडलेली माणसे आहेत. श्रमिक दिनदर्शिकेनुसार सर्व सद्यःकालीन एकाच काळातील माणसे नसतात.

रशियात महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीपूर्वी सर्व माणसे विकासाच्या समान पायरीवर नव्हती. काही माणसे यंत्रयुगात होती, काही आदिकाळातील नांगराने अजून जमीन नांगरत होती आणि आदिकाळातील मागांवर कापड विणत होती. आणि हाडांची हत्यारे बनविणारी व लोखंड माहीत नसणारीही काही माणसे होती.

सोविएत देशातील पुढारलेली माणसे मागासलेल्यांना मदत करतात. मध्य आशिया, सैबेरिया, अतिउत्तरेकडील प्रदेश येथील माणसांनी अवघ्या काही दशकात कित्येक शतकांची प्रगती केलीय.

श्रमिक दिनदर्शिकेनुसार, आमच्या देशातील सर्व माणसे — समाजसत्तावादी युगातील माणसे आहेत. आणि सर्व माणसे समान आहेत.

प्रकरण दहावे

दोन कायदे

स्वतःच्या जहाजांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी केवळ नव्या देशांचा शोध लावला नाही, तर केव्हाच विसरून गेलेले काळही शोधलेत, असे अनेकदा घडलेय.

जेव्हा युरोपीय लोकांनी ऑस्ट्रेलियाचा शोध लावला, तेव्हा त्यांच्या दृष्टीने तो फार मोठा विजय होता — एक संपूर्ण खंड शोधून त्यांनी ते हस्तगत केले होते.

पण ऑस्ट्रेलियातील मूळ रहिवाशांच्या दृष्टीने हे आत्यंतिक दुर्दैव होते. श्रमिक दिनदर्शिके-नुसार, ते वेगळ्या काळात रहात होते. युरोपीय रीतीरिवाज त्यांना समजत नव्हते आणि युरोपीय पद्धतीला स्वीकारण्याची त्यांची इच्छा नव्हती. म्हणून रानटी जनावरांप्रमाणे त्यांची ससेहोलपट करण्यात आली. ऑस्ट्रेलियावासी अजून तंबूमध्ये रहात होते, पण युरोपात ह्या दरम्यान शहरांमध्ये प्रचंड इमारती उभ्या झाल्या होत्या. खाजगी मालकी म्हणजे काय हे ऑस्ट्रे-लियावासींना अजून माहीत नव्हते, पण युरोपात परक्याच्या मालकीच्या जंगलात हरीण ठार मारल्यास माणसांना तुरुंगात शिक्षा भोगावी लागत होती.

ऑस्ट्रेलियावासींच्या दृष्टीने जे कायदेशीर होते, तेच युरोपीय लोकांच्या दृष्टीने गुन्हा ठरत होते.

जेव्हा ऑस्ट्रेलियन शिकाऱ्यांना वाटेत मेंढ्यांचा कळप भेटायचा, तेव्हा आनंदाने आरोळ्या ठोकत ते त्या कळपाला वेढा घालत आणि घाबरलेल्या मेंढ्यांवर चारही बाजूंनी भाल्यांचा व बूमरँगचा हल्ला व्हायचा. पण आता ह्या क्षणी युरोपीय शेतकऱ्यांच्या बंदूका अडथळा आणू लागल्या.

युरोपीय पशुपालकाच्या दृष्टीने मेंढी खाजगी मालमत्ता होती, पण आदिकालीन ऑस्ट्रेलियन शिकाऱ्याच्या दृष्टीने मेंढी म्हणजे सुदैवी शोध होती. "मेंढीला जो विकत घेतो अथवा पोसतो, तो तिचा मालक" — युरोपीय लोकांचा असा कायदा. "ज्यांनी जनावराला पकडले, त्या शिकाऱ्यांची त्याच्यावर मालकी" — ऑस्ट्रेलियावासींचा तसा कायदा.

आणि ऑस्ट्रेलियावासी त्यांच्या काळाच्या कायद्यानुसार वागत होते, म्हणून युरोपीय त्यां-च्यावर बंदूका झाडत होते; जणू ते लोक नव्हते, तर मेंढीला पळवून नेणारे लांडगे होते!

ऑस्ट्रेलियावासी बायकांना शेतात लागवड केलेले बटाटे जेव्हा सापडायचे, तेव्हासुद्धा दोन कायद्यांमध्ये संघर्ष व्हायचा. किंचितही विचार न करता काठ्यांच्या साह्याने झकास बटाटे उकरून

काढायला बायका आरंभ करायच्या. एका जागी खाण्यायोग्य एवढे बटाटे सापडणे म्हणजे काय चेष्टा आहे! सबंध महिनाभर वणवण करून त्या बायकांना जेवढे बटाटे गोळा करता येत नसत, तेवढे ह्या शेतात अवघ्या एका तासात सापडायचे.

पण हे भाग्य त्यांचे फार मोठे दुर्दैव ठरायचे. बंदूकांचे बार घुमायचे आणि ओझ्यांसकट बायका जमिनीवर कोसळायच्या. कोण आणि कशासाठी त्यांना ठार मारतोय हे त्यांना उमजायचे नाही.

अमेरिकेच्या शोधानंतर दोन जगांचा असाच संघर्ष झाला.

जुने "नवे जग"

अमेरिकेचा शोध लावलेल्या युरोपीय लोकांना वाटले, की नव्या जगाचा शोध लावला. कोलंबसाला त्याबद्दल गौरवचिन्हही बहाल करण्यात आले:

कॅस्टील व लेऑनसाठी
कोलंबसाने नवे जग शोधलें.

पण हे "नवे जग" प्रत्यक्षात जुने जग होते. युरोपीय लोकांना ते स्वतः फार पूर्वीच जो भूतकाळ विसरून गेले होते, त्याचा तेथे नकळत शोध लागला.

महासागरापलिकडून आलेल्यांना इंडियनांचे रीतीरिवाज जंगली व विचित्र वाटले. इंडियनांची घरे युरोपातल्या घरांसारखी नव्हती, कपडे वेगळे होते, जगण्याची रीत वेगळी होती.


उत्तरेत राहणारे इंडियन स्वतःचे बाणांचे भाते व बाणांची टोके गारगोटीपासून आणि हाडांपासून बनवत होते. लोखंडाबद्दल त्यांना काहीही माहिती नव्हती. शेती करणे एव्हाना त्यांना माहीत होते: मका पेरत होते, वाफ्यांमध्ये भोपळा, घेवडा, तंबाखू लावत होते. पण शिकार हा त्यांचा मुख्य उद्योग होता. ते लाकडी घरांमध्ये रहात आणि स्वतःच्या वस्तीभोवती उंच खुंटांचे कुंपण घालत.

दक्षिणेत, मेक्सिकोत, इंडियनांपाशी तांब्याची हत्यारे होती, सोन्याचे अलंकार होते, मोठी घरे होती. ही घरे न भाजलेल्या, प्लास्टरचा गिलावा दिलेल्या विटांपासून बांधत.

अमेरिकेतील पहिले वसाहतवादी आणि विजेते ही सर्व वर्णने त्यांच्या दैनंदिनींमधून तपशीलवार व अचूक करतात.

पण रीतीरिवाजांचे वर्णन करण्यापेक्षा वस्तूंचे वर्णन करणे अधिक सोपे.

अमेरिकेतील रीतीरिवाज विचित्र होते. युरोपीयनांना ते अजिबात समजत नव्हते आणि त्यांच्याबद्दलची हकीकत त्यांनी चुकीची व अस्पष्ट सांगितली.



इंडियन लाकडी घरांमध्ये रहायचे व स्वतःच्या खेड्याभोवती उंच खुंटांचे कुंपण घालायचे. (१६ व्या शतकातील खोदचित्र)

"नव्या जगात" पैसे नव्हते, व्यापारी नव्हते, श्रीमंत व गरीब नव्हते. सोने म्हणजे काय हे माहीत असणाऱ्या काही टोळ्या इंडियनांमध्ये होत्या, पण सोन्याची किंमत त्यांना ठाऊक नव्हती.

कोलंबसाबरोबरच्या खलाशांनी प्रथम पाहिलेल्या इंडियनांच्या नाकांखाली सोनेरी काड्या होत्या आणि मानांवर सोनेरी माळा रूळत होत्या. पण काचेच्या मण्यांच्या आणि कपड्यांच्या मोबदल्यात त्यांनी स्वतःचे सोन्याचे अलंकार सहज देऊन टाकले.

महासागरापलिकडून आलेल्यांना विचार करायची सवय होती की, जगातील सर्व लोकांची विभागणी नोकर व मालक, जमीनदार व शेतकरी, अशी झालेली होती. पण इथे सर्व माणसे समान होती. जेव्हा शत्रूला कैदी म्हणून आणत, तेव्हा त्याचे गुलामात अगर नोकरात रूपांतर करत नसत. त्याला ठार मारत अथवा दत्तक घेत.

इथे खाजगी मालकीचे वाडे, घरे अथवा इस्टेटी नव्हत्या. "लांबोडी घरे" असे नाव असलेल्या सामायिक घरांमध्ये लोक रहात होते. आख्खी टोळी एकत्र रहायची आणि एकत्रितपणे कारभार चालवायची. जमिनीची मालकी वेगवेगळ्या लोकांकडे नव्हती, तर सबंध टोळीकडे होती. परक्याच्या जमिनीवर काम करणारे भूदास इथे नव्हते. इथे सगळे स्वतंत्र होते.

सरंजामशाहीत, भूदास पद्धतीत जगणाऱ्या युरोपीयनांना गोंधळून जाण्यास एवढे एक कारण पुरेसे होते. पण एवढ्यावरच सगळे संपले नव्हते.

युरोपात प्रत्येकाला माहीत होते की, जर कुणी दुसऱ्याच्या मालकीची वस्तू घेतली, तर शहरचा बेलीफ मानगूट पकडून क्षणाचा विचार न करता तुरुंगात डांबील. पण इथे खाजगी मालमत्ता नव्हती, बेलीफ नव्हते, तुरुंग नव्हते. पण तरीही, इथे स्वतःची एक व्यवस्था होती. त्या व्यवस्थेची माणसे राखण करायची, पण युरोपातल्याप्रमाणे नव्हे.

गरीबांनी श्रीमंतांच्या मालकीचे काहीही घेऊ नये, नोकरांनी मालकाचे आज्ञापालन करावे, जमीनदारांकडे भूदासांनी काम करावे, अशा रीतीने युरोपातील कायदे बनविलेले होते.

पण इथे माणसाचे नातेवाईक व टोळीवाले त्याचे रक्षण करीत होते. जर कुणाला ठार मारले, तर सबंध टोळी त्या खुनाचा बदला घेत होती. पण सामोपचारानेही काहीवेळा समस्या सोडविली जायची. खुनी माणसाचे नातेवाईक क्षमा मागायचे व खून झालेल्या माणसाच्या नातेवाईकांना भेटवस्तू द्यायचे.

युरोपात सम्राट, राजे, प्रिन्स होते. इथे राजे नव्हते, राजसिंहासने नव्हती. टोळीच्या कारभाराचे निर्णय सर्व टोळीसमोर पुढाऱ्यांचे मंडळ घेत असे. गुणांनुसार पुढारी निवडत आणि त्यांनी स्वतःची जबाबदारी योग्य रीतीने पार न पाडल्यास त्यांना पदभ्रष्ट करीत. पुढारी हा टोळीवाल्यांचा मालक म्हणून कधीही वावरत नव्हता. काही इंडियन भाषांमध्ये "पुढारी" ह्या शब्दाचा अर्थ फक्त "वक्ता" असा आहे.

जुन्या जगात राज्याचा प्रमुख राजा होता, कुटुंबाचा प्रमुख बाप होता. राज्य लोकांचा सर्वांत मोठा गट होते, कुटुंब सर्वांत छोटा गट होते. राजा प्रजाजनांचा निवाडा करायचा आणि अपराध्यांना शासन करायचा. बाप मुलांचा निवाडा करून त्यांना शिक्षा करायचा. राजा स्वतः-च्या मुलाला राष्ट्र द्यायचा, बाप मुलाला इस्टेट द्यायचा.

इथे, नव्या जगात, बापाची त्याच्या मुलांवर कोणतीही सत्ता चालत नव्हती. मुले आईच्या मालकीची असत व आईपाशीच रहात. "लांबोड्या घरात" सर्व कारभार बायकांच्या ताब्यात होता. युरोपीयनांचे मुलगे घरातच रहात आणि मुली घरट्यामधून चारी दिशांना उडून जात. इथे उलट होते—नवरा बायकोला स्वतःच्या घरी घेऊन जायचा नाही, तर बायको नवऱ्याला स्वतःकडे घेऊन जायची. घरात बायकांची सत्ता चालायची.

एका प्रवाशाने लिहिलेय :



"लांबोड्या घरात". पाईप ओढणारा माणूस—नेता

"सर्वसाधारणपणे बायका घर चालवीत व नेहमी एकमेकींच्या पाठीशी उभ्या रहात. साठे सामायिक मालकीचे होते. पण घरी क्वचित शिकार आणणाऱ्या नवऱ्याच्या वाट्याला दुःख येई! ह्या घरात त्याची कितीही मुले व वस्तू असल्या, तरी अंथरूण गुंडाळून घराबाहेर चालता हो, अशी कोणत्याही क्षणी त्याला आज्ञा होऊ शकायची. आणि त्या आज्ञेचा भंग करणे त्याच्या दृष्टीने हिताचे नव्हते. घरात मग त्याची धडगत नव्हती. जर मावशीने अगर आजीने त्याच्यासाठी रदबदली केली नाही, तर त्याला त्याच्या टोळीकडे परतावे लागायचे, किंवा दुसऱ्या टोळीतील बाईशी लग्न करावे लागायचे. बायकांचे सामर्थ्य फार मोठे होते. त्यांच्या भाषेत बोलायचे तर, पुढाऱ्याच्या डोक्यावरची "शिंगे मोडायची" जेव्हा गरज पडायची, तेव्हा त्या क्षणाचा विचार करीत नसत. ताबडतोब त्याला पदच्युत करून टोळीतील सामान्य योद्धा बनवीत. तसेच, नव्या पुढाऱ्याची निवड करणे नेहमी त्यांच्याच हातात होते."

जुन्या जगात बाई नवऱ्याच्या धाकात होती. पण इंडियनांमध्ये ती घराची प्रमुख होती, काहीवेळा टोळीची प्रमुख होती. पूष्कीनने एक लेख लिहिलेला आहे – जॉन टॅन्नेर नांवाचा एक अमेरिकन इंडियनांच्या हाती कसा सापडला व त्याचे तेथे काय झाले. हा जॉन टॅन्नेर खरोखरीच अस्तित्वात होता. जेव्हा तो इंडियनांचा कैदी बनला, तेव्हा न्येत-नो-कूआ नावाच्या बाईने त्याला दत्तक घेतले. ती ओटावुआ टोळीची प्रमुख होती. तिच्या होडीवर नेहमी निशाण फडकायचे. जेव्हा न्येत-नो-कूआ इंग्लिश किल्ल्यात भेटीला यायची, तेव्हा तोफांच्या सलामीने तिचे स्वागत व्हायचे. केवळ इंडियनच नव्हे, तर गोरे लोकही ह्या बाईशी आदराने वागत.

अशा व्यवस्थेत वारसा बापाच्या नव्हे, तर आईच्या बाजूने निर्णित होत असल्यास नवल नाही. युरोपात मुले बापाचे आडनाव लावत, तर इथे आईच्या टोळीचे नाव मुलांना लागायचे. जर बाप "हरीण" टोळीतील असेल व आई "अस्वल" टोळीतील असेल, तर मुले "अस्वल" टोळीच्या मालकीची होत. प्रत्येक टोळी बायका व त्यांच्या मुलांची, त्यांच्या मुलींच्या मुलांची आणि नातींच्या मुलांची मिळून बनायची.

युरोपीयनांना हे सगळे विचित्र वाटत होते. इंडियनांच्या रीतीरिवाजांना ते जंगली म्हणत आणि खुद्द इंडियनांना रानटी म्हणत.

धनुष्य-बाणाच्या युगात, पहिल्या होडयांच्या आणि पहिल्या कुदळींच्या काळात, त्यांचे स्वतःचे रीतीरिवाजसुद्धा तसेच होते, हे ते विसरले.

अमेरिकेतील पहिले वसाहतवादी आणि विजेते स्वतःच्या टिपणांमधून टोळ्यांच्या पुढाऱ्यांचे वर्णन महाराज, जमीनदार असे करतात. पुढारी हा किताब त्यांना राजकिताब वाटला व वंशचिन्ह म्हणजे राजचिन्ह वाटले. पुढाऱ्यांच्या मंडळाला ते सेनेट म्हणतात आणि सर्वोच्च लष्करी पुढाऱ्याला ते राजा समजतात. आपण आत्ता जर सरसेनापतीला राजा म्हटले तर जेवढे विचित्र वाटेल, तेवढेच ते विचित्र होते.



पूएब्लो – मेक्सिकोतील इंडियनांचे खेडे

अनेक शतकांच्या वास्तव्यातही अमेरिकेतील गोरे रहिवासी तेथील मूळ लोकांचे रीतीरिवाज समजू शकले नाहीत. अमेरिकन लेखक मॉर्गन यांनी 'प्राचीन समाज' पुस्तकात परत एकदा अमेरिकेचा शोध लावीपर्यंत तसेच चालत राहिले. मॉर्गन यांनी दाखवून दिले की, इरोकेझ आणि आत्स्टेक इंडियन टोळ्यांचे जीवन, म्हणजे युरोपीयनांनी फार फार पूर्वी पार केलेली जीवनावस्थेची एक पायरी होते.

मॉर्गननी हे पुस्तक १८७७ साली लिहिले. पण आपण चर्चा करतोय अमेरिकेला प्रथम जिंकून घेणाऱ्यांच्या काळाची.

गोरे लोक इंडियनांना समजत नव्हते व इंडियन गोऱ्यांना समजू शकत नव्हते. मूठभर सोन्यासाठी एकमेकांची नरडी दाबायला गोरे का सज्ज व्हायचे, हे इंडियनांना समजायचे नाही. गोरे लोक अमेरिकेत कशाला आले होते आणि "परक्याची भूमी जिंकणे" म्हणजे काय, हे त्यांना समजत नव्हते.

आदिमानवांच्या धर्मानुसार जमीन सर्व टोळीच्या मालकीची होती आणि त्यांच्या रक्षणकर्त्यांचे आत्मे जमिनीचे संरक्षण करीत होते. परक्याची जमीन बळकावणे म्हणजे परक्या देवांचा स्वतःवर कोप ओढवून घेणे.

इंडियनांनासुद्धा युद्ध करावे लागायचे. पण शेजारच्या टोळीवर विजय मिळविल्यानंतर ते त्या टोळीतील लोकांना स्वतःचे गुलाम बनवीत नसत, त्यांच्यावर स्वतःचे रीतीरिवाज लादत

नसत, त्यांच्या टोळी-प्रमुखांना पदच्युत करीत नसत. फक्त त्यांच्याकडून खंडणी वसूल करीत. टोळीच्या पुढाऱ्याला पदभ्रष्ट करण्याचा हक्क फक्त त्याच्या स्वतःच्या टोळीचा होता.

आणि दोन जगांची, दोन व्यवस्थांची टक्कर झाली. अमेरिका जिंकण्याचा इतिहास म्हणजे दोन जगांमधील संघर्षाचा इतिहास.

स्पॅनिश लोकांनी मेक्सिको जिंकल्याचे उदाहरण इथे आठवते.

चुकांची साखळी


१५१९ साली मेक्सिकोच्या किनाऱ्यापाशी तीन डोलकाठ्यांच्या शिडांच्या अकरा गलबतांचा काफला आला. गलबतांच्या दोन्ही बाजू फुगीर होत्या, पुढची व मागची टोके पाण्यापासून खूप उंच वर होती, चौकोनी झडपांमधून तोफा डोकावत होत्या, डेकवर शिपायांचे भाले व चापाच्या बंदूका चमकत होत्या. निशाणाच्या गलबताच्या नाकावर रुंद खांद्यांचा, दाढीवाला माणूस उभा होता. त्याने बेरेट टोपी कपाळापर्यंत खाली खेचली होती. सपाट किनाऱ्याकडे आणि किनाऱ्यावर उभ्या असलेल्या अर्धनागड्या इंडियनांच्या जमावाकडे तो तीक्ष्ण नजरेने पहात होता.

निशाणाच्या गलबतावरील माणसाचे नाव होते कोर्तेस. मेक्सिको जिंकण्यासाठी पाठविण्यात आलेल्या मोहीमेचा तो प्रमुख होता. खरे म्हणजे त्याची नेमणूक रद्द केल्याचे स्पेनच्या गव्हर्नरचे पत्र त्याच्या खिशात होते. पण कोर्तेससारख्या निडर साहसी माणसाला त्या वडतर्फीच्या हुकूमाची काय मातब्बरी! अपार पाण्याचा विस्ताराने त्याला स्पेनपासून अलग केलेले होते. इथे ह्या गलबतांवर तो राजाप्रमाणे वागत होता.

गलबतांनी नांगर टाकले. कोर्तेसने वाटेत बेटांवर पकडलेल्या इंडियन गुलामांनी गलबतांवरून तोफांच्या नळ्या, तोफगाडे, शिध्याचे खोके, चापाच्या बंदूका होड्यांमध्ये उतरवायला आरंभ केला. घाबरलेले, मागील पायांवर उभे राहणारे घोडे गलबतांच्या खालच्या भागांमधून डेकवरती आणण्यात आले. त्यांना डेकपासून किनाऱ्यापर्यंत आणणे सर्वांत अवघड गेले.

तरंगत्या घरांकडे, कपड्यांखाली शरीरे झाकणाऱ्या फिकट कातडीच्या माणसांकडे, त्यांच्या विचित्र शस्त्रांकडे, इंडियन माणसे चकित नजरांनी पहात होती. पण त्यांना सर्वांत जास्त आश्चर्य वाटले होते केसाळ आयाळींच्या आणि शेपट्यांच्या फुरफुरणाऱ्या जनावरांचे. असले राक्षस यापूर्वी त्यांनी कधी पाहिले नव्हते.

गोऱ्यांच्या आगमनाची वार्ता सबंध किनारपट्टीत वेगाने पसरली. देशाच्या अंतर्भागात आणि डोंगराळ भागातही ही बातमी गेली. तेथे पर्वताच्या भिंतीपलिकडे, खोऱ्यामध्ये, आत्सुतेक टोळीतील पूएब्लो माणसांची खेडी होती. सर्वांत मोठे खेडे होते तेनोख्तीतलान. एका सरोवराच्या मध्यभागी ते उभे होते व किनाऱ्याशी पुलांनी जोडले होते. प्लास्टर फासलेली त्याची पांढरी



तेनोख्तीलानाचा नकाशा

चमकती घरे व मंदिरांचे सोनेरी कळस दूरवरून दिसायचे. सर्वांत मोठ्या घरात आत्स्तेकांचा लष्करी नेता मोन्तेत्सूमा स्वतःच्या योद्ध्यांसह रहात होता.

गोऱ्यांच्या आगमनाची बातमी समजल्यानंतर मोन्तेत्सूमाने योद्ध्यांच्या सल्लागार मंडळाची बैठक बोलावली. कसे वागावे ह्याबद्दल त्यांनी खूप वेळ विचार केला. मुख्य म्हणजे गोऱ्यांचे आगमन कशासाठी झाले होते, त्यांना काय हवे होते, हे जाणून घ्यायला पाहिजे होते.



कोर्तेसला वकीलांनी भेटी आणल्या (मेक्सिकन चित्र)

दुसऱ्या स्थळांपासून आलेल्या वार्तांवरून योद्धयांना समजले होते की, गोरे लोक सोन्याचे लोभी आहेत. तेव्हा सल्लागारांनी निर्णय घेतला : गोऱ्यांना सोन्याच्या भेटी पाठवायच्या व स्वतःच्या देशाला परता असे सांगायचे.

ही न सुधारण्यासारखी चूक घडली. सोन्यामुळे गोऱ्यांची हाव अधिकच वाढली. पण आत्स्तेकांना हे माहीत नव्हते आणि माहीत असणे शक्य नव्हते. कारण इंडियन व गोरे वेगवेगळ्या युगांमध्ये राहणारी माणसे होती.

वकीलांना धाडण्यात आले. गाडीच्या चाकाच्या आकाराची सोन्याची कडी, सोन्याचे अलंकार, माणसांच्या आणि जनावरांच्या सोनेरी आकृती, अशा भेटीच्या वस्तू ते सोबत घेऊन गेले.

ही संपत्ती त्यांनी जमिनीत लपवून ठेवली असती, तर त्यांचे वागणे अधिक शहाणपणाचे ठरले असते.


कोर्तेसने व त्याच्या साथीदारांनी जेव्हा सोने पाहिले, तेव्हाच आत्सृतेकांचे भवितव्य ठरले!

निष्कारण त्यांनी कोर्तेसला समुद्रापलिकडे परत जाण्याची विनंती केली. अवघड आणि धोक्याच्या वाटा ज्यांची वाट पहात होत्या, अशा अनाहूत पाहुण्यांना ते निष्कारण भ्यायले.

मेक्सिकनांच्या सोन्याबद्दल स्पॅनिशांना पूर्वी नुसत्या ऐकीव कथा ठाऊक होत्या. पण आता त्यांनी ते सोने खुद्द स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. त्यांचे डोळे चमकले. म्हणजे ऐकीव कथा खऱ्या होत्या!

वकीलांच्या विनंत्या त्यांना हास्यास्पद वाटल्या. उद्दिष्ट एवढे जवळ असताना समुद्रावरून परत जायचे! तसे करणे अगदी मूर्खपणाचे होते.

स्पॅनिशांना प्रवासात किती हालअपेष्टा सोसाव्या लागल्या होत्या! दात तुटतील असे पावाचे कडक सुके तुकडे, दाटी झालेल्या केबिनांमधील झोपण्याच्या आखूड फळ्या, डांबर फासलेल्या दोरखंडांमधील पाठीचा कणा तोडणारे कठीण काम, सागरावरील तुफाने आणि पाण्या-



मोन्तेत्सूमा घराच्या छपरावर चढला व आत्सृतेकांना उद्देशून त्याने भाषण केले (त्या काळातील चित्र)

खालील खडक – ह्या सर्व गोष्टी स्पॅनिशांनी सोसल्या होत्या केवळ संपत्तीच्या प्राप्तीसाठी. ह्या वैभवाची त्यांना रात्रीच्या वेळांना सतत स्वप्ने पडत होती.

कोर्तेसने हुकूम केला: छावणीमधून पुढे कूच करायचे. गुलामांच्या पाठींवर शस्त्रांची व शिध्याची ओझी लादण्यात आली. ओझ्याची जनावरे बनविण्यात आलेली माणसे कण्हत-कुंथत वाटचाल करू लागली. आणि न चालून सांगणार कुणाला? मागे पडणाऱ्यांना गोरे लोक तलवारी टोचून पुढे पळवत होते व हुकूम न ऐकणाऱ्यांची मुंडकी उडवीत होते.

ह्या वाटचालीचे खुद्द आत्स्तेकांनी काढलेले चित्र सापडले आहे. कमरेला लंगोटया नेसलेली माणसे तीन रस्त्यांनी चालत आहेत. एकाच्या पाठीवर तोफगाड्याचे चाक आहे, दुसऱ्याच्या पाठीवर बंदूकींचे ओझे आहे, तिसऱ्याच्या पाठीवर शिध्याचे खोके आहे. स्पॅनिश अधिकाऱ्याने इंडियनाच्या डोक्यावर दंडुका उगारलाय. त्याने इंडियनाचे केस पकडलेत व त्याच्या पोटात बुटाच्या लाथा तो मारतोय. जवळच कडा आहे व त्यावर क्रूसाचे चित्र.

आक्रमक स्वतःला "भले कॅथलिक" समजत होते. जिंकलेल्या भूमीत ते क्रूस घेऊन गेले.

चित्रामध्ये सर्वत्र इंडियनांची तोडलेली मुंडकी व हात दिसतात.

अशा रीतीने स्वतंत्र इंडियनांना प्रथमच समजले, की माणूस माणसाला गुलाम कसा करतो.

स्पॅनिश एकेका पावलाने पुढे सरकत होते. अखेरीस डोंगरउतारावरून त्यांना सरोवर व सरोवराच्या मध्यभागी वसलेले शहर दिसले.

आत्स्तेकांनी पाहुण्यांना प्रतिकार केला नाही. "पाहुणे" शहरात आले. पण आल्या क्षणीच त्यांनी जे काही केले ते सभ्यतेला धरून नव्हते. टोळीचा योद्धा पुढारी मोन्तेत्सूमाला, खुद्द यजमानालाच, त्यांनी कैद केले.

कोर्तेसच्या हुकूमावरून मोन्तेत्सूमाला साखळदंड बांधण्यात आले. स्पेनच्या राजाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घे, अशी कैद्याकडून मागणी करण्यात आली. कैद्याने त्याला सांगण्यात आलेले सर्व शब्द परत उच्चारले. राजा म्हणजे काय आणि राजनिष्ठेची शपथ म्हणजे काय, त्याला काहीही समजले नव्हते.

कोर्तेस स्वतःला विजेता समजत होता. त्याने मेक्सिकनांचा राजा कैद केला अशी त्याची समजूत झाली होती. कैद झालेल्या राजाने स्वतःची सत्ता स्पेनच्या राजाकडे सोपवली होती. म्हणजे सर्व टीक होते. कोर्तेसने असा विचार केला. पण त्याची घोडचूक झाली होती. मोन्तेत्सूमाला जशा स्पॅनिशांच्या रीती माहीत नव्हत्या, त्याचप्रमाणे कोर्तेसला मेक्सिकनांच्या रीतीभाती माहीत नव्हत्या. त्याला वाटले होते की, मोन्तेत्सूमा राजा होता. पण मोन्तेत्सूमा केवळ लष्करी नेता होता, स्वतःच्या देशावर सत्ता गाजविण्याचा त्याला हक्क नव्हता.

कोर्तेसने स्वतःला विजेता समजायची घाई केली होती.

त्याला अनपेक्षित अशी कृती आत्स्तेकांनी केली: मोन्तेत्सूमाच्या भावाला नवा पुढारी म्हणून निवडले.

स्पॅनिशांनी जेथे मुक्काम केला होता त्या मोठ्या घरावर टोळीतील सर्व योद्ध्यांसह नव्या पुढाऱ्याने हल्ला चढविला.

स्पॅनिशांनी तोफांमधून आणि बंदूकांमधून मारा केला.

आत्सूतेक दगड फेकत होते, बाण मारत होते. तोफगोळा आणि बंदूकीची गोळी ही बाण व दगडापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहेत. पण आत्सूतेक स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी लढत होते आणि त्यांना काहीही थोपवू शकत नव्हते. जेव्हा दहा कोसळत, तेव्हा त्यांच्या जागी शंभर नवे योद्धे उभे रहात. भावासाठी भाऊ सूड घेत होता, पुतण्यासाठी काका सूड घत होता. मृत्यूला कुणीही भीत नव्हता. जेव्हा सबंध टोळीवर संकट यायचे, तेव्हा आत्सूतेक स्वतःच्या प्राणांची कधीही पर्वा करायचा नाही.



स्पॅनिश लोक इंडियनांना कैद करून नेतात

मामला अवघड आहे असे पाहून कोर्तेसने आत्स्तेकांशी तडजोडीच्या वाटाघाटी करण्याचे ठरवले. त्याला वाटले की, मोन्तेत्सूमाला मध्यस्थ करणे सर्वांत जास्त इष्ट ठरेल. मोन्तेत्सूमा राजा होता. त्यालाच सांगू दे स्वतःच्या माणसांना शस्त्रे खाली टाकायला.

मोन्तेत्सूमाच्या बेड्या काढण्यात आल्या. घराच्या सपाट छपरावर तो चढला. पण त्याला भेकड आणि द्रोही समजण्यात आले. त्याच्यावर दगडांचा व बाणांचा वर्षाव झाला. सगळ्या दिशांनी आरोळ्या उमटल्या:

"चूप रहा, नीचा! तू योद्धा नाहीस, तू बाई आहेस, सूतकताई आणि विणकाम करायला जन्मलेली! हे कुत्रे तुला कैदी म्हणून धरतात! तू भेकड आहेस!"

मोन्तेत्सूमा मरणांतिक घायाळ होऊन पडला.

कोर्तेसला त्या वेढ्यामधून मोठ्या मुष्कीलीने सुटता आले. त्याचे निम्मे सैनिक ठार झाले. पण त्याच्या सुदैवाने आत्स्तेकांनी त्याचा पाठलाग केला नाही, अन्यथा तो जिवंत राहिला नसता.

पण कोर्तेसला जिवंत परत जाऊ देण्यात आत्स्तेकांनी नवी चूक केली. कोर्तेस नवी फौज घेऊन तेनोख्तीतलानवर चालून आला.

आत्स्तेक शौर्याने लढले. स्पॅनिशांना त्यांनी काही महिनेपर्यंत थोपवून धरले. पण तोफांविरुद्ध धनुष्ये आणि दगड किती टिकणार? तेनोख्तीतलानचा पाडाव झाला व ते लुटण्यात आले.

लोहयुगाच्या माणसांनी ताम्रयुगाच्या लोकांवर विजय मिळविला. जुन्या टोळीपद्धतीला नव्या समाजव्यवस्थेसमोर माघार घ्यावी लागली.

प्रकरण अकरावे


वेगवान चालणारे बूट

साध्या बुटांच्या जोडीऐवजी वेगवान चालणारे बूट बाजारात विकत घेणाऱ्या एका माणसाबद्दल गेल्या शतकात एका लेखकाने एक परीकथा लिहिली आहे. कथेचा नायक विसरभोळा होता आणि त्याला स्वतःची चूक ताबडतोब ध्यानात आली नाही. बाजारामधून घरी परतताना तो कसल्यातरी खोल विचारांमध्ये गढून गेला होता. अचानक त्याला जोराची थंडी वाजू लागली. त्याने भोवती नजर टाकली, तेव्हा सर्वत्र बर्फ पसरल्याचे आणि क्षितिजापाशी फिकट लाल सूर्य बुडत असल्याचे त्याला दिसले. असे आढळले की, वेगवान चालणाऱ्या बुटांनी त्याच्या नकळत त्याला आर्क्टिकमध्ये आणले होते.

त्याच्या जागी दुसरा कुणी असता तर अशा अद्भुत वस्तूपासून त्याने भरपूर फायदा करून घेतला असता. पण कथेच्या नायकाला पैशांबाबत मुळीच लोभ नव्हता. त्याला विज्ञान सर्वांत जास्त आवडत होते. तेव्हा संपूर्ण पृथ्वी पाहण्यासाठी व तिचा अभ्यास करण्यासाठी स्वतःच्या भाग्याचा वापर करण्याचे त्याने ठरविले. वेगवान चालणारे बूट घालून तो सबंध पृथ्वीभर धावला—उत्तरेपासून दक्षिणेकडे आणि दक्षिणेपासून उत्तरेकडे. त्यामुळे सैबेरियातील तैगामधून हिवाळा त्याला आफ्रिकेतील वाळवंटात पिटाळायचा, तर एका रात्रीत पूर्व गोलार्धातून तो पश्चिम गोलार्धात पाऊल टाकायचा.

मळकट काळया जाकीटात, संग्रहवस्तूंसाठी खांद्याला एक पेटी लटकावून, जणू पाण्यातील गोटचांवर उड्या माराव्या तशा एका बेटावरून दुसऱ्या बेटावर उड्या मारत तो ऑस्ट्रेलियातून आशियात जायचा, आशियातून अमेरिकेत जायचा.

एका शिखरावरून दुसऱ्या शिखरावर सावधपणे पावले टाकत, कधी आग ओकणाऱ्या ज्वालामुखींना ओलांडत, तर कधी हिमशिखरांना पार करत, त्याने खनिजे व गवताची पाती गोळा



स्त्रीच्या आकाराची चिकणमातीची छोटी आकृती—चुलीची रक्षणकर्त्री (पाषाणयुग)



देवी : शहराची रक्षणकर्त्री

केली, प्राचीन मंदिरे व गुंफा न्याहाळल्या, पृथ्वीचा आणि तिच्यावरील सर्व सजीव गोष्टींचा अभ्यास केला.

माणसाच्या जीवनाचा अभ्यास करणाऱ्या इतिहासकारालासुद्धा वेगवान चालणारे बूट पायात घालावे लागतात. ह्या पुस्तकाच्या पानांमधून आपण एका खंडातून दुसऱ्या खंडात गेलो, एका युगाला ओलांडून दुसऱ्या युगात गेलो.

काही वेळा अफाट अंतरांमुळे आणि काळाच्या वेगवान उड्डाणांमुळे आपल्याला भोवळ आली. पण न थांबता आपण पुढे जात राहिलो. साध्या बुटांमधील माणसांप्रमाणे थांबणे व अत्यंत तपशीलवारपणे अभ्यास करणे आपल्याला शक्य नव्हते.

एका झेपेत काही शतकांना ओलांडण्याच्या धांदलीत काही गोष्टी आपल्या नजरेतून सुटल्या असणे शक्य आहे. पण जर फक्त क्षणभर आपण वेगवान चालणारे बूट पायांमधून काढले असते व सामान्य पावले टाकत गेलो असतो, तर तपशीलांच्या अंधारातून आपण कधीच वाट काढून बाहेर पडू शकलो नसतो. जंगलातील प्रत्येक झाड अभ्यासत बसलात, तर झाडांपायी जंगल न दिसण्याचा धोका असतो.

आपल्या वेगवान चालणाऱ्या बुटांच्या मदतीने आपण केवळ युगांना ओलांडले नाही, तर एका शास्त्राला ओलांडून दुसऱ्या शास्त्रामध्येही गेलो.

वनस्पती व प्राणी यांच्या शास्त्रातून आपण भाषाशास्त्रात गेलो, भाषाशास्त्रातून हत्यारांच्या इतिहासात वाट काढली, हत्यारांच्या इतिहासातून धर्मांच्या इतिहासात, धर्मांच्या इतिहासातून पृथ्वीच्या इतिहासात.

अर्थात असे करणे सोपे आणि सामान्य नव्हते. पण दुसरा उपाय नव्हता. कारण सर्व शास्त्रे माणसाने निर्माण केलीत आणि माणसासाठी निर्माण केलीत. आणि जेव्हा माणसाच्या पृथ्वीवरील

जीवनाविषयी, जगातील त्याच्या स्थानाविषयी, आपण बोलतोय, तेव्हा ती सर्व शास्त्रे आवश्यक आहेत.

आपण आत्ताच अमेरिकेत कोर्तेसच्या काळात होतो.

आता खि. पू. चार अथवा तीन हजार वर्षांच्या काळातील युरोपात मागे जाऊ. तेथे आपल्याला तसेच इरोकेझ अथवा आत्सुतेक टोळीवाले भेटतील. जेथील सर्व कारभार बायका चालवतात अशी "लांबोडी" सामायिक घरे आढळतील.

बाईला घरात मान आहे. ती घराची कारभारीण आहे आणि टोळीची निर्माती आहे. हिवाळ्यासाठी अन्नसाठे करण्याची ती खबरदारी घेते, ती जमीन खणते आणि पीक गोळा करते.

पुरुषापेक्षा ती जास्त काम करते. त्यामुळे तिला पुरुषापेक्षा मानही जास्त मिळतो. त्या काळात प्रत्येक वस्तीत, प्रत्येक घरात, हाडापासून अथवा दगडापासून बनवलेली स्त्री-मातेची आकृती सापडायची ते काही उगीच नव्हे. ती जननी होती, तिच्यामधून कुळाचा जन्म झाला होता. तिचा आत्मा घराचे रक्षण करत होता. तिने धान्य द्यावे, शत्रूपासून घराचे संरक्षण करावे, म्हणून तिची प्रार्थना करायची.

पुढे असा काळ येतो, जेव्हा ह्या घराचे रक्षण करणाऱ्या मातेचे, अथेन्समधील शहराचे रक्षण करणाऱ्या भालाधारी देवीमध्ये रूपांतर होते. आता ती स्त्रीची छोटी आकृती नसते, तर देवीची महाप्रचंड मूर्ती शहराचे रक्षण करीत उभी असते, त्या शहराला तिचे नाव दिलेले असते.

जुन्या इमारतीला तडे जातात

आपल्या बोलीत अजून प्राचीन टोळीजीवनातील अवशेष शिल्लक राहिलेत.

जेव्हा आपली मुले परक्या माणसांना "काका" किंवा "मावशी", अथवा "आजोबा" आणि "आजी" म्हणून संबोधतात, तेव्हा हा प्राचीन जीवनाचा अवशेष आहे. त्यावेळी वस्ती-मधील टोळीतील सर्व माणसे नातेवाईक असत.

आपण स्वतःसुद्धा कधी कधी "कॉम्रेड" ऐवजी "बंधू" म्हणतो व परक्याच्या मुलाला "मुला" म्हणतो.

प्राचीन जीवनाचे असेच अवशेष दुसऱ्या भाषांमध्येही उरले आहेत. जर्मन भाषेत "भाचरे" म्हणण्याऐवजी "बहिणीची मुले" म्हणतात. त्याचे कारण, जुन्या रूढीनुसार बहिणीची मुले कुटुंबातच रहात, पण भावाची मुले दुसऱ्या कुटुंबात, त्याच्या बायकोच्या कुटुंबात, समाविष्ट होत. बहिणीची मुले घरची होती, "भाचरे" होती, पण भावाची मुले घरची मानली जात नव्हती, ती परक्या कुटुंबाची होती.

साक्से ह्या प्राचीन राज्यात राजाचा वारस त्याचा मुलगा नसे, तर राजाच्या बहिणीचा मुलगा राज्याचा वारस असायचा.

आफ्रिकेत गेल्या शतकापर्यंत आशान्ती नावाचे एक राज्य होते. त्याच्या राजाला "नाने", म्हणजे "मातांची माता" असे म्हणत.

मध्य आशियात, समर्कंदमध्ये, राजाला "आफशिन" म्हणत. ह्या प्राचीन शब्दाचा अर्थ "घराची मालकीण" असा होता.

जेथे माता घराची मालकीण होती, मातृप्रधान कुटुंबव्यवस्था जेव्हा चालत होती, अशा काळातील कित्येक स्मृती लोकांच्या ध्यानात कशा राहिल्यात त्याची आणखी अनेक उदाहरणे देता येतील.

ज्याअर्थी आपण टोळीव्यवस्थेबद्दल प्रदीर्घ काळ आठवणी ठेवतोय, त्याअर्थी टोळी खूप भक्कम असावी. मग ती व्यवस्था कशामुळे उध्वस्त झाली?

अमेरिकेत युरोपीयनांनी आक्रमण करून भूमी काबीज केल्यामुळे तेथील टोळीव्यवस्था उध्वस्त झाली. अमेरिकेचा शोध लागण्याआधी हजारो वर्षांपूर्वी, युरोपात टोळीव्यवस्था आपोआपच उध्वस्त झाली—वाळवी लागलेले घर कोसळून पडते तशी.

पुरुष घराचा कारभार जास्त जास्त स्वतःच्या हाती घेऊ लागला, तेव्हापासून ती व्यवस्था उध्वस्त होण्यास आरंभ झाला.

प्राचीन काळापासून बायका जमीन खणायच्या आणि पुरुष गुरे राखायचे. जोवर गुरे कमी होती, तोवर बाईचे शेतीचे काम अधिक महत्त्वाचे ठरत होते. मांस क्वचित खात, दूध सर्वांना पुरत नव्हते. जर बायका नसत्या आणि त्यांनी पीक काढले नसते, तर घरात खायला काहीही मिळाले नसते. बार्लीची भाकरी अथवा मूठभर वाळवलेले धान्याचे दाणे, एवढ्याच वस्तू अनेकदा जेवणात असत. भाकरीबरोबर तोंडी लावायला मध अथवा रानटी फळे असत. हे पदार्थही बायकांनीच गोळा करून आणलेले असत. बायका घराचा कारभार चालवत, म्हणून घरावर त्यांची सत्ताही चाले.

पण तसे नेहमी आणि सर्वत्र घडत नव्हते. स्तेप पट्ट्यात धान्याची पैदास वाईट व्हायची. स्तेपमधील गवतांचा धान्याच्या वाढीला अडथळा व्हायचा. त्या गवतांची मुळे जमिनीत घट्ट रोवून बसली होती. कुदळीचा घाव जेव्हा जमिनीवर पडायचा, तेव्हा मऊ माती आढळायची नाही, तर घट्ट गवताचे तण लागायचे, खणायला अवघड अशी ओसाड जमीन लागायची.

म्हणून तीन किंवा चार बायका एकत्र मिळून कुदळ चालवायच्या. तरीसुद्धा कुदळीचा जमिनीवर फक्त ओरखडा उमटायचा.

फार खोल न नांगरलेल्या मातीत पेरलेले बियाणे सूर्यामुळे सुकून जायचे, पाखरे खाऊन जायची. पीक विरळ उगवायचे. त्यात आणखी दुष्काळ स्वतःची कामगिरी बजावायचा: पीक जाळून टाकायचा, पण चिवट तण शिल्लक ठेवायचा.

जेव्हा कापणीची वेळ यायची, तेव्हा आढळायचे की, कापायला पीकच नाही. तणांमध्ये धान्याची कणसे दिसत नसत. पिटाळून लावलेल्या शत्रूच्या फौजा परत निशाण फडकवीत डौलाने चालून याव्यात, तशा थाटात गवतांची पाती स्तेपमध्ये वाऱ्यावर डोलताना दिसायची.

पिकाऐवजी तण! ह्यासाठी पाठीचा कणा मोडायची, हातांना शिणवायची गरज होती काय?

पण माणसांना जे तण, तेच गुरांना अन्न. स्तेपमध्ये गायी व मेंढ्या तृप्त जगायच्या. त्यांच्या-साठी तेथे सर्वत्र मेजवानी पसरून ठेवलेली होती.

दर वर्षागणिक गुरांचा कळप वाढत होता. कमरपट्ट्यात कटचार खुपसून पुरुष गुरांच्या कळपामागून फिरायचा. गुराख्याचा विश्वासू मित्र कुत्रा त्याला मेंढ्या एकत्र ठेवायला मदत करायचा, स्तेपमध्ये मेंढ्यांना उधळू द्यायचा नाही. गुरांचा कळप वाढत होता, गुरांची संख्या वाढत होती. दूध, मांस, लोकर, हे पदार्थ जास्त जास्त प्रमाणात मिळत होते.

घरात धान्य अपुरे होते, पण मेंढ्यांच्या दुधापासून बनविलेले चीज भरपूर होते आणि कढयां-मध्ये बकऱ्यांचे मांस शिजत होते.

स्तेप प्रदेशात पुरुषाचे श्रम, गुराख्याचे काम, अधिक महत्त्वाचे ठरले.


पण लौकरच उत्तरेकडील जंगलांमध्ये पुरुषाने स्त्रीला मागे सारले.

स्वीडनमध्ये एका कड्यावर नांगऱ्याचे एक प्राचीन चित्र सापडले. चित्र ओबडधोबड आणि वाईट आहे. लहान मुले चित्र काढतात तसे नांगऱ्याचे चित्र दिसते. पण चित्र चांगले अथवा वाईट रेखाटलेय हे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे नाही. आपल्या दृष्टीने हे चित्र नव्हे, साक्षीदार आहे. हा साक्षीदार स्पष्टपणे दाखवतो, की नांगऱ्या नांगरामागून चालतोय व नांगर बैल ओढ-ताहेत.


हा बहुधा मानवजातीच्या इतिहासातील पहिला नांगर असावा. तो अजून खूपसा कुदळीसारखा दिसतो. फरक एवढाच की, त्याला एक लांब दांडा जोडलेला आहे व हा दांडा माणसे ओढत नाहीत, तर बैल ओढताहेत.

माणसाला पहिले इंजिन सापडले! नांगराला जुंपलेला बैल म्हणजे जिवंत इंजिन आहे; धातूपासून बनविलेल्या आपल्या ट्रॅक्टरचा जिवंत पूर्वज. बैलाच्या खांद्यावर जोखड घालून माणसाने बैलाला स्वतःच्या कामासाठी जुंपले. पूर्वी माणसाला गुरांपासून मांस, दूध, कातडी ह्या वस्तू मिळत होत्या. आता त्यांची ताकदही माणसाला उपलब्ध झाली.

मंद गतीने चालणारे, मानेवर जोखड घेतलेले ताकदवान बैल पहिले लाकडी नांगर ओढू लागले. कुदळी-



स्वीडनमध्ये डोंगराच्या कड्यावर नांगऱ्याचे चित्र सापडले



"नांगर" — कॅनडाचे इंडियन

पेक्षा नांगराचा फाळ मातीत जास्त खोलवर खणत होता. नांगरापाठोपाठ उकरलेल्या मातीची काळी फीत पसरायची.

पहिला नांगऱ्या स्वतःची सर्व शक्ती नांगराच्या दांडयाला लावायचा.

आता बैलाला सगळी ताकद लावावी लागली. नांगरणी, झोडपणी आणि धान्य वाहून नेणे, अशी कामे बैलाच्या अंगावर पडली. शरदात बैलाला झोडपणीच्या खळ्यावर नेत आणि तेथे तो खुरांच्या साह्याने कणसांमधून दाणे वेगळे करायचा. मग त्याला बिनचाकाच्या गाडीला जुंपायचे आणि शेतावरून घरापर्यंत धान्याची पोती ओढून न्यायला लावायचे.

पशुपालन शेतीच्या मदतीला आले. गुराखी पुरुष आता नांगऱ्यासुद्धा बनला. त्यामुळे घरात त्याची सत्ता वाढली.

एवढे खरे, बाईच्या वाटयाला काही कमी काम नव्हते. तिला सूत कातावे लागे, कापड विणावे लागे, पीककापणी करावी लागे व मुलांचा सांभाळ करावा लागे.

पण पूर्वीचा मान आता राहिला नव्हता. कुरणात आणि शेतात पहिले स्थान पुरुषाला मिळाले होते.

घरांमध्ये नवऱ्यांवर खेकसणे कमी झाले. आणि नवरे स्वतःचा केवळ बचाव न करता वारंवार उलटून बोलू लागले. पूर्वी सास्वा, मावशा आणि आजीबाया परक्या घरातून आलेल्या पुरुषाला सहजपणे हाकलून लावीत. पण आता त्या त्याची सेवा करू लागल्या. कारण परक्या घरातून आलेला हा पुरुष सगळ्यांसाठी राबत होता, सर्व कुटुंबाला खाऊ घालत होता. स्वतःच्या पुरुषांना दुसरीकडे जाऊ देण्यास टोळी आता अनुत्सुक असायची.

समाजावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी पुरुषांनी आपापसात लष्करी युती केल्या.

पूर्वी पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याचा वारसा त्याच्या बहिणीच्या मुलांना मिळायचा. आता हा रिवाज बदलून टाकण्याची पुरुष खटपट करू लागले.

आफ्रिकेतील तूआरेग भटक्या जमातीत सर्व वारसा "हक्काचा" व "बिनहक्काचा" यांच्यात वाटला जातो. "हक्काचा" वारसा बहिणीच्या मुलांना मिळतो. मरण पावलेल्या पुरुषाला त्याच्या आईकडून मिळालेल्या वस्तू आणि घराच्या कारभारात त्याने प्राप्त केलेल्या वस्तू, ह्यांचा त्यात समावेश असतो. "बिनहक्काच्या" वारशात त्याने युद्धात मिळविलेल्या वस्तू आणि व्यापारात मिळविलेल्या वस्तू समाविष्ट असतात. ह्या वस्तू मृत पुरुषाच्या मुलांना मिळतात.

मातृप्रधान कुटुंबव्यवस्था हजारो वर्षे चालली!


आणि जुन्या व्यवस्थेला तडे गेले! पुरातन ओक वृक्षाला जातात तसे!

जुन्या चालीरीतींचा माणसे वारंवार भंग करू लागली. पूर्वी बायको स्वतःच्या घरात नवऱ्याला आणायची, आता नवरा स्वतःच्या घरात बायकोला आणू लागला.

जुन्या रीतीचा हा भंग होता. म्हणून असा भंग करणाऱ्याला गुन्हेगार समजत.

नवरदेव स्वतःच्या वधूला सरळ घरी घेऊन जाऊ शकत नव्हता. त्याला तिची चोरी करावी लागे, तिचे हरण करावे लागे.

नवरदेवाची टोळी त्याच्या नवरीची निवड निश्चित करायची. मग मध्यरात्रीला नवरदेव व त्याचे टोळीवाले नवरीच्या घरापाशी भाले-कटयारी घेऊन लपतछपत जायचे. कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे घरातील सर्व माणसे जागी व्हायची. नवरीचे पांढरे केसवाले आजोबा व मिसरूडे न फुटलेले भाऊसुद्धा हाती शस्त्रे घ्यायचे. लढणाऱ्यांच्या भयानक आरोळ्यांमध्ये बायकांच्या रडण्याचा आवाज



बैलांना जमीन नांगरण्यास जुंपले (इजिप्तमधील चित्र)

लपून जायचा. टोळीवाल्यांचा आडोसा घेऊन नवरदेव स्वतःची शिकार—नवरी—हातांवर उचलून पळ काढायचा.

वर्षे उलटली. चालीरीतीचा भंग हळूहळू रीत बनला. नवरीच्या नातेवाईकांशी नवरदेवाची मारामारी आता एक धार्मिक विधी बनली.

रक्तपाताऐवजी भेटवस्तू आणि खंडणी देऊ लागले. नवरीची सासरी पाठवणी करताना तिच्या आईने, बहिणींनी व मैत्रिणींनी रडणेसुद्धा लग्नामधील एक विधी बनले. मिष्टान्न भोजनात ह्या विधीची सांगता व्हायची.

परक्या टोळीत, परक्याच्या घरी येऊन पडलेली तरुण नवरी आपल्या कमनशिबाबद्दल अश्रू ढाळतेय, अशा आशयाची अनेक प्राचीन] दुःखगीते लोकांच्या स्मरणात अजून आहेत.

नवरीच्या नशीबाचा हेवा वाटावा असे काही नव्हते. परक्या घरात नवऱ्याच्या सत्तेखाली बाईला रहावे लागे. तक्रार कुणापाशी करणार ती? सासू, सासरा आणि नवऱ्याचे सगळे नातेवाईक नवऱ्याचा कैवार घेणारे. घरात आणलेली नवरी म्हणजे मोलकरीण समजून सगळे तिच्या पाठी हात धुवून लागत. तिला क्षणभर स्वस्थ बसू देत नसत. घासभर जास्त अन्न खाऊ देत नसत. मातृप्रधान कुटुंबव्यवस्था पितृप्रधान बनली.

आता मुले आईपाशी नव्हे, तर बापापाशी रहात, बापाच्या टोळीत रहात. बापाच्या कुटुंबावरून नाते ठरू लागले, मातेच्या नव्हे. माणसाच्या स्वतःच्या नावाशी व कुळाच्या नावाशी त्याच्या बापाचे नावही जोडले जाऊ लागले.

ह्या काळापासून रशियात माणसाला त्याच्या बापाच्या नावासह संबोधण्याची चाल सुरू झाली: "प्योत्र इवानोविच" किंवा जुन्या रशियन रूढीप्रमाणे "प्योत्र, इवानचा मुलगा".


पहिले भटके

कोणे एके काळी सापडलेल्या अद्भुत भांडारामधून माणसाला सतत अधिकाधिक गोष्टी लाभत होत्या. स्तेपमध्ये हजारो मेंढ्या चरत होत्या. शेतात काळ्या मऊ मातीमधून मंदपणे नांगर ओढत जाणाऱ्या बैलांवर नांगऱ्या ओरडत होता.

सुपिक खोऱ्यांमध्ये पहिल्या बागा आणि पहिले द्राक्षाचे मळे फुलले. संध्याकाळच्या वेळांना आवारात अंजिरांच्या झाडांखाली माणसे गप्पा मारायला जमू लागली.

श्रमामुळे माणसाला अधिकाधिक गोष्टी लाभू लागल्या, पण त्याचबरोबर श्रम जास्त करणे आवश्यक ठरले. प्रत्येक द्राक्षाच्या घडासाठी, गव्हाच्या प्रत्येक कणसासाठी माणूस अपार घाम गाळत होता.

एकट्या द्राक्षासाठी किती खटाटोप! द्राक्षाचे अवजड घोस तोडून एकत्र गोळा केल्यानंतर त्यांना दगडी उखळांमध्ये चिरडायचे व नंतर द्राक्षाचा रस वेगळा काढायचा. द्राक्षे चिरडायची,



अवजड द्राक्षघडांना गोळा करून रगडयंत्रात टाकायचे (इजिप्तमधील चित्र)

फुटायची आणि त्यांचे काळसर रक्त बकरीच्या कातडचाच्या पिशव्यांमध्ये गळायचे. लोक मदिरेच्या गौरवाखातर गूढ गाणी गायचे, बकरीच्या कातडचाची वस्त्रे ल्यायलेल्या देवाची, त्याच्या हाल-अपेष्टांची गाणी गायचे.

नद्यांच्या खालच्या अंगांना दर वसंतात पूर यायचा व माती सुपिक बनायची. जणू खुद्द निसर्ग पिकांची काळजी वाहात होता.

पण इथेही शेतकऱ्यांचे हात स्वस्थ बसत नव्हते. शेतांमध्ये पाणी अडवण्यासाठी माणसे चर खणत होती, बांध घालत होती, जेथे पाण्याची जास्त गरज होती तेथे पाणी सोडत होती.

जमीन सुपिक बनविणाऱ्या नदीची माणसे स्तुतीपर कवने गात होती. त्यांच्या श्रमांविना ह्या पृथ्वीवर तणाच्या गवताविना दुसरे काहीही उगवले नसते, ह्याचा त्यांना विसर पडायचा.

शेतकऱ्याच्या चिंता वाढत होत्या. आणि पशुपालकालाही क्षणाची उसंत मिळत नव्हती. स्तेपमधील कुरणात गुरांचे कळप दिवसागणिक नव्हे, तर तासागणिक वाढत होते. कळप जेवढा मोठा, तेवढ्या त्याच्या उसाभरी जास्त. काही दशक मेंढ्यांची राखण आणि हजारो मेंढ्यांची राखण, ह्यात फार फरक होता. मोठा कळप गवताचे कुरण लौकर फस्त करायचा आणि मग वस्तीपासून अधिक दूरदूरच्या कुरणांमध्ये त्याला चरण्यासाठी न्यावे लागत होते.

शेवटी सबंध वस्तीच एके ठिकाणचा मुक्काम उठवून गुरांच्या आणि मेंढ्यांच्या कळपांबरोबर दुसरीकडे जाऊ लागली. लोक स्वतःचे तंबू गुंडाळून उंटांच्या पाठींवर लादायचे आणि स्वतःची जिवंत संपत्ती पुढे हाकत प्रवासाला निघायचे.

त्यांच्या पाठीमागे ओसाड, तण वाढलेली शेते रहायची. पण लोकांना त्यांच्याबद्दल विशेष वाईट वाटत नसे. कारण कोरड्या स्तेपमध्ये फारसे चांगले पीक कधी निघत नसे.



भटके मंगोल (प्राचीन चिनी चित्र)

केवळ एका टोळीत नव्हे, तर अनेक टोळयांमध्ये श्रमविभागणी जगात प्रथमच घडली. गुरांची पैदास करून गुरांच्या बदल्यात धान्य घेणाऱ्या गुराख्यांच्या टोळया स्तेपमध्ये उदयाला आल्या. ह्या टोळया एका जागी फार काळ रहात नसत. एका कुरणातून दुसऱ्या कुरणात त्या भटकत रहायच्या.

भटक्यांचे जीवन रानटी व मुक्त होते.

उघडचा स्तेपमध्ये, जेथे झाडे नव्हती आणि घरे नव्हती, हे लोक स्वतःच्या राहुटचा ठोकायचे. आख्खे स्तेप त्यांचे घर होते. दूरच्या प्रवासांवेळी मुलांना झोपेच्या वेळी पाळण्याचे झोके मिळत नसत, उंटाच्या पाठीचे हिंदोळे त्यांना अंगाई गीत गात.

ज्या काळाबद्दल आम्ही बोलत आहोत, त्या काळात गुराखी टोळयांमध्ये अस्सल भटके अजून कमी होते.

जिवंत हत्यार

भटक्या टोळयांचे जीवन शांत आणि स्वस्थ नव्हते. त्यांच्या भटकंतीत वाटेत येणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतांवरील पिकांना व गुरांना हे भटके टोळीवाले अनेकदा जबरदस्तीने लुटून नेत. नदीच्या खोऱ्यात उतरून अगर स्तेपमधून जंगलाच्या कडेपर्यंत जाऊन, ते खेडी लुटत आणि जाळून टाकत, पिके तुडवून टाकत, गुरांना आणि माणसांना पळवून नेत.

त्यांना माणसांची सर्वांत जास्त गरज भासायची. माणसांना कामाला जुंपता यायचे, गुरांची राखण करायला लावता यायचे.

भटके गुराखी असे वागत. पण शेतकरीसुद्धा आता शांत बसून रहात नव्हते.

शरदामध्ये पीक-कापणी झाल्यानंतर, तेसुद्धा शेजारच्या वस्तीवर धाडी घालत, परक्या टोळीचे धान्याचे साठे, अलंकार, हत्यारे लुटून नेत. पण सर्वांत मौल्यवान लूट म्हणजे कैद केलेली माणसे.

याचे कारण चर खणायला, बांध घालायला, बैलांना हाकायला, शेतकऱ्यांनासुद्धा हात अपुरे पडत होते.

पूर्वी कैद्यांना गुलाम म्हणून वागवत नसत, कारण त्यात काही अर्थ नव्हता. जादा हातांची जोडी विशेष फायदेशीर ठरत नव्हती. माणूस काम करायचा, पण तेवढेच खायचा.


जेव्हा मोठे गुरांचे कळप बनले, अधिक धान्यपैदास करू लागले, जेव्हा एका माणसाचे श्रम एका माणसाच्या गरजेपेक्षा जास्त धान्य, मांस, लोकर देऊ लागले, तेव्हा सारेच बदलून गेले. धान्याऐवजी लोकर घेण्यासाठी, स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक धान्याची पेरणी शेतकरी करू लागले. त्याचप्रमाणे पशुपालक स्वतःच्या वस्त्रांच्या गरजेपेक्षा जास्त मेंढ्या पाळू लागले : कारण लोकरीच्या बदल्यात ते धान्य व शस्त्रे घेऊ शकत होते.

ह्या देवघेवीपायी आणि कधी कधी लूट केल्यामुळे, काही टोळ्या व कुटुंबे दुसऱ्यांपेक्षा अधिक श्रीमंत बनली. त्यांच्यापाशी गुरांचे कळप जास्त होते आणि ते अधिक पेरणी करत होते. मेंढ्यांची राखण करायला व जमीन नांगरायला त्यांना माणसे अपुरी पडत होती. इथेच काही माणसांनी दुसऱ्या माणसांना गुलामाप्रमाणे राबविण्यास सुरुवात झाली.


गुलाम स्वतःच्या श्रमांमार्फत स्वतःला व स्वतःच्या मालकाला खाऊ घालू शकत होता. गुलामाने अधिक काम करावे व कमी खावे, एवढी खबरदारी फक्त मालकाला घ्यावी लागे. अशा रीतीने माणसाने दुसऱ्या माणसाला स्वतःचे जिवंत हत्यार बनविले.

माणसाला हीन बनविण्यात आले. बैलाच्या मानेवर ठेवत तसे त्याच्या मानेवर जोखड ठेवण्यात आले.

स्वातंत्र्याच्या वाटेवर, निसर्गावर सत्ता स्थापन करण्याच्या उद्योगात, माणूस दुसऱ्या माणसाच्या गुलामीत अडकला.



इजिप्तच्या माणसांची लढाईतील लूट



गुलाम जमिनीची मशागत करीत आहेत (इजिप्तमधील चित्र)

पूर्वी जमिनीची मशागत करणाऱ्या सर्वांच्या मालकीची ती जमीन असायची. आता गुलाम त्याची मालकी नसलेल्या जमिनीची मशागत करू लागला.

ज्या बैलाला तो हाकायचा तो बैल त्याच्या मालकीचा नव्हता आणि जे पीक तो गोळा करायचा ते पीक त्याचे नव्हते.

प्राचीन इजिप्तमध्ये बैल हाकताना गुलाम गाणे म्हणायचा :

तुडवा कणसे, बैलांनो!
तुडवा कणसे!
पीक धन्याच्या मालकीचे!

अशा रीतीने माणसांमध्ये मालक व गुलाम प्रथम निर्माण झाले.

आठवण आणि स्मारक

भूतकाळातील आपली सफर अवघड होती. गुंफांच्या वेटोळ्यात आपण हौशी प्रवाशांप्रमाणे फिरलो नाही, तर संशोधकांप्रमाणे निरीक्षण केले. सापडलेली प्रत्येक वस्तू गूढ कोडे होती, ते कोडे सोडवावे लागले. पण आपल्या वाटेत आपल्याला काही मार्गदर्शक खुणा आढळल्या नाहीत, शोधात मदत करणारी खांबावरील अक्षरे सापडली नाहीत. पाषाणयुगात माणूस कुठून अक्षरे लिहून ठेवणार? कारण त्याला लिहिताच येत नव्हते!

अखेरीस आपण अशा मार्गावर येतोय, ज्यावर मार्गदर्शक खुणांचे खांब आहेत. थडग्यांवर आणि मंदिरांच्या भिंतींवर आपल्याला पहिले लेख आढळतात. दुष्ट पिशाच्चांना पिटाळून लावण्या-

साठी काढलेल्या पूर्वीच्या जादूच्या चित्रांशी ह्यांचे साम्य नाही. ह्या माणसांसाठी, माणसांविषयीच्या संपूर्ण चित्रकथा आहेत.

आपल्या अक्षरांशी साम्य दाखविणारे येथे काहीही नाही. बैलाचे बैलासारखे चित्र आहे, झाडाला सर्व फांद्यांसकट चितारले आहे.

लेखनाचा इतिहास चित्रलिपीपासून सुरू होतो. ह्या चित्रांना अधिक सोपे रूप येण्यासाठी, त्यांचे सोयीस्कर खुणांमध्ये रूपांतर होण्यासाठी, बराच काळ उलटणे आवश्यक होते.

ज्या चित्रांमधून आपली अक्षरे निर्माण झाली, ती चित्रे ओळखणे आता अवघड आहे. "A" अक्षर म्हणजे बैलाचे डोके, असा विचार कोण करील? पण तुम्ही "A" उलटे केलेत, तर शिंगवाले डोके दिसते. प्राचीन यहुद्यांच्या भाषेत हे शिंगवाले डोके म्हणजे "A" होते – पहिले अक्षर "आलेफ": त्याचा अर्थ बैल.

आपल्या प्रत्येक अक्षराचा इतिहास शोधून काढणे शक्य आहे. "O" म्हणजे डोळा, "P" म्हणजे लांब मानेवरचे डोके, असे सिद्ध करणे शक्य आहे.

पण आपल्या वेगवान बुटांनी आपल्याला त्यापेक्षा खूप दूर आणले आहे.


आपण आपल्या कथेत फक्त पहिल्या चित्रलिपीपर्यंत येऊन ठेपलोय.

माणूस अत्यंत मंदपणे आणि अडखळत लिहायला शिकला.

मात्र एव्हाना त्याने लिहायला शिकणे आवश्यक होते.

ज्ञान आणि वस्तुस्थिती जोवर कमी प्रमाणात होती, तोवर त्यांना आठवणीत ठेवणे सोपे होते. दंतकथा, रूपककथा, परीकथा तोंडातोंडी सांगितल्या जात होत्या. प्रत्येक वृद्ध माणूस म्हणजे जिवंत पुस्तक. कथा, दंतकथा, शहाणपणाने जगण्याचे नियम, याबाबत शब्द न शब्द आठवणीत ठेवून माणसे स्वतःच्या मुलांना ते मौल्यवान गाठोडे म्हणून देत. मुलांनी त्याप्रमाणे त्यांच्या मुलांना तो ठेवा द्यावा म्हणून. पण ह्या गाठोड्याचे ओझे जसे वाढत गेले, तसे ते डोक्यात साठवणे अवघड झाले.

अशा वेळी आठवणीच्या मदतीला स्मारक आले. अनुभव देताना बोली भाषेला लिखित भाषा मदत करू लागली. टोळीप्रमुखाच्या समाधीवर त्याच्या मोहीमा व लढाया चितारण्यात आल्या – त्याच्या वारसांना ज्ञात होण्यासाठी.




इंडियनांच्या नेत्याची समाधी

दुसऱ्या दोस्त टोळीप्रमुखांकडे दूत पाठवत, तेव्हा झाडाच्या सालीवर अथवा चिकणमातीच्या पाटीवर आठवणीला मदत म्हणून चित्रलिपी कोरून देत.


समाधीवरील लेख – म्हणजे पहिले पुस्तक. भोजाच्या सालीचा तुकडा – म्हणजे पहिले पत्र.

वेळ आणि अंतर यांच्यावर मात करणाऱ्या आपल्या टेलीफोन, रेडिओ, टेपरेकॉर्डर इत्यादींचा आपण अभिमान बाळगतो. रेडिओवरील भाषण हजारो किलोमीटर दूरपर्यंत प्रक्षेपित करण्यास आपण शिकलोय. फितींवर आणि तबकड्यांवर ध्वनीमुद्रित केलेले आपले आवाज पुढे शेकडो वर्षे घुमत राहतील. आपण खूप काही साध्य केले आहे, पण आपल्यापूर्वी जगलेल्या माणसांचे ऋण आपण विसरणार नाही. आपल्याआधी फार फार काळापूर्वी, भोजाच्या सालीवर पत्र लिहून माणसांनी अंतरावर मात केली होती आणि समाधींच्या दगडांवर लिहून वेळावर मात केली होती.

प्राचीन काळातील मोहीमांच्या व लढायांच्या हकीकती सांगणारी अनेक स्मारके आपल्या काळापर्यंत टिकून राहिली आहेत. तलवारी आणि भाले धरलेल्या योद्धयांच्या दगडांवर कोरलेल्या आकृती. विजेते समारंभपूर्वक घरी परतत आहेत आणि त्यांच्या मागून हात पाठीशी बांधलेले,



उत्तर अमेरिकेतील इंडियनांची चित्रकथा



पाथरवट गुलाम मंदिर बांधताहेत. वरती उजवीकडे मकादम हातात छडी घेऊन बसलाय (इजिप्त-मधील चित्र)

माना खाली घातलेले कैदी. आणि ह्या चित्रांमध्ये आपल्याला चित्रलिपी आढळते – गुलामीचे; विषमतेचे चिन्ह दाखविणारी हातबेडी. ही खूण मानवजातीच्या इतिहासातील नव्या प्रकरणाची – गुलामगिरीच्या आरंभाची – साक्ष देते.

इजिप्तमधील मंदिरांच्या भिंतींवर नंतर आपल्याला असे अनेक चित्र-साक्षीदार भेटतात.

बांधकाम स्थळावर विटा वाहून नेणारी गुलामांची ती लांबलचक रांग पहा. एका गुलामाने विटांची चवड खांद्यावर ठेवलीय आणि दोन्ही हातांनी तिला धरलेय. दुसरा कावडीवर विटा वाहून नेतोय – रशियात शेतकरी पाण्याच्या बादल्या वाहून नेत त्याप्रमाणे. पाथरवट भिंत बांधत आहेत. तेथेच विटेवर मुकादम बसलाय. त्याने हाताचे कोपर स्वतःच्या गुडघ्यांवर टेकवलेत. त्याच्या हातांमध्ये लांब छडी आहे. त्याला काम करावे लागत नाही. त्याचे काम – दुसऱ्यांना काम करायला लावायचे. दुसरा मुकादम बांधल्या जाणाऱ्या इमारतीपाशी फिरतोय. त्याने संतापून गुलामाच्या डोक्यावर छडी उगारलीय. तो गुलामावर नाराज दिसतोय.

गुलाम आणि स्वतंत्र लोक

कांद्यामधून गुलाब कधी फुलणार नाही.

गुलामामधून स्वतंत्र माणूस जन्मणार नाही. ज्या काळात गुलामगिरी एव्हाना पक्की प्रस्थापित झाली होती व समाजरचनेचा पाया बनली होती, त्या काळात ग्रीक कवी थेओग्नीसने असे म्हटले होते.

पण आरंभीच्या काळात गुलामांना हीन कुळातील समजले जात नव्हते. स्वतंत्र लोक व गुलाम एकत्र रहात, एकत्र काम करीत, त्यांचे एकच मोठे कुटुंब होते, एकच समाज होता.

ह्या कुटुंबाचा मुख्य आणि सत्ताधारी बाप होता. त्याचे मुलगे, सुना, नातवंडे, गुलाम, गुलामांच्या बायका असे सगळे त्याच्यासह एकाच छपराखाली रहात होते, त्याच्या सर्व आज्ञा पाळत होते. अवज्ञा करणाऱ्या मुलाला आणि अवज्ञा करणाऱ्या गुलामाला बाप सारख्याच मापाने छडीने झोडपून काढायचा.


म्हातारा गुलाम त्याच्या धन्याला "मुला" म्हणून संबोधायचा आणि धनी त्याला जुन्या रूढीनुसार "तात" म्हणायचा.

तुम्ही जर 'ओदेसी' महाकाव्य वाचले असेल, तर कदाचित तुम्हाला आठवेल, की त्यात डुकरांच्या कळपाची व्यवस्था पाहणारा म्हातारा एवमेय त्याच्या मालकाशेजारीच टेबलाशी बसून खातो-पितो. 'ओदेसी' गाणारे लोकगायक टोळीच्या प्रमुखाला "देवासमान" मानतात.

पण गाण्यातील प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवता येत नाही. डुकरे सांभाळणारा एवमेय देवासमान नव्हता आणि मालकासमानही नव्हता. त्याच्यावर काम करण्याची सक्ती केलेली होती व त्याचा मालक स्वतंत्रपणे काम करीत होता. कुटुंबातील घटकापेक्षा गुलामाकडून जास्त काम करवून घेत आणि त्याला मोबदला कमी देत. गुलाम त्याच्या मालकाची मालमत्ता होता, तर स्वतंत्र माणूस मालमत्तादार होता.

जेव्हा मालक मरायचा, तेव्हा त्याचा गुलाम मालकाच्या सर्व साठ्यांसह, गुरांच्या कळपासह, मालकाच्या मुलांची मालमत्ता बनायचा.

ह्या कुटुंब-समूहात इतःपर पूर्वीची समानता नव्हती.



गुलाम-गुराखी व कळपाचा मालक (इजिप्तमधील चित्र)



इजिप्तमधील नीग्रो कैद्यांची मोजणी

इथे बापाची मुलांवर सत्ता चालायची, नवरा बायकोवर सत्ता गाजवायचा, सासू सुनांवर सत्ता चालवायची, मोठ्या सुना धाकट्या सुनांवर सत्ता चालवायच्या. पण गुलाम सर्वांत खालच्या पायरीवर होता. त्याच्यावर सगळे सत्ता गाजवायचे.

टोळ्यांमध्ये आणि समूहांमध्येही पूर्वीची समानता राहिली नव्हती. एका टोळीपाशी जास्त गुरे होती, दुसरीपाशी कमी गुरे होती. संपत्तीचे मोजमाप गुरांच्या संख्येवरून ठरत होते. बैलाच्या मोबदल्यात कापड व शस्त्रे खरीदता येत होती. पहिली ब्राँझची नाणी बैलाच्या ताणलेल्या कातडीच्या आकारासारखी पाडण्यात आली होती ह्यात काही नवल नाही.

पण बैलापेक्षा गुलाम जास्त मौल्यवान मानला जायचा.

गुलाम डुकरांची, गायींची, मेंढ्यांची राखण करायचा. दिवसभर त्यांना कुरणात चारल्यानंतर संध्याकाळच्या वेळांना तो ह्या जनावरांना घरी पिटाळत आणून कोंडवाड्यात कोंडायचा. गुलाम पीक-कापणीत मदत करायचा, गुलाम द्राक्षांचा रस काढायचा, ऑलीवचे तेल काढायचा. कोठारांमध्ये सोनेरी धान्याचे ढीग साठायचे. सुगंधित तेल घाण्यामधून चिकणमातीच्या प्रचंड भांड्यांमध्ये गळायचे. त्या भांड्यांना ॲम्फोरी म्हणत.

गुलाम स्वतंत्र माणसाला मदत करायचा, पण सर्वांत कठीण श्रमांचे काम गुलामाच्या वाट्याला यायचे.

युद्ध उत्पन्नाचे साधन बनले. कारण युद्धातून गुलाम मिळायचे आणि गुलामांमुळे संपत्ती वाढायची.

अशा रीतीने स्वतंत्र माणसे युद्धावर जायची आणि गुलामांना गुरांची राखण करायला व जमिनीची मशागत करायला मागे घरी ठेवायची.

युद्धामुळे लोकांची कामे आणखी वाढली. हल्ला करण्यासाठी तलवारी व भाले आवश्यक होते, लढाऊ रथ आवश्यक होते. लढाऊ रथांना वेगवान घोडे जुंपायचे आणि रणांगणावर त्या रथांमधून योद्धे लढायला जायचे.

पण युद्धात आक्रमण व संरक्षण अशा दोन्ही गोष्टी आहेत. शत्रूच्या तलवारींपासून आणि भाल्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी योद्धयाला डोक्यावर शिरस्त्राण घालावे लागे, डाव्या हाती ढाल धरावी लागे. टोळीच्या सामूहिक घरांभोवती मोठ्या दगडांच्या भक्कम भिंतींचे तट उभारण्यात आले.

टोळी जेवढी जास्त श्रीमंत आणि सामर्थ्यवान, तेवढी ती संरक्षणाची जास्त काळजी घ्यायची. कारण राखण करण्यासारखे तिच्यापाशी खूप काही असायचे.

लौकरच अनेक खोल्यांच्या आणि कोठारांच्या गढ्या टेकाडांवर उभ्या झाल्या. त्यांच्याभोवती बुरूजांचे तट होते, त्यांची प्रवेशद्वारे भक्कम होती.

तंबू घर कसा बनला, घर शहर कसे बनले

सोविएत इतिहासलेखक से. प्यो. तोल्स्तोव यांनी त्यांच्या 'प्राचीन खोरेझ्म' पुस्तकात त्यांना मध्य आशियातील वाळवंटात आढळलेल्या गढ्यांबद्दल लिहिले आहे.

ही बांधकामे घरापेक्षा शहराची आठवण करून देणारी होती.

एका प्रचंड मोकळ्या चौकाभोवती अनेक किलोमीटर लांबीची चिकणमातीची भक्कम भिंत चारही बाजूंनी उभी होती. समूहातील माणसे त्या भिंतींच्या आत रहात – कमानदार कॉरीडॉ-रांमध्ये. त्यांच्या छतांना छोटी गवाक्षे होती.

पहिल्या दृष्टिक्षेपात मनात गोंधळ निर्माण होतो की, हजारो माणसे अशा अर्धवट अंधाऱ्या, दाटीच्या कॉरीडॉरांमध्ये का रहात होती आणि मधला चौक मोकळा का ठेवत होती.

तोल्स्तोव ह्याचा साधा खुलासा देतात. त्या काळात खोरेझ्मवासींच्या दृष्टीने गुरे मुख्य संपत्ती होती. चौकाचा वापर ते प्रचंड संख्येच्या गुरांना सुरक्षित ठेवण्यासाठी करीत होते व गवाक्षांच्या आणि बुरूजांच्या भिंती ह्या पशुधनाचे शत्रूपासून संरक्षण करण्यास उपयोगी पडत होत्या.

जेव्हा शत्रूचा हल्ला होई, तेव्हा गढीतील सर्व माणसे गवाक्षांपाशी एकवटत आणि अप्रिय योद्धयांवर बाणांचा वर्षाव करीत.

पण सामुदायिकरीत्या ज्या संपत्तीचे ते रक्षण करीत होते, ती संपत्ती आता सामुदायिक राहिली नव्हती. इथे सर्व एकमेकांचे नातेवाईक होते. पण काही कुटुंबांपाशी इतरांपेक्षा जास्त मेंढ्या, बैल, घोडे होते.

प्राचीन दंतकथा साक्ष देतात की; "सधन" शब्द त्यावेळी अस्तित्वात आला होता. केवळ "सधन" म्हणत नसत, तर "कळपांनी सधन", "घोडयांनी सधन" असे म्हणत.

परक्या किल्ल्यावरील प्रत्येक धाडीनंतर योद्धयांच्या नेत्यांचे गुरांचे कळप वाढत होते, सधन आणि निर्धनांमधील अंतर वाढत होते.

तोल्स्तोवना आणि त्यांच्या मदतनीसांना वाळवंटात खूप नंतरच्या काळातील गढयाही सापडल्या.

हे उत्खननाचे काम खूप अवघड होते व अनेक वर्षेपर्यंत ते चालले. प्राचीन काळी नाहीशा झालेल्या जगाच्या खुणा शोधण्यासाठी सोविएत संशोधक उंटांवरून, मोटारींमधून, होडयांमधून, विमानांमधून प्रवास करीत होते. काहीवेळा उंटाच्या पाठीवरून अगर टेकाडावरून त्यांना फक्त भुरकट क्षाराचा थर बसलेले ढीग दिसायचे. पण वाळवंटावर विमानातून अगदी खालून उडताना त्यांना त्या ढिगांखालील भिंतींच्या, रस्त्यांच्या, मोठया सामुदायिक घरांच्या रूपरेषा स्पष्ट दिसत.

ह्या सर्व घरांची आणि शहरांची तुलना करून संशोधकांना अखेरीस धागे जोडता आले की, आदिमानवांच्या समाजापासून गुलाम बाळगणाऱ्यांचा समाज कसा निर्माण झाला.

जान्बास-काला ह्या ठिकाणाजवळचे मच्छीमारांचे तंबूचे घर पहा. इथे अजून सधन व निर्धन नाहीत. सगळया चुली सारख्या, सगळी माणसे सारखी, कारण ती सारखीच निर्धन होती. घरा-भोवती तटबंदी नाही. राखण करण्यासाठी इथे संपत्तीच नाही.

जान्बास-काला ह्या स्थळाशेजारीच, ह्या छावणीपासून थोडया अंतरावर, चिकणमातीपासून बांधलेल्या "लांबोडया घरा"चे अवशेष संशोधकांना सापडले. पन्नास मीटर लांबीच्या दोन बोळकंडींमध्ये ओळीने चुली मांडल्या होत्या.

ह्या घराभोवतीही अजून तटबंदी नव्हती.

पण काही शतके उलटतात. अनेक "लांबोडी घरे" एकमेकांना लगटून प्रचंड मोकळया आवा-राभोवती रहिवासी भिंत उभी करतात.

क्यूझेली-गीर येथे असे बंदिस्त घर आहे. येथे एव्हाना लढाईसाठी गवाक्षे व पहाऱ्याचे बुरूज आहेत. शत्रूंच्या धाडींपासून लोक स्वतःच्या गुरांच्या कळपांचे रक्षण करतात. पण शेजारच्या परक्यांचे धन लुटायलाही त्यांची हरकत नसते. इथे काही कुटुंबे दुसऱ्यांपेक्षा जास्त श्रीमंत आहेत. पण उत्खनन करणाऱ्या पुराणवस्तुशास्त्रज्ञाला त्याबद्दल अजून पुरावा दिसत नाही. दुसऱ्या देशांमध्ये व जगाच्या दुसऱ्या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या जीवनपद्धतींचा अभ्यास करून तो ह्या विष-मतेबद्दल तर्क करतो.

पुढची पायरी – जान्बास-कालाचा किल्ला. भिंतींच्या आतील चौकोनी आवारात दोन महा-प्रचंड अनेक खोल्यांची सामायिक घरे बांधलेली आहेत. ह्या दोन घरांदरम्यानचा रस्ता "अग्नी-घरा"कडे जातो. मच्छीमाराच्या तंबूतील प्राचीन शेकोटीत सतत पेटणारा अग्नी येथे मंदिरात जाऊन बसलाय.

किल्ल्यात आता एक नव्हे, तर दोन टोळयांचे गट राहतात. प्रत्येक गट स्वतंत्र घरात राहतो. गुरांसाठी बंदिस्त आवार येथे नाही, कारण रहिवाशांचा मुख्य व्यवसाय पशुपालन नसून शेती आहे. किल्ल्याशेजारी पाणीपुरवठयाच्या कालव्यांचे जाळे पसरलेली शेते आहेत. ह्या शेतांचे व कालव्यांचे किल्ला भटक्या टोळयांपासून रक्षण करतो.

ही आणखी उशीराची पायरी—तोप्राक-काला किल्ला. इथे आता दोन नव्हेत, तर अनेक खोल्यांची जवळजवळ दहा घरे आहेत.

बुरूजांसकटच्या भक्कम तटांच्या भिंती शहराच्या चारही बाजूंना उभ्या आहेत. प्रवेशद्वारामधून पाहुणा थेट शहरात पोहचत नाही. शहराच्या वेशीपर्यंत रक्षण करणाऱ्या वाटांचे जाळे त्याला ओलांडावे लागते.

वेशीपासून शहराच्या दुसऱ्या टोकापर्यंत मुख्य रस्ता जातो. त्याच्या दोन्ही बाजूंना शेकडो खोल्यांची, मनोऱ्यांची, आत अंगणे असलेली मोठी सामायिक घरे. मुख्य रस्ता "अग्नी-घरा" कडे जातो आणि शहराच्या सत्ताधाऱ्याच्या तीन मनोऱ्यांच्या भव्य प्रासादाकडे जातो.

ह्या सगळयातून आता काही ठिकाणी चिकणमातीचे व वाळूचे थर बसलेले थोडे पडके अवशेष उरलेत. शहराचा चेहरा पुन्हा रचण्यास आमच्या शास्त्रज्ञांना खूप कष्ट घ्यावे लागले.

सापडलेल्या अवशेषांमुळे त्यांच्या श्रमांचे चीज झाले. विशेषतः तीन मनोऱ्यांच्या प्रासादातील सापडलेल्या वस्तू खूप स्वारस्यपूर्ण होत्या. दर्शनी दालनांच्या भिंतींवर चित्रकारांनी रेखाटलेल्या भित्तीचित्रांचे अवशेष आढळले. ह्या निर्जन वाळवंटाच्या मध्यभागी त्या प्रासादाच्या भिंतींवर संशोधकांना भूतकाळातील चित्रे जणू जिवंत पाहिल्याचा भास झाला: हार्प वाद्य वाजविणारी मुलगी, डोक्यावर करंडी पेलणारी द्राक्षे गोळा करणारी स्त्री, काळया अंगरख्यातील पुरुष, घोडे, वाघ, तीतर पक्षी. अत्यंत सुबक घडविलेल्या पुतळयांचे तुकडेसुद्धा सापडले.

प्रासादातील सर्व गोष्टी सांगत होत्या की, शहरातील इतर रहिवाशांपेक्षा प्रासादाचे मालक खूप श्रीमंत व उच्चकुलीन होते.

आणि इतर घरांपेक्षा खूप उंच असलेला प्रासाद खुद्द साक्ष देत होता की, त्यातील रहिवासी इतरांपेक्षा खूप श्रेष्ठ होते.

इथे खोरेझ्मशाह स्वतःचे कुटुंब व अनेक गुलाम यांच्यासह रहात होता. शहराचा आणि सबंध देशाचा तो सत्ताधारी होता.

हे आता अस्सल राज्य होते. शहराच्या सत्ताधाऱ्यापाशी फौजा होत्या. गुलामांना व गरीबांना जरबेत ठेवायला, श्रीमंत व नामवंत कुटुंबांच्या हक्कांचे रक्षण करायला, पाणीपुरवठ्याच्या काल-व्यांच्या बांधकामांवर देखरेख करायला, ह्या फौजांची त्याला मदत व्हायची. पाण्याचा मोठा कालवा खोदण्यासाठी अनेक हजार गुलामांच्या श्रमाची गरज होती. खोरेझ्ममध्ये शेतांचे, काल-व्यांचे, तटबंदी नसलेल्या शेतकऱ्यांच्या घरांचे रक्षण केवळ एक नव्हे, तर अनेक किल्ले आणि मोठी लष्करी सेना करीत होते.


अशा रीतीने हजारो वर्षांमधून प्रवास करून संशोधकांना स्वतःच्या डोळ्यांनी पहायला मिळाले : तंबूचे घरात, घराचे शहरात रूपांतर कसे झाले; समान माणसांच्या समाजाचे गुलाम बाळगणाऱ्यांच्या राज्यात रूपांतर कसे झाले.

केवळ मध्य आशियातच नव्हे, तर गोळा केलेल्या संपत्तीचे शत्रूपासून रक्षण करण्याची गरज होती अशा दुसऱ्या अनेक ठिकाणीसुद्धा किल्लेवजा मोठी घरे पुराणवस्तुशास्त्रज्ञांना सापडली.

किल्ल्याचा वेढा

किल्ल्याच्या भिंतींवरून खूप दूरचे दिसते. स्तेपमध्ये जेव्हा धुळीचे लोट उठायचे व उन्हात भाल्यांची टोके चमकू लागायची, तेव्हा किल्ल्यात संरक्षणाच्या तयारीची धांदल उडायची. नांगऱ्या घाईघाईने स्वतःच्या बैलांना पळवायचा, गुराखी कळप पिटाळायचे. आणि शेवटचा माणूस घरात आला. अवजड दरवाजे गच्च बंद झाले. भिंतींवर व बुरूजांवर योद्धे धनुष्य-बाण घेऊन शत्रू माऱ्याच्या टप्प्यात येण्याची वाट पहात उभे रहायचे.

आक्रमक किल्ल्यापाशी आल्यानंतर स्वतःच्या छावण्या ठोकायचे. किल्ला सहज सर होणार नाही ह्याची त्यांना जाणीव आहे. किल्ल्याच्या उंच भिंती कोसळण्यापूर्वी अनेक महिने लोटतील. रोज सकाळी किल्ल्याचा दरवाजा करकरत उघडतो. उघड्या मैदा-



असीरीयन किल्ल्याला वेढा घालतात. खाली : योद्धे कैद्यांना घेऊन जातात

नात युद्धाचा निर्णय लावण्यासाठी भाले परजत सैनिकांच्या झुंडी बाहेर धावत येतात. घोड्यांच्या शेपट्यांनी सजविलेल्या शत्रूंच्या चमकदार शिरस्त्राणांवर ते त्वेषाने तलवारींचे घाव घालतात. स्वतःची किंवा शत्रूची गय न करता ते थकून जाईपर्यंत लढतात.

एक पक्ष स्वतःच्या घरांची, बायका-मुलांची राखण करण्याच्या हेतूने स्फुरण पावत असतो. दुसऱ्या पक्षाला हाताच्या अंतरावर असलेली संपत्ती लाभत नाही म्हणून संताप आलेला असतो. रात्री उशीरा प्रहराला जिवंत उरलेले किल्ल्याचे रक्षक माघार घेतात. पहाट फुटेपर्यंत लढाई थंडावते.

असे दिवस उलटतात. वेढ्यात अडकलेले हल्लेखोरांशी धैर्याने लढत देतात. पण शत्रूंच्या तलवारींपेक्षा व बाणांपेक्षा उपासमार जास्त भयानक असते.

जेव्हा कोठारांमध्ये धान्याऐवजी केवळ धूळ शिल्लक राहते, जेव्हा चिकणमातीच्या मोठ्या खुजामधून तेलाच्या धारेऐवजी थेंब ठिपकू लागतात, तेव्हा किल्ल्यात रडण्याचा आकांत उमटतो. भुकेली मुले रडत असतात आणि पुरुषांचा राग ओढवू नये म्हणून बायका गुपचूप अश्रू पुसतात.

प्रत्येक लढाईनंतर किल्ल्याच्या रक्षकांची संख्या कमी होत जाते. आणि एक दिवस असा उजाडतो, जेव्हा माघार घेणाऱ्यांचा पाठलाग करीत शत्रूचे लोक किल्ल्यात घुसतात. उंच भिंतींचा दगड न दगड ते पाडून टाकतात. जेथे लोक रहात होते, काम करीत होते, मेजवान्या झोडीत होते, तेथे आता फक्त उध्वस्त ढिगारे व ठार झालेल्यांची प्रेते उरतात. आणि विजेते लहान-थोरांना स्वतःबरोबर घेऊन जातात—स्वतंत्र माणसांना गुलाम करण्यासाठी.


मृत जिवंतांबद्दल हकीकत सांगतात

रशियाच्या दक्षिणेस विस्तीर्ण पसरलेल्या स्तेपमध्ये काही ठिकाणी थेट क्षितिजापर्यंत टेकलेली उंच टेकाडे दिसतात. सपाट मैदानांमध्ये ही टेकाडे कशी निर्माण झाली, त्यांना कुणी बनविले, ह्याबद्दल स्थानिक लोकांपैकी कुणालाही काही आठवत नाही.

जर तुम्ही खूपच कसून चौकशी करू लागलात, तर एखादा शंभर वर्षांचा आजोबा तुम्हाला सांगेल की, ही "मामाईची" अथवा "मामाईच्या मुलींची" थडगी आहेत. पण हे "मामाई" कोण आणि इथे ते केव्हा रहात होते, ह्याचा खुलासा मात्र तो करू शकणार नाही.

आजोबा गप्पिष्ट असेल तर तो मोठ्या उत्साहाने तुम्हाला त्याच्या जमीनदार मालकाबद्दल आठवणी सांगेल. हा जमीनदार हाती नकाशा घेऊन, गुप्त खजिना शोधण्यासाठी प्रत्येक वर्षेपर्यंत टेकडी खणत होता. पण शेवटी त्याला काहीच सापडले नाही. मग क्रांती घडली, "मालकाची जमीनदारी काढून घेण्यात आली" आणि त्याला खजिन्याचा शोध थांबवावा लागला.

पण आजोबाला प्रश्न विचारत बसण्यापेक्षा, टेकड्यांवर उत्खनन करणाऱ्या पुराणवस्तुशास्त्रज्ञांना तुम्ही प्रश्न विचारणे जास्त इष्ट ठरेल.



दोल्मेन – प्रचंड दगडांची प्राचीन समाधी

आजोबाला फक्त त्याच्या स्वतःच्या आयुष्यभरात काय घडले तेवढेच आठवते, पण पुराणवस्तुशास्त्रज्ञांना त्यांच्या जन्मांपूर्वी कित्येक शतके काय घडले होते ते माहीत असते.

टेकडया म्हणजे प्राचीन थडगी आहेत, स्तेपमध्ये कोणे एके काळी राहिलेल्या लोकांना मृत्यूनंतर तेथे पुरले आहे.

टेकडया खणल्यानंतर त्यांच्यात खोलवर माणसांचे सापळे सापडतात व सापळ्यांशेजारी वस्तू: चिकणमातीचे खुजे, गारगोटीची अथवा ब्रॉंझची हत्यारे, घोडयांची अनेक हाडे. मृत माणसासोबत हे सामान देत – त्याच्या दूरच्या प्रवासात त्याने बरोबर घेऊन जावे म्हणून.

लोकांची समजूत होती की, मृत्यूनंतर माणसाला खायला व काम करायला लागेल; बाईच्या आत्म्याला सूत कातायची चाती लागेल व पुरुषाच्या आत्म्याला भाल्याची गरज भासेल.

अत्यंत प्राचीन थडगी अगदी एकसारखी आहेत. मेलेल्या माणसाबरोबर त्याच्या मालकीच्या काही वस्तू पुरतात.

आरंभीच्या काळात माणसाच्या वस्तू फार कमी होत्या. "स्वतःचे" असे तो काय म्हणणार? त्याने गळ्यात घातलेला एखादा ताईत, किंवा ज्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला होता तो भाला.

घरात सर्व सामायिक मालकीचे होते. घराचा कारभार सामायिकरीत्या, सर्व टोळी मिळून चालवायची. म्हणूनच अत्यंत प्राचीन टेकड्यांमध्ये श्रीमंत व गरीब थडगी नाहीत. मेलेले सगळे समान होते.

श्रीमंत आणि गरीब मृत नंतर उदयाला आले.

दॉन नदीवर, येलीझावेतोवस्काया खेड्यापाशी थडग्यांची टेकाडे असलेली स्मशानभूमी आढळली. तेथे तीन प्रकारची थडगी आहेत: एका प्रकारात श्रीमंत माणसे आहेत, दुसऱ्यात मध्यमवर्गीय आहेत व तिसऱ्यात अगदी दरिद्री लोक आहेत.

सर्वांत मोठ्या टेकड्यांमध्ये मध्यभागी एक खळगा आढळला – थडगे. त्या थडग्यात रंगवलेली ग्रीक पुष्पपात्रे, सोन्याचं पाणी दिलेली चिलखते आणि सुबक मुठी कोरलेल्या कटचारी ठेवलेल्या होत्या.

छोट्या टेकड्यांमध्ये सोन्याची वस्तू क्वचित सापडते, पण रंगवलेली पुष्पपात्रे अजिबात नाहीत. पण ह्या थडग्यांना दरिद्री म्हणता येणार नाही. जर मृत माणूस दरिद्री असता, तर त्याच्या थडग्यात ही काळ्या लाखेचा मुलामा दिलेली बशी ठेवली नसती, धातूच्या तबकड्यांपासून चतुराईने बनविलेले चिलखत ठेवले नसते.

स्मशानभूमीत सर्वांत जास्त छोटुकली टेकाडे आहेत. ही दरिद्री लोकांची थडगी. मृत माणसाच्या उजव्या हातापाशी अरुंद खड्ड्यात भाला ठेवलेला आहे व डाव्या हाताशी पाण्याचा खुजा. म्हणजे त्याला तहान लागल्यास पाणी पिता यावे. दरिद्री माणूस थडग्यातसुद्धा दरिद्रीच राहिला.

एक म्हण आहे: "थडग्याप्रमाणे मूक." पण ही थडगी मुकी आहेत काय? जगात श्रीमंत आणि गरीब माणसे प्रथम निर्माण झाली त्या काळाविषयी ही थडगी आपल्याला सांगत नाहीत काय? मृत जिवंतांबद्दल हकीकत सांगतात.

जर ह्या थडग्यांना सोडून जवळच्याच उध्वस्त वस्तीमध्ये आपण गेलो, तर तेथेही आपल्याला पूर्वीच्या श्रीमंतीच्या आणि दारिद्र्याच्या खुणा पहायला मिळतात. पुराणवस्तुशास्त्रज्ञांना आढळले की, वस्तीला दोन कुंपणे होती. एक कुंपण वस्तीच्या भोवती होते व दुसरे वस्तीच्या मध्यभागी वर्तुळाकार होते. हा मध्यभाग नदीकिनारी होता. दूरच्या ग्रीसमधून आणलेल्या मौल्यवान भांड्यांचे व पुष्पपात्रांचे खूप तुकडे मध्यभागी सापडले. आतील व बाहेरच्या कुंपणांदरम्यान तसले तुकडे मुळीच सापडले नाहीत. इथे अत्यंत सामान्य स्थानिक मातीच्या भांड्यांचे व खुजांचे तुकडे सापडले. सीमेपाशी राहणाऱ्या लोकांपेक्षा मध्यभागी राहणारे लोक जास्त सधन होते हे स्पष्ट आहे. मौल्यवान बशा अथवा वाट्या विकत घ्यायला त्यांच्यापाशी काहीतरी होते.

दुरून दिसणारी उंच टेकाडे नंतर त्यांच्या थडग्यांवर बांधण्यात आली.

अशा रीतीने थडग्यात पुरलेल्या माणसांबद्दल ती थडगी बोलतात. कधी कधी ती फार भयानक गोष्टी सांगतात. मालकाबरोबर दफन करण्यासाठी ठार मारण्यात आलेल्या गुलामांविषयी ती हकीकती सांगतात, मेलेल्या नवऱ्यांबरोबर थडग्यात जाणे भाग पडलेल्या बायकांबद्दल सांगतात.

बापाच्या क्रूर सत्तेबद्दल, श्रीमंत टोळीच्या प्रमुखाबद्दल, कुठल्याही पुस्तकापेक्षा थडगी जास्त कथन करतात. टोळीचा प्रमुख मरणानंतर स्वतःबरोबर आपल्या बायकांना व गुलामांना थडग्यात घेऊन जायचा. कारण ब्राँझ आणि सोन्याच्या मौल्यवान वस्तूंप्रमाणे, बायका व गुलाम त्याच्या मालकीची माणसे होती.

माणूस नवीन धातू निर्माण करतो


हजारो वर्षे थडग्यांच्या अंधारात पडून राहिलेल्या आणि तटबंदींच्या वस्त्यांच्या अवशेषांमध्ये लोळत पडलेल्या मौल्यवान वस्तू आता वस्तुसंग्रहालयांमध्ये जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. माणसाच्या डोळ्यांआड इतकी वर्षे जे लपून होते, ते आता प्रदर्शनात मांडून ठेवलेले आहे, त्यामुळे प्रत्येकजण स्वतःच्या डोळ्यांनी खूप दूरचा भूतकाळ पाहू शकतो.

वस्तुसंग्रहालयाला भेट देणारी माणसे काचेच्या कपाटांसमोर खूप वेळ उभी राहतात आणि सोन्याच्या मुठींच्या तलवारी पाहतात; नाजुक कलाकुसरीच्या माळा, छोटे सोन्याच्या वासराचे डोके कोरलेले मणी, बैलांच्या अगर हरीणांच्या आकाराची चांदीची पात्रे पाहतात.

ह्या प्रत्येक वस्तूला बनविण्यासाठी किती श्रम व कलाकुसर आवश्यक होती!

ब्राँझची अत्यंत साधी कटयार बनवायलासुद्धा अनेक दिवस खर्च करावे लागत होते.

प्रथम खाणमाती काढावी लागत होती. नैसर्गिक तांब्याचे तुकडे पायांखाली लोळत पडण्याचे दिवस केव्हाच संपले होते. तांब्याची माती मिळविण्यासाठी आता जमिनीत खोल खणावे लागत होते. खोल खाणींमध्ये टिकाबांच्या साह्याने माणसे खाणमाती खोदत व कातडी पिशव्यांमधून वर आणत.



अत्यंत जुनी ब्राँझची तलवार

दगड फोडणे सोपे जावे म्हणून खाणीत शेकोटी पेटवायचे. जेव्हा दगड लालबुंद तापायचा, तेव्हा त्याच्यावर पाणी ओतायचे. पाणी फस्स आवाज करीत वाफ बनायचे. दगडाला तडे जात व त्याचे तुकडे पडत. खाणमाती खणून काढण्यास आग आणि पाणी टिकावाला मदत करीत.

खाण तेव्हा ज्वालामुखी भासायची. खाली पेटविलेल्या आगीमुळे, ज्वालामुखीच्या विवरातून बाहेर पडणाऱ्या वाफेच्या ढगांप्रमाणे, तिच्या तोंडातून वाफेचे लोट बाहेर पडायचे.

खाणमातीमधून धातू वितळवून ओतायचे. ह्यासाठी फार मोठे कसब आवश्यक होते. धातू घट्ट बनावा, त्याला साच्यात ओतणे सोपे जावे, म्हणून तांब्याच्या मातीत कथीलाचा दगड मिसळत.

जेव्हा खाणमाती वितळवत, तेव्हा भट्टीत तांबे आणि कथील यांचे मिश्रण झालेला नवा धातू तयार व्हायचा. हाच ब्रॉंझ — नवे गुणधर्म असलेला, माणसाच्या हातांनी निर्माण केलेला नवा धातू.

पूर्वी, ओबडधोबड दगडी हत्यारांच्या काळात, एक माणूस सहजपणे दुसऱ्याचे काम करू शकायचा. कारागिरी शिकणे तेवढे अवघड नव्हते. शिकारी टोळयांमध्ये प्रत्येक पुरुष शिकारी होता आणि प्रत्येकजण स्वतःसाठी धनुष्य-बाण बनवू शकत होता.

पण लवचिक काठीला वाकवून, तिच्या दोन टोकांना दोरी बांधून धनुष्य बनविणे वेगळे आणि खाणमातीच्या तुकड्यामधून चमकती ब्रॉंझची तलवार घडविणे वेगळे.

शस्त्रे बनविण्याची कारागिरी आत्मसात करण्यासाठी माणसांना अनेक वर्षे शिकावे लागले. मुलगा बापापासून शिकायचा. कारागिरी टोळीची मालमत्ता होती, पिढीजात संपत्ती होती. काही वेळा कुंभारांच्या, शस्त्रे बनविणाऱ्यांच्या, तांबटांच्या आख्ख्या वस्त्या असायच्या. त्यांची कीर्ती दूरवर पसरायची.

स्वतःचे आणि परक्याचे

आरंभी प्रत्येक कारागीर फक्त स्वतःच्या समाजासाठी, स्वतःच्या वस्तीसाठी काम करायचा.

पण जसा काळ उलटत गेला, तसा शस्त्रकारागीर अथवा कुंभार जास्त जास्त प्रमाणात स्वतःच्या वस्तूंच्या बदली धान्य, कापड, दुसऱ्या कारागीरांच्या हातांनी बनविलेल्या वस्तू घेऊ लागला.

प्राचीन टोळीव्यवस्थेला तडे जाऊ लागले, खाणींमध्ये तापवलेल्या दगडावर पाणी ओतताच त्याला तडे जात त्याप्रमाणे.

पूर्वी खेड्यात सगळे समान होते. आता एका तड्याने श्रीमंत टोळीला गरीब टोळीपासून वेगळे केले, दुसऱ्या तड्याने कारागीर व शेतकरी यांना विभक्त केले.

जोवर कारागीर सबंध समाजासाठी काम करीत होता, तोवर समाज त्याला खाऊ घालीत होता. माणसे एकत्र काम करीत होती व मिळालेल्या सर्व वस्तू आपापसात वाटून घेत होती.

पण जेव्हा कारागीर स्वतःच्या तलवारी आणि कढया दुसऱ्या खेड्याला विकू लागला, तेव्हा स्वतःच्या कामासाठी मिळालेले धान्य अथवा कापड टोळीतील नातेवाईकांबरोबर वाटून घेण्यास तो तयार नव्हता.

ब्राँझची भांडीसुद्धा बनवू लागले



कारण हे धान्य आणि हे कापड त्याने इतर कुणाचीही मदत न घेता फक्त स्वतःच्या मुलां-बरोबर श्रमून मिळविलेले होते!

अशा प्रकारे माणूस स्वतःचे आणि परक्याचे असा भेद करू लागला, स्वतःचे कुटुंब आणि नातेवाईकांची कुटुंबे यांच्यात भेद करू लागला.

माणसे छोटया कुटुंबगटांमध्ये राहू लागली.

ग्रीसमध्ये मीकेना आणि तीरीन येथे आढळलेल्या प्राचीन वस्त्यांच्या अवशेषांवरून कुटुंबांचे विभक्त राहणे स्पष्ट दिसते.

उंच टेकडीच्या शिखरावर भक्कम भिंतींच्या पलिकडे सर्वांत श्रीमंत, सर्वांत सामर्थ्यवान कुटुंब रहात होते. ह्या कुटुंबापाशी दगडी भिंतींआड दडवून ठेवण्यासारखे खूप काही होते! इथे टोळीचा लष्करी पुढारी स्वतःची मुले, सुना, नातवंडे यांच्यासह रहात होता. खाली, सपाट मैदानात, गरीब शेतकरी माणसे खोपटांमध्ये दाटीवाटीने रहात होती. आणि भोवतालच्या टेकडयांवर शस्त्रकारागीरांची, कुंभारांची, तांबटांची घरे होती.

इथे ह्या खेडयात लोक आता एकमेकांशी समानतेच्या नात्याने बोलत नव्हते. टोळीच्या श्रीमंत व सत्ताधारी पुढाऱ्याला पाहताच शेतकरी त्याच्यापुढे आदराने झुकून अभिवादन करीत. त्यांची समजूत होती की, खुद्द देवच सामर्थ्यवानांच्या पाठीशी असतात.

देवाच्या पुजाऱ्यांनी त्यांना असे शिकविले होते, अगदी लहानपणापासून त्यांच्या मनावर असले विचार ठसविण्यात आले होते.

कारागीराला, खाणमाती खणणाऱ्यालासुद्धा, शेतकरी स्वतःचा भाऊ मानीत नव्हता. जेथून आगीच्या ज्वाळा उमटतात अशा जमिनीतून तांबे काढणारा हा मळकट माणूस चेटक्या तर नव्हे? पायांखाली जमिनीत काय करतात कोण जाणे? कशी त्याला खाणमाती गवसली? बहुधा कुणी तरी त्याला जमीन कुठे खणायची ते दाखवतो, खाणमाती मिळवायला व तिच्यापासून अद्भुत तांबे आणि ब्राँझ बनवायला कुणीतरी त्याला मदत करतो! तेथे, जमिनीखाली, खाणकामगाराचे गूढ रक्षणकर्ते आहेत आणि सामान्य माणसाने त्यांच्यापासून चार हात दूर राहणे इष्ट!

अशा समजुती केवळ ग्रीसमध्येच नव्हे, तर सर्वत्र प्रचलित होत्या.

लोहार-चेटक्यांविषयींच्या दंतकथा फार प्राचीन काळापासून आपल्यापर्यंत चालत आल्या आहेत.

श्रीमंती व गरीबीबद्दल कोणे एके काळी लोकांना काय वाटायचे ते व्यक्त करणारे शब्द

आपल्या भाषेत अजून टिकून आहेत. श्रीमंत व गरीब हा भेद कुठून आला ते लोकांना समजत नव्हते. माणसाचे दैव देव निर्णित करतो असे त्यांना वाटायचे.

रशियन भाषेत "बगातीय" (श्रीमंत – अनु.) हा शब्द "बोग" (देव – अनु.) ह्या शब्दापासून निर्माण झाला आहे. देव श्रीमंतांना मदत करतो व दरिद्री लोकांवर फक्त संकटे पाठवतो, अशी लोकांची जेव्हा समजूत होती, त्या काळात हा शब्द निर्माण झाला.

नव्या व्यवस्थेचा आरंभ

माणसाने पार पाडलेल्या वाटेवर परत एकदा नजर टाकू.

कोणे एके काळी माणसामध्ये श्रीमंत व गरीब नव्हते, गुलाम व गुलामांचे मालक नव्हते.

आदिकाळातील शिकारी जमिनीखालील निवाऱ्यांमध्ये दाटीवाटीने रहात होते आणि सगळे सारखेच दरिद्री होते. दगड आणि हाडे यांच्यापासून बनविलेली त्यांची हत्यारे परिपूर्ण नव्हती. हिंस्र श्वापदांपासून, उपासमार व थंडीपासून, माणसे वाचू शकली याचे एकमेव कारण म्हणजे ती एकत्र रहात होती, एकत्र शिकार करीत होती, संकट आल्यास सामायिक बळाने संरक्षण करीत होती, सामायिक बळानेच त्यांनी स्वतःची घरे बांधली.

एकटा-दुकटा माणूस प्राचीन प्रचंड हत्तीची शिकार करू शकला नसताच, पण अस्वलाला ठार मारणेही त्याला शक्य झाले नसते.

मोठ्या चुलाण्यासाठी मोठा दगड वाहून आणणे किंवा कड्याखाली दगडी फरशीची भिंत उभारणे एका माणसाच्या ताकदीबाहेरचे काम होते.

लोकांचे सर्व सामायिक होते. जेव्हा शिकार यशस्वी व्हायची, तेव्हा पाठलाग करणाऱ्या व जनावराला ठार मारणाऱ्या, अशा सर्वांना मांसाचे वाटे म्हातारी माणसे द्यायची.

पण काही हजार वर्षे लोटली. तंबू व जमिनीखालील निवाऱ्याऐवजी घरे निर्माण झाली, दगडाच्या आणि हाडाच्या हत्यारांऐवजी धातूची शस्त्रे तयार झाली.

प्रथम कुदळीने व नंतर नांगराने जमीन नांगरण्याचे काम माणसे करू लागली. माणसे गायी, घोडे, मेंढ्या पाळू लागली. लोहारशाळांमध्ये हातोड्याचे घण ऐकू येऊ लागले. कुंभाराची चाके फिरू लागली. लोकांमध्ये श्रमविभागणी सुरू झाली. लोहाराला जमिनीची नांगरणी करण्याचे कारण उरले नाही: कुऱ्हाडीच्या अथवा कोयत्याच्या बदल्यात तो धान्य घेऊ शकत होता. मेंढ्यांच्या कळपाविना जगणे शेतकऱ्याला शक्य झाले: धान्याच्या बदल्यात स्वतःच्या गरजेपुरती लोकर तो पशुपालकापासून घेऊ शकत होता.

धान्य, लोकर, कुऱ्हाडी, चिकणमातीची भांडी, असा माल लादून होड्या व गलबते एका खेड्यापासून दुसऱ्या खेड्यापर्यंत जाऊ लागली. दुसऱ्या ठिकाणचे "पाहुणे" वारंवार दरोडेखोर ठरायचे. देवघेव आणि दरोडेखोरी हातात हात घालून चालत होत्या.

पूर्वी स्वतःच्या नातेवाईकांपेक्षा जास्त श्रीमंत होणे कुणालाही शक्य नव्हते. सगळे सारखेच गरीब होते.

आता गरीबांच्या खोपटांच्या डोक्यांवर, टेकड्यांच्या माथ्यांवर, श्रीमंत आणि सामर्थ्यवान कुटुंबांची उंच दगडी भिंतींच्या कुंपणांची घरे उभी झाली. तेथे विपुल भांडारे उतू जात होती. दर वर्षागणिक तेथे मौल्यवान वस्तू साठत होत्या, त्यांची संख्या वाढत होती.

श्रीमंतांनी सत्ता स्वतःच्या हाती हिसकावून घेतली व गरीबांना अंकित केले. गरीब माणसाला वारंवार श्रीमंत शेजाऱ्याकडे जावे लागायचे – मदतीची याचना करण्यासाठी. पण ही मदत फार महागात पडायची: संकटकाळात उसन्या आणलेल्या धान्याच्या मोबदल्यात अनेक वर्षेपर्यंत राबावे लागायचे.

अशा रीतीने काही माणसे दुसऱ्यांना गुलाम बनवू लागली.

पण गुलामगिरी केवळ अशा मार्गाने उदयाला आली नाही. लोक युद्धात कैदी धरून आणायचे व स्वतंत्र लोक गुलाम बनायचे.

पूर्वी सगळे श्रमायचे. आता काही लोक मुळीच काम करीत नव्हते, तर दुसऱ्यांना छडीच्या माराखाली काम करावे लागत होते.

पूर्वी सर्व सामायिक होते – शिकारीची हत्यारे आणि भक्ष्य. आता गुलामांच्या मालकाच्या ताब्यात केवळ जमीन, गुरांचे कळप, कर्मशाळा नव्हत्या, तर जमीन नांगरणारे, गुरे राखणारे, कर्मशाळांमध्ये काम करणारे गुलामसुद्धा त्यांच्या ताब्यात होते.

पूर्वी एका समाजातील माणसे एकमेकांविरुद्ध लढत नव्हती, शांततेने रहात होती. रशियन शब्द "मीर" ह्याचे दोन अर्थ काही उगीच नाहीत: शांततामय जीवन आणि समाज.

पण जेव्हा गुलामी अस्तित्वात आली, तेव्हा प्रत्येक खेड्यात, प्रत्येक शहरात, संघर्ष सुरू झाला.

गुलामांचे मालक गुलामांना तुच्छ मानायचे, गुलाम त्यांच्या मालकांचा तिटकारा करायचे.

मालकापासून पळून कसे जायचे ह्याबद्दलच गुलाम सतत विचार करायचा. मालक स्वतःच्या मालमत्तेला, स्वतःच्या जिवंत बोलणाऱ्या हत्याराला राखून ठेवण्याचा प्रयत्न करायचा. गुलामांच्या मालकांच्या राज्यात स्वतंत्र लोकांच्या मालमत्तेचे सैन्यामार्फत रक्षण केले जात होते. जर गुलामांनी बंडाळी केली, तर आज्ञापालनाची त्यांच्यावर जबरी करण्यात येई व त्यांना क्रूर शासन करण्यात येई.

अशा रीतीने जुन्या आदिकाळातील सामूहिक व्यवस्थेच्या जागी नवी गुलाम बाळगणारी व्यवस्था आली.

प्रकरण बारावे

विज्ञानाचा आरंभ

कोणे एके काळी माणसाला सबंध जग परीकथेसारखे भासत होते. सर्व गूढ आणि अनाकलनीय होते.

प्रत्येक पाऊल, हाताची प्रत्येक हालचाल कुठलीतरी अज्ञात शक्ती त्याला देत होती. तिच्यामुळे त्याचा नाश होऊ शकत होता अथवा त्याचे भाग्यही उघडत होते.

अजून अनुभव फार कमी आणि असहाय होता, त्यामुळे लोकांना कसलीच खात्री वाटत नव्हती. रात्रीनंतर दिवस उगवेलच, हिवाळ्यानंतर वसंत येईलच, ह्याचा भरवसा वाटत नव्हता.

आकाशात वर चढण्यास सूर्याला मदत व्हावी, म्हणून माणसे जादूटोण्याचे विधी करीत. सूर्याचे पृथ्वीवरील रूप समजला जाणारा इजिप्तमधील फाराओ आकाशातील सूर्याची फेरी पूर्ण व्हावी म्हणून दररोज देवळाभोवती प्रदक्षिणा घालायचा.

शरदात इजिप्तमध्ये "सूर्याची काठी" हा सण साजरा करायचे. तेथील लोकांची समजूत होती की, दुबळ्या बनलेल्या सूर्याच्या हाती काठी दिली पाहिजे, म्हणजे त्याला पुढची वाटचाल करायला मदत होईल.

पण माणूस काम करीत होता, जगाचे आणि वस्तूंच्या गुणधर्मांचे त्याला जास्त जास्त ज्ञान घडत होते.

दगडाला तासणाऱ्या व धारदार बनविणाऱ्या आदिकालीन कारागिराने दगडाचे गुणधर्म स्वतः-च्या हातांमार्फत व डोळयांमार्फत शिकून घेतले. कारागिराला ठाऊक होते की, दगड घट्ट आहे, त्यावर दुसरा दगड जोराने आपटल्यास दगड फुटणे शक्य आहे, आघात केल्यास दगड किंचाळत नाही. अर्थात दगड भिन्न होते. एक दगड बोलला नाही, पण दुसरा अचानक बोलला तर? असे विचार आपल्याला हसू आणतील. पण आदिमानव आपल्याप्रमाणे विचार करीत नव्हता.

आदिमानवाला सर्वसाधारण नियम आखता येत नव्हते, त्यामुळे त्याला सगळे आयुष्यच अपवादात्मक भासायचे. जगात दोन दगड सारखे नसतात हे त्याने पाहिले होते. म्हणून त्याला वाटले की, त्यांचे गुणधर्मही भिन्न असतील. जेव्हा तो दगडाची नवी कुदळ बनवायचा, तेव्हा जमीन चांगली खणली जावी म्हणून जुन्या कुदळीसारखी तिला बनवायचा तो प्रयत्न करायचा.

काही शतके आणि हजारो वर्षे उलटली. माणसाच्या हातांमधून अनेक भिन्न प्रकारचे दगड

पसार झाल्यानंतर त्याला एकूण दगडाबद्दलचे थोडे आकलन झाले. सगळे दगड घट्ट होते, म्हणजे दगड घट्ट वस्तू आहे. एकही दगड बोलला नाही, म्हणजे दगड बोलत नाहीत.

अशा रीतीने विज्ञानाचे पहिले कण — वस्तूंच्या संकल्पना अस्तित्वात येतात.

जेव्हा कारागीर म्हणतो की, गारगोटी घट्ट दगड आहे, तेव्हा आता तो केवळ त्याने हातात धरलेल्या गारगोटीबद्दल बोलत नसतो, तर एकूण कुठल्याही गारगोटीच्या दगडाबद्दल त्याचे हे विधान असते.

म्हणजे एव्हाना त्याला निसर्गाचा कुठलातरी नियम माहीत आहे, जगात अस्तित्वात असलेला कुठलातरी नियम ठाऊक आहे.

"हिवाळ्यानंतर वसंत येतो." तुम्हा-आम्हाला ह्याचे आश्चर्य वाटत नाही. हिवाळ्यानंतर वसंत येतो, शरद नव्हे, ही गोष्ट अगदी तर्काला धरून आहे. पण वर्षामधील ऋतूंचे बदल आपल्या पूर्वजांच्या दृष्टीने आरंभीच्या शास्त्रीय शोधांपैकी एक शोध होता व प्रदीर्घ काळपर्यंत निरीक्षण केल्यानंतर त्यांनी हा शोध लावला होता. हिवाळा आणि उन्हाळा केवळ योगायोगाने परत येत नाहीत, हिवाळ्यानंतर नेहमी वसंत येतो व वसंतानंतर ग्रीष्म आणि शरद येतात, हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले, तेव्हाच माणसे वर्षे मोजू लागली.

इजिप्तमधील लोकांनी नाईल नदीच्या महापूरांचे निरीक्षण करून हा शोध लावला. तेथे वर्ष असेच मोजत: नदीच्या एका पूरापासून — दुसऱ्या पूरापर्यंत.

धर्माधिकारी नदीचे निरीक्षण करीत. लोकांची श्रद्धा होती की, नदी देवस्वरूप आहे. इजिप्त-मधील नदीकिनारीच्या देवालयांच्या भिंतींवर धर्माधिकाऱ्यांनी त्या काळात केलेल्या पाण्याच्या पातळीच्या खुणा अजूनपर्यंत आहेत.

जुलैमध्ये जेव्हा शेतांमधील जमीन उष्णतेने तडकायची, तेव्हा नाईलचे पिवळे, गाळाने भरलेले पाणी चरांमधून केव्हा धावेल म्हणून शेतकरी आतुरतेने वाट पहायचे. पण पाणी नक्की धावणार ना? जर देव रागावले आणि त्यांनी शेतांमध्ये पाणी धाडले नाही तर?

देवालयांमध्ये चहूबाजूंनी देणग्या आणि बळींचा ओघ लागायचा. शेतकरी स्वतःजवळील शेवटचे मूठभर धान्य पुजाऱ्यांजवळ आणून देत व नम्र विनंती करीत: देवाची जोरदार प्रार्थना करा.

रोज सकाळी पहाटेच्या प्रहरी पुजारी नदीपाशी जात व पाण्याची पातळी तपासून पहात.

रोज संध्याकाळी ते देवालयाच्या सपाट छपरावर चढत व गुडघ्यांवर टेकून दूरच्या ताऱ्यांचे निरीक्षण करीत. नक्षत्रांचे आकाश म्हणजे त्यांची दिनदर्शिका होते.

आणि अखेरीस पुजारी मंदिरात गंभीरपणे जाहीर करीत: "देवाला प्रार्थनांमुळे दया आलीय — तीन रात्री उलटल्यानंतर शेतांमध्ये पाणी येईल."

लोकांच्या दृष्टीने नव्या असलेल्या जगावर लोक सावकाशपणे, एकेका पावलाने, प्रभुत्व मिळवू लागले. हे जग परीकथांचे नव्हते, ज्ञानाचे होते. देवालयाचे छप्पर म्हणजे पहिली खगोलशास्त्रीय



ऱाराओ बैलांचा बळी नेतो

भाराच्या व लोहाराच्या कर्मशाळा म्हणजे पहिले प्रयोग केलेल्या प्रयोगशाला.
करण्यास, मोजण्यास, निष्कर्ष काढण्यास माणसे शिकली.
ीन शास्त्राचे आपल्या आत्ताच्या शास्त्राशी फार कमी साम्य होते. ते अद्याप जादू-
साधर्म्य राखणारे होते व त्यांची विभागणी करणे सोपे नव्हते. लोक ताऱ्यांचे
ा करीत नव्हते, तर त्यांच्यावरून भविष्य सांगत होते. आकाश व पृथ्वीचा अभ्यास
ाच, ते आकाशीच्या व धरतीवरच्या देवांच्या प्रार्थना करीत होते. असे असले
ः थोडेसे निवळू लागले होते.

देव ऑलींपसला जातात

अद्भुत परीकथेतील जगाच्या धुक्यामधून माणसाला टप्प्याटप्प्याने वस्तूंच्या खऱ्या रूपरेषा दिसू लागल्या.

कोणे एके काळी आदिमानवांची श्रद्धा होती की, पिशाचे सर्वत्र वास करतात : प्रत्येक दगडात, प्रत्येक झाडात, प्रत्येक प्राण्यात.

ह्या श्रद्धेचा अंत झाला.


प्रत्येक प्राण्यात पिशाच वास करतेय असा विचार करणे माणसाने थांबविले. त्याच्या कल्पनेतील सर्व प्राण्यांची पिशाचे आता दाट जंगलात राहणाऱ्या जंगलच्या देवामध्ये सामावली.

पिकाच्या प्रत्येक पेंडीत पिशाच आहे असे शेतकरी मानेनासा झाला. कणसाला वाढायला लावणाऱ्या सुफला देवीमध्ये त्याची धान्याची सगळी पिशाचे सामावली.

पूर्वीच्या पिशाचांच्या जागी आलेले हे देव आता माणसांमध्ये रहात नाहीत. ज्ञान त्यांना मानवी वस्तीपासून अधिकाधिक दूर रेटत नेते. जेथे माणूस कधीही गेला नव्हता अशा दाट पवित्र झाडींमध्ये किंवा झाडांनी आच्छादलेल्या डोंगरमाथ्यांवर देवांनी आपला निवास नेला.

पण माणूस तेथेही जातो. ज्ञान जंगलातील काळोख नाहीसे करते, डोंगरउतारांवरील धुके पळवून लावते.

आणि नव्या घरांमधून पळवून लावलेले देव आकाशात वर चढतात, सागरतळांशी डुबी मारतात, पाताळराज्यात लपून राहतात.



अथेन्स देवता लढाईपूर्वी पुढाऱ्याला ताकीद देते आहे

माणसांमध्ये देव अगदी क्वचित येतात. लढायांमध्ये भाग घेण्यासाठी, किल्ल्याला वेढा घालण्यासाठी, देव पृथ्वीवर कसे उतरले होते, ह्यासंबंधीच्या दंतकथा तोंडातोंडी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात.

तलवारी आणि भाले हाती धरून देव माणसांच्या भांडणांमध्ये हस्तक्षेप करीत होते. अगदी अखेरच्या क्षणी पुढाऱ्याला ते काळ्या मेघांआड दडवून ठेवीत आणि शत्रूंवर विद्युल्लतेचा आघात करून त्यांचा पराभव करीत. पण हे सगळे कधीतरी खूप खूप पूर्वी घडले, असे कथा-कथन करणारे पुढे सांगत.

अशा रीतीने मानवी अनुभव पुढे पुढे शिरकाव करीत जात होता, तेजस्वी वर्तुळ सतत विस्तारत होते व त्यामुळे देवांना जवळच्या ठिकाणापासून दूर जावे लागत होते, वर्तमानकाळातून भूतकाळात जावे लागत होते, ह्या जगातून त्या "पलीकडच्या" जगात जावे लागत होते.

देवांकडून काही काम करवून घेणे अवघड बनले. पूर्वी प्रत्येकजण जादूटोणा करून "चमत्कार" घडवू शकायचा. ते मांत्रिक विधी सोपे होते. उदाहरणार्थ, पावसाला बोलवायचे असले, तर तोंडात पाणी धरायचे आणि नाचताना तोंडातून पाण्याचे फवारे उडवायचे. काळे मेघ पळवून लावायचे असतील, तर घराच्या छपरावर चढायचे आणि वाऱ्याची नक्कल करीत तोंडातून फुंकरी मारायच्या.

आता माणसाला माहीत आहे की, अशा मार्गांनी पावसाला बोलावता येत नाही किंवा काळ्या मेघांना पळवून लावता येत नाही. माणूस अशा निष्कर्षाला पोहोचला की, देव त्याच्या प्रार्थनांना असे सहजी पावणार नाहीत. तेव्हा सामान्य माणसे व देव यांच्या दरम्यान देवाचे पुजारी उभे राहिले. त्यांना सर्व अवघड धर्मविधी माहीत होते, देवांविषयीच्या सर्व गुप्त कथा माहीत होत्या.

पूर्वी मांत्रिक एखाद्या शिकारी-नाचाचे मार्गदर्शन करायचा. त्याच्या नातेवाईकांपेक्षा तो पिशाचांच्या अधिक जवळ नव्हता.

पण पुजाऱ्याचे वेगळे. तो देवांपाशी पवित्र रानात राहतो. देवांच्या इच्छा ताऱ्यांच्या पुस्तकातून वाचण्यासाठी तो मंदिराच्या छपरावर चढतो. हे ताऱ्यांचे पुस्तक फक्त तो एकटाच वाचू शकतो. लढाईआधी बळी दिलेल्या प्राण्यांच्या कोथळ्यांकडे पाहून जयाचे अथवा पराजयाचे भविष्य तो सांगू शकतो. पुजारी हा माणसे व देव यांच्यातील मध्यस्थ बनतो.

सामान्य मर्त्यांपासून देव अधिकाधिक दूर गेले. जेव्हा देव सर्वांशी सारखे वागत, तो काळ संपला. स्वतःकडे, स्वतःच्या आयुष्याकडे नजर टाकल्यानंतर माणसांना दिसले, की पूर्वीची समानता नाही. "तसंच असलं पाहिजे", पुजारी शिकवायचे, "माणसानं पूर्णतया देवांवर विसंबलं पाहिजे. राजे आणि नेते जशी लोकांवर सत्ता गाजवतात, तसे देव जगावर सत्ता गाजवतात". पण पुजाऱ्यांची शिकवण सगळ्याच माणसांना पटत होती असे नव्हे. देवांच्या इच्छांपुढे मान तुकविण्यास नकार देणारी काही माणसे होती.

एक काळ येतो व ग्रीक कवी विचारतो : "झ्यूसचा न्याय कुठं आहे? चांगल्यांचे हाल होत आहेत, पापी मजेत जगताहेत. बापांच्या पापांचे मुलांना शासन भोगावे लागतेय. लोकांमध्ये वसणाऱ्या एकमेव आशा देवतेची आराधना करणं तेवढं बाकी उरलंय. दुसरे सगळे देव ऑलीं-पसला निघून गेले".


जगाच्या कक्षा रुंदावल्या

आदिमानवाला सत्य व परीकथा, ज्ञान आणि भाबडचा समजुती, यांच्यामधील फरक समजत नव्हता. दुधापासून साय जशी वेगळी होते, तसे भाबडचा समजुतींपासून ज्ञान वेगळे व्हायला कित्येक हजार वर्षांचा अवधी लागला.

आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेल्या गीतांमधून आणि कथांमधून टोळयांचा व टोळीप्रमुखांचा इतिहास देवांच्या व वीरांच्या कथांपासून अलग करणे अवघड आहे. अस्सल भूगोलाला काल्पनिक भूगोलापासून व ताऱ्यांविषयीच्या पहिल्या माहितीला प्राचीन दंतकथांपासून अलग करणे कठीण आहे.

'इलीयड' व 'ओदीसी' मधून ग्रीकांनी आपल्यासाठी अतिप्राचीन गाणी आणि कथा ठेवून दिल्या. ग्रीकांनी ट्रॉय शहराला वेढा घालून त्याचा विध्वंस कसा केला व ग्रीकांच्या एका टोळीचा नेता ओदीसस दीर्घ काळपर्यंत सागरसंचार करून शेवटी स्वतःच्या इताका जन्मगावी कसा परतला, ह्याबद्दल ती गीते आहेत. ट्रॉयच्या तटांपाशी माणसांबरोबर देवही लढत होते. काही देव वेढा घालणाऱ्यांच्या बाजूने, काही देव वेढलेल्यांच्या बाजूने. जेव्हा देवांच्या आवडत्या व्यक्तीला धोका निर्माण व्हायचा, तेव्हा देव तिला पळवून न्यायचे आणि सुरक्षित जागी ठेवायचे. ऑलींपसच्या शिखरावर मेजवानी झोडताना देव चर्चा करायचे की, लढणाऱ्या माणसांची लढाई पुढे चालू ठेवावी अथवा त्यांच्यात समझोता घडवून आणावा.

ह्या कथांमध्ये सत्य व काल्पनिक यांचे मिश्रण केलेले आहे. त्यांच्यात इतिहास कुठे आणि दंतकथा कुठे? ग्रीकांनी ट्रॉयच्या तटांपाशी कधी लढाई केली होती काय? आणि ट्रॉय नावाचे शहर प्रत्यक्षात कधी होते काय?



ओदीससचे गलबत.

जोवर पुराणवस्तुशास्त्रज्ञांच्या टिकावांनी अंतिम निर्णय लावला नाही, तोवर ह्या प्रश्नांवर पंडितांनी खूप वादंग माजविले. 'इलीयड'मधील सूचनांनुसार पुराणवस्तुशास्त्रज्ञ आशिया मायनर-मध्ये गेले व जेथे ट्रॉय शहर असणे शक्य होते, तेथे उत्खनन करून त्यांनी ट्रॉयचे भग्न अवशेष वर काढले.

'ओदीसी' मध्ये हे सर्व काल्पनिक नाही. भूगोलशास्त्रज्ञांनी हे सिद्ध केले. नकाशावरून ओदीससच्या प्रवासाचा मार्ग त्यांना शोधता आला. जर तुम्ही नकाशा घेतलात, तर त्यावर तुम्हाला कमळे खाणाऱ्यांचा देश, एओलो बेटे आढळतील. एवढेच नव्हे तर ओदीससचे गलबत ज्यांच्या दरम्यान बुडता बुडता वाचले, ती त्सीला व हारिब्दा ही ठिकाणेही सापडतात.

कमळे खाणाऱ्यांचा देश, म्हणजे आफ्रिकेतील त्रिपोलीतानचा किनारा. एओलो बेटे म्हणजे आताची लीपारी बेटे. त्सीला व हारिब्दा — सिसिली व इटालीच्या दरम्यानचे आखात.

'ओदीसी' मध्ये सर्व काल्पनिक नाही. पण तरीसुद्धा 'ओदीसी' वरून प्राचीन जगाचा भूगोल शिकायचे तुम्ही ठरविले असते, तर तुमची ती घोडचूक ठरली असती.

प्रवासवर्णनाच्या ह्या पहिल्या पुस्तकात भूगोलाला परीकथेच्या वेषाने सजविले आहे. त्यातील पर्वत राक्षस बनलेत, बेटांवरील रानटी रहिवासी एकडोळे बलाढ्य मनुष्यभक्षक आहेत.

त्या काळातील माणसांना फक्त त्यांच्या भोवतालचा प्रदेश चांगला ठाऊक होता. खरे आहे, व्यापारी स्वतःच्या गलबतांमधून सागरसंचार करीत होते. पण किनाऱ्यांपासून फार दूर जाण्याचे धाडस ते करीत नसत. उघडचा समुद्रात जायला भीती वाटायची. त्यावेळी होकायंत्र नव्हते, नकाशे नव्हते. केवळ सूर्य आणि तारे ह्यांच्या साह्याने खलाशी चाचपडत वाट काढायचे. बेटा-वरील एखादा कडा, किनाऱ्यावरील एखादे उंच झाड, यांचा दीपस्तंभासारखा उपयोग करीत.

सागरात हजारो धोके दडले होते. साध्या लाटांमुळेसुद्धा रुंद, कपाच्या आकाराचे गलबत हिंदकळायचे. न वाकणाऱ्या शिडांच्या साह्याने दिशा धरणे अवघड जायचे. वारा माणसाचे ऐकायचा नाही आणि मन मानेल तसा गलबताशी खेळायचा.

अखेरीस गलबत किनाऱ्याला लागायचे. दमलेले खलाशी गलबताला खेचून वाळूत आणून ठेवीत. इथे जमिनीवर ते विश्रांती घेऊ शकत. पण त्यांच्या काळजात शांतता नसायची. समुद्रापेक्षा परकी भूमी जास्त भयानक वाटायची. दुसऱ्या खलाशांपासून ऐकलेल्या नरभक्षक माण-सांच्या कथा त्यांना भेडसावायच्या. पूर्वी न बघितलेले प्रत्येक जनावर त्यांच्या नजरेत राक्षस दिसायचे. देशाच्या आतील भागात खलाशी जात नसत.

तरीसुद्धा प्रत्येक नव्या सफरीबरोबर जग रुंदावत चालले होते. अज्ञाताच्या सीमा, परीकथां-च्या सीमा, अधिकाधिक पुढे सरकत होत्या. जेथून महासागर सुरू व्हायचा, त्या सागराच्या दरवाजांपर्यंत सर्वांत धाडसी खलाशी जाऊन आले होते. विश्वाप्रमाणे हा महासागर त्यांना अनंत वाटायचा. घरी परतल्यावर ते सांगायचे की, जगाच्या शेवटच्या टोकापर्यंत ते जाऊन आले आणि जमिनीला सर्व बाजूंनी महासागराचा वेढा पडलेला आहे.

काही हजार वर्षे उलटली. माणसे युरोपातून हिंदुस्थानात, चीनमधून युरोपात फिरू लागली. दर्यावर्दी महासागर ओलांडून गेले व माणसांची वस्ती असलेले नवे देश त्यांना सापडले.

तरीसुद्धा, पृथ्वीच्या शास्त्राबरोबर परीकथा अजून खूप काळ सोबत करणार आहे.

अमेरिकेचा शोध लावणाऱ्या कोलंबसाची समजूत होती की, पृथ्वीवर एक अतिउंच पर्वत आहे व त्यावर स्वर्ग वसलाय. त्याने स्पेनच्या राणीला लिहिले होते की, थेट स्वर्गापर्यंत जाण्याचा व तेथील परिसराचे संशोधन करण्याचा त्याचा इरादा होता.

रशियन राज्यात १५ व्या शतकात माणसांची समजूत होती की, उराल पर्वतापलिकडे लोक थेट अस्वलाप्रमाणे सबंध हिवाळाभर झोपून रहात होते. "पूर्वेतील अज्ञात माणसे" हे अति-प्राचीन हस्तलिखित आमच्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. डोक्यांवर तोंडे असलेल्या, छातीवर डोळे असलेल्या बिनडोक्यांच्या माणसांविषयी ह्या हस्तलिखितात तपशीलवार वर्णने आहेत.

आपल्याला हे हास्यास्पद वाटते. पण आपल्या काळातही अद्भुत कादंबऱ्यांचे लेखक लोकांना अज्ञात अशा जगांमधील राक्षसांची वर्णने करतात.

पृथ्वीचा आता उत्तम अभ्यास करण्यात आला आहे. म्हणून लेखक त्यांच्या नायकांना अनेकदा पृथ्वीच्या केंद्रभागी, मंगळावर, चंद्रावर पाठवतात.

पहिले गायक

प्रत्येक शतकाबरोबर माणसांच्या जीवनामधील गूढता आणि अज्ञातता कमी कमी होत गेली. कारागीर स्वतःच्या हातांवर व डोळ्यांवर जास्त जास्त विश्वास ठेवू लागला आणि देवाचा धावा करायला क्वचितच जाऊ लागला. सूर्य वर चढल्यानंतर दरीमधील धुके जसे नाहीसे होते, तसा जादूटोणा माणसाच्या आयुष्यातून हळू हळू नाहीसा होत गेला.

वेगवेगळ्या चालीरीतींमध्ये, पवित्र खेळांमध्ये, नाच-गाण्यांमध्ये जादूटोणा भक्कम टिकून राहिला. पण माणसाच्या जागृत झालेल्या विचारशक्तीने जादूटोण्याची इथूनही, त्याच्या स्वतःच्या घरातूनही, निष्ठुरपणे हकालपट्टी केली.

मांत्रिक नाच-गाण्यांमधून जादूटोणा नाहीसा झाला, फक्त नाच-गाणी उरली.

लोकांना फळे देणाऱ्या दीओनीसस देवाच्या सन्मानार्थ प्राचीन काळी ग्रीसमधील शेतकरी खेळांचा उत्सव करीत. आरंभी ते पवित्र जादूटोण्याचे खेळ होते. दीओनीसच्या मृत्यूबद्दल व पुनर्जन्माबद्दल गायकवृंद गाणी म्हणायचा. हिवाळी मृत झोपेनंतर निसर्गाला पुनर्जन्म घ्यायला मदत व्हावी आणि लोकांना त्याने धान्य, फळे व मदिरा द्यावी, असा गाण्यामागील हेतू असायचा.

जनावरांचे मुखवटे घालून खेड्यातील देवाच्या वेदीभोवती सोंगाडे नाचायचे.

मुख्य गायक दीओनीससच्या हालअपेष्टांविषयीचे गाणे म्हणायचा व गायकवृंद कडव्याला धरून उत्तर द्यायचा.

हा प्राचीन जादूटोण्याचा खेळ आता खूपसा नाटकासारखा आहे. गायकात व सोंगाड्यांमध्ये एव्हाना भावी नट ओळखू येतात. मुख्य गायक फक्त देवाच्या यातनांचे गाणे गात नव्हता, तर हावभावांनी त्यांचे प्रदर्शन घडवीत होता. तो स्वतःची छाती पिटतो, तो आकाशाकडे हात पसरतो.

जेव्हा देवाचा पुनर्जन्म होतो, तेव्हा सोंगाडे आनंदाचा जल्लोष करतात, एकमेकांना चिडवतात, थट्टामस्करीची देवघेव करतात.

आणखी काही शतके उलटतात व जादूटोण्याच्या विधींमधून जादू निघून जाते.

पण प्रत्यक्ष विधी शिल्लक राहतो. पूर्वीप्रमाणेच माणसे खेळतील, गातील, नाचतील. पण आता देवाच्या नव्हे, तर माणसांच्या हालांचे दर्शन ती घडवतील. रंगमंचाकडे पाहताना माणसे हसतील व रडतील, शौर्याचे व पराक्रमाचे कौतुक करतील, मूर्खपणाला आणि अजागळपणाला हसतील.

अशा रीतीने प्राचीन गायकवृंदाचा मुख्य गायक शोकांतिकेचा नट बनला आणि उल्हासी सोंगाड्यांमधून विनोदी नट, विदूषक बनले.

पण पहिला गायक केवळ पहिला नट नाही, तर पहिला गायकही आहे. प्रथम तो गायक-वृंदासह गातो. नंतर एकटाच गाणे म्हणू लागतो.

धर्मविधीपासून गाणे अलग झाले. पवित्र खेळांच्या वेळी गायक गातो आणि नेता मित्रांबरोबर मेजवानी झोडतो त्यावेळीही तो गातो. वीणेच्या तारा छेडत गायक गातो आणि कधी कधी प्राचीन रूढीनुसार शब्द, संगीत, हालचाली यांचा मेळ घालून नृत्यसुद्धा करतो. तो मुख्य गायक असतो व गानवृंदही असतो. तो गाणे म्हणतो व कडवेही गातो.

गायक कसले गाणे गातो? देव आणि वीर, अत्यंत धीट माणसांना पळवून लावणाऱ्या स्वतःच्या टोळीचे नेते, ह्यांच्याविषयीची गाणी तो गातो. लढायांमध्ये धारातीर्थी पडलेल्या योद्ध्यांबद्दल, ज्यांच्याबद्दल सूड घेतला पाहिजे अशा भावांबद्दल, तो गातो.

ही गाणी म्हणजे प्रार्थना नव्हेत किंवा मांत्रिक जादूटोणा नव्हे. नव्या पराक्रमांना आवाहन करणारी ही पराक्रमांची कहाणी आहे.

प्रेमविषयक गाणी, वसंताची गाणी, दुःखाची गीते! कुठून आली ही सगळी गाणी? हीसुद्धा रूढ विधींपासून अलग झाली. कोणे एके काळी माणसे विवाहप्रसंगी, अंत्यसंस्कारप्रसंगी, पीकका-पणीच्या वेळी अथवा द्राक्षे गोळा करताना ही वेगवेगळी गाणी गात होती. दोन गानवृंद छोट्या गाण्यांची जुगलबंदी करू लागले.

चरख्याशेजारी बसलेल्या मुलीला ही गाणी आठवतात. बाळाला झोके देताना आई ह्या गाण्यांना गाते.

वसंताबद्दलची गाणी फक्त वसंतातच आता गात नाहीत, प्रेमगीते फक्त विवाहप्रसंगीच गात नाहीत.

वीरांबद्दलची, प्रेमाबद्दलची पहिली गाणी कुणी निर्माण केली?

पहिली तलवार अथवा पहिला चरखा कुणी बनविला हे जसे आपल्याला माहीत नाही, तसेच पहिली गाणी कुणी केली हे आपल्याला माहीत नाही. एका माणसाने नव्हे, तर शेकडो पिढ्यांनी हत्यारे, गाणी, शब्द ह्यांना निर्माण केले. गायकाने स्वतःचे गाणे स्वतः रचले नाही, त्याने ऐकलेली गाणी तो दुसऱ्यांना ऐकवत होता. एका गायकाकडून दुसऱ्या गायकाकडे जाताना गीते वाढली, बदलली. अनेक छोट्या निर्झरातून नदी निर्माण होते, त्याप्रमाणे गीतांमधून महाकाव्ये बनली.

'इलीयड' होमरची निर्मिती आहे असे आपण म्हणतो. पण हा होमर कोण? आपल्यापर्यंत त्याच्याबद्दलच्या फक्त दंतकथा येऊन पोहोचल्या. होमर ज्या वीरांच्या कथा गातो, त्या वीरांसारखा खुद्द होमर कीर्तीमान आहे.

वीरांबद्दलच्या पहिल्या गीतांची जेव्हा निर्मिती झाली, तेव्हा गायक अजून स्वतःच्या टोळीशी घट्ट बांधलेला होता. माणसे सर्व सामायिकरीत्या श्रम करीत होती व पिढीच्या सामायिक श्रमातून गाणीसुद्धा निर्माण करीत होती.



दीओनिससच्या सन्मानार्थ नाच

वारसाने लाभलेल्या गीताला जेव्हा गायक बदलायचा, नटवायचा, तेव्हासुद्धा तो स्वतःला कवी म्हणवून घ्यायचा नाही, निर्माता म्हणवून घ्यायचा नाही.

पण माणूस आता "माझे" व "परक्याचे" असा भेद करू लागला. टोळी फुटू लागली, पूर्वीचे ऐक्य नाहीसे झाले. कारागीर स्वतःसाठी काम करू लागला, टोळीच्या ताब्यातील आज्ञाधारक हत्यार असे स्वतःला तो इतःपर मानत नव्हता.

काही शतके उलटतील आणि कवी थेओग्नीस म्हणेल:

"ह्या कवितांवर, माझ्या कलेच्या फळांवर, मी माझी मोहोर उमटवली. त्यांना कुणीही चोरणार नाही, बदलणार नाही. सर्व म्हणतील: 'ह्या कविता मेगाराच्या थेओग्नीसच्या आहेत!'"

टोळीव्यवस्थेतील माणूस असे म्हणू शकला नसता.

माणूस वारंवार "मी" म्हणू लागला. तो काळ खूप मागे पडला, जेव्हा माणसाला तो स्वतः काम करतोय असे भासत नव्हते, तर कुणीतरी त्याच्यामार्फत काम करतोय असे वाटत होते. गायक अजून स्फूर्तीदेवतांबद्दल म्हणत होता, त्याला गाण्याची स्फूर्ती देणाऱ्यांबद्दल म्हणत होता की, "गीताची देणगी" त्याला देवांपासून लाभत होती, पण आता त्याला स्वतःचा विसरही पडत नव्हता:

"स्फूर्तीदेवतांनी मला वचन दिलेय, माझी आठवण विसरली जाणार नाही."

ह्या ओळींमध्ये ग्रीक कवयित्री साफो हिने नव्या-जुन्याचा मेळ घातलाय. साफोचा अजून विश्वास आहे की, स्फूर्तीदेवतांनी तिला शब्द दिले; खाणकामगाराला डोंगरात खाणमाती सापडते त्याप्रमाणे तिला ते भाषेत स्वतःला सापडले नाहीत. पण त्याच कवितांमध्ये एव्हाना कवीचा, निर्मात्याचा, गर्व ऐकू येतो की, त्याचे नाव विसरले जाणार नाही हे त्याला माहीत आहे.

माणूस असा वाढत गेला. आणि जेवढ्या अधिक उंचीवर तो चढला, तेवढी त्याच्या भोवतालची क्षितिजे विस्तारत गेली.

ह्या पुस्तकाबद्दल आणखी काही शब्द

आदिमानवाबद्दलची कहाणी तुम्ही वाचलीत.

हे पुस्तक लिहायला घेण्यापूर्वी आम्हाला अनेक पुस्तके वाचून काढावी लागलीत.

चार्ल्स डार्विन व त्यांचे अनुयायी व्लादीमिर कोवालेव्स्की आणि क्लीमेन्त तिमिऱ्याझेव यांनी आम्हाला हकीकत सांगितली की, माणूस निर्माण होईपर्यंत पृथ्वीवरील सजीव प्राण्यांमध्ये किती बदल घडले.

फ्रीड्रिख एंगेल्स यांच्या पुस्तकावरून आम्हाला समजले, श्रमाने माकडाचे माणसात स्थित्यंतर कसे घडविले.

रशियन इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते इवान पावलोव यांनी आम्हाला समजून घेण्यास मदत केली, माणूस विचार करायला व बोलायला कसा शिकला.

कार्ल मार्क्स, फ्रीड्रिख एंगेल्स आणि व्लादीमिर इल्यिच लेनिन यांच्या पुस्तकांनी, हजारो वर्षांच्या कालावधीतील मानवी समाजाच्या विकासाचे विस्तृत चित्र आमच्यासमोर उघडे केले.

निसर्गशास्त्रज्ञांची, इतिहासलेखकांची, धाडसी संशोधक प्रवाशांची आणखी कित्येक पुस्तके आम्हाला वाचावी लागली.

आणि जर माणसाचा इतिहास अधिक चांगला व तपशीलवार जाणून घेण्याची तुमचीसुद्धा इच्छा असेल, तर आम्ही वागलो तसेच तुम्ही वागा: ज्ञानाच्या मूळ उगमांचा शोध घ्या, पृथ्वी-वरील आणि मानवजातीच्या जीवनांचा अभ्यास केलेल्या शास्त्रज्ञांची पुस्तके वाचा.

आमचा हेतू होता केवळ तुम्हाला विज्ञानाच्या दारांपाशी घेऊन जायचे आणि म्हणायचे: "आत जा!"

प्रिय वाचक,

तुम्ही हे पुस्तक वाचले असेल आणि कदाचित त्यातील गंमतीदार चित्रांना पाहून हसला असाल. मानवजातीचा इतिहास रंजक आणि सुबोध पद्धतीने सादर करू शकणाऱ्या गुणी लेखकांनी पुस्तकातील मजकूर लिहिला आहे. प्रत्येक शास्त्राप्रमाणे, इतिहासशास्त्र वास्तव साहित्यांवर आधारले आहे. त्यात जगातील अनेक म्युझियमांमध्ये जतन केलेल्या सांस्कृतिक साधनांचा समावेश आहे. आमच्या पुस्तकात आम्ही आमचे स्वतःचे छोटुकले म्युझियम निर्माण केले आहे. त्यावर नजर टाकायला आम्ही तुम्हाला निमंत्रण देत आहोत.

माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ताः 'रादुगा' प्रकाशन,
१७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को
११९०२१, सोविएत संघ.


М. Ильин, Е. Сегал

КАК ЧЕЛОВЕК СТАЛ ВЕЛИКАНОМ

На языке маратхи

१००००० वर्षांपूर्वी

२५०००० वर्षांपूर्वी



ताठ उभा माणूस

आदिमानव


सोलो नदीवरील माणूस

सुमारे १० लाख वर्षांपूर्वी, ॲन्थ्रोपोहेनच्या आरंभी, दोन पायांवर ताठ उभे राहून चालणाऱ्या माकडांच्या जातीच्या आरंभापासून माणसाचे पूर्वज निर्माण झाले – पिथेकॅन्थ्रॉप अथवा माकड-माणूस. त्यांच्यामधून आदिमानवांचा उदय झाला – नीॲंडरथाल. आणि सुमारे १ लाख वर्षांपूर्वी आजच्यासारख्या दिसणाऱ्या माणसांचा उदय झाला. सुमारे २० हजार वर्षांपूर्वी आजच्यासारख्या दिसणाऱ्या प्राण्यांचा व वनस्पतींचा उदय झाला.

चतुर्थ कालखंड

१५०००० वर्षांपूर्वी

४०००० वर्षांपूर्वी



ऱ्होडेशियन माणूस

नीॲंडरथाल

क्रोमानोनची माणसे, वरची गुंफा आणि बोस्कोप

आधुनिक माणूस

'द यूनेस्को कूरीयर', ऑगस्ट-सप्टेंबर १९७२, मधील र. झालीगेर यांनी काढलेले चित्र.



रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

ISBN 5-05-000836-0